घटक १

# अनुभवकथन–एक लेखनप्रकार : संकल्पना आणि स्वरूप

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ साहित्याचे स्वरूप आणि वर्गीकरण व्यवस्था
- १.२.२ अनुभवकथन: संकल्पना आणि स्वरूप
- १.२.३ अनुभवकथनपर लेखनाची वैशिष्ट्ये
- १.२.४ अनुभवकथनपर लेखनाची मराठीतील परंपरा
- १.२.५ पर्यावरण आणि साहित्य यांचा सहसंबंध
- १.२.६ कथा सागरेश्वर अभयारण्याची : पर्यावरणीय दृष्टी देणार अनुभवकथन

१.३ समारोप/ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.६ लघुत्तरी प्रश्न सारांश

१.७ दीर्घोत्तरी प्रश्न

१.८ टीपा लिहा.

१.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ / पुस्तके

## १.० उद्दिष्टे

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासातून आपल्याला-

१. अनुभवकथन या लेखनप्रकाराची संकल्पना आणि स्वरूप समजून घेता येईल.

२. अनुभवकथनपर गद्य या लेखनप्रकाराची वैशिष्ट्ये सांगता येतील.

३. इतर लेखनप्रकारांहून अनुभवकथन या प्रकाराचे वेगळेपण अभ्यासता येईल.

४. मराठीतील अनुभवकथनपर लेखनाची परंपरा समजून घेता येईल.

५. अनुभवकथनपर गद्य लेखनासाठी दिशादर्शक ठरतील असे लेखनविशेष समजून घेता येतील.

## १.१ प्रास्ताविक

साहित्याचे कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, निबंध, लघुनिबंध अशा अनेक प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते. वाङ्मयीन रूपबंध आणि अभिव्यक्ती यांच्या वैशिष्ट्यांच्या आधारे हे वर्गीकरण केले जाते. अनुभवकथनपर गद्य हादेखील वरील प्रकारांसारखाच एक वैशिष्ट्यपूर्ण असा लेखनप्रकार आहे. साहित्य जीवनाच्या अनेक पैलूंचा शोध घेते आणि एका कलात्मक रूपात त्यांना अभिव्यक्त करते. अनुभवाच्या वेगवेगळ्या शक्यतांचा मागोवा घेत जगण्याचा अफाट आवाका सतत कवेत घेण्याचा प्रयत्न करते. जगण्याच्या गुंतागुंतीला भिडण्याचा आग्रह धरते आणि त्यातूनच अनुभवाकडे पाहण्याची एक मर्मदृष्टी आपल्याला देते.

त्यामुळे साहित्याचा अनुभव, आस्वाद आणि अभ्यास एक व्यक्ती म्हणून आपल्या धारणा अधिक निकोप करणारा, आपल्या जाणिवा समृद्ध करणारा असतो. परंतु त्यासाठी साहित्याकडे पाहण्याची सजग अशी दृष्टी विकसित होत जाणे गरजेचे असते. अन्यथा साहित्याविषयीचे आणि पर्यायाने जीवनाविषयीचे आपले आकलन सदोष आणि एकारलेले राहण्याची शक्यता असते. उत्तम साहित्य जगण्याच्या ज्या मूलभूत भानाकडे आपल्याला नेऊ पाहते ते समजून घेण्यासाठी वाचक म्हणून स्वतःला घडवत नेणे आवश्यक असते. साहित्याचे अधिकाधिक निकोप आणि सम्यक असे आकलन ही प्रयत्नसाध्य गोष्ट असते. त्यासाठी आपले जीवनविषयक आणि वाङ्मयीन अशा दोन्ही स्तरावरचे एकांगी आणि एकरेषीय पूर्वग्रह दूर ठेवता येणे आवश्यक असते. जगणे आणि कलाव्यवहार या दोहोंमधील वैविध्यपूर्णता, विकसनशीलता आणि सखोल अशी मौलिक अर्थगर्भता यांचे भान सतत जागे ठेवता येणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. अशी व्यापक दृष्टी ठेवता आली तर साहित्याच्या प्रगल्भ आकलनापर्यंत निश्चितपणे पोहोचता येते. विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा हेतू म्हणजे वाङ्मयीन रूपबंधाची वैशिष्ट्ये आणि आवाका समजून घेणे हा असतो. म्हणूनच ललित गद्याचा एक महत्त्वाचा उपप्रकार म्हणून अनुभवकथन या लेखनप्रकाराचा अभ्यास आपल्याला इथे करायचा आहे. अनुभवकथन या लेखनप्रकाराची संकल्पना आणि स्वरूप प्रस्तुत घटकातून आपल्याला विस्ताराने समजून घ्यायचे आहे. साहित्याचे त्याच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपानुसार कविता, कथा, कादंबरी, नाटक, निबंध असे अनेक प्रकार केले जातात. अनुभवकथनपर

ललित गद्य हादेखील अशाच प्रकारचा एक महत्त्वाचा लेखनप्रकार आहे. साहित्याचे हे प्रकार किंवा वर्गीकरणव्यवस्था समजून घेणे साहित्याच्या अभ्यासाला मदत करणारे ठरते. साहित्याच्या रूपबंधाविषयीची, रचनेविषयीची एक समज या अभ्यासातून तयार होत असते. म्हणूनच साहित्याचे स्वरूप आणि साहित्याचे प्रकार यांचे स्वरूप समजून घेणे साहित्याभ्यासात महत्त्वाचे ठरते.

## १.२ विषयविवेचन

### १.२.१ साहित्याचे स्वरूप आणि वर्गीकरण व्यवस्था

साहित्य आपल्या सशक्त अशा भाषिक संरचनेतून मानवी जगण्याचे अत्यंत सूक्ष्म असे पैलू आविष्कृत करते. मानवी जीवनव्यवहार, माणसांचे परस्परांशी आणि सृष्टीशी असणारे नाते, माणसाचे मनोविश्व आणि वर्तनव्यवहार यांचे चित्रण, विश्लेषण, अर्थनिर्णयन आणि सर्जनशील भाष्य करणाऱ्या भाषिक अभिव्यक्तीला स्थूलमानाने साहित्य असे म्हटले जाते. 'सहित' ह्या विशेषणापासून साहित्य हे भाववाचक नाम बनलेले आहे. एकत्र असणे, बरोबर असणे, असा त्याचा शब्दशः अर्थ आहे. शब्द आणि अर्थ यांचे एकत्र अस्तित्त्व 'साहित्य' या शब्दामधून दर्शवले जाते. साहित्यात शब्द आणि अर्थ हे एकमेकांत मिसळलेले असतात, एकजीव झालेले असतात. त्यांची एकसंधता हेच साहित्याचे प्रमुख लक्षण मानले जाते. इंग्रजीतील ए. सी. ब्रॅडली या समीक्षकाने साहित्याची 'व्हेअर साउंड अँड मीनिंग आर वन' अशी व्याख्या केली आहे. त्यातूनही शब्द व अर्थाची ही एकरूपताच अधोरेखित केली गेली आहे. शब्द म्हणजे ध्वनी किंवा अक्षरांचा गट, वर्णसमूह असा विस्तार होत. अशा अनेक शब्दसमूहांचे बनणारे वाक्य व वाक्यसमूहांतून व्यक्त होणारा आशय असा व्यापक अर्थ शब्द या संकल्पनेत सामावलेला आहे. संवेदनांची, विचारांची, कल्पनांची एकसंध अशी रचना असाही अर्थ या संज्ञेत दडलेला आहे. अशा व्यापक अर्थांनी शब्द व अर्थ यांची एकरूपता साहित्य या शब्दात अभिप्रेत आहे. साहित्य हा शब्द इंगजीतील लिटरेचर (literature) या शब्दाला पर्याय म्हणून वापरला जातो. मूळ 'Littera' या लॅटिन शब्दापासून 'लिटरेचर' हा शब्द तयार झाला. Littera ही संज्ञा प्राचीन असून तिचा अर्थ वर्णमालेतील अक्षर किंवा अक्षरे, असा होतो. काळाच्या ओघात लिटरेचर ह्या संज्ञेला अनेक लेखक, तत्त्वज्ञ, समीक्षकांनी अर्थांची वेगवेगळी परिमाणे दिली. त्यामधून या संज्ञेचा अर्थविस्तार होऊन ती अधिक व्यापक, सखोल आणि बहुआयामी बनली. अर्थात काही तज्ज्ञांनी 'जे जे लिहिले जाते असा सर्वच लिखित मजकूर म्हणजे साहित्य' अशी काहीशी अतिव्याप्त व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. तर काहींनी केवळ अभिजात म्हणजे श्रेष्ठ अशा वैश्विक साहित्यालाच साहित्य असे म्हणावे असा आग्रह धरला. अशा दोन्हीही टोकाच्या भूमिका साहित्य या संज्ञेचा योग्य अर्थ समजून घेण्यासाठी स्वीकारार्ह ठरत नाहीत. या दोन्ही भूमिकांचा समन्वय साधता आल्यास साहित्य या संकल्पनेचे अधिक निकोप आकलन हाती लागू शकेल. या दोन्ही भूमिकांचा संदर्भ घेत साहित्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येऊ शकते–

**१. ललित साहित्य**

ललित साहित्य हे लेखकाच्या सर्जनशील आणि बौद्धिक क्षमतेमधून आणि त्याच्या कल्पनाशक्तीतून

निर्माण होते. ललित म्हणजे सौंदर्यपूर्ण अथवा कलात्मक. ललित साहित्याला वास्तवातील व्यक्ती, घटना, प्रसंग, तपशील ह्यांचा पायाभूत आधार असला तरी त्यातून साकारणारा अनुभव ही लेखकाची स्वायत्त अशी कल्पित अभिव्यक्ती असते. त्यामुळे ललित साहित्य हा व्यक्तिनिष्ठ, आणि सर्जनशील अशा संवेदनदृष्टीतून निर्माण होणारी रचना किंवा रूपबंध असतो. सौंदर्यनिर्माण आणि कलात्मक जाणिवेतून ललित साहित्य आकार घेते. त्यातून मांडला गेलेला आशय आणि त्याची प्रत्यक्ष संरचना अशा दोन्ही स्तरावर ही कलात्मकता काम करते. काव्य, कथा, कादंबरी, नाटक हे ललित साहित्याचे प्रमुख प्रकार आहेत. ललितबंध किंवा मुक्तगद्य हेही ललित साहित्याचाच भाग असतात. सर्जनशील कल्पनाशक्ती, वाङ्मयीन रचनेचे कौशल्य, सूक्ष्म निरीक्षण क्षमता आणि जीवनाचे मौलिक असे अर्थनिर्णयन करणारी प्रज्ञा यातून उत्तम ललित साहित्य आकाराला येते.

**२. ललितेतर साहित्य**

वाचकाला विशिष्ट विषयाची विशेषतः वास्तवाची माहिती पुरवणारे, त्याचे वेगवेगळ्या ज्ञानशाखांविषयीचे कुतूहल शमवणारे, त्यातील अद्ययावत असे ज्ञान देणारे साहित्य म्हणजे ललितेतर साहित्य असे म्हणता येईल. ललितेतर साहित्यात कल्पित गोष्टींच्या आविष्काराला फारसे स्थान नसते. वास्तवाचे वर्णनात्मक किंवा तपशीलवार विश्लेषण यांनाच त्यात वाव असतो. विविध ज्ञानशाखांमधील वैचारिक, शास्त्रीय, संशोधनपर, चर्चाचिकित्सात्मक, तत्त्वमीमांसक अशा विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश ललितेतर साहित्यात केला जातो. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र अशा विविध सामाजिक शास्त्रांमधील तसेच मानव्यविद्याविषयक ग्रंथ, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिविज्ञान, वनस्पतिविज्ञान अशा वैज्ञानिक विषयांमधील शास्त्रीय माहिती देणारे, त्याविषयी चर्चा करणारे ग्रंथ, संशोधनपर, वैचारिक अशा सर्व लिखाणाचा ललितेतर साहित्यात समावेश केला जातो. हे साहित्य वस्तुनिष्ठ, बुद्धिप्रेरित, तर्क आणि अनुमानावर आधारित असते. त्यामुळे त्यांतील मांडणी तर्काधारित, वस्तुनिष्ठ अशा स्वरूपाची असते.

**३. ललित व ललितेतर यांच्या सीमारेषेवरचे साहित्य**

विशिष्ट प्रकारचे इतिहास लेखन, प्रासंगिक व्यक्तिचित्रे आणि निबंध, टिपणे, दैनंदिनी स्वरूपाचे लिखाण, चरित्र, आत्मचरित्र, चर्चात्मक गद्य, अनुभवकथनपर गद्य अशा प्रकारच्या लेखनाचा यात समावेश करता येईल. वरच्या दोन्ही प्रकारातल्या लेखनाची काही वैशिष्ट्ये अशा लेखनात एकवटलेली दिसतात. लेखकाच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा पडणारा प्रभाव, रचनेचे, रूपबंधाचे कौशल्य, आणि शैलीदारपणा ही ललित साहित्याची वैशिष्ट्ये ; आणि त्यातून प्रकट होणारे वस्तुनिष्ठ विचार, माहितीपूर्णता, ज्ञानात्मकता ही ललितेतर साहित्याची वैशिष्ट्ये अशी दोन्ही प्रकारातली वैशिष्ट्ये या प्रकारच्या लेखनात सामावलेली असतात. त्यामुळे या लेखनाचा समावेश ललित व ललितेतर यांच्या सीमारेषेवरील लेखन म्हणून करावा लागेल.

साहित्याचा विचार जसा लेखकाच्या दृष्टीने केला जातो; तसाच आस्वादकाच्या म्हणजेच वाचकाच्या संदर्भातून करणेही आवश्यक ठरते. वाचक साहित्याचे वाचन कशासाठी करतो, ह्या प्रश्नाचे उत्तर शोधताना वेगवेगळे हेतू समोर येतात. दैनंदिन आयुष्यातील ताणतणावापासून मुक्त होण्यासाठी चार घटका विरंगुळा, मनोरंजन, स्वप्नरंजन, उद्‌बोधन, जिज्ञासातृप्ती, ज्ञान आणि माहिती मिळविणे, दैनंदिन समस्यांवर उपाय शोधणे अशा विविध हेतूंनी वाचक साहित्याकडे वळतो. पण श्रेष्ठ अशा ललित साहित्याच्या आस्वादासाठी हे हेतू पुरेसे ठरत नाहीत. विदग्ध किंवा श्रेष्ठ अशा साहित्याच्या आस्वाद आणि आकलनासाठी वाचकांकडून अधिकच्या तयारीची, अनुभवक्षमतेची अपेक्षा असते. वाचकाच्या अंगी साहित्याचा आस्वाद घेण्यासाठीची जिज्ञासा आणि सहृदयता, विवेकशील वैचारिक बैठक, बौद्धिक आव्हाने पेलण्याची तयारी असेल तरच त्याची वाङ्मयीन अभिरुची विकसित, संपन्न व प्रगल्भ होऊ शकते. अशा अभिरुचीमधूनच त्याला दर्जेदार व सकस साहित्याचा अनुभव घेता येऊ शकतो. अशा साहित्याने निर्माण केलेल्या मौलिक भानापर्यंत पोहोचता येते. त्यातून त्याच्या जीवनविषयक जाणिवा समृद्ध होऊन आयुष्याचे नवनवे अर्थ त्याला प्रत्ययास येतात. आपल्या अनुभवकक्षेची मर्यादा ओलांडून श्रेष्ठ साहित्याने घडवलेले मानवी मनोविश्वाचे, जीवनाचे विस्तृत, वैविध्यपूर्ण, सर्वांगीण व परिपूर्ण दर्शन अनुभवता येते. त्यातूनच वाचकाच्या अनुभूतीच्या कक्षा विस्तारत जातात. मानवी जीवनाचा अफाट पसारा समजून घेता येतो. त्याची व्याप्ती आणि खोली लक्षात येते. जगण्यातील गुंतागुंतीच्या प्रश्नांची मनोज्ञ उकल होते. संस्कृतीने घडवलेल्या नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांची जाणीव होते. साहित्याच्या आणि कलांच्या सजग अनुभवातून एकूणच मानवी जीवनाविषयीची आपली जाण समृद्ध, प्रगल्भ बनते.

### १.२.२ अनुभवकथन : संकल्पना आणि स्वरूप

अनुभवकथनपर गद्य हा ललित गद्य या साहित्यप्रकारातील एक उपप्रकार आहे. एक स्वतंत्र लेखनप्रकार म्हणून ललित अनुभवकथन या लेखनप्रकाराचे स्वरूप आणि विशेष आता आपण समजून घेऊ. ललित साहित्याच्या अनेक प्रकारांमधील 'ललित गद्य' हा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. ललितगद्यालाच ''ललितलेख', 'आत्मनिष्ठपर गद्य', 'मुक्तगद्य' अशा संज्ञाही वापरल्या जातात. परंतु 'ललित गद्य' ही संज्ञा सर्वसमावेशक असल्यामुळे तीच अधिक समर्पक ठरते. या संज्ञेमध्ये 'आठवणी-अनुभवपर ललित', 'लघुनिबंध', 'प्रवासवर्णनपर ललित गद्य', 'व्यक्तिचित्रणात्मक ललित गद्य', 'ललितलेख' 'अनुभवकथनपर गद्य' असे ललित गद्याचे विविध उपप्रकार सहजपणे सामावले जातात. 'ललितगद्य' हा वाङ्मयप्रकार अत्यंत लवचिक अशा स्वरूपाचा असल्यामुळे त्यामध्ये इतर उपप्रकारांचा विकास झालेला दिसतो. या वाङ्मयप्रकारामध्ये लेखकाला मुक्तपणे आपली अभिव्यक्ती घडवता येते. वाङ्मयप्रकाराची काटेकोर किंवा जाचक अशी बंधने नसल्यामुळे या प्रकाराला इंग्रजीत 'Formless form' ही संज्ञा वापरली जाते. या संज्ञेमधूनही या वाङ्मयप्रकाराचे मोकळेपण किंवा लवचिकता लक्षात येते. प्रामुख्याने १९५० नंतर साहित्यामध्ये 'ललित गद्य' ही संज्ञा अधिक प्रस्थापित आणि रूढ झालेली दिसते. अनुभवकथनपर गद्य हा ललित गद्याचा एक महत्त्वाचा उपप्रकार आहे

''लेखकाच्या विविध अनुभवांचा आविष्कार ललित गद्यामधून होत असतो. या विविधतेची व्याप्ती फार मोठी असते. समूर्तापासून अमूर्तापर्यंत, वास्तवापासून काल्पनिकापर्यंत या अनुभवाचा पल्ला असतो. म्हणूनच एखादे विशिष्ट ऐतिहासिक ठिकाण आणि एका व्यक्तीला एका विशिष्ट रात्री पडणारी स्वप्ने या दोन्हींवर ललितलेखन करता येते. प्रत्यक्षात भेटलेल्या हाडामासांच्या माणसाप्रमाणेच केवळ वाङ्मयीन व्यक्तींवर किंवा त्याहीपुढे जाऊन केवळ कल्पनेतच असू शकतील अशा व्यक्तींवरही लिहिता येते. कुणाचे भाषण हा विषय चालतो. तसाच कुणाचे मौन हाही चालतोच. या परस्परविरोधी टोकांना असणाऱ्या अनुभवांच्या मध्ये वावरणारा लेखक एकच असल्यामुळे अनुभवांचे विषय अत्यंत भिन्न असतानाही त्या अनुभवांना एक समान सूत्र प्राप्त होते. त्या अनुभवांचा आविष्कार होत असताना 'आत्म' ही आविष्कृत होऊन त्याचा लेखनावर रासायनिक स्वरूपाचा परिणाम होतो आणि अनुभव कळताकळताच अनुभव घेणाराही कळत जातो. यशस्वी ललित लेखनात या दोघांचे वेगळे अस्तित्त्व फारसे जाणवत नाही. स्वतःचे, स्वतःभोवतीचे, जाणवणारे, न जाणवणारे, वर्तमान, भूत, भविष्य या तिन्हींमधले व्यापक संदर्भ ज्या ललित लेखकामध्ये जागृत असतात, तोच लेखक असे यशस्वी ललितलेखन करू शकतो.''

**– विनय हर्डीकर**

या सर्व विवेचनावरून ललित गद्य हा अनेक उपप्रकारांना सामावून घेणारा बहुजिनसी, समावेशक आणि लवचिक असा लेखनप्रकार असल्याचे लक्षात येते. अनुभवकथनपर लेखनप्रकार स्वातंत्र्योत्तर काळात अधिक ठळकपणे विकसित झालेला दिसत असला तरी त्याचे मूळ प्राचीन मराठी गद्य परंपरा आणि त्यानंतर अलीकडच्या काळातील 'निबंध', 'लघुनिबंध' यामध्ये सापडते. निबंध, लघुनिबंधाचेच अधिक विकसित रूप म्हणजे आजचे ललित गद्य होय. आणि ललित गद्यातीलच एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे अनुभवकथन होय. अनुभवकथनपर गद्य हे बाह्य स्वरूपावरून निबंधात्मक वाटले, तरी अंतर्गत वैशिष्ट्यांमुळे निबंधापेक्षा वेगळे ठरते. आत्मपरता, अनौपचारिकता हे त्याचे विशेष असले, तरी त्यामध्ये चिंतनशीलता आणि वैचारिकता आणि वस्तुनिष्ठ अशी वास्तवदर्शी शैली यांचेही अनुभवपरत्वे वेगवेगळ्या प्रमाणात प्रतिबिंब दिसून येते. हे लेखन एखाद्या अनुभवाच्या किंवा विषयाच्या निमित्ताने झालेले असते. एखादी घटना, व्यक्तिगत अनुभव अथवा सामाजिक वास्तव टिपणारा घटनाक्रम, विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन ते त्याच्या संकल्पपूर्तीचा आलेख टिपणारा अनुभव, एखादा प्रवासाचा अनुभव किंवा निसर्गानुभव, एखाद्या स्थळाचे दर्शन, एखाद्या कलाकृतीचा अनुभव, एखादा संवेदनानुभव, भावानुभव किंवा विचारानुभव यांचे निमित्त अशा लेखनाला पोषक ठरते. त्या अनुभवाचे सर्वांगाने दर्शन घडवण्याच्या, तो अनुभव अनुभूतीच्या पातळीवर भावजीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर गद्य लेखनातून केला जातो. अनुभवातील संवेदना, भावना, विचार यांच्याशी जोडले गेलेले विविध प्रकारचे पैलू, त्या अनुभवाचे बारीकसारीक कंगोरे आणि तपशील नोंदवण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर लेखनातून केला जातो. त्यातूनच सूक्ष्म सामाजिक निरीक्षणे, जीवनातील गुंतागुंतीचे दर्शन अनुभव कथनातून घडताना दिसते. सामाजिक वास्तवाचे चित्रण घडवताना

अटळपणे अवतरणारी वैचारिकताही या लेखनात येऊ शकते. वरवर पाहता अनुभवकथनपर लेखन निरीक्षण, विश्लेषण, तर्क-अनुमान, प्रमाण आणि तथ्यांची मांडणी अशा गोष्टींचा आधार घेत लिहिले जाते; असे वाटत असले तरी त्याची संरचना शास्त्रीय लेखनाच्या मांडणीप्रमाणे केवळ तर्काधिष्ठित आणि वस्तुनिष्ठ नसते. अनुभवकथनाची संरचना त्या-त्या अनुभवाचा पोत लक्षात घेऊन केली जाते. अनुभवकथनाची एकूण शैली ही त्या अनुभवाचे एकूण जगण्याशी असणारे अतूट आणि सूक्ष्म असे नाते प्रभावीपणे उलगडून दाखवणारी असते. तो अनुभव भाषेतून मांडण्यासाठी कथनाच्या अनेक पद्धतींचा वापर अनुभवकथनातून केला जातो. अनुभवाला चिकटून येणारे आत्मनिष्ठ पैलू, अनुभवाभोवतीचा सामाजिक सांस्कृतिक आशय पचवून निर्माण होणारी वैचारिक पक्वता, आणि अनुभवाचे मर्म शोधू पाहणारी चिंतनशीलता अशा अनेक वैशिष्ट्यांचा वाचकाला एकसंध असा प्रत्यय देणारी अभिव्यक्ती रचण्याचा प्रयत्न अनुभवकथनातून केला जातो.

ललित गद्यात्मक लेखन आत्मपर असल्यामुळे त्यामध्ये लेखकरूपी 'मी' ठळकपणे दिसत राहणे अपरिहार्य असते. 'मी', 'मला' 'माझे' अशी 'मी' ची रूपे त्यात सहजपणे येतात. पण असे असले तरीही ज्या ललित गद्यात 'मी'पेक्षा तो ज्या संवेदनानुभवाच्या, भावानुभवाच्या किंवा विचारानुभवाच्या निमित्ताने बोलत असतो, त्याला अधिक अर्थपूर्णत्व प्राप्त होणे अधिक महत्त्वाचे असते. ज्या लेखनात 'मी'पेक्षा अनुभवाला अधिक ठळकपणे मांडले जाते ते ललित गद्य अधिक गुणवत्तेचे आणि यशस्वी मानावे लागते. कारण अशा ललित गद्यातील अनुभवाचे निवेदन लेखक 'मी' करत असूनदेखील खऱ्या अर्थाने त्यातील 'मी' हा निमित्तमात्र असतो. काही फसलेल्या किंवा सदोष ललित गद्यात मात्र नेमका उलट अनुभव येतो. जेव्हा लेखकामधील 'मी', एखाद्या अनुभवाचा फक्त स्वतःचे प्रदर्शन करण्यासाठीच वापर करतो; तेव्हा ते ललित गद्य रचनेच्या दृष्टीने अपयशी ठरते.

### १.२.३ अनुभवकथनपर लेखनाची वैशिष्ट्ये

#### अ) बहुपेडी आशयसूत्रे सामावून घेण्याची क्षमता

जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये, अनेक पातळ्यांवर झपाट्याने होत जाणारे बदल टिपत त्यातील बहुपेडी आशय सामावून घेण्याची क्षमता अनुभवकथनपर गद्याने लक्षणीयरित्या सिद्ध केलेली दिसते. निसर्ग आणि माणूस यांच्यातील सूक्ष्म नातेसंबंध, मानवी संवेदनांचे बदलत्या भवतालाशी होणारे टकराव, त्यातून उभे राहणारे मानसिक, आर्थिक, सामाजिक असे अनेकपदरी संघर्ष या लेखनातून अचूकपणे टिपले गेले आहेत. या संघर्षातून घडत जाणारे मानवी मन, आकाराला येत जाणारे सामाजिक सांस्कृतिक भवताल,पर्यावरणीय संवेदनेचा होत गेलेला भेसूर संकोच असा समकालीन जीवनदर्शनाचा व्यापक पट अनुभवकथन या वाङ्मयप्रकाराने समर्थपणे कवेत घेतलेला दिसतो. सामाजिक चळवळीतून आकाराला आलेल्या आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक आशयाचे व्यक्ती मनावर उमटणारे ठसे या अनुभवकथनपर गद्यातून ठळकपणे नोंदवले गेलेले दिसतात. आत्मशोधाच्या वाटेने जाणाऱ्या व्यक्तित्त्वावर पडणारा तत्त्वज्ञानात्मक विचारांचा प्रभाव,

त्यातून आकाराला येणारे आधिभौतिक संवेदनांचा शोध घेऊ पाहणारे मनोविश्व अनुभवकथनपर गद्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण असा भाग आहे. ललित कलांचा अनुभव घेताना त्यामागच्या तात्त्विक भूमिकांचा किती खोलवर परिणाम होतो याचे मर्मज्ञ विवेचन अनुभवकथनपर गद्यातून व्यक्त झाले आहे. कलानुभवांचे तात्त्विक स्वरूप उलगडताना त्यातून होणारे रूपतत्वांचे दर्शन, कलांचे सैद्धांतिक आणि सौंदर्यशास्त्रीय दर्शन कलांची व्यापकता आणि मौलिकता समजून घेण्यासाठी किती निर्णायक ठरते याचेही अत्यंत मूलभूत चिंतन अनुभवकथनपर गद्यातून मांडले गेले आहे. सृष्टीकेंद्री आणि पर्यावरणस्नेही जीवनशैलीतूनच जगण्याची खरी समृद्धी हाती लागू शकते याचे लख्ख भान अनुभवकथनपर गद्याने आपल्यासमोर ठेवलेले दिसते. भौतिक उन्नतीच्या रेट्यातून बोकाळत वाढत जाणारा सर्वव्यापी उपभोगवाद आणि चंगळवाद हा एका बौद्धिक, वैचारिक अधोगतीचे कारण ठरतो आहे याची परखड चिकित्सा अनुभवकथनपर गद्यातून केली गेली आहे. ग्रामीण कृषिकेंद्री मूल्यव्यवस्थेची होत जाणारी पडझड, आधुनिकीकरणातून निर्माण झालेले व्यक्तिपुढचे गुंतागुंतीचे प्रश्न, त्यातून व्यक्तीच्या मनोविश्वात निर्माण होणारे ताण, तंत्रज्ञान आणि माध्यमांच्या अतिरेकी वापरातून मानवी संवेदनांना येणारे बथ्थडपण, मानवी संवेदनहीनता अशा या काळातील महत्त्वाच्या प्रश्नांनाही मराठी अनुभवकथनपर गद्याने सखोलपणे स्पर्श केला आहे.

अशा अनेक आशयसूत्रांसह अनुभवकथनपर गद्याची वाटचाल होत गेलेली दिसते. आशयाच्या गुंतागुंतीला संवादी ठरेल असा रूपबंधही अनुभवकथनपर गद्याने सहजपणे घडवत नेला आहे. अनेक वाङ्मयप्रकारांच्या रूपबंधांमधून सत्त्व घेत अनुभवकथनपर गद्याने आपला वैशिष्ट्यपूर्ण असा रूपबंध निर्माण केला आहे. अतिशय लवचिक रूपतत्त्वीय क्षमता असणारा हा वाङ्मयप्रकार या काळात अतिशय प्रभावीपणे वापरला गेल्याचे आढळते. रूपाशयाचे अतिशय प्रयोगशील असे आविष्करण अनुभवकथनपर ललितगद्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वाङ्मयीन कृती ही एक भाषिक घटना किंवा अभिव्यक्ती असते. या भाषिक घटनेत अनेक शैलीशास्त्रीय आणि रूपतत्त्वीय घटक समाविष्ट असतात याचे भान या अनुभवकथनपर गद्याने करून दिले आहे. ललितगद्यासारख्या अनेक वाङ्मयप्रकारांच्या रूपतत्त्वांना सामावून घेणाऱ्या वाङ्मयप्रकारात या रूपतत्त्वांचे एक संश्लेषित संवेदन प्रकट होताना दिसते. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर अनेक नव्या जाणिवांचे आविष्करण मराठी अनुभवकथनपर गद्यातून झाले. अनिल अवचट, अरुण खोपकर, वसंत आबाजी डहाके, नंदा खरे, महेश एलकुंचवार, वसंत आबाजी डहाके, मारुती चितमपल्ली, राजन गवस, आ. ह. साळुंखे, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, कविता महाजन, शिरीष कणेकर, सिसिलिया कार्व्हालो, श्रीकांत इंगळहळीकर, कृष्णमेघ कुंटे, अंबरीश मिश्र, महावीर जोंधळे, प्रवीण बांदेकर, सदानंद देशमुख, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार, समीर गायकवाड, रश्मी कशेळकर, हिमांशू स्मार्त, सचिन कुंडलकर अशा अनेक लेखकांनी अनुभवकथनपर गद्य हा लेखनप्रकार समृद्ध केलेला दिसतो.

**ब) प्रवासानुभव आणि स्थळदर्शनाचा प्रत्ययकारी अनुभव**

प्रवासात आलेले स्थळांचे, निसर्ग चक्रातील ऋतूबदलांचे, घटना-प्रसंगांचे अनुभव व्यक्तीचे आंतरिक

विश्व कसे बदलून टाकतात याचे प्रत्ययकारी दर्शन या प्रवासानुभवातून घडते. प्रवासात भेटणारी माणसे प्रवासाच्या सगळ्या अनुभवालाच कसे नवे आयाम देऊन जातात याचेही दर्शन अनुभवकथनपर गद्यातून प्रभावीपणे घडते. रुळलेल्या वाटा नाकारून नव्या शक्यता आजमावण्याचे आवाहन या लेखनातून व्यक्त होते. सततच्या सहवासाने, सरावाने, आणि अतिपरिचयामुळे एखाद्या ठिकाणच्या अनुभवाला कशा मर्यादा पडतात आणि त्यातून मुक्त होण्यासाठी आपली दृष्टी सतत सावध कशी ठेवावी लागते याचेही दिशादर्शन या अनुभवकथनपर गद्यातून होते. प्रभाकर पाध्ये यांचे 'तोकोनामा' , रा. भि. जोशी यांचे 'मजल दरमजल' आणि 'धनुष्कोडी', अनंत काणेकर यांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा' वसंत आबाजी डहाके यांचे 'यात्रा-अंतर्यात्रा' यासारख्या प्रवासवर्णन आणि स्थळवर्णनपर ललितगद्यातून प्रवास आणि त्यातून हाती लागणाऱ्या समृद्ध अशा जीवनानुभूतीचे विलक्षण आत्मीय आणि चित्रदर्शी दर्शन घडते. इंग्लंडमधील प्रवासाबद्दल लिहिताना तेथील ग्रामीण परिसराचे अतिशय चित्रमय असे दर्शन पु.ल.देशपांडे यांनी घडवले आहे. त्या लेखात ते लिहितात, ''इंग्लंडची सारी शोभा या ग्रामीण इंग्लंडमध्ये आहे. छोटी छोटी वने, उपवने, ओहोळ आणि ओढ्याएवढ्याच चिमुकल्या नद्या, लहानग्या टेकड्या, त्यांतून डोकावणारी ती टुमदार इंग्लिश खेडी, आकाशात घुसणारे प्रार्थनामंदिरांचे कळस, उतरणीवर चरणारे गायींचे किंवा मेंढरांचे कळप, तारांच्या कुंपणावर बसून धावत्या गाडीला हात दाखविणारी इंग्लिश मुलेमुली, एखाद्या पाण्यात गळ टाकून बसलेला म्हातारा, मधून-मधून दृष्टीपुढून सरकणारे एखादे हिरवेगार क्रीडांगण, त्यात रंगात आलेला गावठी क्रिकेटचा सामना, टेकडीवर नागमोडी धावत पळणारे रस्त्याचे मोहक वळण, रंगीबेरंगी लोकरी कार्डिगन्स घातलेल्या, सफरचंदी गालाच्या, सोनेरी केसांच्या तरुणींचा सायकलवरुन पिकनिकला निघालेला आणि रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंगशी अडकलेला घोळका, आगगाडीची दुमदार स्टेशने, एवढ्या एवढ्याशा घरातून डोकावून कडेवरच्या गुबगुबीत गुंड्याला आगगाडी दाखवणारी एखादी गृहिणी, खेड्यातल्या चर्चच्या दाराशी थबकलेल्या पाच-सात इंग्लिश रमाकाकू, ठमाकाकूंचा काळ्या झग्यांतला थवा, ओक वृक्षाखाली तोंडावर हॅट ओढून स्वस्थ झोपलेला एखादा म्हातारा, धिप्पाड घोड्यांची जोडी नांगराला जोडून शेतात राबणारा शेतकरी, ठिकठिकाणी दिसणारी व्हिटनेज एलची जाहिरात, गावागावांना जोडणाऱ्या रस्त्यांतून पळणारी लालभडक बस यातली एकेक दृश्ये म्हणजे कवी-चित्रकाराला आव्हान आहे.''

प्रवासानुभवाचे हे अत्यंत चित्रदर्शी वर्णन त्या त्या स्थळाकडे, प्रदेशाकडे आणि तिथल्या संस्कृतीकडे पाहण्याची नवी दृष्टी देते. आपल्या सरावलेपणाला, साचेबद्ध जाणिवांना अधिकाधिक मोकळे करत आपल्या अनुभवाला एक नवा आयाम देतात. एकूणच स्थळ आणि अवकाशाच्या अनवटपणामुळे प्रवासवर्णनपर अनुभवकथनांमधील नाविन्य जीवनाच्या वैविध्यपूर्णतेचे अनोखे दर्शन घडवणारे आहे. एखाद्या स्थळाकडे पाहण्याची अभिनव दृष्टी आणि वेगवेगळ्या अनुभवांना सामोरे जाताना ते अनुभव सजगपणे घेण्यासाठी लागणारी अभिरुची, सौंदर्यदृष्टी वृद्धिंगत करण्याचा, आणि त्यासाठी आवश्यक अशी दृष्टी देण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर लेखनातून ठळकपणे जाणवतो.

**क) सामाजिक वास्तवाचे अधिक थेटपणे दर्शन घडवण्याची क्षमता**

सामाजिक वास्तवाचे अधिक विस्तृतपणे, नेमके आणि सखोल दर्शन अनुभवकथनपर गद्य लेखनातून ठळकपणे झालेले दिसते. यामध्ये अनिल अवचट, लक्ष्मण माने, आ. ह. साळुंखे, बाबा आढाव, वसुंधरा पटवर्धन, देविदास बागुल, नरेंद्र दाभोळकर, राजन गवस, संपत देसाई अशा काही लेखकांचा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व अशी जीवनमूल्ये त्यांनी आपल्या ललित लेखनातून प्राधान्याने व्यक्त केलेली दिसतात. समाजातील अनेक वास्तव अनुभवांना, त्यातील उग्र होत गेलेल्या सामाजिक प्रश्नांना हे लेखक आपल्या लेखनाद्वारे भिडताना दिसतात. अंधश्रद्धा, बुवाबाजी, देवदासी प्रथा, तळागाळातील मजूर, शेतकरी, कामगार, भटके विमुक्त अशा अनेक लोकांचे प्रश्न मांडण्याचे, त्याचे विविध पैलू तपासण्याचा प्रयत्न या काळातील अनुभवकथनपर गद्यातून सशक्तपणे केला गेल्याचे दिसते. आजच्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या शिखरावर असणाऱ्या युगातही आदिम भटक्या अवस्थेत जगणाऱ्या माणसांचे, प्रचंड सामाजिक विसंगती दर्शवणारे चित्र अनिल अवचट यांच्या 'माणसं' या लेखसंग्रहातील 'अनिकेत' या लेखातून समोर येते. या लेखातील एक अंश पाहू-

''आदिम अवस्थेपासून आजपर्यंत हजारो वर्षाच्या कालखंडात माणसाच्या जगण्याच्या पद्धतीत केवढी उलथापालथ झाली! समाजातल्या बऱ्याच मोठ्या भागाचा चेहरामोहरा संपूर्ण बदलून गेला आहे. पण आज, या घटकेलाही, भटक्यांच्या रूपाने आदिमानवाचे असंस्कृत भयग्रस्त अडाणी जीवन केविलवाणेपणे आपल्यासमोर उभे आहे. ते जीवन आदिम, भटक्या मेंढपाळ संस्कृतीच्या पुढे सरकलेले नाही. आजही भटकी माणसे गवताच्या प्रदेशात आपली गुरेढोरे घेऊन फिरत असतात. छोट्यामोठ्या प्राण्यांच्या शिकारी करून खात असतात. अमीबा-सारखा एकपेशीय प्राणी उत्क्रांत होत होत त्यातून माणसासारखा प्रगल्भ प्राणी बनला. उत्क्रांतीच्या अगदी वरच्या पायरीवर असलेल्या माणसाच्या जगात सर्वात खालच्या पायरीवरचा अमीबा त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह अजून टिकून आहे. तसे काहीसे या भटक्यांचे झाले आहे. ज्या शहरात आयत्या मिळणाऱ्या इमारतींच्या सुख्या भागांमुळे आठ दिवसांत अनेकमजली इमारती उभ्या राहतात, त्याच शहरातल्या डांबरी सडकांवरून, हजारो वर्षे एकाच पद्धतीने पाले बांधून राहणाऱ्या या भटक्या जमातींचे तांडे आपल्या ताडपत्र्या, गोधड्या, चटया गाढवांवर लादून पुढच्या मुक्कामाला चाललेले दिसतात. अंतराळात माणसांसह रॉकेट सोडणे, त्या माणसांनी लाखो मैल अंतरावर रॉकेटातून निर्वातात उतरणे, यानास यान जोडणे, चंद्रावर गाडीने प्रवास करणे यासारख्या नित्य नव्या गमती व धाडसे करणाऱ्यांच्या समाजात ही भटकी माणसे मरीआई, म्हसोबा यांसारख्या आदिम दैवतांना चळचळा कापतात. त्या कोपू नयेत म्हणून हजारो जनावरे दरवर्षी बळी देतात.

शेती-संस्कृती स्थिरावल्यावर या देवतांच्या उपासनांचे स्वरूप सौम्य होत गेले. निसर्गाचे अधिकाधिक ज्ञान झाले तशी संस्कृती प्रगल्भ होत गेली, धार्मिक तत्त्वज्ञाने निर्माण झाली. महाराष्ट्रात संत मंडळींनी या मातृ-पितृ-दैवतांवर कडाडून हल्ला चढवला.

**''नव्हे जाखाई जोखाई। मायराणी मेसाबाई।।**
**बलिया माझा पंढरीराव। जो या देवांचाही देव।।''**

किंवा

**''वेताळे फेताळे। जळो त्याचें तोंड काळें।।**
**तुका म्हणे चित्ती। धरा रखुमाईचा पती।।''**

या शब्दांत त्यांनी या दैवतांची संभावना करून 'सौम्य स्वरूपाचा भक्तिमार्ग' आणि 'विठोबा' हा केवळ नामस्मरणाने जिंकता येईल असा देव रूढ केला. (डी. डी. कोसंबी यांनी तर असे मत मांडले आहे की, कोकण, घाटमाथा या अतिपावसाच्या भागातून पावसाळ्याच्या सुरुवातीला जनावरांचे कळप घेऊन मोठमोठे मानवसमूह भटकत कमी पावसाच्या, गवत भरपूर असलेल्या पठारी भागात येत असत आणि पावसाळा संपल्यावर काही महिन्यांनी मूळ ठिकाणी परत जात. ही भटकी यात्रा त्यांची शेती-संस्कृती स्थिरावण्यापूर्वी हजारो वर्षे चालूच होती. संतांनी या यात्रेला वारकरी दिंडीचे स्वरूप देऊन दोन संस्कृतींचा समन्वय साधला.) मुख्य समाजात या धर्मसुधारणा झाली. त्याला सातआठशे वर्षे लोटली तरी भटक्या समाजात मात्र मातृ-पितृ-देवतांची पकड आजही घट्ट आहे. भटक्यांच्या काही चालीरीती तर अशा आहेत की त्या केवळ आदिमानवाच्या काळातच आचरल्या जात असतील. नुसत्या उपासनांच्या बाबतीतच नाही, तर त्यांची सगळी जीवनपद्धतीच टोळ्या करून राहणाऱ्या आदिमानवासारखी आहे. मात्र या जमाती आदिवासींसारख्या मुख्य समाजापासून दूर व एकत्रित स्वरूपात अस्तित्वात नाहीत. मुख्य समाजात फिरून, नाना धंदे करून वैदू, कैकाडी, वडार यांसारख्या जमाती आपले पोट भरतात. किंवा निरनिराळ्या प्रकारे भिक्षा मागून जोशी, चित्रकथी, वासुदेव, गोंधळी, डवरी, वैरागी इत्यादींसारख्या जमाती आपली उपजीविका करतात. कोल्हाटी, डोंबारी, माकडवाले, मदारी ह्या जमाती करमणुकीचे खेळ करून तर फासेपारधी, मारवाडी-कुंभार, कंजारभाट या जमाती चोऱ्यामाऱ्या करून आपले पोट भरतात. आपल्यात वावरत असून, वर्षानुवर्षे या संस्कृतीची घसट असूनही, हे लोक आदिमानवाच्या संस्कृतीत आजतागायत कसे राहिले असावेत हा अवघडच प्रश्न आहे.''

भौतिक प्रगतीच्या, तंत्रज्ञानाच्या अजस्र अशा वेगात अव्याहत वाहणाऱ्या या काळातही अगदी आदिम अवस्थेत जगणाऱ्या माणसांचे अनिल अवचट यांनी घडवलेले हे वास्तववादी दर्शन आपल्या समाजाच्या विस्मयकारी गुंतागुंतीचे एक भेदक असे रूप उलगडून दाखवते. एकीकडे तंत्रज्ञान, विज्ञान आणि माध्यम क्रांतीच्या महाकाय वेगाने मानवी संस्कृतीला व्यापलेले असताना त्याच संस्कृतीच्या एका स्तरात मात्र जगण्याचे आदिम अवशेष आजही तसेच टिकून असलेले दिसतात. जगातल्या मुख्य प्रवाहातल्या तथाकथित प्रगतीचे, विकासाचे आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे कुठलेच कवडसे तिथे पोहोचलेले नसतात या अंतर्विरोधात्मक वास्तवाचे नेमके भान अनुभवकथनपर गद्यातून व्यक्त होते.

### ड) बदलत्या मूल्यव्यवस्थेचा वस्तुनिष्ठ वेध

जागतिकीकरणाच्या रेट्यात ग्रामीण जीवनातील बदलती मूल्यव्यवस्था, मूल्यांचा होत असलेला ऱ्हास अनुभवकथनपर ललितगद्यातून व्यक्त होतो. तंत्रज्ञान आणि सायबरविश्वाच्या आक्रमणामुळे माणसाच्या जगण्यात होत गेलेली मानसिक उलथापालथ, त्यामधून ढासळत गेलेले व्यक्तीचे संवेदनविश्व अनुभवकथनपर गद्यातून रेखाटले गेले आहे. राजन गवस, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, श्रीकांत देशमुख, समीर गायकवाड, प्रवीण बांदेकर यांच्या लेखनातून या बदलांचे चित्रण आढळते. आधुनिकीकरणाच्या नव्या मूल्यवस्थेत हरवत चाललेल्या मूल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर ललितगद्यातून केला गेला आहे. 'हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध' या ललितगद्य संग्रहातून प्रवीण बांदेकर यांनी मूल्यवस्थेतील बदलाचे एक चित्र रेखाटताना नोंदवलेली निरीक्षणे खूप महत्त्वाची आहेत. आपलं आजचं जगणं कुरतडणारी एक उपभोगवादी आणि नैतिकता हरवलेली व्यवस्था हळूहळू इथल्या भूमीमध्ये कशी पाय रोवत आहे याची नोंद प्रवीण बांदेकरांनी आपल्या अनुभवकथनपर लेखनातून अतिशय नेमकेपणाने घेतलेली आहे. ते लिहितात, ''लहानपणी अनुभवलेलं गाव हळूहळू बदलत जातंय याची जाणीवही व्हायला लागली होती. माणसं बदलली तसा नितळ स्वच्छ पाण्याने भरून वाहणाऱ्या नदीच्या पाण्यानेही आपला रंग बदलायला सुरुवात केली. आरसपानी नितळ नदीपात्रात माडापोफळींचं पडलेलं प्रतिबिंब मिरवणाऱ्या एखाद्या बागेसारखं असलेलं हे गाव कालपरवापर्यंत आरसबागच होतं, हे आता मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीचं गढूळ-प्रदूषित होत चाललेलं पाणी पाहताना काहीतरी खोटं, कल्पनारम्य वाटू लागलंय. नदीचं आणि त्यामुळे गावाचंही बदलत चाललेलं रूप पाहताना अलीकडे अस्वस्थही वाटत राहतं. सगळंच बदलत चाललं आहे. गाव काय किंवा नदी काय, कुणीच कसं अपवाद असणार आहे? बदल हा तर दुनियेचा धर्मच आहे, हे सगळं पटतंय. पण तरीसुद्धा बदलांचं, आधुनिकीकरणाचं बोट धरून चोरपावलांनी शिरणारी, आपलं कालपरवापर्यंतचं शांत, समाधानी, भाबडं जगणं कुरतडणारी आणि मूल्ये, नैतिकता, संस्कृती अशा सगळ्याला कीड लावणारी एक नवी व्यवस्था समोर येऊ लागलीय. आपले तिच्याशी सूर जुळणं जरा कठीणच वाटतंय, हेही मला जाणवतंय.''

(''हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध''- प्रवीण बांदेकर)

ग्रामीण कृषी संस्कृतीलाही या बाजारू संस्कृतीने घातलेला विळखा राजन गवस यांच्या 'लोकल ते ग्लोबल' या अनुभवकथनपर ललितगद्यातील 'किड्या मुंगीने जगावं' या लेखातून अतिशय परखडपणे व्यक्त झाला आहे. आधुनिकीकरणातून अवतरलेला हा उपभोगाचा रेटा आपण थोपवू शकत नाही याची खोल हताशा आणि आपल्या भोवतीची सृष्टी आणि आपला सर्वार्थाने सजीव असा भवताल अखंड टिकून राहावा याविषयीची आत्मीय आस्था या लेखातून अतिशय प्रभावीपणे व्यक्त होते.

''हंगामानुसार या किड्यांची संगतही बदलायची. पावसाळ्यात भेटणाऱ्या मावश्या उन्हाळ्यात भेटायच्या नाहीत. पैसा किडा पावसाळा संपला की, अचानक गायब व्हायचा, घरातली गुळाची ढेप संपली की, डोंगळे-मुंगळे संपावर. मुंग्या तेवढ्याच घरात बाभळीच्या-आंब्याच्या झाडांवर, उन्हात-पावसात

अशीच सतत भेटणारी, वेडावून टाकणारी मैत्रीण गोगलगाय, इवलीशी गोगलगाय कोणत्याही भाजीच्या पानावर तोऱ्यात हिंडायची. चुनखडीच्या शेतात पाठीवर सरकारची. अशा गोगलगाई शोधून जमवणं हा आमचा आवडता उद्योग. गोगलगाईला हळूच उचललं की, ती अंग आकसून शंखात बसायची. अशा पसाभर गोगलगाई गोळा करून घरातल्या सोप्यात पसरल्या की, त्यांच्यातच बाहेर जाण्याची शर्यत लागायची. शेवटी गोगलगाईच त्या. उंबराही गाठू शकायच्या नाहीत आमच्यासमोर.

सगळ्यात वेडावून टाकायचे काजवे. पेरणीच्या दिवसांत. कधी कधी अध्येमध्ये. रात्रीच्या काळोखात राखणीला चाललं की, एखादं झाड अचानक चमकायला लागायचं गडद अंधारात. काजव्यांनी भरलेलं झाड बघणं दुनियेतला अवर्णनीय क्षण! लुकलुकणारं झाड डोळ्यांत साठवत वस्तीच्या ठिकाणी पोचलं की, असे काजवे पकडून खास नेलेल्या बाटलीत भरून घराकडं आणायचे. घरातली सगळ्यात अंधारी खोली मदघर. मदघरात देव्हारा. देव्हाऱ्यावर ही बाटली ठेवली की, देव उजळायचे त्यानेच निर्माण केलेल्या प्रकाशानं!

काळ बदलला. खेड्यापाड्यांत नव्या कीटकनाशकांनी प्रवेश केला. झाडोरा वाढला, हे औषध फवारा. कीड पडली, ते औषध फवारा. चिकटा पडला, हे मारा, मावा पडला, ते फवारा. या फवाऱ्यात आणि पंपाच्या धुस्काऱ्यात शेतातल्या गोगलगाई, वाणी किडे, काळ्या मुंग्या, लाल मुंग्या हळूहळू गायब होताहेत. आता मुंगळे आणि डोंगळे औषधालाही सापडत नाहीत. डोंगळ्याची प्रजातीच नष्ट झाली की काय कुणास ठाऊक! ट्यूबवर किंवा बल्बवर जीव देणं बरं वाटत नाही पतंगाला. नवी पिकं, नवी औषधं यांच्या माऱ्यात क्वचितच भेटतात काजवे. किड्या-मुंग्यांनी-काजव्यांनी बहरलेलं आयुष्य. किड्यानं जगावं, मुंगीनं जगावं म्हणून गुळाचा खडा अंगणात टाकणारी म्हातारी. काजवे बाटलीत भरून, 'मावशीच्या' पंखाला दोरी बांधून एखाद्या मित्राच्या शर्टात वाणी किडा टाकायचा झाला, तर आणायचा कोठून? आता त्या साऱ्याच दंतकथा. पुढे लोकसाहित्याचे अभ्यासक त्यावर पीएच. ड्या. करतील. तेवढं भाग्य जरी किडा-मुंगीला लाभलं तरी चिक्कार!'

आपल्या सर्वार्थाने कोसळणाऱ्या भवतालाचे आणि आपण गमावत चाललेल्या सृष्टीच्या समृद्ध अशा वैभवाचे नेमके भान अनुभवकथनपर गद्य लेखनातून ठळकपणे व्यक्त होते. दिवसागणिक आपण आपल्या मौलिक परंपरेचा अस्सल ठेवा गमावतो आहोत, आपल्या हातून जगण्यातली अनेक मौल्यवान गोष्टी निसटत चालल्या आहेत याची लख्ख जाणीव अनुभवकथनपर लेखनातून प्रभावीपणे व्यक्त झालेली दिसते.

**इ) व्यापक पर्यावरणीय भान घडवणारे अनुभवकथन**

उपभोगवादी आणि चंगळवादी जीवनशैलीच्या हव्यासातून होत चाललेले निसर्गाचे अतोनात शोषण आणि उग्र होत जाणारे पर्यावरणाचे प्रश्न याविषयीचे अत्यंत संवेदनशील भाष्य या काळातील अनुभवकथनपर ललितगद्यातून केले गेले आहे. वाढते हवामान बदल, बिघडत जाणारे ऋतुचक्र, नामशेष होत जाणाऱ्या दुर्मीळ नैसर्गिक प्रजाती, प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांचा विनाश याविषयीची अगतिकता आणि या सर्व

अनागोंदीविरुद्ध संयतपणे दिलेला प्रतिसाद या अनुभवकथनातून व्यक्त होतो. प्रामुख्याने मारुती चितमपल्ली, अनिल अवचट, राजन गवस, श्रीकांत इंगळहळीकर, हिमांशू स्मार्त, प्रकाश गोळे, कृष्णमेघ कुंटे, परिणीता दांडेकर, दिलीप कुलकर्णी, सत्यजित वसंत पाटील, रश्मी कशेळकर, शरदिनी डहाणूकर, विद्याधर म्हैसकर या लेखकांच्या लेखनातून पर्यावरणीय आस्था असणारी दृष्टी व्यक्त होते. आपल्या भवतालातील पर्यावरण, सजीव आणि निर्जीव सृष्टीशी माणसांचे अतूटपणे जोडले गेलेले अनुबंध, निसर्गाविषयी असणारा प्रगल्भ आणि निकोप मैत्रभाव, निसर्गावर होणारे मानवी आक्रमण आणि त्याविषयी वाटणारा तीव्र कळवळा या अनुभवकथनपर ललित गद्यातून ठळकपणे व्यक्त झाला आहे. आपल्या भोवतीच्या जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी या लेखनातून मिळते.

जगण्याचा खरा अर्थ समजण्यासाठी, आपल्या अस्तित्वाची सार्थ ओळख पटण्यासाठी आपण पुरेसे संवेदनशील आणि सजग असायला हवे याचे भान या लेखनातून व्यक्त होते. आपण आपल्या सृष्टीला किती सजगपणे, आस्थेने आणि अभ्यासपूर्ण विवेकाने समजून घेतो यावरच आपली जगण्याची खरी गुणवत्ता अवलंबून असते याची जाणीव या अनुभवकथनातून होते. 'ओकच्या झाडाची गोष्ट' या परिणीता दांडेकर यांच्या ललित लेखातून मानवी संस्कृती आणि मानवी अस्तित्त्व यांच्या व्यापक संदर्भात एका झाडाचे महत्त्व काय असते याचे अत्यंत विलक्षण दर्शन घडते. ऑस्टिन शहरातल्या एका ओकच्या झाडाला घातल्या गेलेल्या विषारी रसायनांपासून वाचवण्यासाठी तिथल्या लोकांनी केलेल्या आत्यंतिक धडपडीचे, त्यांनी दाखवलेल्या निसर्ग संवेदनेचे, आपल्या भवतालाविषयीच्या आणि एकूणच सृष्टीविषयीच्या कृतज्ञतेचे कृतिशील दर्शन घडवते. माणसांनी घडवलेल्या आणि त्यामुळेच अत्यंत मानवकेंद्री बनलेल्या आजच्या आधुनिक जगण्यात झाडांना, पशुपक्ष्यांना, कीटकांना किंबहुना अवघ्या चराचर सृष्टीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असायला हवे. किंबहुना त्यांचे स्थान महत्त्वाचे असतेच, त्याची समंजस जाणीव आणि आपल्या जगण्यातल्या अग्रक्रमात त्याला आस्थेने स्वीकारत जाणे गरजेचे असते. आपल्या जगण्यातून हद्दपार होत चाललेला सृष्टीविषयीचा विवेकी मैत्रभाव जपण्याचे हृद्य आवाहन अनुभवकथनपर ललित गद्यातून प्रभावीपणे होते.

### १.२.४ मराठीतील अनुभवकथनपर गद्य लेखन-परंपरा

फ्रेंच लेखक माँतेनच्या एसेजच्या (१५८०) प्रभावातून लिहिलेल्या 'एसे'मधून इंग्रजीमध्ये 'पर्सनल एसे' या नावाने ललितनिबंध हळूहळू विकसित होत गेला. परंतु मराठीतील ललित गद्य मात्र एकोणिसाव्या शतकात जन्माला आलेल्या मराठी 'निबंधा'मधून निर्माण झालेले नाही, तर ते इंग्रजीमधील चार्ल्स लॅम्ब, डे क्विन्सी यांसारख्या एकोणिसाव्या शतकातील आणि ए. जी. गार्डनर, इ. व्ही. ल्यूकस, रॉबर्ट लिंड यांच्यासारख्या विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकांतील इंग्रजी लेखकांच्या ललित निबंधलेखनाच्या प्रभावातून निर्माण झाल्याचे दिसते. १९२६ साली गुजगोष्टी (पुस्तकरूपात १९३३) या नावाने ना. सी. फडके यांनी लिहिलेले लघुनिबंध किंवा त्याच सुमारास वि. स. खांडेकर यांनी लिहिलेले लघुनिबंध यांच्यापुढे वर उल्लेख केलेल्या इंग्रजी ललित लेखकांचाच आदर्श होता. काही अंशी अनंत काणेकरांचे

ललितनिबंध लेखन त्यापेक्षा थोडे वेगळे होते. फडके, खांडेकर, काणेकर यांनी लोकप्रिय केलेल्या ललित निबंधाच्या परंपरेत अनेक लेखकांनी लेखन केले. पण १९३० नंतर झपाट्याने वाचकप्रिय व लेखकप्रिय झालेला मराठी ललित निबंधाचा प्रभाव १९४०-४५ नंतर मात्र हळूहळू कमी होऊ लागला. कारण त्या लेखनात साचेबद्धता, यांत्रिकता, व्याजलालित्य (नकली किंवा खोटे लालित्य) आणि व्याजवैचारिकता (खोटी वैचारिकता, वैचारिकतेचा केवळ आभास) निर्माण होऊ लागली. १९४५ नंतरच्या काळात मात्र मराठी ललित निबंधाने एक नवी भरारी घेतलेली दिसते. या काळातील समर्थ लेखकांनी ललित निबंधाचे रूप पूर्णपणे बदलून मराठी ललित गद्याचा मजबूत पाया घातला. गो. वि. (विंदा) करंदीकर, दुर्गा भागवत, माधव आचवल, इरावती कर्वे, श्रीनिवास विनायक कुळकर्णी, विजय तेंडुलकर, रा. भि. जोशी, महेश एलकुंचवार, ग्रेस, अनिल अवचट यांचे लेखन ललित गद्याच्या कक्षा विस्तारणारे ठरले. ललित गद्यासंबंधीच्या पारंपरिक, रूढ आणि चाकोरीबद्ध कल्पनांना दूर करून या लेखकांनी या साहित्यप्रकाराला नवी सशक्त संरचना देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लेखनातून विचार, भावना आणि संवेदना यांच्याशी जोडल्या गेलेल्या विविध अनुभूतींचे लालित्यपूर्ण असे सौंदर्य प्रकट होते. या लेखनामधील गद्याला सामर्थ्य देणारी चिंतनगर्भ वैचारिकता त्यातील लालित्यालाही पोषक ठरत गेल्याचे दिसते. ललित निबंध या नावाने न लिहिले जाणारे प्रवासवर्णनात्मक, स्थलवर्णनात्मक, व्यक्तिचित्रणात्मक असे लेखन पुढच्या काळात इतके ललित गद्यस्वरूप होत गेले की, या प्रकारच्या सर्व लेखनाचा विचार एकत्रच केला जावा आणि त्यांना 'ललित निबंध' या संज्ञेऐवजी 'ललितगद्य' अशा अधिक व्यापक आणि समावेशक नावाने ओळखले जावे असे मत साहित्य अभ्यासकांनी व्यक्त केले. मराठीतील ललित गद्य लेखनातील एक महत्वाचा उपप्रकार म्हणून अनुभव कथनपर लेखनप्रकाराचा उल्लेख करता येतो. या लेखनप्रकारात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या काही महत्त्वाच्या लेखकांचा आपण इथे प्रातिनिधिक स्वरूपात आढावा घेणार आहोत.

**१) रा. भि. जोशी**

१९५०-५५ सालापासून मराठीत प्रवासलेखनाच्या रूढ साच्यात फार मोठे बदल झाले. प्रवासलेखनाच्या पारंपरिक स्वरूपात आणि प्रयोजनात फार मोठे परिवर्तन करणाऱ्या लेखकांमध्ये रा. भि. जोशी यांचे नाव अग्रस्थानी आहे. प्रवासलेखनाची आपली 'वाटचाल' त्यांनी रुळलेल्या वाटेने केलेली नाही. काही अनोखे, नवे मार्ग आणि सौंदर्यशोधनाच्या नव्या दिशा चोखाळण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. रा.भिं.जोशींचे ललितलेखन एका अर्थाने आत्मनिवेदनपर आहे. आत्मनिवेदनपर लेखनात प्रत्यक्षाचा, माहितीचा आणि केवळ वस्तुनिष्ठ दर्शनाचा भाग अधिक असणे हे स्वाभाविक असते. हा भाग तसा अललितच म्हणावा लागेल. परंतु अशा अललित वर्णनामध्येही लालित्य निर्माण करण्याची क्षमता रा. भि. जोशींच्या व्यक्तिमत्वात आहे. कारण त्यांच्या प्रवासलेखनात केवळ वर्णन किंवा नुसते निवेदन येत नाही, तर त्यामध्ये एक प्रकारची नवनिर्मितीही असते. ही नवनिर्मिती त्यांच्या अनुभवाचा समृद्धतेतून साकार झालेली असते. प्रवासवर्णनाच्या निमित्ताने लेखक ज्या स्थळाचे वर्णन आपल्या लेखात करतो, ते स्थळ कदाचित वाचकांनी

आधीच पाहिलेले असले तरीही रा. भिं. जोशी यांच्यासारख्या प्रतिभावंत लेखकाने घडविलेल्या त्याच स्थळाच्या पुनर्दर्शनात एक संपूर्णपणे नवी अनुभूती देण्याचे सामर्थ्य असते. कारण स्थळ एकच असले तरी त्याचे दर्शन हा व्यक्तिपरत्वे वेगळा अनुभव ठरत असतो. ती प्रत्येकाची एक वेगळी आणि स्वतंत्र जाणीव असते. त्यामुळे अशा स्थळांचे वर्णन नव्याने वाचताना दर्शनाचा आनंद पुन्हा नव्याने मिळत असतो. या सर्व अनुभवाचे वैशिष्ट्य म्हणजे आपण पूर्वी पाहिलेल्या स्थळाचेच लेखकाने घडविलेले हे दर्शन घटना, नोंदी, त्यांचा इतिहास, पौराणिक कथा, दंतकथा, आख्यायिका आदी पार्श्वभूमींसह अधिकच समृद्ध बनते. या बाबी आपल्याला कशा दिसल्या नाहीत, याचेही आश्चर्य वाचकांना वाटत राहते. आपल्या अनुभवाच्या आनंदाचे अत्तर वाचकांच्याही हाताला लावावे आणि आपल्यासारखे त्यांनाही आनंदित करावे असे त्यांच्यातील लेखकाला सहजपणे वाटते. या स्वाभाविक प्रवृत्तीतूनच त्यांचे प्रवासलेखन अवतरते. मात्र त्यासाठी प्रवासलेखक स्वतः रसिक निरीक्षक हवा. लोकजीवनाचे नवे दर्शन व्हावे याविषयीची ओढ त्याला वाटली पाहिजे. निसर्ग सौंदर्याचा नित्य नवा प्रत्यय त्याला आला पाहिजे. मानवसृष्टी आणि निसर्गसृष्टी यांतील वेचक अनुभवांचा सहजसुंदर आविष्कार करणारी रससिद्ध शैली त्याच्याजवळ असली पाहिजे. रा.भि. जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वात हे सारे गुण एकवटलेले असल्यामुळे त्यांचे ललित लेखन वाचकांना एका समृद्ध अनुभवविश्वाची सफर घडवते. एक 'अजायबघर' (वाटचाल), 'अंबा मनोहर नगरी' (मजल दरमजल), 'जिथे उथव येतो' (उथव), 'पार्वतीचे क्रीडांगण' (घाटशिळेवरी उभी), 'दिवाकर कृष्ण' (सोन्याचा उंबरठा) यासारख्या त्यांच्या उल्लेखनीय लेखांमधून या सकस अनुभवविश्वाचा प्रत्यय येतो. रा. भि. जोशींचे प्रवासलेखन त्यांच्या एकूण वाङ्मयाचे एक सरस आणि अभिरूचीसंपन्न असे अंग आहे. या प्रवासचित्राची एकच एक शैली किंवा प्रकार नाही. यात कधी ते स्थलचित्रे रेखाटतात, तर कधी त्या स्थळांशी संबंध असलेल्या भाववृत्तीचे चित्रण करतात. धर्मप्रवणता (वाई, गाणगापूर, पंढरपूर, औदुंबर इत्यादी), वाङ्मयीन कुतूहल (पैठण, ऋद्धिपूर, एलिचपूर, अंबेजोगाई इत्यादी) ऐतिहासिक आकर्षक स्थळे (लाहोर, दिल्ली, आग्रा, देवगिरी इत्यादी), निसर्ग-शोभा (गोमंतक, गोकर्ण, धनुष्कोडी, कारवार इत्यादी) अशा विविध प्रेरणांमधून शब्दबद्ध झालेले हे सर्व प्रवासलेख मुळात लेखकाच्या प्रसन्न जीवनदृष्टीच्या एका महत्त्वाच्या जीवनसूत्रात गुंफलेले आहेत. म्हणूनच त्यांचे सारे प्रवासलेखन एका अर्थाने जीवनाची वाटचाल करताना आलेल्या अनुभवांचे चित्रण ठरते. मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनात किंबहुना एकूणच ललित गद्यात रा. भि. जोशी यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे.

### २. अनिल अवचट

अनिल अवचट हे मुक्त स्वरूपाचे ललित गद्यलेखन करणारे एक महत्त्वाचे लेखक आहेत. १९७४ ते २००० या पंचवीस वर्षांच्या काळात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ललितगद्य लेखनातून सामाजिक प्रश्नांचे, बदलांचे, नवनिर्माणाचे अत्यंत समृद्ध असे अनुभवविश्व रेखाटले गेले आहे. बहुपेडी वृत्तान्तकथन (रिपोर्ताज) आणि वस्तुनिष्ठ तरीही लालित्याच्या अंगाने केले गेलेले सामाजिक निरीक्षण अशा स्वरूपात त्यांच्या या समग्र ललितलेखनाचे स्थूलमानाने वर्णन आणि वर्गीकरण करता येऊ शकेल. पण अनिल अवचट यांचे

एकूण लिखाणाचा विचार करता हे वर्गीकरण काहीसे अपूर्ण स्वरूपाचे ठरते. कारण अवचटांचे स्फुटलेखन एकाच प्रकारचे नाही. त्यात शैली, आशयविषय, आकृतिबंध अशा दृष्टीने बरेचसे वैविध्य आढळते. प्रारंभीच्या 'वेध' (१९७४) या सदरलेखनातून सिद्ध झालेल्या पुस्तकानंतर अवचट यांच्या लेखनाला अनेक आश्वासक अशा दिशा मिळत गेल्या. त्यातल्या वैशिष्ट्यानुसार आणि काळानुसार 'माणसं', 'मोर', 'कार्यरत', 'आप्त', 'स्वतःविषयी', 'अमेरिका', 'छंदांविषयी' अशा पुस्तकांच्या स्वरूपात काही टप्पे नोंदवता येतील. अवचट यांचे काही लेखन वृत्तान्तपर आहे. अशा वृत्तान्तवजा लेखसंग्रहातील एक महत्त्वाचा संग्रह म्हणजे 'माणसं' हे त्यांचे पुस्तक होय. वस्तुनिष्ठ निरीक्षणे, समाजजीवनाविषयीची, माणसांविषयीची सखोल अशी आस्था, संदर्भबहुलता आणि व्यापक सामाजिक भान ही त्यांच्या ललित लेखनाची वैशिष्ट्ये 'माणसं' या ललित लेखनातून प्रभावीपणे व्यक्त होतात. विश्लेषणाला लालित्याची डूब मिळाल्याने या लेखनाला एक प्रकारचा संवादीपणा प्राप्त होतो. विभिन्न क्षेत्रांत भेटलेल्या माणसांचे विलक्षण अनुभव, स्वतःचा अंतर्मुख होऊन घेतलेला शोध, एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याच्या कार्याचा दीर्घ असा परिचय करून देणे, प्रवासातील अनुभवाचे निवेदन करणे असे त्यांच्या लेखनातील कथनाचे वेगवेगळे प्रकार आहेत. 'मोर'सारख्या संग्रहातील आत्मपर लेखात आत्मनिष्ठा आणि कलात्मकता यांचा समन्वय झाला आहे. 'मोर'मधील काही लेखांत मनाच्या विश्रब्ध अवस्थेतील मनन-चिंतन आहे; तर 'स्वतःविषयी' या पुस्तकात त्यांनी आपल्या जीवनातील वैयक्तिक स्वरूपाच्या अनुभवांचे प्रांजळ निवेदन केले आहे. 'छंदांविषयी'मध्ये त्यांनी स्वतःच्या छंद जोपासनेचा सहजसाध्या शैलीत परिचय करून दिला आहे. एकूणच, अवचट यांच्या लेखनातील 'मी' त्यांच्या लेखनाच्या वेगवेगळ्या दिशा वेळोवेळी निश्चित करीत गेला आहे. सामाजिक स्थितिगतीचा सहानुभूतीने 'वेध' घेणाऱ्या अवचट यांना सामाजिक विषमता, श्रमजीवी, गोरगरीब, पददलित स्त्री-पुरुषांचे समाजात चाललेले शोषण, त्यांच्यावर होणारे अन्याय इत्यादींबद्दल खंत वाटते; काही वेळा त्यांच्या मनात अपराधीपणाची जाणीवही निर्माण होते. सहानुभूतिपूर्ण, प्रत्ययकारी लेखन करणाऱ्या अवचट यांच्या शैलीत विषयवस्तुबद्दलची जिज्ञासा आणि अपार कुतूहल दिसून येते. वर्ण्यविषयाबद्दलची आत्मीयता आणि सहृदयता यांमुळे त्यांचे लेखन कृत्रिम होत नाही; ते सर्व थरांतल्या वाचकांना विचारप्रवृत्त करते. अत्यंत सातत्याने, वैविध्यपूर्ण, प्रदीर्घ आणि अभ्यासू लेखन करून अवचट यांनी गेल्या वीस वर्षांत मराठी ललितगद्य लेखनाच्या अनेक वाटा मोकळ्या केल्या आहेत. सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या आत्मपर लेखनाच्या कलात्मक शक्यता वाढवण्याचे त्यांचे प्रयत्न अत्यंत भरीव स्वरूपाचे आणि लक्षणीय आहेत.

**३. राजन गवस**

बदलती कृषीनिष्ठ ग्रामसंस्कृती, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बदलत चाललेली गाव-खेड्यातील सांस्कृतिक मूल्यव्यवस्था याविषयी वस्तुनिष्ठपणे आणि संवेदनशीलतेने केलेले भेदक असे भाष्य हे राजन गवस यांच्या ललित गद्याचे एक प्रमुख आशयसूत्र आहे. काचाकवड्या (२००६), कैफियत (२०१०) आणि लोकल ते ग्लोबल (२०१९) या तीन ललितलेखसंग्रहातून राजन गवस यांच्या प्रगल्भ अशा

मूल्यभानाचा एक प्रवास ठळकपणे अधोरेखित होतो. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण यांच्या प्रभावातून वाढत गेलेल्या बाजारु मूल्यव्यवस्थेमुळे समृद्ध अशी कृषीनिष्ठ ग्रामसंस्कृती कशी पोखरत गेली याचे अस्वस्थ करणारे चित्र त्यांच्या ललितलेखनातून व्यक्त होते. आपली पारंपरिक ग्रामीण व्यवस्था कृषीकेंद्रित होती. पशुपक्षी, झाडे, वेली, नद्या इतकेच नव्हे तर इथले किडा-मुंगीदेखील आपल्या जगण्याचा, सहजीवनाचा अविभाज्य भाग होता. आर्थिक सुबत्ता नसली तरी पर्यावरणाच्या, निसर्गाच्या समृद्ध भवतालात मानवी जगण्याला एका निरामय आनंदाचा ठहराव होता. माणसांमध्ये निर्मळ प्रेमाचा एक आस्थाभाव टिकून होता. निसर्गाशी अभिन्नपणे जोडल्या गेलेल्या माणसांजवळ रोजच्या अनुभवातून, कष्टातून आणि संघर्षातून उमललेले साधे तरीही सत्त्वयुक्त शहाणपण होते. शेतीशी निगडित अनेक विषयांमधले प्रत्यक्ष अनुभवसिद्ध असे ज्ञान हा ग्रामीण समाजव्यवस्थेचा एक अनमोल ठेवा होता. पण बदलत्या उपभोगवादी आणि बाजारू व्यवस्थेच्या आगमनामुळे तिथली ही पारंपरिक मूल्यव्यवस्था कशी उखडून टाकली जात आहे याचे एक अस्वस्थ करणारे चित्र राजन गवस यांच्या ललितगद्यातून उभे राहते. त्यांच्या लेखांची शीर्षकेही हा आशय सहजपणे पोहोचवणारी आहेत. 'तयार खेळण्यांचं रेडिमेड बालपण', 'डांगर ते बर्गर', 'हलगी ते डॉल्बी' 'किडा-मुंगीने जगावं', 'नोटा छापण्याचे मशीन' अशा बोलक्या शीर्षकांमधून या सर्व आशयसूत्रांचे अर्थवाही सूचन होते. संवेदनशीलता आणि परखडपणा, आस्था आणि चिकित्सा, साधेपणा आणि नेटकेपणा यांच्यातील अचूक समतोल साधणारी वाङ्मयीन दृष्टी हे राजन गवस यांच्या अनुभवकथनपर गद्याचे लक्षणीय असे वैशिष्ट्य आहे.

**४) अरुण खोपकर**

'चित्रव्यूह', 'चलतचित्रव्यूह', 'अनुनाद', 'कालकल्लोळ' आणि 'प्राक-सिनेमा' अशा पाच पुस्तकांमधून अरुण खोपकर यांचे मुक्तचिंतनात्मक ललित गद्यलेखन प्रसिद्ध झाले आहे. या सर्वच लेखनातून जाणवणारे एक समान सूत्र म्हणजे त्यांचे कलाविषयक चिंतन होय. चित्रपट आणि साहित्य हे त्यांचे खास आस्थेचे विषय आहेत. या दोन्ही कलांमधील विविध पैलूंचा वेध त्यांनी आपल्या ललितगद्यातून प्रभावीपणे घेतला आहे. जगभरच्या कला-व्यवहाराचे चौफेर भान असणाऱ्या एका प्रगल्भ कलादृष्टी लाभलेल्या व्यक्तिमत्त्वाचे समृद्ध अनुभवविश्व या लेखनातून प्रकट होते. चित्रपटकलेमध्ये सहभागी असणाऱ्या परंतु बऱ्याचदा पार्श्वभूमीलाच राहणाऱ्या अनेक घटकांचे, तंत्र आणि तंत्रज्ञानाविषयीचे मूलभूत असे चिंतन या लेखनातून व्यक्त होते. लेखकाला भेटलेले अनेक लेखक, कलावंत, दिग्दर्शक, त्यांचे कलाविषयक दृष्टिकोन या लेखनातून प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत. पु. ल. देशपांडे, मामा वरेरकरांसारख्या साहित्यिकांपासून ते बारा भाषा येणाऱ्या पानवाल्यापर्यंत आणि जहागीर सबावाला, भूपेन खक्कर अशा मोठ्या चित्रकारांपासून ऋत्विक घटक, गुरुदत्त यांच्यासारख्या चित्रपटकर्त्यांपर्यंत अनेक प्रकारच्या कलावंतांचे जाणिवविश्व या लेखनातून उलगडत जाते. एखादा कलावंत किंवा अभ्यासक विशिष्ट विषयात अभ्यास करत, प्रवास करत खोल-खोल जात राहतो तेव्हा त्याला त्या कलेतील काही मूलभूत आणि व्यापक असे भान हाती लागते. संत तुकारामांच्या भाषेत कलेतले 'बीजमूळ' सापडत जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणून अरुण खोपकरांच्या

ललित गद्यलेखनाकडे निर्देश करता येईल. अरुण खोपकर आपल्या लेखनातून विविध कलांची मूलभूत तत्त्वे कशी एकमेकांशी जोडली गेली आहेत, हे नेमकेपणाने उलगडून दाखवतात. वेगवेगळ्या ज्ञानशाखा एकमेकींना किती पूरक ठरतात, त्या ज्ञानशाखांचा परस्परांशी किती जवळचा संबंध असतो हे सांगतात. त्यामुळे कलावंताने आणि आस्वादक अभ्यासकानेही केवळ एकाच साच्यात, एकाच विचारधारेत अडकणे किती धोक्याचे असते हे ते सहजपणे लक्षात आणून देतात. कलांच्या आस्वाद, आकलनात विविध ज्ञानशाखांमधील विचाराचा किती मोलाचा सहभाग असतो, हे या लेखनातून स्पष्ट करतात. आणि अशा समतोल आकलनामधूनच कलावंताला कलेविषयीची एक व्यापक अशी दृष्टी प्राप्त होऊ शकते; याची लख्ख जाणीव करून देतात. खोपकरांची भाषा कुठेही कृत्रिम होत नाही. केवळ परिभाषेतल्या क्लिष्टतेत अडकून पडत नाही. देश विदेशातल्या विविध विषयांच्या संदर्भांची रेलचेल असूनही त्यातली भाषेची आंतरिक लय आणि डौल टिकवून ते टिकवून ठेवतात. मराठी भाषेच्या अभिजात सौष्ठवाची जाणीव करून देताना ते वर्तमान काळातल्या मराठी संस्कृतीची परखडपणे चिकित्साही करतात. कलेतल्या वैश्विकतेचे, त्यातून समृद्ध होत जाणाऱ्या एका कलासाधकाचे अभिजात मुक्तचिंतन म्हणून अरुण खोपकरांचे अनुभवकथनपर गद्य लेखन अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**५) वसंत आबाजी डहाके**

'यात्रा-अंतर्यात्रा' या प्रवासवर्णनपर ललित गद्यसंग्रहामधून वसंत आबाजी डहाके यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाची जडणघडण कशी होत गेली याचे हृद्य असे दर्शन घडते. लेखकाच्या लिहिण्याचा आणि त्याच्या आंतरिक आणि बाह्य प्रवासाचा नेमका काय संबंध असतो याचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखनातून केला गेला आहे. आपण अनुभवतो ती स्थळे, प्रदेश, अवकाश आपल्या भावविश्वावर, सर्जनशीलतेवर आणि जीवनदृष्टीवर नेमका काय परिणाम करतात याविषयीचे चिंतनशील भाष्य या लेखनामधून व्यक्त होते. लेखकाच्या घडण्यात व्यक्तिगत वर्तनापासून ते आपण ज्या सामाजिक पर्यावरणात वाढतो त्यातील गुंतागुंतीपर्यंत अनेक पैलूंचा असणारा सहभाग यात नोंदवला गेला आहे. डहाके यांच्या 'गोष्ट : न सांगता येण्याविषयीची' या ललित लेखसंग्रहातून मानवी संस्कृतीमधल्या दडपल्या गेलेल्या, बाहेर न येऊ शकलेल्या अनेक मूक संवेदनांना, 'आतल्या गोष्टींना' अत्यंत आत्मीयतेने शब्दरूप दिले गेले आहे. समाजाकडून सतत दाबल्या गेलेल्या, कोंडलेल्या आणि बंदिस्त झालेल्या गोष्टी सांगण्यासाठी एक मुक्त अवकाश असला पाहिजे अशी आस्था या लेखनातून व्यक्त होते. अशा अव्यक्त गोष्टी सांगण्यातच आयुष्याचे सार्थक आहे म्हणूनच 'लिहिणं' हे एक प्रकारे सूक्ष्मरूपाने 'सार्थपणे जगणंच आहे' असा जगण्याचा नवा सर्जनशील अन्वयार्थ ते या ललित गद्यातून वाचकांसमोर ठेवतात. आपल्या विवेकदृष्टीला अनेक कारणांमुळे आलेले आंधळेपण नष्ट व्हावे, त्यासाठी भवतालातल्या काळोखाचे नवे भान आपल्याला यायला हवे याची सखोल आणि मर्मग्राही मांडणी करतात. जगण्यातल्या वेगवेगळ्या रूपातल्या या काळोखाच्या खऱ्या भानातूनच अंधार आणि उजेड यांचा खरा अर्थ आपल्याला सापडू शकेल असा विश्वास त्यांच्या लेखनातून व्यक्त झाला आहे. आपल्या जगण्याचा आणि कलांचा अतूट संबंध त्यांच्या

लेखनातून ठळकपणे उलगडत जातो. 'पाहणं' हेही एक प्रकारचे वाचनच असते. अशा शब्दात त्यांनी दोन कलानुभवांच्या परस्परांशी असणाऱ्या एकसंध नात्याचा सार्थ शोध अत्यंत प्रभावीपणे घेतला आहे. एका अर्थाने सर्वच कलांचा शोध हा 'मूर्त शब्दरूपाकडून अमूर्त अर्थरुपाकडे' कसा झेपावत राहतो याचे अत्यंत मूलगामी आणि चिंतनशील असे दर्शन त्यांच्या ललित लेखनातून होत राहते. लिहिणे ही केवळ एक भाषिक कृती एवढेच नसून जीवनाच्या बहुपेडी रूपाचा एक कलात्मक शोध असतो याचे नेमके चित्र डहाके यांच्या ललितगद्यातून प्रकट होते. जगणे म्हणजे नुसते जीवन व्यतीत करणे नसून जीवनाला सर्जनशील आकार देत राहणे असते. याचे प्रगल्भ असे भान त्यांच्या ललितगद्यातून व्यक्त होते. डहाके यांच्या व्यक्तिमत्त्वातील चिंतनशीलता, काव्यात्मक दृष्टी, संयत आणि समंजस अशी जीवनदृष्टी आणि जीवनाच्या प्रगाढ सखोलतेचे भान ही वैशिष्ट्ये त्यांच्या अनुभवकथनपर गद्यातूनही ठळकपणे प्रकट होतात.

**६) कृष्णमेघ कुंटे**

'एका रानवेड्याची शोधायात्रा' हे कृष्णमेघ कुंटे यांचे ललितगद्य लेखन म्हणजे रुळलेले, रूढ असे हमरस्ते नाकारून समृद्ध अनुभवाच्या नव्या पायवाटा शोधू पाहणाऱ्या एका संवेदनशील तरुणाचे अनुभवकथन आहे. महाविद्यालयात रसायनशास्त्राच्या परीक्षेत नापास झाल्यामुळे वाट्याला आलेल्या रिकाम्या वेळेचा लेखकाने केलेल्या सर्जनशील उपयोगाचे वर्णन या लेखनातून केले गेले आहे. त्याने या फावल्या वेळेत केलेल्या मदुमलाईच्या जंगलाच्या सफरीची ही विलक्षण अशी गोष्ट आहे. परीक्षेतल्या अपयशाने खचून न जाता जंगलात प्राणीनिरीक्षणासाठी जाण्याचा निर्णय कृष्णमेघला एक नवी दृष्टी देतो. या सर्व जंगलप्रवासाचे थरारक आणि रोमांचक आणि सुंदर अनुभवांनी भरलेले हे अनुभवकथन एक विलक्षण असा रोमांचक आणि समृद्ध करणारा अनुभव देते. जंगलातले हत्ती, रानगवे, रानकुत्री यांच्यासह साऱ्या जंगल अनुभवांचे केवळ वस्तुनिष्ठ आणि तटस्थ चित्रण यात येत नाही तर त्यांच्यासोबत आस्थेने केलेल्या सोबतीचे, सहप्रवासाचे संवेदनशील दर्शन या लेखनातून घडते. मदुमलाईच्या जंगलाचे, त्यातल्या वनस्पती, पशुपक्षी आणि इतर जीवांचे, निसर्गाच्या रौद्ररूपाचे, गूढ अशा अरण्यविश्वाचे हे प्रत्ययकारी दर्शन आपली जीवनाविषयीची समज वाढवणारे आहे.

**७) सदानंद देशमुख**

सदानंद देशमुख यांच्या अनुभवकथनपर गद्य लेखनातून जगण्यातील सर्जनशीलतेपुढील दुहेरी आव्हानांचे अत्यंत मनस्वी असे चिंतन व्यक्त होते. आधुनिकीकरणाच्या रेट्यात होत असलेल्या खेड्यातील कृषीनिष्ठ संस्कृतीच्या ऱ्हासाचे अस्वस्थ चित्र त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. त्यांच्या ललित गद्यातून शेती आणि सर्जनशीलतेचा एक घनिष्ठ असा संबंध प्रभावीपणे व्यक्त होतो. माती हे सर्जनाचे, नवनिर्मितीचे प्रतीक आहे. मातीची नवनिर्मितीची क्षमता ही मानवी जगण्यातली एक मौलिक गोष्ट असते. आधुनिकतेच्या रेट्यात कृषीनिष्ठ अशा ग्रामीण संस्कृतीत 'हाराकी' म्हणजेच महायब्रीड, रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा प्रवेश झाला आणि त्यातूनच मातीची ही सर्जनशीलता धोक्यात आली. आधुनिकतेच्या नावाखाली चंगळवादाची चटक खेड्यापाड्यात शेताबांधावर पोहोचली. 'हाराकी'च्या विषारी व्यवस्थेने आपली समृद्ध

अशी सर्जनशील भूमी नासवली याचे विषन्न करणारे दर्शन सदानंद देशमुख यांच्या 'भुईरिंगणी' या ललितगद्यसंग्रहातून घडते. सिमेंट काँक्रीटच्या बांधकामापेक्षाही मजबूत अशी मातीने बांधलेली गावातील शंभर फुटी गढी, ट्रॅक्टर-ट्रॉलीने अगदी सहजपणे भुईसपाट करता येते याची हताश जाणीव लेखक व्यक्त करतो. हे भीषण आधुनिक वर्तमान माणसाच्या संहारशक्तीचे अतिशय भयावह असे रूप दाखवते. मनात आणलं तर माणूस काहीही नष्ट करू शकतो हे भीषण वास्तव सदानंद देशमुख यांच्या ललितगद्यातून व्यक्त होते. 'कातरकळा', 'जीवकाचणी', 'कापूसकाळ', 'उतरकरी', 'दुखणकरी', या त्यांच्या लेखांच्या शीर्षकांमधूनदेखील ही अगतिकता प्रभावीपणे प्रकट होते.

**८) श्रीकांत देशमुख**

श्रीकांत देशमुख यांच्या 'पडझड वाऱ्याच्या भिंती' या ललितगद्य संग्रहातून ग्रामीण, कृषिनिष्ठ अशा माणसांचे, त्यांच्या चैतन्यमय भावविश्वाचे एक हृद्य असे दर्शन घडते. ग्रामीण संस्कृतीशी अतूटपणे जोडल्या गेलेल्या माणसांचे विलक्षण जग या लेखनातून उलगडत जाते. 'पहाटपाळणा', 'बापू', 'मामाचा गाव' आणि 'गोविंदबाग' यासारख्या ललितलेखांमधून लेखकाची कौटुंबिक जडणघडण आणि कौटुंबिक पार्श्वभूमीचा लेखकाच्या भावजीवनावर पडलेला प्रभाव व्यक्त झाला आहे. या लेखनाचे स्वरूप वरवर काव्यात्मक आणि संवेदनशील व्यक्तीचित्रणाचे असले तरी लेखकाची व्यापक सामाजिक जाण, वैचारिक बैठक आणि मानवतावादी दृष्टी या लेखनाला एक प्रगल्भ जीवनचिंतनाच्या स्तरावर घेऊन जाते. या लेखनातून सर्वच पातळ्यांवर होत चाललेली मानवी संवेदनांची, निसर्गसाखळीची, आधुनिकतेच्या अतिरेकातून संकोचत चाललेल्या सांस्कृतिक मूल्यांची पडझड लेखकाने आंतरिक तळमळीतून व्यक्त केलेली आहे. लेखकाचे व्यक्तिगत भावजीवन, आसपासच्या मायाळू कष्टकरी माणसांशी जोडलेले त्याचे नातेबंध आणि एकूणच माणसांचे परस्परांशी असणारे आपुलकीचे आस्थेचे आणि स्नेहाचे बंध एका आंतरिक तरलतेतून लेखकाने व्यक्त केले आहेत.

**९) प्रवीण बांदेकर**

प्रवीण दशरथ बांदेकर हे आजच्या काळातील अत्यंत सखोल अशी जीवनदृष्टी असणारे लेखक आहेत. समकालीन जगण्यात निर्माण झालेल्या, अनेक कंगोरे असणाऱ्या प्रश्नांना विस्तृत अवकाश असणाऱ्या कथात्मक वाङ्मयप्रकारातून त्यांनी समर्थपणे अभिव्यक्त केले आहे. कादंबरीप्रमाणेच ललितगद्यासारख्या आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकारातूनही त्यांनी आजच्या काळाविषयीचे चिंतनशील भाष्य नोंदवणारे अत्यंत महत्त्वाचे लेखन केले आहे. 'घुंगुरकाठी', 'हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध' यासारखे ललितगद्य आणि 'अरते ना परते' या लेखसंग्रहातून त्यांनी केलेले गद्यलेखन ललितगद्य या वाङ्मयप्रकाराच्या नव्या शक्यता आणि सामर्थ्यस्थळे शोधणारे आहे. आपल्या भवतालातील मूल्यांचा होत जाणारा ऱ्हास, या मूल्यऱ्हासामुळे संवेदनशील माणसांची आणि सर्जनशील कलावंतांची होणारी कोंडी या ललित गद्य लेखनातून आंतरिक कळवळ्यातून टिपली गेली आहे. एका बाजूला बदलत्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचे अत्यंत सूक्ष्म असे भान या लेखनातून व्यक्त होते, तर दुसरीकडे या परिस्थितीत

संवेदनशील माणसाच्या नितळ जाणिवा कशा पणाला लागतात याचे हृद्य चित्रण त्यांच्या ललित गद्यातून केले गेले आहे. आपल्या भूमीविषयीचा अपार आस्थाभाव त्यांच्या ललितगद्यातून ठळकपणे व्यक्त होतो. आजच्या काळात होत चाललेले निसर्गाचे अपरिमित असे शोषण आणि त्यातून उभे राहणारे व्यापक पर्यावरणीय प्रश्न बांदेकरांच्या अनुभवकथनपर ललितगद्यलेखनातून अतिशय भेदकपणे मांडले गेले आहेत.

**१०) श्रीकांत इंगळहळीकर**

'आसमंत' आणि 'नवा-आसमंत' या ललितगद्यसंग्रहांमधून श्रीकांत इंगळहळीकर आपल्या सृष्टीकडे, निसर्गातील समृद्ध अशा विश्वाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी वाचकाला देतात. निसर्गातील अनेक आविष्कारांचा, सृष्टीचक्रातल्या बदलांचा वेध या लेखनातून अत्यंत आत्मीयतेने घेतला गेला आहे. निसर्गातील अनोख्या वनस्पतीविश्वाचे आणि त्यातल्या विलक्षण अशा वैविध्यपूर्ण अनुभवाचे वेधक दर्शन इंगळहळीकरांच्या ललित लेखनातून घडते. निसर्गाबद्दलचे अपार कुतूहल, सृष्टीतील अज्ञाताचा वेध घेण्याची अखंड जिज्ञासा आणि त्यातील बारकावे टिपण्याची दृष्टी यामुळे हे ललित लेखन आपल्या भवतालातील अपरिचित अशा अद्भुत जगाचे विलक्षण दर्शन घडवते. निसर्गातील बदलांकडे अधिक निकोपपणे आणि पूर्वग्रहरहित विवेकाने पाहण्याचा नम्र आग्रह या लेखनातून व्यक्त होत राहतो. आपल्या संकुचित मानवकेंद्री अशा दृष्टीला इंगळहळीकर अधिक विस्तारीत अशा सृष्टीकेंद्री विश्वाचे समंजस भान आणून देतात. मराठी साहित्यातील अनुभवकथनपर गद्यलेखनाला श्रीकांत इंगळहळीकर यांनी दिलेले योगदान अत्यंत मूलगामी आणि अभूतपूर्व असे आहे.

**११) डॉ. आ. ह. साळुंखे**

डॉ. आ. ह. साळुंखे यांची महाराष्ट्रातील महत्त्वाचे प्रागतिक विचारवंत, संशोधक आणि लेखक म्हणून स्वतंत्र आणि ठळक अशी ओळख आहे. वैचारिक आणि संशोधनात्मक लेखनाबरोबरच त्यांनी अतिशय मौलिक, चिंतनशील ललितगद्य लिहिले आहे. व्यक्ती आणि समष्टी यांच्या बौद्धिक, मानसिक, भावनिक अंगांचे विवेकी परिवर्तन व्हावे याची तीव्र तळमळ त्यांच्या अनुभव कथनपर ललितगद्यातून व्यक्त होते. आशयाला अनुकूल ठरतील असे पत्रात्मक, चिंतनात्मक, काव्यात्मक आणि संवादरूप अशा प्रकारांचा लवचिक असा वापर त्यांच्या ललितगद्य लेखनातून प्रभावीपणे केलेला दिसतो. 'तुझ्यासह आणि तुझ्याविना', 'चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून!', 'त्यांना सावलीत वाढवू नका!', 'शंभर कोटी मेंदू, दोनशे कोटी हात', 'मन निरभ्र व्हावं', 'मित्रांना शत्रू करू नका!' अशा पुस्तकांमधून आणि त्यांच्या लक्षणीय अशा शीर्षकांमधूनही त्यांच्या ललितगद्याच्या शैली आणि आशयाची दिशा सूचित होते. आ. ह. साळुंखे यांच्या ललितगद्यातून व्यक्ती आणि समाजातील अनेक स्तरात जगणारी सामान्य माणसे म्हणजेच व्यष्टी आणि समष्टी यांच्या समग्र परिवर्तनाची संवेदनशील अशी तळमळ व्यक्त होते. जगण्यातल्या संघर्षाला सामोरे जाण्यासाठी समाजातील सर्वच स्तरातील सामान्य माणसांना ऊर्जा मिळावी आणि जगण्यातल्या निरामय आनंदाचे क्षण त्याला अनुभवता यावेत, याची तळमळ त्यांच्या लेखनातून व्यक्त होते.

जीवनाकडे बघण्याच्या निर्मळ आणि निकोप दृष्टीचे दर्शन या लेखनातून घडते. त्यांच्या ललित लेखनातून कुठल्यातरी पारलौकिक, खोट्या विश्वाचे भाबडे स्वप्न दाखवले जात नाही. वास्तव जीवनाची निरर्थकता दाखवणारी निराशावादी भूमिका किंवा खोटे सांत्वनही त्यातून केले जात नाही. तर माणसाचे रोजचे जगणे अधिकाधिक प्रगल्भ आणि उन्नत होण्यासाठी हवी असलेली दिशा त्यांच्या ललित गद्यातून अचूकपणे दर्शवली जाते. त्यांच्या समग्र ललित गद्यातून इहवादी आणि लौकिक जीवनदृष्टीचा आग्रह व्यक्त होतो. विवेकी आणि विज्ञानवादी दृष्टीने जीवनाला सामोरे गेल्यास आपण आपले आणि इतरांचेही जीवन खऱ्या अर्थाने सुंदर आणि अर्थपूर्ण करू शकतो याचा विश्वास त्यांच्या ललितगद्यातून सार्थपणे प्रकट होतो. जीवनातल्या प्रत्येक क्षणामधली मौलिकता आणि सौंदर्य लक्षात आले तरच जगण्याचा अर्थ आपल्याला कळू शकेल अन्यथा 'जीवन कळायला लागतं, तेव्हा ते संपत आलेलं असतं!' अशा अतिशय कठोर वास्तवाला सामोरे जावे लागते याचे नेमके भान त्यांच्या ललित लेखनातून व्यक्त होते. तरल संवेदनशीलता, सामाजिक उत्थानाची तीव्र आकांक्षा, आणि जगण्यातले सौंदर्य आणि निरागसतेची उत्कट ओढ यामुळे हे ललितगद्य एक चिंतनशील, काव्यात्मक तरीही अत्यंत प्रखर असा वैचारिक दृष्टिकोन वाचकाला देते.

**१२) सत्यजित पाटील**

सत्यजित वसंत पाटील यांचे 'कुब्र' हे अनुभवकथनपर गद्यलेखन म्हणजे अरण्य अनुभवाच्या चिंतनशील अशा नोंदी आहेत. 'एका शुष्क पानझडी जंगलातल्या नोंदी' अशा उपशीर्षकातून लेखकाने या लेखनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. जंगलातल्या अनेक ऋतूंमधल्या निरीक्षणांमधून हे लेखन आकाराला येते. जंगलातले बिबटे, तरस, वाघ, रानकुत्री, अजगर त्याचप्रमाणे फुलपाखरे, मुंग्या अशा अनेक सजीवांबद्दलचे अनुभव या लेखनातून नोंदवले गेले आहेत. जंगल हे अनेक जीवांच्या, वनस्पतींच्या आणि प्राकृतिक आविष्कारांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेली एक समृद्ध परिसंस्था असते. या परिसंस्थेमध्ये दिवसेंदिवस मानवी हस्तक्षेप वाढतच चालला आहे. त्याचे दुष्परिणाम ग्लोबल वॉर्मिंग, वाढते प्रदूषण, अवर्षण आणि इतर पर्यावरणीय समस्यांमधून आज आपण अनुभवतोच आहोत. हा मानवी हस्तक्षेप असाच वाढत राहिला तर संपूर्ण सृष्टीवर त्याचे खूपच गंभीर असे दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे जंगल आणि एकूणच निसर्गाचे समृद्ध वैभव जपण्याचे आवाहन या लेखनातून व्यक्त होते. अरण्याच्या समृद्ध अनुभवातून सृष्टीने आपल्याला दिलेल्या वैभवाचे मोल किती मोठे आहे याची जाणीव होते. आणि मानवाच्या हव्यासामुळे, वाढत्या उपभोगवादी जीवनशैली मुळे, चंगळवादामुळे नष्ट होत चाललेले हे वैभव जपण्याची तीव्र गरज अधोरेखित होते.

## १.२.५ पर्यावरण आणि साहित्य यांचा सहसंबंध

पर्यावरण आणि साहित्य यांच्या सहसंबंधाचा प्रामुख्याने दोन अंगांनी विचार करता येतो. साहित्य निर्माण करणारा लेखक हा अनेक घटकांनी आकाराला आलेल्या एका व्यापक पर्यावरणाचा भाग असतो. त्या पर्यावरणाशी त्याचे अतूट असे नाते असते. त्यामुळे लेखकाचे आपल्या पर्यावरणाशी असणारे व्यक्तिनिष्ठ, सामाजिक, सांस्कृतिक नाते, त्याचा आपल्या भवतालातील पर्यावरणाकडे बघण्याचा दृष्टिकोन

हा पहिला स्तर आणि त्याच्या साहित्यातून आविष्कृत स्तरावर साहित्य आणि पर्यावरण यांच्या सहसंबंधाचा विचार करता येतो. लेखकाने आपल्या भवतालातील पर्यावरणाचा त्यातील गुंतागुंतीचा अधिक व्यापक विचार करणे अतिशय आवश्यक असते. अधिक सखोलपणे पाहिल्यास आजच्या काळात आपल्या जगण्याला व्यापून असणारे अनेक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रश्न अंतिमतः पर्यावरणीय जाणिवांशी निगडित असल्याचे लक्षात येते. आजच्या काळात आपल्या जगण्याला विळखा घालू पाहणाऱ्या बाजारू संस्कृतीच्या उन्मादामुळे पर्यावरणाचे अतोनात नुकसान होत आहे. या काळात केवळ वस्तू खरेदी करणारे ग्राहक हीच आपली पहिली आणि अंतिम ओळख बनवण्याचे अनेक प्रकल्प हाती घेतले जात आहेत. वस्तूंच्या खरेदीमध्येच आयुष्यातील खरा आनंद लपला आहे असे भासवणारे आणि चातुर्याने आपल्याला पटवून देणारे एक धूर्त व्यापारी जग आपल्याभोवती निर्माण झाले आहे. दुर्दैवाने हे षडयंत्र कळण्याइतके भान फार थोड्या विवेकी लोकांकडे असते. आणि वस्तूंच्या मागे धावण्याच्या या शर्यतीत सामील झाल्यामुळे अशा सजग लोकांच्या बोलण्या-लिहिण्याकडे पुरेसे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नाही. याच बाजारू विश्वाच्या विळख्यामुळे आजच्या काळातील पर्यावरणापुढे कधी नव्हे इतके अक्राळविक्राळ आणि भीषण प्रश्न उभे राहिले आहेत. या प्रश्नांचे नेमके भान आपल्याला करून देण्यासाठी त्यावरचे मूलभूत आणि नेमके उपाय शोधण्यासाठी आपल्याला साहित्य खूप मोलाची मदत करत असते. त्यामुळे पर्यावरणाच्या निकोप आणि समृद्ध वाढीसाठी साहित्य आणि प्रगल्भ अशा साहित्य निर्मितीसाठी पर्यावरण परस्परांना अत्यंत पूरक ठरते. मानवी जीवनासंदर्भात 'परिसर' ही अत्यंत अर्थपूर्ण आणि अपरिहार्य अशी संकल्पना आहे. अपरिहार्य या अर्थाने की मानवाच्या एकंदरच जगण्यावर ती अत्यंत प्रभाव टाकत असते. म्हणूनच साहित्याचा अभ्यास आणि साहित्याची निर्मिती करणाऱ्या प्रत्येकाचे पर्यावरण विषयक भान सजग,सखोल आणि विवेकी असणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यासाठी लेखक , साहित्याचे अभ्यासक विद्यार्थी आणि रसिक यांनी आपले पर्यावरण आणि परिसरशास्त्र याविषयीचे भान जागृत ठेवणे, त्यासाठी आवश्यक तो अभ्यास करणे अनिवार्य ठरते. पर्यावरणीय भान घडवणाऱ्या काही महत्त्वाच्या संकल्पनांचा येथे थोडक्यात विचार करू.

**पारिस्थितिकी : परिसर, परिसंस्था आणि समष्टी**

मानवी व्यक्तिमत्वाची संपूर्ण जडणघडण परिसराच्या बहुमितीय प्रभावांतून होत असते. मानवाची जैविक घडण ही व्यापकार्थाने नैसर्गिक बाब असली, तरी त्याची शारीरिक व सांस्कृतिक घडणही परिसराच्याच संदर्भाने होत असते. कोणताही परिसर हा अनेकार्थानी वैशिष्ट्यपूर्ण असतो. कारण तो परिसर मुळात एक वैशिष्ट्यपूर्ण पर्यावरण लाभलेला स्वयंपूर्ण असा परिसर असतो. त्या परिसराचे प्राकृतिक स्थान, भौगोलिक रचना, नद्या, ओढे, नाले, डोंगर, शेती, जंगल, झाडे-झुडपे, पशुपक्षी, कीटक, सरीसृप अशा अनेक लहानसहान घटकांचे अस्तित्व त्या परिसराला वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वयंपूर्ण असे पर्यावरण बहाल करीत असते. कोणताही माणूस त्या विशिष्ट परिसराच्या पर्यावरणाचा अतूट असा भाग असतो. मानवाच्या संदर्भात हे पर्यावरण अपरिहार्य तर असतेच पण अर्थपूर्णही असते. कारण मानवाचे जगणे हे पर्यावरणाच्या संदर्भातच अर्थपूर्ण ठरते. मानवी विकासक्रमामध्ये पर्यावरण हे जीवन आणि मृत्यू अशा सर्वंकष पातळ्यांना

व्यापून असते. मानवाच्या जीवनानुभवांची इतिकर्तव्यता परिसर व त्या परिसराच्या पर्यावरणातच सिद्ध होत असते. म्हणून आपल्याला 'पर्यावरण हा मानवी जीवनाचा भाग' अशा दृष्टीने पाहून भागत नाही, तर 'मानवी जीवन हेच पर्यावरणाचा भाग असते' या दृष्टीने पर्यावरणीय जाणिवांकडे पाहणे अनिवार्य ठरते. 'जसे पर्यावरण तसा माणूस' यातून माणूस आणि पर्यावरण यांचे साहचर्य अधोरेखित होते.

निसर्गात विविध प्रकारचे सजीव असतात. त्यांमध्ये वनस्पती व प्राणी यांसारखे जैविकदृष्ट्या प्रगत व जटिल सजीव असतात, तर कवके, अमीबा, जीवाणू इ. साधे व सरल सजीवही असतात. यांपैकी कोणताही लहान किंवा मोठा, साधा किंवा जटिल सजीव एकटा जगू शकत नाही. प्रत्येक सजीव कोणत्या ना कोणत्या प्रकारे इतर सजीव किंवा पर्यावरणातील अजैविक (निर्जीव) घटकांवर अवलंबून असतो. उदा., एखाद्या परिसरातील गवत नष्ट केले, तर त्या परिसरातील हरिणांसारखे प्राणी अन्नासाठी दुसरीकडे निघून जातात किंवा त्यांची उपासमार होते. त्याच पद्धतीने वनस्पतीसुद्धा पोषक घटक मिळविण्यासाठी त्यांच्या परिसरावर अवलंबून असतात. कारण प्राण्यांचे मलमूत्र तसेच मृत प्राणी व वनस्पती यांच्या ऱ्हासातून तयार होणारे घटक तिथल्या वनस्पतींसाठी गरजेचे असतात. सजीवांचे अस्तित्व आणि सुस्थिती पर्यावरणीय आंतरसंबंधावर अवलंबून असल्यामुळे पारिस्थितिकीचा अभ्यास गरजेचा असतो. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात झालेला एखादा क्षुल्लक बदल आपल्यावर आणि आपल्या पर्यावरणावर परिणाम करू शकतो. पारिस्थितिकी तज्ज्ञ निसर्गातील संघटनांचा अभ्यास तीन पातळीवर करतात: (१) समष्टी (पॉप्युलेशन) : एखाद्या ठिकाणी, कोणत्याही दिलेल्या काळी असलेल्या सजीवांच्या एखाद्या जातीतील (किंवा गटातील) सर्व सजीव. (२) समुदाय (कम्युनिटी) : एखाद्या ठिकाणी, दिलेल्या काळी परस्पर आंतरक्रिया असलेल्या सजीवांच्या विविध जातींतील सर्व सजीव. (३) परिसंस्था : जैविक समष्टी मिळून जैविक समुदाय होतो, समुदायाची त्याच्या सभोवतालच्या अजैविक घटकांशी आंतरक्रिया होत असते. असे समुदाय आणि अजैविक घटक मिळून परिसंस्था बनते.

**(१) समष्टी :** नानज अभयारण्यातील सर्व माळढोक पक्षी मिळून त्यांची समष्टी बनते, तसेच एखाद्या वनात असलेले सर्व साग वृक्ष त्यांची समष्टी दाखवितात. पारिस्थितिकी तज्ज्ञ समष्टीत झालेली वाढ निश्चित करतात, तिचे विश्लेषण करतात आणि प्रत्येक जाती व पर्यावरणाची स्थिती यांतील आंतरसंबंध शोधतात.

### १.२.६ कथा सागरेश्वर अभयारण्याची : पर्यावरणीय दृष्टी देणारे अनुभवकथन

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' हे धों. म. मोहिते यांचे अनुभवकथन पर्यावरणीय भान जागृत झालेले एक मानवी मन पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनाच्या हेतूने अत्यंत मौलिक असे काम उभे करण्यासाठी किती प्रेरक ठरू शकते याचे अतिशय मनोज्ञ दर्शन घडवते. पर्यावरणविषयक कृतिशील आणि रचनात्मक काम करण्याची आकांक्षा असणाऱ्या असंख्य संवेदनशील माणसांसाठी हे अनुभवकथन अत्यंत दिशादर्शक ठरते. असंख्य व्यक्तींना एकेकट्या पातळीवर पर्यावरणाचे महत्त्व पटत असते. त्यासाठी काहीतरी करण्याची इच्छाही असते मात्र एकट्या व्यक्तीला आपण नेमके काय करावे. हे अनेकदा उमगत नाही.

आजच्या काळात पर्यावरणाची असंख्य गुंतागुंतीची आणि अक्राळविक्राळ आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत. एकट्या माणसाच्या ताकदीच्या बळावर ती कशी पार होतील याविषयीची साशंकता बहुसंख्य लोकांना असते. एकटा माणूस काहीही करू शकणार नाही हा याविषयीच्या एकूण चर्चांचा सारांश असतो. या पार्श्वभूमीवर सांगली जिल्ह्यातील (तेंव्हाचा सातारा जिल्हा) निसर्गमित्र धों. म. मोहिते या एकट्या माणसाने स्वतःमधील दुर्दम्य इच्छाशक्ती आणि पर्यावरणविषयक आस्थेच्या बळावर एक अभयारण्यच निर्माण करून एका नव्या पर्यावरणीय अधिवासाची उभारणी केली, याचे अत्यंत प्रेरणादायी अनुभवकथन धों. म. मोहिते यांनी आपल्या 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या पुस्तकातून केले आहे.

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' हे अनुभवकथनपर गद्य म्हणजे एका अभयारण्याच्या उभारणीचा केवळ इतिहास नाही, तर ग्रामीण महाराष्ट्रातील पर्यावरणीय प्रबोधन आणि संवर्धनाची एक प्रेरणादायी कहाणी आहे. एका कृतिशील पर्यावरणीय जाणिवेचे महत्त्वाचे दस्तऐवजीकरण आहे. लेखकाने आपल्या अनुभवकथनातून तत्कालीन दक्षिण सातारा (आताचा सांगली जिल्हा) या अवर्षणग्रस्त, पशुधनावर अवलंबून असलेल्या प्रदेशाचे एका समृद्ध, जैवविविधतेने नटलेल्या अधिवासात झालेले रूपांतर साक्षेप आणि प्रभावीपणे मांडले आहे. कृष्णा नदीच्या सुपीक खोऱ्यात वसलेला, तरीही सिंचनाच्या दुर्लक्षामुळे सतत अवर्षणग्रस्त ठरलेला, तत्कालीन दक्षिण साताऱ्याचा पूर्व भाग – हेच नंतरचे सांगली जिल्ह्याचे वाळवा, कडेगाव आणि पलुस तालुके होय. दुधारी, दह्यारी, ताकारी, तुपारी, लोणारी अशी गावांची नावे म्हणजे पशुधनावर अवलंबून असलेल्या लोकजीवनाचीच साक्ष देणारी आहेत. वर्षानुवर्षे दुष्काळाच्या झळा सोसत जगणाऱ्या या परिसरातील लोकांकडे फक्त कष्ट आणि निसर्गाशी झुंज यांचीच काय ती संपत्तीची एकमेव ठेव होती. याच भागातील एका खेड्यातील संवेदनशील, जिद्दी, आणि स्वप्नाळू तरुण म्हणजे धोंडिबा महादेव मोहिते. आपल्या गावासाठी काहीतरी करण्याचे ध्येय उराशी ठेवून वाटचाल करणाऱ्या धों. म. मोहिते यांनी केलेल्या अथक प्रयत्नाचे एक प्रेरणादायी कथन 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनपर गद्यलेखनातून व्यक्त होते. आपल्या भागातील एका साध्या परिसराचे एका समृद्ध अधिवासात केलेले रूपांतर त्यांच्या या अनुभवकथनातून अत्यंत प्रत्ययकारी पद्धतीने चित्रित झाले आहे. माणदेशातून येणारे धनगरांचे तांडे, त्यांच्यामागोमाग फिरणारे मेंढ्यांचे व शेळ्यांचे कळप, आणि त्यामागचा सततचा पाण्याचा संघर्ष पाहून त्यांच्या मनात एक विचार दृढ झाला – या वैराण भूमीला पाणी मिळालेच पाहिजे. पाणी मिळाले, तर झाडे उगवतील, आणि झाडे आली, तर निसर्ग पुन्हा सजीव होईल. गावातील एका वृद्धाने सांगितलेल्या साध्या पण क्रांतिकारक विचाराने मोहितेंच्या मनात वृक्षारोपणाचे बीज पडले. आणि त्यातूनच त्यांनी गावच्या चावडीवर आपली कल्पना मांडली. प्रारंभी ग्रामस्थांनी उपहासाने नाकारलेल्या या कल्पनेला सातत्यपूर्ण जनजागृती, शासनस्तरीय पाठपुरावा आणि दूरदृष्टी यांची जोड मिळाल्यानंतरच गती प्राप्त झाली.

या प्रक्रियेत महत्त्वाचा टप्पा म्हणजे धों. म. मोहिते यांनी तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांना पत्र पाठवून आपली कल्पना त्यांच्यापर्यंत पोहोचवली. पक्षीय भेद न मानता यशवंतराव चव्हाणांनी या

संकल्पनेला पाठिंबा देत वनखात्याला कार्यवाहीचे आदेश दिले. परिणामी, १९७१ साली पहिल्या वृक्षारोपणाचा शुभारंभ झाला आणि सागरेश्वर अभयारण्याच्या निर्मितीची औपचारिक सुरुवात झाली. आज सागरेश्वर अभयारण्य देशातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य म्हणून ओळखले जाते. शिसम, ऐन, किंजळ, चिंच, कडुनिंब, निलगिरी, खैर, पळस, बांबू अशा वृक्षप्रजातींनी नटलेले हे जंगल साळींदर, काळविट, सांबर, चितळ, अस्वल, गवे, कोल्हे यांसह अनेक प्राणी आणि मोर, नीलकंठ, बुलबुल, खंड्या अशा पक्ष्यांचे, अजगरासह विविध सर्पप्रजाती यांचे अधिवासस्थान बनले आहे. कथा सागरेश्वर अभयारण्याची या अनुभवपर गद्य लेखनातून या सर्व प्रवासाचे अत्यंत प्रेरक चित्रण अभिव्यक्त झाले आहे. या अनुभवकथनाचा एक महत्त्वाचा हेतू म्हणजे एका वैराण, दुष्काळग्रस्त प्रदेशाला सजीव आणि पर्यावरणपूरक अधिवासात रूपांतरित करण्याच्या प्रक्रियेचे शास्त्रशुद्ध आणि संवेदनशील असे चित्र उभे करण्याचा असल्याचे जाणवते. कथा सागरेश्वर अभयारण्याची हे अनुभवकथन म्हणजे केवळ एक पर्यावरणीय यशोगाथा नसून, ती एका व्यक्तीच्या न थकणाऱ्या जिद्दीची, निसर्गप्रेमाची आणि सामूहिक प्रयत्नांच्या सामर्थ्याची सजीव साक्ष आहे.

## १.३ समारोप

माणसाच्या मनात निर्माण होणारा कोणताही विचार त्याला येणाऱ्या विविध अनुभवांवरून सुचतो. सुचलेल्या विचारांना मिळतीजुळती अशी अनेक उदाहरणे तो आपल्या तसेच इतरांच्या जीवनातून किंवा पुस्तकांमधून शोधतो. स्वतःला नंतर येणारे अनुभव त्या विचारांशी ताडून पाहतो. त्यातूनच तो जीवनात काही आडाखे, नियम बांधून जीवन सुकर, सुंदर, आणि समृद्ध करतो. म्हणजेच मनात आलेले विचार हे अनुभव, उदाहरणे, दृष्टांत, पुरावे देऊन मांडण्याची प्रवृत्ती साहित्यात प्राचीन काळापासून आढळते. ती एकूण वैचारिक आणि ललित वाङ्मयात स्पष्ट-संदिग्ध, स्थूल-सूक्ष्म, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आणि प्रतीकात्मक स्वरूपात तसेच अनुभव, माहिती, वर्णन, शोध यांच्या स्वरूपात सर्वत्र दिसते. ललित वाङ्मयाच्या सर्व प्रकारांमध्ये ती दाखविता येते. महानुभावांचे दृष्टांतपाठ, ज्ञानेश्वरीतील दृष्टांत ही त्याचीच उदाहरणे आहेत. निबंध हा त्यातीलच एक तर्कनिष्ठ आणि विचारांना महत्त्व देणारा प्रकार आहे. अनुभवकथनपर लेखनप्रकार स्वातंत्र्योत्तर काळात अधिक ठळकपणे विकसित झालेला दिसत असला तरी त्याचे मूळ प्राचीन मराठी गद्य परंपरा आणि त्यानंतर अलीकडच्या काळातील 'निबंध', 'लघुनिबंध' यामध्ये सापडते. निबंध, लघुनिबंधाचेच अधिक विकसित रूप म्हणजे आजचे ललित गद्य होय. आणि ललित गद्यातीलच एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे अनुभवकथन होय. अनुभवकथनपर गद्य हे बाह्य स्वरूपावरून निबंधात्मक वाटले, तरी अंतर्गत वैशिष्ट्यांमुळे निबंधापेक्षा वेगळे ठरते. आत्मपरता, अनौपचारिकता हे त्याचे विशेष असले, तरी त्यामध्ये चिंतनशीलता आणि वैचारिकता आणि वस्तुनिष्ठ अशी वास्तवदर्शी शैली यांचे प्रतिबिंब दिसून येते. हे लेखन एखाद्या अनुभवाच्या किंवा विषयाच्या निमित्ताने झालेले असते. एखादी विशिष्ट घटना, व्यक्तिगत अनुभव अथवा सामाजिक वास्तव टिपणारा घटनाक्रम, एखादा प्रवासाचा अनुभव किंवा निसर्गानुभव, एखाद्या स्थळाचे दर्शन, एखाद्या कलाकृतीचा अनुभव, एखादा संवेदनानुभव, भावानुभव किंवा विचारानुभव यांचे

निमित्त अशा लेखनाला पोषक ठरते. त्या अनुभवाचे सर्वांगाने दर्शन घडवण्याच्या, तो अनुभव अनुभूतीच्या पातळीवर भावजीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न अनुभवपर गद्य लेखनातून केला जातो. अनुभवातील संवेदना, भावना, विचार यांच्याशी जोडले गेलेले विविध प्रकारचे पैलू त्या अनुभवाचे बारीकसारीक कंगोरे आणि तपशील नोंदवण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर लेखनातून केला जातो. त्यातूनच सूक्ष्म सामाजिक निरीक्षणे, जीवनातील गुंतागुंतीचे दर्शन अनुभव कथनातून घडताना दिसते. सामाजिक वास्तवाचे चित्रण घडवताना अटळपणे अवतरणारी वैचारिकताही या लेखनात येऊ शकते. वरवर पाहता अनुभवकथनपर लेखन निरीक्षण, विश्लेषण, तर्क-अनुमान, प्रमाण अशा गोष्टींचा आधार घेत लिहिले जाते असे वाटते पण त्याची संरचना शास्त्रीय लेखनाच्या मांडणीप्रमाणे तर्काधिष्ठित नसते. अनुभवकथनाची संरचना त्या-त्या अनुभवाचा पोत सांभाळून केली जाते. अनुभव कथनाची एकूण शैली ही त्या अनुभवाचे जगण्याशी असणारे अतूट असे नाते प्रभावीपणे उलगडून दाखवणारी असते. तो अनुभव भाषेतून मांडण्यासाठी कथनाच्या अनेक पद्धतींचा वापर अनुभव कथनातून केला जातो. अनुभव, सामाजिक सांस्कृतिक चिंतन, आणि वैचारिकता यांचा वाचकाला एकाच वेळी एकत्रित असा प्रत्यय देणारी एक संरचना निर्माण करण्याचा प्रयत्न अनुभवकथनातून केला जातो.

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' हे धों. म. मोहिते यांचे अनुभवकथन पर्यावरणीय भान जागृत झालेले एक मानवी मन पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनाच्या हेतूने अत्यंत मौलिक असे काम उभे करण्यासाठी किती प्रेरक ठरू शकते याचे अतिशय मनोज्ञ दर्शन घडवते. पर्यावरणविषयक कृतिशील आणि रचनात्मक काम करण्याची आकांक्षा असणाऱ्या असंख्य संवेदनशील माणसांसाठी हे अनुभवकथन अत्यंत दिशादर्शक ठरते.

कथा सागरेश्वर अभयारण्याची हे अनुभवकथनपर गद्य म्हणजे एका अभयारण्याच्या उभारणीचा केवळ इतिहास नाही, तर ग्रामीण महाराष्ट्रातील पर्यावरणीय प्रबोधन आणि संवर्धनाची एक प्रेरणादायी कहाणी आहे. एका कृतिशील पर्यावरणीय जाणिवेचे आत्मीय स्वरूपात केले गेलेले महत्त्वाचे दस्तऐवजीकरण आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**१. रूपबंध-** लेखक एखादे पुस्तक लिहिताना (संहिता) विचारांची, कल्पनेची जी विशिष्ट अशी रचना किंवा मांडणी करतो त्याला साहित्यकृतीचा रूपबंध असे म्हणतात. रूपबंधालाच आकृतिबंध किंवा घाट असेही म्हटले जाते. रूपबंधात संहितेचे भाषिक रचना, लेखनाची शैली यांना महत्त्व असते.

**२. 'मी'त्त्व-** व्यक्ती किंवा लेखक यांच्या जडणघडणीतून तयार झालेली त्याची मते, भावना, कल्पना, विचार यांमधून त्याचा जो व्यक्तिगत दृष्टीकोण निर्माण होतो त्याला 'मी'त्त्व असे म्हणतात.

## १.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

१. इंग्रजीतील कोणत्या समीक्षकाने साहित्याची 'व्हेअर साउंड अँड मीनिंग आर वन' अशी व्याख्या केली आहे.

अ) रॉबर्ट फ्रौस्ट　　　　ब) ए. सी. ब्रॅडली

क) विल्यम गोल्डिंग　　　　ड) जॉन पॉल सार्त्र

२. 'एका रानवेड्याची शोधायात्रा' हे अनुभवकथनपर लेखनाचे पुस्तक कोणी लिहिले आहे?

अ) सत्यजित पाटील　　　　ब) श्रीकांत इंगळहळीकर

क) कृष्णमेघ कुंटे　　　　ड) संपत देसाई

३. .......... हे अनुभवकथनपर पुस्तक अनिल अवचट यांनी लिहिलेले आहे.

अ) हरवलेल्या पावसाचा शोध　　　　ब) लोकल ते ग्लोबल

क) आसमंत　　　　ड) माणसं

४. 'यात्रा-अंतर्यात्रा' या अनुभवकथनपर ललित गद्याचे लेखक कोण आहेत?

अ) राजन गवस　　　　ब) रा. भि. जोशी

क) वसंत आबाजी डहाके　　　　ड) अरुण खोपकर

५. 'चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये म्हणून' या अनुभवकथनपर ललित गद्याचे लेखक कोण आहेत?

अ) आ. ह. साळुंखे　　　　ब) पु. ल. देशपांडे

क) संपत देसाई　　　　ड) नरेंद्र दाभोळकर

**उत्तरे :** १. (ब) ए. सी. ब्रॅडली　　२. (क) कृष्णमेघ कुंटे　　३. (ड) माणसं

४. (क) वसंत आबाजी डहाके　　५. (अ) आ.ह.साळुंखे

## १.६ लघुत्तरी प्रश्न

(१) ललित आणि ललितेतर साहित्य म्हणजे काय ?

(२) साहित्याची वर्गीकरण व्यवस्था म्हणजे काय?

## १.७ दीर्घोत्तरी प्रश्न

(१) अनुभवकथनपर लेखनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) अनुभवकथनपर लेखन करणाऱ्या मराठीतील महत्त्वाच्या लेखकांच्या योगदानाची चर्चा करा.

(३) अनुभवकथनपर लेखनाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

## १.८ टीपा लिहा.

१) अनिल अवचट यांचे अनुभवकथनपर लेखन.

२) धों. म. मोहिते यांचे पर्यावरणविषयक आणि लेखन कार्य

३) अनुभवकथनपर लेखनाचे स्वरूप

४) डॉ. आ. ह. साळुंखे यांचे अनुभवकथनपर लेखन

## १.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ / पुस्तके


१. साहित्य: अध्यापन आणि प्रकार (प्रा. वा. ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ), संपादक : श्री.पु.भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने

२. ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास- आनंद यादव


❍❍❍

घटक २

# कथा सागरेश्वर अभयारण्याची : कथानक आणि आशयसूत्रे

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

   २.२.१ अभयारण्य निर्मिती प्रक्रिया

   २.२.२ लेखक परिचय

   २.२.३ कथानकाचे स्वरूप

   २.२.४ कथा सागरेश्वर अभयारण्याची – आशयसूत्रांचे स्वरूप

२.३ समारोप

२.४ सरावासाठी प्रश्नोत्तरे

२.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

२.६ उपक्रम

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास,

१. मानवनिर्मित अभयारण्याची उभारणी समजून घेता येईल.

२. परिसरनिष्ठ जाणीवा समृद्ध होऊन पर्यावरणविषयक जागृती निर्माण होईल.

३. पर्यावरणविषयक लेखन करण्याची प्रेरणा मिळेल.

४. या आत्मकथनाच्या कथानकाचे स्वरूप आणि आशयसूत्रे समजून घेता येतील.

## २.१ प्रास्ताविक

सागरेश्वर अभयारण्य हे भारतातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य होय. धों. म. मोहिते यांच्या जगावेगळा पण लोकोपयोगी सार्वजनिक कामाचा छंद आणि निसर्गवेडातून हे अभयारण्य उभे राहिले. यासाठीची खडतर वाटचाल करत अनेक जीवघेण्या संकटावर मात करीत अनेकांच्या अनेक हातांचे पाठबळ घेत घेत त्यांनी हा प्रवास पूर्ण केला. त्यात ते यशस्वी झाले. हे काम त्यांनी प्रामाणिकपणे, निस्वार्थपणे करत राहिले. अनेक मान्यवरांनी, सामान्यजनांनी त्यांची पाठ थोपटली. शिवाय त्यांना अनेक मानाचे आणि प्रतिष्ठेचे गौरव पुरस्कारही मिळाले. वनीकरण, वनसंवर्धन, वन्यजीवन संरक्षण, पर्यावरण हे मानवाचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी आज विषय चर्चिले जात नाहीत; तर प्रत्यक्ष मार्गीही लागले आहेत. लोकांना त्याचे महत्त्व पटू लागले आहे. पण १९७० च्या दशकात परिस्थिती वेगळी होती. त्यावेळी आजच्या इतकी पर्यावरण जागृती नव्हती. त्यासाठी वृक्षमित्र धों.म. मोहिते यांनी अपरिमित कष्ट घेतले आहेत. त्याचे अनुभव त्यांनी 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून मांडले आहेत. ही कथा अनेक जाणकरांना पटेल. या क्षेत्रात काम करणाऱ्याना ती दिशादर्शक ठरेल. त्यासाठी सागरेश्वर अभयारण्याची निर्मिती, या अनुभवकथनाचे कथानक आणि त्याची आशयसूत्रे काय आहेत? हे आपण या घटकामध्ये अभ्यासणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

सागरेश्वराच्या डोंगरावर अभयारण्याचे कष्टप्रद काम डोंगराशी झुंज देऊन मोठ्या जिद्दीने तडीस नेणारे वृक्षमित्र धों. म. मोहिते यांचे हे अनुभवकथन आहे. कार्यकर्ता कसा घडतो? मनात आणले तर तो काय करू शकतो? याचे हे यथार्थ चित्रण या अनुभवकथनात उमटलेले आहे. पर्यावरण हे नैसर्गिक वरदान आहे. त्याला मानव हानी निर्माण करू शकतो आणि त्याचे रक्षणही तोच करू शकतो. त्यासाठी समाजामध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृती निर्माण होणे गरजेचे आहे. या अनुभवकथनाच्या अभ्यासाअंती आपल्या मनात पर्यावरण रक्षणाची निश्चित जाणीव निर्माण होते. त्याचबरोबर पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन कित्येक पिढ्यांची गरज बनत आहे. याचे गांभीर्य वाचकांना कळल्याशिवाय राहणार नाही. विद्यार्थ्यांनी सजगपणे आपल्या परिसराकडे पाहण्याची दृष्टी विकसितत करावी, आपला निसर्ग संरक्षित करावा, त्यातून आलेल्या अनुभवांचे कथन करावे. अनुभवकथन हा एक सर्जनशील वाङ्मय प्रकार आहे.

या वाङ्मय प्रकारातूनही विद्यार्थ्यांनी लेखन करावे. हाही दृष्टिकोन या अनुभवकथनाच्या अभ्यासातून साध्य होईल. आपण अभयारण्याची निर्मिती प्रक्रिया कशी घडते? या अनुभवकथनाच्या कथानकाचे आणि आशयसूत्रांच्या स्वरूपाचा विचार करूया.

### २.२.१ अभयारण्य निर्मिती प्रक्रिया

अभयारण्य म्हणजे काय? तर अभयारण्य म्हणजे वन्यप्राण्यांना सुरक्षित व नैसर्गिक वातावरणात संरक्षण देण्यासाठी शासनाने राखून ठेवलेला प्रदेश. येथे शिकार, जंगलतोड, औद्योगिक उपक्रम इत्यादी मानवी हस्तक्षेपांवर कठोर नियंत्रण असते. अभयारण्य म्हणजे कायद्याने संरक्षित केलेले वन, जंगल, अरण्य, तलाव किंवा समुद्र यांचा समावेश असलेले क्षेत्र होय. हे क्षेत्र वन्यजीव, वनस्पती आणि नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करण्यासाठी निश्चित केलेले असते. येथे प्राणी, पक्षी आणि वनस्पतींना कोणत्याही भीतीशिवाय जगता येते. या ठिकाणी शिकार आणि मानवी हस्तक्षेप पूर्णपणे बंद असतो. अशा आरक्षित ठिकाणाला अभयारण्य असे म्हणतात.

अभयारण्यांचा मुख्य उद्देश हा दुर्मीळ होत जाणाऱ्या जैवसंपदेचे संरक्षण करणे हा आहे. आज काही जातींचे किंवा प्रकारचे जीव आढळत नाहीत (उदा. डायनोसॉर किंवा भीमसरट, स्मायलोडॉन किंवा कट्यारदंती वाघ, वूली मॅमथ किंवा केसाळ हत्ती, डोडो पक्षी, वगैरे). यातील काही प्राणी नष्ट होण्यामागील कारण पूर्णपणे नैसर्गिक होते. पण मॉरिशस येथील डोडो पक्षी मात्र पूर्णपणे मानवी लोभामुळे नाहीसा झाला. 'डोडो' हे एकच उदाहरण नाही, तर रोज २० प्राण्यांच्या जाती, ८ पक्ष्यांच्या जाती, ३३ झाडांच्या जाती व इतर जीवांच्या जाती नष्ट होत आहेत. त्यामुळे आज विपुल प्रमाणात आढळणाऱ्या जीवांच्या जाती अभयारण्यांच्या माध्यमातून संरक्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि तो बऱ्याच प्रमाणात यशस्वीही होत आहे.

अभयारण्याचे दोन प्रकार सांगता येतील.

**१. प्राणी अभयारण्ये –** म्हणजे अशी सुविधा जिथे प्राण्यांना राहण्यासाठी आणले जाते आणि त्यांचे उर्वरित आयुष्य संरक्षित केले जाते.

**२. वनस्पती अभयारण्ये –** ही नैसर्गिक परिसंस्था कार्यरत ठेवण्यासाठी, प्रजातींसाठी आश्रयस्थान म्हणून काम करण्यासाठी आणि जमिनीवर आणि समुद्रामध्ये टिकू न शकणाऱ्या पर्यावरणीय प्रक्रिया जतन करण्यासाठी राखून ठेवली जातात.

भारतामध्ये केंद्र शासनाने वन्यजीव रक्षणाच्या उद्देशाने काही नैसर्गिक प्रदेश संरक्षित केले आहेत. हे राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये व राज्यस्तरीय वनोद्याने या तीन प्रमुख प्रकारांत आढळून येतात. वन्यजीव व त्यांचे पर्यावरण यांच्या अभिवृद्धीसाठी एखाद्या प्रदेशातील पारिस्थिती नुसार अनुकूल असलेले क्षेत्र केंद्र व राज्य शासनांकडून निश्चित करण्यात येते. असा प्रदेश, क्षेत्र सीमांकित केल्यानंतर तो राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्य म्हणून घोषित केला जातो. अभयारण्यात प्राण्यांची शिकार करण्यास पूर्णपणे बंदी घातली जाते,

त्यांना अभय दिले जाते, त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येते. सर्व अभयारण्ये ही शासनाच्या नियंत्रणाखाली असून त्यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी वनविभागाकडे सोपविण्यात आली आहेत. अभयारण्यातील जीवसृष्टीचे संरक्षण आणि व्यवस्थापन यांविषयी तरतुदी असलेला कायदा (वाइल्ड लाईफ प्रोटेक्शन ॲक्ट, १९७२) केलेला आहे.

पर्यावरणातील जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी वन्य जीवांचे रक्षण करणे हा अभयारण्ये स्थापन करण्यामागील प्रमुख उद्देश आहे. मागील २-३ शतकांत वन्य जीवांची प्रचंड प्रमाणात हत्या झाली, प्रदूषणामुळे त्यांच्या प्रजननास प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आणि अधिवासाचे प्रदेश (वसतिस्थान) नष्ट होऊ लागले. अशा स्थितीत त्यांना जीवनसंघर्षात टिकून राहणे अवघड झाले. त्यामुळे अनेक वन्यजीव प्रजातींचा क्षय झाला असून काही प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे टाळण्यासाठी आणि पर्यावरणातील पारिस्थितिनुसार संतुलन टिकून राहण्यासाठी वन्यजीवांचे अभयारण्यात संवर्धन केले जाते. त्यामुळे अभयारण्ये महत्त्वाची असतात. (मराठी विकिपिडिया)

देशातील पहिले मानवनिर्मित अभयारण्य म्हणजे सागरेश्वर अभयारण्य होय. केंद्र सरकारने अलीकडेच सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य हे नाव बदलून 'यशवंतराव चव्हाण सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य' असे नामकरण केले आहे. १०.८७ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेले सागरेश्वर अभयारण्य हे महाराष्ट्रातील अभयारण्यांपैकी एक आहे. ते आपल्या देशातील पहिले मानवनिर्मित अभयारण्य आहे. कराड नजिक कृष्णा नदीच्या खोऱ्यात हे ठिकाण आहे. याठिकाणी सुमारे सात-आठशे वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या प्राचीन मंदिरांचा एक मोठा समूह आहे. त्यात अदमासे ५१ मंदिरं असून सागरेश्वर हे मुख्य शंकराचे मंदिर आहे. याशिवाय इतरही अन्य देवदेवतांची मंदिरे आहेत. सागरेश्वराच्या या देवळापासून जवळच एक लहानसा घाट ओलांडला की अभयारण्य सुरू होते.

या अभयारण्याचा विस्तार कमी असला तरी हे अभयारण्य नैसर्गिक नसून मानवी प्रयत्नातून आकाराला आले आहे. एकीकडे माणूस स्वार्थापोटी वृक्षतोड करीत असल्याचे दिसते. तर दुसरीकडे परिश्रमपूर्वक वृक्षांची लागवड करणारे मानवी हात पाहिले की अचंबा वाटतो. या परिश्रमांमागे स्वातंत्र्यसैनिक व वृक्षमित्र श्री. धों. म. मोहिते यांचा मोठा पुढाकार आहे. त्यामुळेच उजाड माळरान असलेल्या या ठिकाणी अभयारण्य निर्माण झाले आहे.

सागरेश्वराच्या जंगलात श्वापदांची संख्या फारशी नसली तरीही येथील मृगविहारात सांबर, काळवीट, भेर हे प्राणी संख्येने अधिक आहेत. याशिवाय तरस, लांडगे, कोल्हे, ससे, रानमांजरं आदि प्राणीही येथे दिसतात. अनेक भारतीय पक्षी या जंगलात सुखेनैव विहार करतात. मात्र मोरांची संख्या खूप अधिक आहे. वनसंपदाही उत्तम आहे. जवळपास ३०-४० प्रकारचे वृक्ष या जंगलात आढळतात. अशा या अभयारण्याची निर्मिती कशी झाली, त्याचा इतिहास काय आहे? हे 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून धों. म. मोहिते यांनी उत्तमपणे कथन केले आहे.

### २.२.२ लेखक परिचय

श्री. धोंडीराम महादेव मोहिते हे सागरेश्वर पठारापासून चार कि. मि. वर मोहित्यांचे वडगाव (ता. कडेगाव, जि. सांगली) येथील रहिवाशी होते. २६ जुलै १९२६ रोजी शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ते किर्लोस्कर, स्त्री आणि मनोहर मासिकाचे पत्रकारही होते.

सन १९४२ च्या 'भारत छोडो' अंदोलनात त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. भूमिगत चळवळीत तुफान सेनादलाचे ते कॅप्टन होते. मोहिते वडगावचे ते सरपंच आणि ग्रामविकास मंडळाचे चेअरमन होते.

१९७० ते १९९४ या कालावधीत त्यांनी पूर्ण वेळ देऊन विनावेतन, विनाहुद्दा काम करून त्यांनी २४ वर्षे कष्ट करून सांगली जिल्ह्यात एक मानवनिर्मित 'सागरेश्वर अभयारण्य' निर्माण केले.

या कार्याप्रित्यर्थ त्यांना १ मे १८१ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'वृक्षमित्र' ही पदवी देण्यात आली. तर १९९४ साली केंद्र सरकारकडून राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र ॲवॉर्ड, प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह व रोख ५०,०००/ रूपये देऊन सन्मानित करण्यात आले. याबरोबरच अनेक सामाजिक संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांना गौरविले आहे.

**त्यांची ग्रंथसंपदा –**

१. सोनहिऱ्याचे पाणी (लघुकथासंग्रह )

२. मुलाखतीच्या मैदानातून (कथारूप मुलाखतींचा संग्रह)

३. कथा सागरेश्वर अभयारण्याची (आत्मकथन)

- किर्लोस्कर मासिकातून लेख, कथा इ. विपूल लेखन.
- मुंबई, पुणे, सांगली या आकाशवाणी केंद्रावरून लोकनाट्य, कथा, श्रुतिका, नभोनाट्य, भाषण, मुलाखती इत्यादी कार्यक्रमासाठी लेखन व प्रत्यक्ष सहभाग.
- मराठीतील अग्रगण्य दैनिके व साप्ताहिकातून सातत्याने लेखन.
- ६ सप्टेंबर २००० साली त्यांचा मृत्यू झाला.

### २.२.३ कथानकाचे स्वरूप

वनीकरण, वनसंवर्धन, वन्यजीवन संरक्षण, पर्यावरण हे मानवाचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी महत्वाचे विषय आहेत. हे विषय प्रत्यक्ष अंमलात आणणे फार धाडसाचे आणि कष्टाचे काम आहे. पण स्वातंत्र्यानंतर निसर्गवेडातून असे एक धाडस धों. म. मोहिते यांनी केले. स्वातंत्र्यानंतरच्या दोन दशकात, सह्याद्रीवरील उरलीसुरली झाडे-झुडपे भुईसपाट झालेली 'याचि देही याचि' डोळा पहाणारे श्री. मोहिते हे एक साक्षीदार होते. विविध कारणास्तव हिरव्या संपत्तीचा केलेला मुक्त विध्वंस पाहून व्यथित झालेल्या मोहिते अण्णांनी एक अद्भूत स्वप्न बाळगले. अनेक संकटांचा महापूर ओलांडून अभयारण्य उभारणीचा त्यांनी

पैलतीर गाठला. एखादा मनुष्य एवढा निसर्गवेडा असू शकतो; यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. उघड्या बोडक्या टेकड्यांचे हिरव्याकंच पर्यटनस्थळात रुपांतर करण्याचा ध्यास घेऊन आपल्या आयुष्यातील तब्बल २४ वर्ष याकरिता वाहिली. सह्याद्रीची उतरंड पूर्वपदावर आणण्यासाठी अथक परिश्रम करणारी 'मोहिते' ही एक वैशिष्टपूर्ण वल्ली आहे. चिकाटी आणि निर्धाराने लालफितीच्या कारभाराविरुद्ध त्यांनी दिलेला लढा, आयुष्यातल्या चढ उतारांशी दिलेली झुंज अशी ही एक सुरस कहाणी! या क्षेत्रात काम करणाऱ्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

सागरेश्वर अभयारण्याच्या कथेचा प्रारंभ फार रोमहर्षक पद्धतीने झाला आहे. या अभयारण्यासाठी घेतलेल्या कष्टाप्रित्यर्थ श्री मोहिते यांची इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कारासाठी निवड झाली आहे. ६ ऑगस्ट १९९४ रोजी राजधानी दिल्लीत राष्ट्रपती भवनातील अशोक हॉलमध्ये समारंभासाठी ते उपस्थित आहेत. वनक्षेत्रातील सर्वोच्च बहुमान असलेला हा पुरस्कार तत्कालीन राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते स्वीकारत आहेत. पुरस्कार स्वीकारत असताना श्री मोहिते यांच्या विषयी निवेदिकेने त्यांच्या कार्याचा जो परिचय करून दिला आहे; तो ऐकत असताना श्री मोहिते यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत. या धुंदीत, बेहोशीत सागरेश्वर अभयारण्याच्या निर्मितीच्या भूतकाळात श्री. मोहिते अण्णांनी प्रवेश केला. त्याची कहाणी त्यांनी एखाद्या चित्रपटातील दृश्यासारखी पूर्वस्मृतींना उजाळा देण्याच्या (फ्लॅशबॅक) पद्धतीने सांगितली आहे.

श्री. मोहिते अण्णा १९ मार्च १९७० रोजी महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाने आयोजित केलेल्या पत्रकारांच्या विदर्भ पाहणी दौऱ्यातून ताडोबा अभयारण्यात गेले होते. तेथे त्यांना गेटमनने पास असल्याशिवाय कोणालाही आत सोडणार नाही. अशा पद्धतीची अडवणूक केली. ताडोबा जंगलाच्या गेटने त्यांच्या मेंदूची कवाडे उघडली. त्यांच्या विचारचक्रांना गती दिली. त्यांच्यातील कार्यकर्ता जागा झाला. 'असे अभयारण्य सागरेश्वराच्या डोंगरात उभे करायचेच!' असा त्यांनी निश्चय केला. ताडोबा जंगल हे त्यांचं प्रेरणास्थान ठरलं आणि तिथून पुढे त्यांच्या सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीचा खडतर प्रवास सुरू झाला.

दक्षिण महाराष्ट्रातील निसर्गरम्य डोंगर कपारीत वसलेले एक पुरातन देवस्थान म्हणजे श्री क्षेत्र सागरेश्वर! एका बाजूला कृष्णा आणि दुसऱ्या बाजूला सोनहिरा नदी यांच्यामध्ये एक सह्याद्रीची रांग विसावलेली आहे. तेथे सागरेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. मंदिराच्या परिसराला सागरोबाचा डोंगर म्हणतात. या डोंगरावर अभयारण्य करायचे असे श्री मोहिते यांनी ठरविले. वनखात्याच्या दप्तरी याची राखीव जंगल अशी नोंद असल्याची खात्रीही त्यांनी करून घेतली. सांगली जिल्ह्यातील पूर्वीच्या खानापूर, तासगाव आणि आताच्या कडेगाव, पलूस आणि वाळवा या तीन तालुक्यातील मोहित्यांचे वडगाव, देवराष्ट्रे, आसद, दुधारी, ताकारी आणि तुपारी ही सहा गावे या क्षेत्रात येतात. या गावांचे हे वनक्षेत्र आहे. ताकारी ते देवराष्ट्रे सडक धरून पश्चिमेस आसदच्या डोंगरापर्यंतचा पट्टा त्यांनी अभयारण्यासाठी निश्चित केला.

श्री मोहिते यांना प्राथमिक शाळेत असल्यापासून निसर्गाची आवड होती. प्राथमिक शाळेतील शिक्षक

शाळेतील मुलांची सागरेश्वर मंदिर आणि डोंगर परिसरात सहल काढत असत. या डोंगरापासून जवळच असणारे पहिले गाव देवराष्ट्र आणि दुसरे गाव म्हणजे मोहित्यांचे –वडगाव हे होय. त्यावेळी सागरेश्वरचा डोंगर वनश्रीने नटलेला आणि झाडाझुडपांनी गच्च असा परिसर होता. या डोंगरावर अनेक औषधी वनस्पती होत्या. करवंदे, कारी, टेंभरे, आमोनी, जांभळे आदी रानमेवा हंगामात मिळत असे. पशुपक्ष्यांचे वास्तव्य होते. काळवीटांचे कळपच्या कळप होते. एकंदरीत सागरेश्वर परिसर वनवैभवाने समृद्ध होता. पुढे ते कुंडल येथील शाळेत गेले, तरीही तेथील कुलकर्णी मास्तर सागरेश्वराच्या डोंगरावरच विद्यार्थ्यांना घेऊन येत असत. त्यानंतर श्री मोहिते हे १९४२ च्या भूमिगत आंदोलनात सहभागी झाले. त्यावेळी सागरेश्वर अभयारण्यातच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभा होत असत. प्रतिसरकारच्या तुफान सेनेचे मोहिते कॅप्टन झाले. त्यावेळी चळवळीचे केंद्र कुंडल असले तरी सैनिकांच्या कवायती, स्पर्धा, बौद्धिके घेण्यासाठी पुन्हा ते सागरेश्वर डोंगरातच येत. त्यामुळे त्यांची संपूर्ण जडणघडण सागरेश्वर डोंगरवरच होत होती.

सागरेश्वर डोंगरावरील झाडांची तोड अनेक लोक करत होते. त्यातच गाईम्हशी सुद्धा चरायला सोडल्या जात होत्या. शासनाने दारूबंदी जाहीर केली होती. तरीही हातभट्ट्या चालू होत्या. हातभट्ट्यांसाठी झाडे तोडली जात होती. हा निसर्गसंहार होत होता. त्यासाठी मोहिते यांना 'झाडे तोडू नका, डोंगर वाचवा' असे वारंवार अनेक भाषणातून सांगत होते. त्यासाठी त्यांनी वनखात्याची मदत सुद्धा घेतली होती. तरीही वृक्षतोड थांबत नव्हती. त्यासाठी व्यापकपणे प्रयत्न करायचे त्यांनी ठरविले.

'चुटकी सरशी अभयारण्य होईल' असे वाटले होते. पण वनविभागातील अधिकाऱ्यांनी केवळ प्रशासकीय औपचारिकता दाखवली. पण प्रत्यक्ष कोणतीही कार्यवाही झाली नाही. म्हणून धों. म. मोहिते यांनी यशवंतराव चव्हाण यांची कराड येथील सर्किट हाऊसवर भेट घेतली. चव्हाण साहेबांनी अभयारण्य निर्माण होण्यासाठी श्री मोहिते यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन प्रथमपासूनच दिले होते. मोहिते यांनी एक अर्ज लिहून चव्हाण साहेबांच्याकडे दिला होता आणि चव्हाण साहेबांनी आपल्या अधिकारात वनविभागाकडे पाठविला होता. त्यानंतर प्रशासकीय हालचाली सुरू झाल्या. साताऱ्याचे विभागीय वन अधिकारी एस. पी. नरवणे आणि उपविभागीय वन अधिकारी टी. वाय. मोरे यांनी प्रथम सागरेश्वर डोंगराची पाहणी केली. त्यानंतर पुण्याहून मुख्य कॉंझर्वेटर ऑफ फॉरेस्ट पुणे सर्कलचे मुख्य अधिकारी माविनकुर्वे भेटीला येणार होते. ते मुकुंदराव किर्लोस्कर यांचे स्नेही होते. त्यांची मदत श्री मोहिते यांनी घेतली. त्यांनी सागरेश्वरला भेट देऊन ही साईट आवडल्याचे सांगितले. अभयारण्य स्थळाची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्राच्या वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक एस. एस. बूट हे श्री. मोहिते यांच्या अपरोक्ष येऊन पाहणी करून जातात आणि अभयारण्याच्या कामाला गती देतात. साताऱ्याचे वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी अभयारण्याची हद्द निश्चित करण्यासाठी जमिनीची मोजणी करतात.

पाच चौरस किलोमीटर वनक्षेत्रास काटेरी तारेचे कुंपण, अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, सागरेश्वर, लिंगेश्वर, कमळभैरव, पीर मलिक, नागेश्वर या देवालयांच्या परिसरात बागबगीचा, झाडांच्या लागवडीसाठी खड्डे पाडणे, रोपवाटिका, वनीकरण, तीन किलोमीटर पक्की सडक, गेस्ट हाऊस, काळवीट,

चितळ, मोर, ससे, इत्यादी पशुपक्षी सोडणे, आदी विकास कामे या आराखड्यात धरण्यात आली होती. त्यांचे बजेट पाच लाख तीस हजार रुपये इतके नमूद केले होते. आराखड्यात कार्यक्षेत्रातील पाच धार्मिक स्थळांबरोबरच विविध प्रेक्षणीय ठिकाणे आणि सांगली जिल्ह्यासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ होईल, असेही सुचविण्यात आले होते. अभयारण्य निर्मितीबाबत समाजाची काय प्रतिक्रिया आहे? हे समजून घेण्यासाठी श्री मोहिते यांनी पत्रकार परिषद घेऊन सागरेश्वराच्या परिसरात अभयारण्य करण्याचे घोषित केले. सर्व पत्रकारांना आणि जनतेला ही कल्पना उत्तम वाटली. श्री. मोहिते यांना याबाबत अनेक प्रोत्साहनपर पत्रे सुद्धा आली. त्यांचा उत्साह दुणावला. ताकद वाढली. हुरूप चढला. तर दुसरीकडे सागरेश्वराच्या डोंगरावर अभयारण्य करणार हे समजल्यावर आसपासच्या काही लोकांनी श्री मोहिते यांना चक्क वेड्यात काढले!

अनेकांनी त्यांना वेडयात काढले, तरीही त्याकडे दुर्लक्ष करून ते आपल्या मुख्य कामावर लक्ष केंद्रित करत. त्यांनी संपूर्ण वेळ याच कामाला दिला. घरची भाकरी बांधून ते दिवसभर डोंगरावर फिरत. अभयारण्यात कोठे काय असावे? याचे त्यांनी मनात अनेक आराखडे बांधले. डोंगरात चरण्यासाठी भरपूर जनावरे येत. एकेका गुराख्याला गाठून 'पुन्हा जनावरे आणू नका. येथे अभयारण्य करायचे आहे.' असे सांगत. जळणासाठी लाकडे तोडणाऱ्या लाकूडतोड्यांना त्यांनी बंद केले. पण देशी दारूच्या हातभट्टया मात्र बंद होत नव्हत्या. त्यासाठी त्यांनी तत्कालिन केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण साहेबांना या सर्व घडामोडी सांगितल्या. त्यानंतर सांगलीचे जिल्हा पोलीसप्रमुख ए. व्ही. कृष्णन यांच्या कानावर सर्व गोष्टी घालून एका फौजदारामार्फत डोंगरावरील सर्व हातभट्टया हटविल्या.

हे सर्व करत असताना श्री मोहिते यांच्यावर अनेक जीवघेणे प्रसंगसुद्धा आले. एकदा सागरेश्वर परिसरात फिरत असताना तत्कालीन फरारी आरोपी बापू बिरू वाटेगावकर यांनी मोहिते यांना अडवून 'वडगावकर, तुम्ही म्हणे इथं अभयारण्य करायचं म्हणताय? तसा डोक्यातून विचार काढून टाका. गरिबांची मेंढरं चरायची कुठं?' असं म्हणून ते निघून गेले. यावेळी मोहिते थोडे घाबरले होते. पण वाटेगावकर कोणावर विनाकारण अन्याय करणारे नाहीत. असा धीर मोहिते यांना त्यांच्या फौजदार मित्रांनी दिला होता.

सागरेश्वर अभयारण्य लोकांमध्ये ठसविण्यासाठी मोहिते अण्णा यांनी अनेक प्रयत्न केले. विविध ठिकाणी व्याख्याने, पत्रकार परिषदा घेतल्या. त्या काळातील आसद या गावचे एक प्रसिद्ध शाहीर यशवंत तांदळे यांनी सागरेश्वर अभयारण्यावर पोवाडा लिहिला होता. तो श्रोत्यांना फार आवडत असे. त्यामुळे अभयारण्याची प्रसिद्धी चांगलीच झाली होती. त्यानंतर अभयारण्याच्या हद्दीत येणाऱ्या गावच्या ग्रामपंचायतींचे ठराव त्यांनी मिळवले. यामध्ये ताकारी गावच्या तत्कालीन सरपंचांनी मात्र विरोध दर्शविला होता. 'अभयारण्यसाठी गायरान दिले, तर आपल्या गावच्या गाई चरायला न्यायच्या कुठे?' हा त्यांचा महत्त्वाचा मुद्दा होता. हा अपवाद वगळता इतर सर्व मान्यवर व्यक्तींकडून आणि समाजातून सागरेश्वर अभयारण्याला पाठिंबा मिळत होता.

पण एके दिवशी सचिवालयातून श्री. मोहिते यांना पत्र आले. त्या पत्रात लिहिले होते, 'आपण सुचविलेले वनक्षेत्र अभयारण्यासाठी योग्य नाही. तसेच तेथे वनीकरण योजना राबविणे शक्य नाही!' या पत्राने

आजवर केलेल्या अपार कष्टप्रद प्रयत्नांवर अक्षरशः बोळा फिरविला होता. पण गप्प बसतील तर ते अण्णा कसले! दुसऱ्याच दिवशी ते मुंबई येथे सचिवालय (आताचे मंत्रालय) येथे पोहोचले. वनविभागाच्या कार्यालयात व. शं. कुलकर्णींना भेटले. त्यांनी असा निर्णय वनमंत्री तिरपुडेसाहेबांनी घेतल्याचे सांगितले. ते तिरपुडेसाहेबांच्याकडे गेले. या निर्णयावरून दोघांमध्ये वादविवाद झाला. हा सर्व झालेला प्रकार श्री मोहिते यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांना फोनवरून रात्रीच सांगितला. चव्हाण साहेबांनी मोहिते यांना शांत राहण्याविषयी सांगून त्यांची समजूत काढली. दुसऱ्या दिवशी ते वसंतदादा पाटील यांच्याकडे गेले. तिरपुडेसाहेबांनी मोहिते यांना बोलावून घेऊन अभयारण्यासाठी तीन लाख रुपये मंजूर केले. त्यानंतर प्रत्यक्ष अभयारण्याच्या कामाला सुरुवात झाली. प्रथम रस्त्याची जागा सोडून बाजूला खड्डे काढून पाऊस येण्याची वाट कर्मचारी पाहू लागले. दरम्यानच्या काळात सांगली जिल्ह्याचे कलेक्टर एस. एस. सक्सेना यांनी तुपारी गावचा विरोध ज्या गायरान जमिनीसाठी होता, ती समस्या प्रत्यक्ष जागेवर येऊन सोडवली.

२१ ऑगस्ट १९७१ च्या मध्यान्हरात्री ठीक बारा वाजता मोहिते अण्णा यांच्या हस्ते कांचन रोपाचे पहिले रोपण करून रोप लागवडीस सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मजुरांकरवी रात्रभर रोपांची लागवड करण्याचे काम केले. लिंब, चिंच यांच्या बिया टोकण्यात आल्या. रेन ट्री, शिसव, शिरस, अंजन, कांचन, काशीद, गुलमोहर, सुरू, जाकरांडा, सिल्वर ओक, आकेशिया अशा झाडांची रोपे लावण्यात आली. त्याची देखभाल स्वतः अण्णा, दोन रेंजर्स, फॉरेस्टर, गार्ड इ.करीत होते. १९७२ च्या दुष्काळाची झळ या रोपांना लागली. तरीही सर्वांनी ही रोपे जिद्दीने जगवली. याच दरम्यान मार्चमध्ये यशवंतराव चव्हाण सांगली जिल्ह्यातील एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यांनी सागरेश्वर अभयारण्याभोवती हेलिकॉप्टर खाली घेऊन दोन फेऱ्या मारून अभयारण्याची प्रगती पाहिली होती. तसेच ते प्रत्यक्ष जून १९७२ मध्ये अभयारण्याची प्रगती पहाण्यासाठी आले. त्यांच्या आणि महाराष्ट्राचे अर्थमंत्री यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले होते.

अभयारण्यात लोकांनी शिकारीसाठी येऊ नये, यासाठी वनखात्याकडून प्रत्येक ग्रामपंचायतीला नोटीस पाठवली गेली. त्याची अंमलबजावणी कडक केल्यामुळे अभयारण्य परिसरात शिकार करणे कायद्याने थांबले. १९७२ च्या दुष्काळाने उग्ररूप धारण केले होते. 'जनता जगविणे' हे सरकार पुढे मोठे आव्हान उभे होते. शासनाने अनेक गावात दुष्काळी कामे मंजूर केली होती. याचा फायदा मोहिते अण्णांनी उठविला आणि अभयारण्यात रस्ता तयार करण्यासाठी मंजुरी मिळविली. खरेतर वनखात्याने हे काम आपल्या अधिकारात घ्यायला हवे होते. पण त्यांनी हात झटकले. मग मोहिते अण्णांनी हे काम स्वतः करायचे ठरविले. त्यांना अशा कामाची सवय नव्हती. तरीही मजुराकरवी हे काम करून घेण्याचा त्यांनी निश्चय केला. कामाला सुरुवात झाली. रस्ते आखण्याचे अवघड काम अण्णांनी केले. तरीही या कामात काही गावठग्यांना हे काम खटकत होते. म्हणून त्यांनी देवराष्ट्रेच्या तलाठ्याला हाताशी धरून या कामात विघ्न आणण्याचा प्रयत्न केला. पण मामलेदार साहेबांनी पुन्हा मोहितेंना त्यामध्ये लक्ष घालून काम सुरळीत पार पाडण्यास सांगितले. एकदा सुरुंग घालताना अनेकांच्या जीवावर बेतेल असाही प्रसंग येऊन गेला.

अभयारण्यातील कामाच्या वेळी 'अभयारण्य नाट्य मंडळ' स्थापन करून 'मावळी मुजरा' हे नाटक मोठ्या झोकात साजरे झाले. त्याबरोबरच महिलांनी कामावर रचलेली गाणी, उखाणे विरंगुळा म्हणून एकमेकांना ऐकवत असत. कुस्त्या, नकला असेही कार्यक्रम अधून मधून होत. सर्व अधिकारी पाहणी करून 'उत्तम काम चालले आहे' असा शेराही लिहून जात असत. या सडकेचा उद्घाटन सोहळाही संपन्न झाला. सडके वरून लेलँड ट्रक, दोन एस.टी. गाडया, दोन ॲम्बेसीडर, एक जीप, एक मोटार सायकल आणि बैलगाडी इतकी वाहने हजर ठेवली. उद्घाटनासाठी आमदार संपतराव माने, जि. प. सदस्य मोहनराव कदम, तसेच पाटबंधारे, एस. टी. महामंडळ आणि वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. सांगता सोहळ्यात सर्व मान्यवरांनी श्री मोहिते यांचे कौतुक केले.

सातारा जिल्ह्यातून सागरेश्वर अभयारण्य वगळून नंतर सांगली जिल्हा वनकार्यालयाशी जोडले गेले. त्याच दरम्यान १९७७ साली अभयारण्यात विजेचे खांबही उभे राहिले. अभयारण्यात अनेक कार्यशाळा, स्काऊट कॅम्प होत होते. त्यातून श्रमदान शिबिरे घेतली जात होती. त्यामुळे वृक्षारोपण अधिक प्रमाणात होत होते. या कालावधीत अनेक राजकारणी नेते, साहित्यिक, कलावंत यांनी सागरेश्वर अभयारण्याला भेटी दिल्या. परदेशी पर्यटक सुद्धा अभयारण्याला भेटी देऊन 'हाऊ वंडरफूल, हाऊ ब्युटीफूल' म्हणून आनंद व्यक्त करत होते. तरीही महाराष्ट्र शासनाकडून अभयारण्याला पर्यटन केंद्राचा दर्जा मिळालेला नव्हता. पूर्वी वनमंत्री असणारे तिरपुडे आता पर्यटन मंत्री होते. त्यांच्या विरोधात अण्णांनी सत्याग्रह करून निषेध नोंदविण्याचे ठरवले. पण त्याच दिवशी वसंतदादांचे मुख्यमंत्रीपद गेले आणि सरकार कोसळले.

अभयारण्यात मृग विहारासाठी प्रयत्न करायचे निश्चित केले. त्यासाठी जागा निश्चित केली. त्यासाठी विहीर खुदाईचे काम सुरू होते. त्याच दरम्यान कवी वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर आले. त्यांच्या हस्तेच पाण्याचे पूजन करण्यात आले. मृगविहाराच्या ८४ एकराला तेरा फूट उंचीची भक्कम तारेची जाळी लावण्यात आली. हे काम सुरू असताना यशवंतराव चव्हाणसाहेब आले होते. त्यांच्या हस्ते विहिरीवर बसविण्यात आलेल्या विद्युत पंपसेटचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी चव्हाण साहेब म्हणाले होते, ''विधायक कार्यकर्ता आणि शासन यंत्रणा यांच्या कर्तृत्वाचा सुरेख संगम म्हणजे हे सागरेश्वर अभयारण्य!''

सागरेश्वर अभयारण्याच्या वनमहोत्सवमध्ये वृक्षदिंडी काढण्याची कल्पना सुचली. त्याप्रमाणे वृक्षदिंडी काढली. सांगली जिल्ह्यात अशा पद्धतीची वृक्षदिंडी अनेक शाळांमध्ये काढून पर्यावरण जागृतीचे महत्त्वाचे काम केले. शरद पवार साहेब एकदा अभयारण्यात आले. त्यांनी अभयारण्याच्या विकासासाठी मुख्यमंत्री ए. आर. अंतुले साहेबांना भेटून निधीची मागणी करण्यासाठी सुचविले. त्याप्रमाणे मंत्रालयात जाऊन सदर प्रस्ताव सादर केला. अंतुले साहेबांनी धों. म. मोहिते यांचे कार्य समजावून घेतले. त्यावरून त्यांना महाराष्ट्र शासनाच्यावतीने पहिला 'वृक्षमित्र' पुरस्कार जाहीर केला.

वनखात्यातून वन्यजीव विभाग वेगळा करण्यात आला. ही मागणी मोहिते अण्णांचीच होती. त्याचा पाठपुरावा त्यांनी फार आक्रमकपणे केला. त्याचे मुख्यालय कोल्हापूर किंवा पुणे येथे व्हावे असे त्यांना

वाटत होते. पण ते काही व्यक्तींनी बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सुरू केले. त्यातून वनसंरक्षकांनी आपल्या सोयीचे ठिकाण निवडले. त्यामुळे मोहिते यांनी मुख्यमंत्र्याकडे तक्रार केली. हे वन्यजीव विभागातील सर्व अधिकाऱ्यांना आवडले नाही. सारे परप्रांतीय अधिकारी होते. त्यामुळे मोहिते यांचे कार्य त्यांच्या डोळ्यात खुपू लागले. त्यांनी सागरेश्वर अभयारण्यातील रेंजरना हाताशी धरून धों. म. मोहिते यांचे अनेक मान्यवरांसोबत काढलेले सर्व फोटो काढून टाकले. त्यातून त्यांची सागरेश्वर अभयारण्यातून ओळख पुसण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या रक्त-घामाने अभयारण्यावर कोरलेले नाव कसे पुसले जाणार? असा सवाल या व्यवस्थेला मोहिते यांनी उपस्थित केला.

सागरेश्वर अभयारण्य हे भारतातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य होय. डेहराडून येथील वाईल्ड लाईफ ट्रेनिंग सेंटर मध्ये तशी नोंद करण्यात आली. सागरेश्वर अभयारण्याची ही संपूर्ण जन्मकथा आणि वाटचाल श्री मोहिते यांनी सांगून आपला संघर्षही सांगितला आहे. केवळ एक छंद आणि निसर्गवेड म्हणून त्यांनी हे काम हाती घेतले. त्यामध्ये त्यांचा कोणताही स्वार्थ नव्हता.

*नगरेंची रचावी । जळाशये निर्मावी।*
*महावने लावावी। नानाविधें ।*

या ज्ञानेश्वरीतील ओवी प्रमाणे त्यांनी 'वृक्ष देवो भव।' म्हटले. कुठल्याही फळाची त्यांनी अपेक्षा ठेवली नाही. अभयारण्यासाठी स्वतःच्या खर्चाने प्रवास केला. 'घरचं खाऊन अभयारण्याच्या भाकरी भाजल्या.' केवळ सार्वजनिक कामाच्या नशेतून त्यांनी सागरेश्वराचा डोंगर वनश्रीने नटवला आणि अभयारण्य म्हणून अधिकृतरित्या मान्यता पावला ! हे स्वप्न त्यांनी सत्यात अवतरले ! एका ध्येयवेड्या माणसाची ही संघर्ष कहाणी निश्चितच आपल्याला आपल्या ध्येयासाठी प्रेरणादायी ठरेल.

### २.२.४ कथा सागरेश्वर अभयारण्याची – आशयसूत्रांचे स्वरूप

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून पुढीलप्रमाणे आशयसूत्रे सांगता येतील.

**१. सागरेश्वर मंदिराचे प्राचीन महत्व**

दक्षिण महाराष्ट्रातील निसर्गरम्य डोंगर कपारीत वसलेले एक अती पुरातन देवस्थान म्हणजे श्री क्षेत्र सागरेश्वर! एका बाजूस कृष्णा आणि दुसऱ्या बाजूस सोनहिरा नदीच्या खोऱ्यावर लक्ष ठेवून उभ्या असलेल्या सह्याद्रीच्या रांगेत ही दक्षिण काशी विसावली आहे. शिवाची भारत देशात अनेक मंदिरे आहेत. त्यापैकीच एक सागरेश्वर होत. याचे मूळचे नाव समुद्रेश्वर. समुद्र म्हणजेच सागर, लोकबोलीत समुद्रेश्वराचे सागरेश्वर झाले. खरं तर इथून पासून पश्चिमेस कोकणात समुद्र शंभर कोस दूर आहे. सागरेश्वर डोंगर समुद्रसपाटीपासून २७६२ फूट उंच. तरीही हे देवस्थान समुद्रेश्वरच! हे नाव सार्थ ठरायला याला काही कारणेही आहेत. येथील मुख्य पिंडीतील शाळुंका बाजूस केली की आपल्या हाताला पाणी लागते. हाताच्या कुडच्याने घेऊन तीर्थ म्हणून भाविक ते प्राशन करतात. पाणी स्वच्छ तसेच चवदार आहे. समुद्राच्या पाण्यासारखे खारट नाही. मात्र समुद्राच्या पाण्यासारखा या पाण्याला अंत नाही. या पाण्याची खोली अद्यापही समजू शकली

नाही. अशी जुनी जाणती मंडळी सांगतात. पिंडीवरचे संततधार पडणारे पाणी देवळालगतच्या डाव्या बाजूस बांधलेल्या एका कुंडात पडते. ते कुंड आजपर्यंत कधीही आटलेले नाही. त्याच्या बाजूलाच आणखीन तीन मोठी कुंडे आहेत. पहिले पिण्याच्या पाण्याचे, दुसरे आंघोळीचे आणि तिसरे कपडे धुण्याचे. तिन्ही कुंडातील पाणी नेहमी समपातळीवर असते. या पाण्याची बारा महिने पातळी सागरासारखी समान असते. म्हणून हा सागरेश्वर मानला जातो.

सागरेश्वरच्या उत्पत्ती बाबत पौराणिक काळातील एक आख्यायिका आहे. समुद्राचा पुत्र जालंधर आसुरी गुणांचा निपजला. त्याचे निर्दालन देवाने केले. पुत्राच्या वधाने शोकाकुल झालेल्या समुद्राने या स्थानी येऊन शिवशंकराचे तप केले. त्याच्या भक्तीने आणि स्तुतीने प्रसन्न होऊन शंकर प्रगट झाले. संतोषाने मान हलवून 'वर' मागण्यास सांगत असताना माथीच्या गंगेचे काही थेंब भूमीवर पडले. तेथेच प्रार्थनेसाठी स्थापन केलेल्या लिंगामध्ये ते थेंब निरंतर वास करावेत. अशी प्रार्थना समुद्राने केली. आणि प्रत्यक्ष समुद्राने स्थापन केलेल्या या ईश्वराचे स्थान समुद्रेश्वर म्हणून प्रसिद्ध झाले. येथील पिंडीतील शाळुंका बाजूला केली की पाणी लागते. त्यासमयी भूमीवर पडलेली गंगा येथे निरंतर वास करती झाली. याची ही खूण म्हणूनच या पाण्याच्या खोलीचा अंत लागत नाही. अशी आख्यायिका आहे. तसेच गंगेच्या पाण्यात कृमिनाश करण्याचा अलौकिक गुण आहे. कलशात भरलेली गंगा वर्षानुवर्षी टिकते,असे श्रद्धाळू मानतात. असाच गुण येतील जलातही आहे. असे सांगितले जाते. 'सागरेश्वर महात्म्य' या ग्रंथात कौंडण्यपूरचा (आताचे कुंडल) राजा सत्यशील यांने येथे तपश्चर्येस बसलेल्या सुमित्र ऋषीच्या अंगावर कृमीकिड्यांनी भरलेले एक फळ टाकले. ऋषींनी त्याच्या अंगावर कृमी (किडे) राहतील असा शाप दिला. पुढे बारा वर्षांनी राजा कृमीमुक्त झाला. राजाने नंतर येथे देऊळ बांधले. अशी ही कथा आहे. आजही हे पाणी विमलतीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे.

ऋषीमुनींना तपश्चर्या करण्यासाठी येथे दगडी बांधकाम असलेल्या १५ छोट्या ओवऱ्या आहेत. येथे महादेवाच्या एकूण १०८ पिंडी आहेत. २७ देवळे आहेत. प्रत्येक देवळाचे वास्तुशिल्प निराळे आहे. येथे अंबाबाईचे देऊळ आहे. त्यामुळे या परिसरास पूर्वी अंबिकावन म्हणत असत. श्रावण मास हा येथील पर्वणी काळ. येथे श्रावणातील शेवटच्या सोमवारी फार मोठी यात्रा भरते.

इंग्रजी काळातील शतकापूर्वीचे ब्रिटिश गॅझेट पाहता सागरेश्वर देवस्थान आणि परिसर या संदर्भात वरील माहिती मिळते. ऋषीमुनी, देवालय, दाट जंगल, अंबिकावन इत्यादीची माहिती त्यामध्ये नमूद आहे. असे हे दक्षिण महाराष्ट्रातील निसर्गरम्य डोंगर कपारीत वसलेले एक अतिपुरातन देवस्थान श्रीक्षेत्र सागरेश्वर होय.

**२. सागरेश्वर डोंगराची जैवविविधता**

सागरेश्वर अभयारण्याचा परिसर हा माणसाला मोहून टाकत असे. दरीतील निरव शांतता, निसर्गाचे वरदान लाभलेले वातावरण, देवालयांची शिल्पं, त्यांची मांडणी, त्याचबरोबर तेथील निसर्ग वैविध्यपूर्ण होता. या निसर्गामध्ये अनेक प्रकारची जैवविविधता होती. जैवविविधता म्हणजे पृथ्वीवरील जीवसृष्टीमध्ये

आढळणारी विविधता होय, ज्यात जनुकीय विविधता, प्रजाती विविधता आणि परिसंस्था विविधता या तीन प्रमुख स्तरांचा समावेश होतो. जनुकीय विविधता म्हणजे एखाद्या प्रजातीच्या आत असलेली अनुवांशिक भिन्नता, तर प्रजाती विविधता म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशात आढळणाऱ्या विविध प्रकारच्या सजीवांचा समूह. परिसंस्था विविधता म्हणजे जंगले, समुद्रासारख्या विविध परिसंस्था आणि त्यांतील जैविक घटकांचा समावेश होतो. सागरेश्वराच्या जंगलात श्वापदांची संख्या फारशी नसली तरीही येथील मृगविहारात सांबर, काळवीट, भेर हे प्राणी संख्येने अधिक आहेत. याशिवाय तरस, लांडगे, कोल्हे, ससे, रानमांजरं आदि प्राणीही येथे दिसतात. अनेक भारतीय पक्षी या जंगलात सुखेनैव विहार करतात. मात्र मोरांची संख्या खूप अधिक आहे. वनसंपदाही उत्तम आहे. जवळपास ३०-४० प्रकारचे वृक्ष या जंगलात आढळतात. अभयारण्याचा विकास जसाजसा होत गेला, तसेतसे तेथील विविधतेमध्ये वाढ होत गेलेली दिसते. त्यामुळे पर्यावरण समृद्धीसाठी पोषक अशी अन्नसाखळी तयार होत गेली. अन्नसाखळी म्हणजे परिसंस्थेतील एका सजीवाकडून दुसऱ्या सजीवाकडे अन्न आणि ऊर्जा संक्रमित होण्याचा क्रम होय, जिथे एक सजीव दुसऱ्याला खातो आणि नंतर तो सजीव मोठ्या जीवाद्वारे खाल्ला जातो. ही साखळी छोटया वनस्पती उत्पादकांपासून सुरू होते आणि सजीवांच्या वेगवेगळ्या पोषण स्तरांवरून शेवटी मोठया प्राण्यापर्यंत येऊन थांबते. हे पर्यावरणात नित्य चक्र सुरू असते. जीवसृष्टी ही आपला अधिवास स्वतः शोधत असते आणि त्यांना अनुकूल अशा पारिस्थितीमध्ये सर्वच सजीव आपल्या आयुष्याचे मार्गक्रमण करत असतात. त्यासाठी कृत्रिमरीत्या काही करता येत नाही, हे जरा मुळापासून समजून घेणे आवश्यक आहे. जर असे जैवविविधता उद्यान खरेच साकारायचे असेल तर आपल्याला सागरेश्वर अभयारण्या शिवाय पर्याय नाही. याची जाण मोहिते अण्णांना होती.

### ३. धों. म. मोहिते यांची अभयारण्य निर्मितीची कल्पना

श्री. मोहिते हे महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाने आयोजित केलेल्या पत्रकारांच्या विदर्भ पाहणी दौऱ्यातून ताडोबा अभयारण्यात गेले होते. तेथे त्यांना गेटमनने पास असल्याशिवाय कोणालाही आत सोडणार नाही. अशा पद्धतीची अडवणूक केली. ताडोबा जंगलाच्या बंद गेटने त्यांच्या मेंदूची कवाडे उघडली. त्यांच्या विचारचक्रांना गती दिली. त्यांच्यातील कार्यकर्ता जागा झाला. 'असे अभयारण्य सागरेश्वराच्या डोंगरात उभे करायचेच!' असा त्यांनी निश्चय केला. ताडोबा जंगल हे त्यांचं प्रेरणास्थान ठरलं आणि तिथून पुढे त्यांच्या सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीचा खडतर प्रवास सुरू झाला. ही एक नाट्यपूर्ण घटना घडली. पण केवळ कोणत्याही निर्मितीसाठी एक घटना कारणीभूत नसून अनेक घटना कारणीभूत ठरत असतात. लहानपणापासून मोहिते हे सागरेश्वरच्या अभयारण्याशी निगडित आहेत. त्यांच्या शालेय जीवनातील सहली, गावापासून जवळच असणारा सागरेश्वर परिसर, तेथील अनेक सभा आणि जीवनाची जडणघडण या परिसरात झाल्यामुळे त्यांना या परिसराची हानी पहावत नव्हती. त्यातून त्यांच्या मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी याचे संवर्धन करायची ही सुप्त इच्छा ताडोबा येथील प्रसंगाने उत्स्फूर्तपणे वर आली आणि त्यांनी अभयारण्य निर्मितीची कल्पना प्रत्यक्षात साकार करून दाखविली.

### ४. अभयारण्य निर्मितीत वनखात्याची भूमिका

खरे तर अभयारण्य निर्मिती करण्याचे काम हे वन खात्याचेच असते. पण सागरेश्वराच्या डोंगरावर असे अभयारण्य होऊ शकेल, हे वनखात्याच्या लक्षात आले नव्हते. ते काम धों. म. मोहिते यांनी केले. त्यांना सूचलेली अभयारण्य निर्मितीची कल्पना घेऊन ते वन खात्याकडे गेले. १९७० मध्ये कराडचे रेंज ऑफिस त्यांनी गाठले. रेंजर बी. जी. ममदापूरे यांना भेटले. त्यांना आपली कल्पना सांगितली. त्यावर त्यांनी हे काम सहज होऊन जाईल असे सांगितले. 'चुटकी सरशी अभयारण्य होऊन जाईल!' असे वाटणाऱ्या मोहिते अण्णांना वनखात्याकडून वारंवार 'असे होणे नाही' अशी उत्तरे मिळत होती. वनखात्यात दोन प्रवृत्तीची माणसे होती. अभयारण्य व्हावे म्हणून सकारात्मक काम करणारे अधिकारी होते. तसे अभयारण्य होऊ नये, अशा विचारांचेही काही अधिकारी होते. शिवाय प्रशासकीय अडथळे सुद्धा निर्माण होत होते. अभयारण्याला निधी न पुरविणे, कामे अडवून ठेवणे असे प्रकारही घडले. सुरुवातीला सातारा वनक्षेत्रात येणारे सागरेश्वर अभयारण्य नंतर सांगली वनक्षेत्रात वर्ग करण्यात आले. वनमंत्री नासिकराव तिरपुडे हेच या अभयारण्याच्या विरोधात होते. पण धो. म. मोहिते यांनी या सगळ्या समस्यांवर मात करत यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांच्या सहकार्याने सर्व समस्यांवर तोडगा काढत त्यांनी अभयारण्य यशस्वी करून दाखविले.

### ५. राजकीय व्यक्तींची प्रेरणा, प्रोत्साहन आणि मदतीची साथ

अभयारण्य निर्मिती करणे हे एका व्यक्तीचे कार्य नसते. त्या पाठीमागे अनेक स्वरूपाच्या शक्तींची आवश्यकता असते. त्यामध्ये राजकीय इच्छाशक्ती ही लोकशाहीत महत्त्वाची ठरते. या अभयारण्य निर्मितीत अनेक राजकीय व्यक्तींची प्रेरणा, प्रोत्साहन आणि मदत झाली आहे. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. नवा महाराष्ट्र हा सर्व दृष्टिकोनातून संपन्न व्हावा, ही त्यांची धारणा होती. मुख्यमंत्री पदावरून ते केंद्रात अनेक पदावरती विराजमान झाले. पण महाराष्ट्रातील प्रत्येक घडामोडीवर त्यांचे लक्ष होते. त्यात देवराष्ट्रे हे त्यांचे आजोळ. देवराष्ट्राला लागून असणाऱ्या सागरेश्वर परिसरावरती त्यांचे नितांत प्रेम होतेच. सागरेश्वर डोंगरात अभयारण्य निर्मिती करण्याची संकल्पना त्यांना आवडली होती. या निर्मितीत त्यांनी श्री मोहिते यांना सातत्याने प्रोत्साहन देऊन अनेक अडथळ्यावर आपल्या कौशल्याने मात केली आहे. सागरेश्वर अभयारण्याचा प्रस्ताव देण्यापासून ते अभयारण्य पूर्ण होईपर्यंत यशवंतराव चव्हाण यांनी विशेष लक्ष दिले होते. चव्हाण साहेबांनी मोहिते यांच्या पूर्ण स्वभावाची जाण होती. मोहिते यांचा जसा नर्मविनोदी स्वभाव होता, तितकाच रागिष्ट आणि तापट स्वभाव होता. त्यामुळे ते मोहिते यांची विशेष काळजी घेत असत. वनमंत्री नासिकराव तिरपुडे यांनी सागरेश्वर अभयारण्याच्या मंजुरीस नकार दिला. त्यावेळी चव्हाण साहेबांनी वसंतदादांकरवी हे प्रकरण व्यवस्थितपणे हाताळले होते. त्यामुळेच अभयारण्यास मंजुरी मिळू शकली. सागरेश्वर अभयारण्यामध्ये त्यांनी येऊन प्रत्यक्ष वृक्षारोपणही केले होते. कोणत्याही दौऱ्यानिमित्त त्या भागात ते आले की हेलिकॉप्टर जितके खाली घेता येईल, तितके खाली घेऊन सागरेश्वर अभयारण्याची ते पाहणी करून जात असत.

वसंतदादा पाटील त्यावेळी मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्री पदावरून अभयारण्याला जितकी मदत करता येईल तितकी मदत ते करत होते. राजकारणात काही व्यक्तींशी पटत नसूनही ते अभयारण्य निर्मितीसाठी सर्वांशी संधान बांधून अभयारण्याची कामे करवून घेत होते. बॅरिस्टर ए. आर. अंतुले हे मुख्यमंत्री असताना अभयारण्याची अनेक कामे तडीस लागली होती. अंतुले आणि शरद पवार हे राजकीय विरोधक असले तरी खाजगी मध्ये ते एकमेकांचे चांगले मित्र होते. या मैत्रीचा फायदा श्री मोहिते यांनी अभयारण्यासाठी चांगलाच उठवला होता. बॅ. अंतुले यांनी सागरेश्वर अभयारण्याच्या विकासासाठी २ कोटी ६३ लाख रुपये मंजूर करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता. तर शरद पवार हे निसर्गाविषयी चांगली दृष्टी असणारे नेते आहेत. त्यांचेही अभयारण्यासाठी विशेष योगदान असल्याची नोंद मोहिते यांनी या अनुभवकथनामध्ये केली आहे. या नेत्या बरोबरच राजारामबापू पाटील तसेच खानापूरचे आमदार संपतराव देसाई, जिल्हा परिषद - पंचायत समिती सदस्य आणि स्थानिक राजकीय व्यक्तींची साथ या अभयारण्य निर्मितीसाठी झाल्याची नोंद श्री मोहिते यांनी केली आहे.

**६. धों. म. मोहिते यांची जिद्द, कष्ट आणि संघर्ष**

पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करायला पाहिजे, हे सगळ्यांना माहिती असते; पटतही असते. मात्र, त्यासाठी व्यक्तिगत पातळीवर काय करायचे याची कुठेही स्पष्टता असत नाही. एक माणूस करून करून काय करणार आणि आभाळ फाटलेल्या पर्यावरणाच्या वस्त्राला संरक्षणाची ठिगळे तरी किती लावणार, असाच सूर नेहमी उमटताना दिसतो. मात्र, तेव्हाच्या दक्षिण सातारा (आताच्या सांगली) जिल्ह्यातील निसर्गमित्र धों. म. मोहिते या एका माणसाने एकट्याच्या बळावर एका अभयारण्याची निर्मिती करून उजाड आणि बोडक्या माळावर अभयारण्य तयार करून दाखविले. सुरुवातीला थट्टा होत होती. एखादी व्यक्ती अशी थट्टा-मस्करी पाहून निराश झाली असती आणि त्याने असा जगावेगळा नाद सोडून दिला असता. मात्र, जितकी थट्टा जास्त होत गेली, तितका मोहितेंचा निर्धार अधिक कडवा होत गेला.

यशवंतराव चव्हाण केंद्रात मंत्री होते. त्यांचे सहकार्य त्यांना लाभले. मोहितेंनी १९७२ च्या दुष्काळाचा फायदा करून घ्यायचं ठरवलं. रोपे मरू लागली. माणसांना पाणी नाही तर रोपांना कुठून मिळणार. मोहितेंनी दुष्काळी भागात होणारी शासकीय कामे अभयारण्यात आणली. सुरवातीला लांबच्या डोंगरात जावून कामे कोण करणार म्हणून माणसं येत नसतं. पण हळुहळु दुष्काळ वाढला. लोकांना खाण्याचे वांधे झाले. बागायदार शेतकरी जवळ काम करायला नको म्हणून डोंगरात काम करु लागले. त्यातूनच अभयारण्यात कामांचा डोंगर उभा राहिला. डोंगरात जाणारा रस्ता उभा राहिला.

हे सगळं करत असताना त्यांची जिद्द आणि चिकाटी महत्त्वाची ठरली. प्रशासकीय पातळीवर अनेक अडथळे आले. नकारार्थी विचारांच्या अनेक व्यक्ती आणि अधिकारी, मंत्री भेटले. त्या सर्वांवर त्यांनी आपल्या कौशल्याने मात केली. रात्री अपरात्री प्रवास केला. सोई-गैरसोई पत्करून मंत्रालयापर्यंत खेटे घातले. गावातील काही कुप्रवृत्तींच्या माणसांना तोंड दिले. अभयारण्याला हानी पोहचवणारे लाकूडतोडे,

हातभट्टीवाले यांच्याशी संघर्ष केला. जनावरांची चराईबंदी केली. अभयारण्याच्या प्रसिद्धीसाठी वारंवार व्याख्याने देणे, अभयारण्यात विविध कार्यशाळा, शिबिरे आयोजित करणे. ही सर्व कामे ते विना मोबदला, स्वखर्चाने, स्वकष्टाने करत होते. केवळ अभयारण्य निर्माण करण्याच्या ध्येयासाठी हे सर्व प्रामाणिकपणे आणि निष्ठेने करत राहिले. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाच्या प्रत्येक घटना प्रसंगांमध्ये मोहिते यांना करावा लागणारा संघर्ष, त्यांची जिद्द आणि चिकाटी दिसून येते. शेवटच्या टप्प्यात वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये मोहिते अण्णाविषयी नाराजी पसरली. त्यांनी अभयारण्यातील अण्णांचे सर्व फोटो काढून टाकले. त्यावेळी अण्णा म्हणाले होते की, ''फोटो काढून टाकले म्हणून माझ्या रक्ता-घामाने अभयारण्यावर कोरलेल माझे नाव कसे काय पुसले जाणार?'' हे विधान त्यांनी केलेल्या अपार कष्टातून व्यक्त झाले आहे. एका ध्येयवादी माणसाला अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते. याचे हे एक आगळेवेगळे उदाहरण आहे.

### ७. धों. म. मोहिते यांची स्वप्नपूर्ती

१९८५ मध्ये सागरेश्वर अभयारण्य हे भारतातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य म्हणून डेहराडून येथील वर्ल्ड लाइफ ट्रेनिंग सेंटरमध्ये तशी नोंद झाल्याचे जाहीर केले. मोहिते यांची त्याक्षणी स्वप्नपुर्ती झाली. सागरेश्वर अभयारण्याची जन्मकथा वाटचाल आणि तिचे आजचे स्वरूप पाहता धों. म. मोहिते यांनी आपल्या आयुष्यातील (१९७० ते १९९४) वीस ते पंचवीस वर्षे यासाठी खर्ची घातली. अभयारण्याच्या उभारणीचा, कसोटीचा काळ त्यांनी या अनुभवकथनांमधून व्यक्त केला. एक छंद आणि एक निसर्गवेड म्हणून त्यांनी हे काम हाती घेतले. या कामासाठी त्यांची कुणी नेमणूक केली नव्हती. तर स्वतःहून त्यांनी ते काम स्वीकारले होते. त्यासाठी त्यांना शासनाकडून कोणताही आदेश नव्हता किंवा मानधन नव्हते. 'केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे ।।' या श्रद्धेने त्यांनी हे काम पूर्ण केले. संत तुकारामांच्या वचनाप्रमाणे त्यांनी वृक्षवल्ली सगेसोयरे मानले. वृक्षांना देवाठायी पूजले. 'वृक्ष देवो भव।' ही उक्ती त्यांनी अंतःकरणात जपली. फक्त कर्म करत राहिले, फळाची कसलीही अभिलाषा त्यांनी मनात ठेवली नाही. त्यांच्या यथाशक्ती प्रयत्नांना चांगले यश मिळाले. त्यांच्यासारख्या एका सामान्य शेतकरी कार्यकर्त्याचा शासन दरबारी सन्मान झाला. विधानसभेत एकमुखी ठराव करून 'वृक्षमित्र' पदवी मिळवणारे महाराष्ट्रातील ते एकमेव पदवीधर ठरले! दुर्लभ असा त्यांना परदेश दौराही घडून दक्षिण कोरिया पहावयाची संधी मिळाली. सर्व क्षेत्रातील नामवंत व्यक्तींनी त्यांचे कौतुक केलेच, शिवाय सर्वसामान्य जनतेनेही त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. सार्वजनिक कामाच्या ओढीमुळे त्यांनी सागरेश्वराचा डोंगर वनश्रीने नटविला आणि सरकार दरबारी अधिकृतरित्या 'सागरेश्वर अभयारण्य' म्हणून मान्यता पावला. त्यांचे स्वप्न या निमित्ताने सत्यात उतरले!

मोहिते यांच्या या कार्याप्रित्यर्थ महाराष्ट्र आणि केंद्र शासनाच्यावतीने 'वृक्षमित्र' पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. त्यांच्या या पुरस्काराबाबत पु. ल. देशपांडे यांनी मोहिते यांच्या एका पत्राला उत्तर देताना म्हटले की, ''वृक्ष संवर्धनाच्या तुमच्या कार्याबद्दल यापुढेही तुम्हाला खूप गौरव पुरस्कार मिळतील याची खात्री आहे. पण तुम्हाला खरा पुरस्कार तुम्ही वाढविलेल्या उंच वृक्षांनी आणि निर्भयतेने

अरण्यात राहणाऱ्या वनचरांनी यापूर्वीच दिलेला आहे. उंच डोलणारा वृक्ष आणि निर्भयपणे वावरणारे हरीण हे तुमचे अमोल पुरस्कार आहेत. ते सतत मिळत राहोत ही शुभेच्छा!'' हा पु. ल. देशपांडे यांचा अभिप्राय धों. म. मोहिते यांच्या खऱ्या कार्याचा गौरव करणारा आहे.

**८. पर्यावरण संवर्धन काळाची गरज**

पर्यावरण संवर्धन म्हणजे हवा, पाणी, जमीन आणि परिसंस्थांचे संरक्षण करणे आणि मानवजातीचे पर्यावरणावर होणारे नकारात्मक परिणाम कमी करणे. यामध्ये पाण्याचा अपव्यय टाळणे, वन्यजीवांचे संरक्षण करणे आणि स्वच्छ ऊर्जेचा वापर करणे अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. हे पृथ्वीवरील जीवसृष्टीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि आपल्या भावी पिढ्यांसाठी एक निरोगी भविष्य सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. हवा, पाणी आणि अन्न यांसारख्या नैसर्गिक संसाधनांवर मानव अवलंबून असतो. पृथ्वीवरील सर्व सजीव, प्राणी आणि वनस्पती यांच्यासाठी आवश्यक असलेले नैसर्गिक अधिवास आणि परिस्थिती राखणे महत्त्वाचे आहे.

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाची अर्पण पत्रिका फार बोलकी आहे. ती पुढीलप्रमाणे -

***सागरेश्वर अभयारण्यातील***
***झाडे, झुडपे, लतावेली, पशुपक्षी,***
***वन्यप्राणी व येथील चराचर***
***यांच्यावर मी मुलाप्रमाणे***
***प्रेम केले. त्या सर्वांना***
***ही कलाकृती प्रेमभरे अर्पण !***

- वृक्षमित्र धों. म. मोहिते

यावरून हे अनुभवकथन पर्यावरण रक्षणाची आणि संवर्धनाची गरज सांगणारेच आहे, हे लक्षात येते. कारण धों. म. मोहिते यांनी लहानपणी ज्या पद्धतीने सागरेश्वर परिसरात समृद्ध पर्यावरण पाहिले होते. ते त्यांच्या प्रौढपणी दिसले नाही. तेथील पर्यावरणाची झालेली हानी, प्रचंड वृक्षतोड यामुळे ते व्यतीत झाले. ताडोबा अभयारण्यासारखे येथे पुन्हा निसर्गसंपन्न पशुपक्ष्यांनी बहरलेले पर्यावरण साकार करण्याचे ध्येय मनाशी बाळगले. त्यासाठी त्यांनी अनेक प्रयोग राबवले. अभयारण्य परिसरात अनेक मान्यवर व्यक्तींच्या हस्ते वृक्षारोपण केले. विविध शिबिरे, कार्यशाळा, बैठका, व्याख्याने असे उपक्रम अभयारण्यात आयोजित करून अभयारण्याची प्रसिद्धीही केली. त्याचबरोबर शिबिरार्थींकडून वृक्षारोपण करून घेतले.

सागरेश्वर अभयारण्यात मोहिते यांना आगळावेगळा वनमहोत्सव साजरा करण्याची कल्पना सुचली. रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतनवर पु.ल. देशपांडे यांनी एका दिवाळी अंकांमध्ये लेख लिहिला होता.

तो लेख वाचताना वृक्षदिंडीची कल्पना मोहिते यांना सुचली. त्यांनी परिसरातील सर्व शाळांचे विद्यार्थी बोलावले. पालखी सजवली. तिच्यात तजेलदार रोपे ठेवली. विद्यार्थ्यांनी पालखी खांद्यावरून मिरवली. बँड, धनगरी ढोल, लेझीम, घोषणा देत मिरवणूक काढून अभयारण्यातील रोपवाटिकेपासून वाजतगाजत बालोद्यानापर्यंत आणली. तेथे मुलांच्या हस्ते वृक्षारोपण केले. या आगळ्या वेगळ्या वृक्षदिंडीचा वर्तमानपत्रात गाजावाजा झाला. त्यानंतर काही वर्षानंतर सांगली जिल्ह्यात सर्वत्र अशीच वृक्षदिंडी काढून वृक्षारोपणाचा संदेश सर्वत्र पोहोचवला. प्रा. एन. डी. पाटील एकदा मंत्री असताना त्यांनी सांगली जिल्ह्यातील शाळा कॉलेजना आवाहन केले की, ''अभयारण्यातील काही क्षेत्र दत्तक घेऊन युवकांनी त्या क्षेत्रात श्रमदानाने वनीकरण करावे.'' याही आवाहनाला बराच प्रतिसाद मिळाला. त्यामध्ये काही कार्यकर्ते निष्ठेने कित्येक वर्ष श्रमदान करत राहिले. हे अभयारण्य पुढे सांगली जिल्ह्यातील एक पर्यटन केंद्र बनले. त्यामुळे नकळतपणे पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रत्येक माणसाच्या मनामनामध्ये कोरला गेला. त्यामुळे या अभयारण्याचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

**९. ऐतिहासिक व सामाजिक दस्तऐवज**

दस्तऐवज म्हणजे माहिती साठवण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी वापरले जाणारे कोणतेही साधन होय. जे मजकूर, प्रतिमा किंवा इतर माध्यमांच्या स्वरूपात असू शकते. ऐतिहासिकदृष्ट्या हे कागदावरचे लिखित रूप होते, पण आजकाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील दस्तऐवज देखील यात समाविष्ट आहेत. हे दस्तऐवज पुराव्याचे, माहितीचे किंवा सूचनेचे काम करतात आणि ते सार्वजनिक, खाजगी किंवा गुप्त असू शकतात. दस्तऐवज म्हणजे माहितीचा संग्रह असतो. यात मजकूर, आकृत्या, चित्रे किंवा इतर कोणतीही माहिती साठवलेली असते. दस्तऐवजाचा वापर माहिती नोंदवण्यासाठी, संग्रहित करण्यासाठी, प्रसारित करण्यासाठी किंवा पुराव्यासाठी केला जातो.

सामाजिक दस्तऐवज म्हणजे समाजजीवनाशी संबंधित असलेले कोणतेही लिखित, छापील, चित्रे, नकाशे, किंवा इतर कोणत्याही स्वरूपातील नोंदी, ज्यांच्या मदतीने समाजाच्या विविध पैलूंचा अभ्यास करता येतो. उदा. वर्तमानपत्रे, डायरी, आत्मचरित्रे, अनुभवकथने, शासकीय अहवाल, कायदेशीर कागदपत्रे, दैनंदिनी, पत्रव्यवहार हे दस्तऐवज असतात. संशोधकांना समाजातील घटना, प्रवाह आणि मानवी वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. हे दस्तऐवज समाजाच्या भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील माहितीचे दुय्यम स्रोत म्हणून काम करतात. दस्तऐवजांच्या विश्लेषणातून समाजाच्या धोरणांचा, संस्कृतीचा आणि मानवी संबंधांचा सखोल अभ्यास करता येतो. कायदेशीर आणि प्रशासकीय कामांसाठी दस्तऐवज पुराव्याचा आधार म्हणून वापरले जातात. थोडक्यात, सामाजिक दस्तऐवज हे समाजाचे प्रतिबिंब असतात, जे आपल्याला समाजाला समजून घेण्यासाठी आणि त्याचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती आणि पुरावे पुरवतात.

या विवेचनाच्या आधारे 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' हे अनुभवकथन एक ऐतिहासिक आणि

सामाजिक दस्तऐवज ठरू शकते. कारण आज रोजी सागरेश्वर अभयारण्य एक देशातील पहिले मानवनिर्मित अभयारण्य म्हणून प्रसिद्ध आहे. या अभयारण्याचा इतिहास,भूगोल आणि त्याचा सामाजिक, राजकीय दृष्टिकोनातून जर इतिहास लेखन करायचे झाल्यास हे अनुभवकथन एक महत्त्वाचा,अस्सल पुरावा म्हणून पाहता येईल.

## २.३ समारोप

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून एका जिद्दी, ध्येयवेड्या, निसर्गवेड्या व्यक्तीचे अनुभव किती श्रेष्ठ स्वरूपाचे आहेत हे लक्षात येते. जगामध्ये अशक्यप्राय गोष्ट कोणतीच नाही. प्रत्येक गोष्टीवर मात करता येते. ध्येयप्राप्तीचा खडतर आणि कष्टप्रद प्रवास असतो. पण ध्येयपूर्तीनंतर मिळणारा आनंद हा सर्वश्रेष्ठ आनंद असतो. याची जाणीव होते. मानवाच्या वाट्याला अनेक कडूगोड प्रसंग येत असतात. या प्रसंगावर मात कशी करावी? याचे ज्ञान या अनुभवकथनातून मिळते. पर्यावरण रक्षण आणि संवर्धनासाठी एक माणूस काय करू शकतो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. त्याबरोबरच या अनुभवकथनाची निर्मिती प्रक्रिया, कथानकाचे स्वरूप आणि आशयसूत्रांचे स्वरूप लक्षात येते.

## २.४ सरावासाठी प्रश्नोत्तरे

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'विधायक कार्यकर्ता आणि शासन यंत्रणा यांच्या कर्तृत्वाचा सुरेख संगम म्हणजे हे सागरेश्वर अभयारण्य!' असा अभिप्राय अभयारण्याच्या नोंदवहीत कोणी लिहिला आहे?

अ) यशवंतराव चव्हाण ब) वसंतदादा पाटील

क) यशवंतराव मोहिते क) प्रा. एन. डी. पाटील

२. 'सागरेश्वर अभयारण्यातील काही क्षेत्र दत्तक घेऊन युवकांनी त्या क्षेत्रात श्रमदानाने वनीकरण करावे.' असे आवाहन कोणी केले?

अ) यशवंतराव चव्हाण ब) बॅ. ए. आर. अंतुले

क) राजारामबापू पाटील क) प्रा. एन. डी. पाटील

३. कोणत्या डोंगरावर अभयारण्य करायचे? असे धों. म. मोहिते यांनी ठरविले ?

अ) सागरोबा ब) बिरोबा

क) शिंगणापूर ड) कुंडल

४. कोणत्या ग्रंथात कौंडिण्यपूरचा सत्यशील राजा तपश्चर्यास बसल्याचा उल्लेख आहे ?

अ) करवीर महात्म्य    ब) शिवलीलामृत

क) सागरेश्वर महात्म्य    ड) ज्ञानेश्वरी

५. वनमंत्री तिरपुडे साहेबांसोबत धों. म. मोहिते यांचा कशावरून वाद झाला ?

अ) गैरसमजामुळे    ब) श्रेयवादामुळे

क) अभयारण्याच्या मान्यतेवरून    ड) नाराजीमुळे

६. १९७२ च्या दुष्काळात सरकारपुढे प्राधान्याने कोणते मोठे आव्हान उभे होते ?

अ) जनता जगविणे    ब) व्यसनमुक्ती

क) निर्मलग्राम    ड) स्वच्छता अभियान

७. दुष्काळी कामाच्या वेळी अभयारण्यात रस्ते आखण्याची कामे कोण करत होते?

अ) तलाठी    ब) ग्रामसेवक

क) अभियंता    क) धों.म. मोहिते

८. अभयारण्याच्या विकासासाठी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांच्याकडे निधीची मागणी करण्यासाठी कोणी सुचविले?

अ) शरद पवार    ब) यशवंतराव मोहिते

क) प्रा एन. डी. पाटील    ड) वसंतदादा पाटील

९. वनखात्यातून वन्यजीव विभाग वेगळा करण्याची मागणी कोणी केली होती?

अ) उ. रा. माविनकुर्वे    ब) धों. म. मोहिते

क) बी. जी. ममदापुरे    ड) इ. अ. ज. सत्तार

१०. सागरेश्वर परिसरातील वनाला पूर्वी कोणते वन म्हणत असत?

अ) तपोवन    ब) पंचवटी

क) अंबिकावन    क) अशोकवन

**उत्तरे :** १. अ) यशवंतराव चव्हाण    २. क) प्रा. एन. डी. पाटील    ३. अ) सागरोबा
४. अ) करवीर महात्म्य    ५. क) अभयारण्याच्या मान्यतेवरून
६. अ) जनता जगविणे    ७. क) धों.म. मोहिते    ८. अ) शरद पवार
९. ब) धों.म. मोहिते    १०. क) अंबिकावन

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाचे कथानक तुमच्या शब्दात लिहा.

२. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाच्या आधारे वृक्षमित्र धों. म. मोहिते यांचा संघर्ष तुमच्या शब्दात लिहा.

३. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाची आशयसूत्रे लिहा.

४. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाची जाणीव कशी होते, ते लिहा.

**क) लघुत्तरी प्रश्न/ टीपा.**

१. अभयारण्य निर्मिती प्रक्रिया लिहा.

२. सागरेश्वर अभयारण्यातील दुष्काळामध्ये रस्ता बनवण्याच्या कामाचा अनुभव तुमच्या शब्दात लिहा.

३. धों. म. मोहिते यांना राजकीय व्यक्तींचे झालेले सहकार्य

४. सागरेश्वर अभयारण्याला झालेल्या मान्यवर व्यक्तींच्या भेटी

५. धों. म. मोहिते यांना आलेले वनखात्याचे अनुभव

## २.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

**अ) पूरक वाचन**

१. मोहिते, धों. म., कथा सागरेश्वर अभयारण्याची, इंद्रायणी साहित्य, पुणे

२. चव्हाण, यशवंतराव, कृष्णाकांठ, रोहन प्रकाशन, पुणे

३. चव्हाण, यशवंतराव, ऋणानुबंध, रोहन प्रकाशन, पुणे

४. वेलणकर, उदय (संपा.), धों. म. मोहिते गौरव स्मरणिका, प्रकाशक पत्रकार संघ, किर्लोस्करवाडी

५. मोहिते, धों. म., सोनहिऱ्याचे पाणी (लघुकथा संग्रह), बळीराजा प्रकाशन, मोहित्यांचे वडगाव

६. मोहिते, धों. म., मुलाखतींच्या मैदानातून, बळीराजा प्रकाशन, मोहित्यांचे वडगाव

**ब) संदर्भ ग्रंथ**

१. अवचट, अनिल प्रश्न आणि प्रश्न, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे

२. आमडेकर, मिलिंद : निसर्गातले परिचित आणि अपरिचित, लोकवाङ्मयगृह, मुंबई

३. आपटे, मोहन : मला उत्तर हवय पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे

४. करंबळेकर, उमेश : ओळख पक्षिशास्त्राची, राजहंस प्रकाशन, पुणे

५. जाधव, रा. ग. : पर्यावरणीय प्रबोधन आणि मराठी साहित्य, साधना प्रकाशन, पुणे

६. जोशी, प्रकाश : असा निसर्ग अशी माणसं, मनोविकास प्रकाशन, पुणे

७. दामले, निळू : माणूस आणि झाड, राजहंस प्रकाशन, पुणे

८. देसाई, संपत : एका लोकलढ्याची यशोगाथा, शब्द पब्लिकेशन, मुंबई

९. कुंटे, कृष्णमेघ, एका रानवेड्याची शोधयात्रा, राजहंस प्रकाशन, पुणे

१०. मोरसे, दत्ता, झुंड, दर्या प्रकाशन , पुणे

**क) चित्रपट**

१. वृक्षमित्र - महाराष्ट्र शासन पुरस्कृत मराठी लघुपट

२. सागरेश्वर अभयारण्य हरणांना अभय - मराठी चित्रपट

**२.६ उपक्रम :**

१. नजीकच्या वनक्षेत्रात अभ्यास सहल आयोजित करून त्याचे अनुभवकथन लिहा.

❍❍❍

घटक ३

# कथा सागरेश्वर अभयारण्याची : व्यक्तिचित्रण, घटनाप्रसंग आणि जीवनसंघर्ष

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ व्यक्तिचित्रे, घटना–प्रसंग व संघर्षकहाणी
- ३.२.१ व्यक्तिचित्रे, घटना–प्रसंग व संघर्षकहाणी
- ३.२.२ राजकीय व्यक्तींची व्यक्तिचित्रणे
- ३.२.३ साहित्यिक व कलावंतांची व्यक्तिचित्रणे
- ३.२.४ अधिकाऱ्यांची व्यक्तिचित्रणे
- ३.२.५ वनखात्यातील व्यक्तिचित्रणे
- ३.२.६ परदेशी पाहुणे
- ३.२.७ संकीर्ण व्यक्तिचित्रणे
- ३.२.८ घटनाप्रसंग
- ३.२.९ संघर्षाची जीवन कहाणी
- ३.२.१० समारोप

३.३ सरावासाठी प्रश्न

३.४ दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.

३.५ लघुत्तरी प्रश्न / टीपा लिहा.

३.६ पूरक व संदर्भग्रंथ

३.७ उपक्रम

## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

१. व्यक्तींच्या प्रेरणा आणि त्यांच्या कृती अभयारण्य उभारणीसाठी कशा प्रेरित आहेत, हे समजून घेण्यास मदत होईल.

२. व्यक्तिचित्रणाच्या आधारे अनुभवकथानातील घटना आणि पात्रांच्या वर्तनांचा अर्थ लावणे सोपे होईल.

३. व्यक्तिचित्रणातून इतिहास, तत्कालीन समाजजीवन इत्यादींसंबंधी माहिती समजून घेता येईल.

४. व्यक्तींचे गुण, स्वभाव वैशिष्ट्ये आणि मानसिकता समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत प्रकरणात आपल्याला अनुभवकथनाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास करत असताना आपणाला या अनुभवकथनातील व्यक्तीचित्रणाचा, त्यांनी केलेल्या संघर्षाचा अभ्यास करावयाचा आहे. या अनुभवकथनातील व्यक्तींच्या प्रेरणा, त्यांच्या कृती कशाने प्रेरित झाल्या आहेत हे आपणास समजून येईल. अनुभवकथनातील घटना, व्यक्तींचे वर्तन यांचा अर्थ लावणे सोपे होईल. या अनुभवकथनातून एका निसर्गवेड्या व्यक्तीचा व त्याच्या जीवन संघर्षाचा आपणास अभ्यास करावयाचा आहे. तत्कालीन समाजजीवन, रूढी परंपरा, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती याचबरोबर हे अभयारण्य उभा करत असताना लेखकाला कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले, त्यांना कोणी मदत केली आणि कोणकोणत्या लोकांनी विरोध केला; याचीही माहिती आपणास समजून घ्यावयाची आहे. अनुभवकथनातील कथानक अधिक प्रभावी आणि आकर्षक होण्यासाठी 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील पात्रे मदत करताना दिसतात. या व्यक्तींच्या व्यक्तिरेखा अधिक प्रभावीपणे लेखकाने रेखाटल्या आहेत. व्यक्तिचित्रण हे साहित्यिक साधन म्हणून अतिशय महत्त्वाचे ठरते. व्यक्तींचे विशिष्टपणे केलेले वर्णन, त्यांची माहिती, त्यांचे स्वभाव गुणदोष या सर्वांची माहिती व्यक्तिचित्रणातून आपणास समजावून घेता येते. व्यक्तीचित्रणामध्ये म्हणजे लेखकाने लिहिलेली पात्रे ही अधिक विश्वासार्ह बनलेली दिसतात.अभयारण्य उभारणीमध्ये ज्या अडचणी आल्या त्यातून वाट काढत कधी सामंजस्याने तर कधी संघर्ष करीत अभयारण्य उभे राहिले आहे. एकूणच धों. म. मोहिते यांच्या कठोर जीवनसंघर्षाचे वास्तव चित्रण आपणास या घटकातून समजून घेता येईल.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ व्यक्तिचित्रे, घटना–प्रसंग व संघर्ष कहाणी

कोणताही लेखक जेव्हा काही तरी लिहित असतो, तेव्हा त्याच्या मनात अगोदरच कथा, कविता, कादंबरी साकार झालेली असते. प्रत्यक्ष जेव्हा कागदावर उत्तरते तेव्हा विला मूर्त स्वरूप प्राप्त झालेले

असते. एखादी कथा, कविता मनात अनेक दिवस रूजत असते. कथाबीज साकार होत असते. दैनंदिन कालक्रमणात त्याच्या रूजण्यास खतपाणी मिळत असते. आणि जेव्हा भावनेचा उत्कृष्ट बिंदू गाठला जातो. तेव्हा लेखनीद्वारे ते प्रगट होत असते. अनुभवकथन मात्र कल्पनेचा विस्तार नसतो तर जे प्रत्यक्ष अनुभवले आहे त्याचे मूर्त रूप असते. व्यक्तिचित्रण, ज्याला इंग्रजीत ''कॅरेक्टरायझेशन'' असेही म्हणतात, ही साहित्यातील कथेतील किंवा नाटकातील पात्रांचे चित्रण करण्याची प्रक्रिया आहे. यामध्ये पात्रांचे गुण, स्वभाव, भावना आणि कृतींचे वर्णन केले जाते, ज्यामुळे ते वाचक किंवा प्रेक्षकांना जिवंत आणि विश्वासार्ह वाटतात. व्यक्तिचित्रण दोन मुख्य प्रकारे केले जाऊ शकते. १. थेट व्यक्तिचित्रण २. अप्रत्यक्ष व्यक्तिचित्रण. व्यक्तिचित्रण हा साहित्यात एक महत्त्वाचा घटक आहे कारण तो कथा मनोरंजक आणि आकर्षक बनवतो आणि पात्रांना वाचकाशी जोडण्यास मदत करतो. थोडक्यात, व्यक्तिचित्रण म्हणजे कथेतील पात्रांना अशा प्रकारे चित्रित करण्याची प्रक्रिया की ते वास्तविक आणि आकर्षक वाटतील. पात्रांच्या विचारसरणी, कार्यशैली इत्यादींबद्दल माहिती देणे म्हणजे त्या पात्राचे व्यक्तिचित्रण असे म्हणतात. पात्रांचे वर्णन करण्यासाठी त्यांच्या कृती, विधाने आणि विचार इत्यादींचा वापर केला जातो.

कथानकाचा विशेष घटक म्हणून व्यक्तिचित्रणाला विशेष महत्त्व दिले जाते. कथानकातील घटना-प्रसंग व्यक्तींच्या कृती-उक्तीतून घडत असते. कथानकाला गती देण्याचे काम व्यक्तिचित्रणे करीत असतात.कथेमध्ये प्रमुख व्यक्तिचित्रणाबरोबरच गौण व्यक्तिचित्रणेही असतात. ही गौण व्यक्तिचित्रणे कथेमध्ये उपरी म्हणून आलेली नसतात. तर कथेची एक गरज म्हणून आलेली असतात. ही एकसारखी पात्रे नसतात. प्रत्येक पात्र आपल्या स्वभावधर्मामुळे वैशिष्ट्यपूर्ण झालेले असते. त्यांच्या स्वभावात विविध मानवी गुणधर्म असतात. प्रत्येकाचा विशिष्ट स्वभाव असलेली अनेक पात्रे एकत्र आली आणि त्यांच्या प्रसंग परत्त्वे परस्परसंबंध आला तर त्यातून एक विशिष्ट घटनायुक्त परिस्थिती किंवा वातावरण निर्मिती होते. ही वातावरणनिर्मिती पात्रांच्या स्वभावातून घटना-प्रसंगाच्या अनुषंगाने निर्माण झाली तर ती स्वाभाविक, प्रत्ययकारी, वास्तव स्वरूपाची, वाचकाच्या मनाला पटणारी अशी होते. कोणत्याही कलाकृतीतून साकारत जाणारी व्यक्तिचित्रणे ही तेथील परिसंस्थेचा परिपाक असते. याचाच अर्थ त्या परिसरातल्या परिणामातून ती व्यक्तिचित्रणे साकारत गेलेली असतात आणि त्या परिसराचा परिवेश त्या व्यक्तिचित्रणांना लाभलेला असतो.याच पार्श्वभूमीवरून वृक्षमित्र धों. म. मोहिते यांच्या अनुभवकथनातील काही प्रमुख व गौण व्यक्तिचित्रणांचा वेध येथे घेऊ.

**◆ वृक्षमित्र धों. म. मोहिते**

वृक्षमित्र धों. म. मोहिते यांच्या सार्वजनिक कामाचा आढावा घेता सन १९४२ च्या 'भारत छोडो' अंदोलनातील सातारा क्रांतीत सक्रिय सहभाग घेतला आहे. भूमिगत आणि तुफान सेनादलाचा कॅप्टन म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. सन १९५१ ते १९६७ मध्ये ग्रामविकासात सक्रीय सहभाग चेअरमन, ग्रामविकास मंडळ मोहिते वडगावचे सरपंच म्हणून उत्तम कामगिरी केली आहे. गावाचा सर्वांगीण विकास

करणाऱ्या ग्रामपंचायतीस कॅनडा (उत्तर अमेरिका) यांच्याकडून महाराष्ट्रातील ८ ग्रामपंचायतींना मोठे टेबल ट्रान्झिस्टर भेट म्हणून देण्यात आले. त्यातील मोहित्यांचे वडगाव ही एक ग्रामपंचायत होती. सन १९७० ते १९९४ पूर्ण वेळ देऊन विनावेतन विनाहुद्दा काम करून त्यांनी २४ वर्षे कष्ट करून सांगली जिल्ह्यात एक मानवनिर्मित 'सागरेश्वर अभयारण्य' निर्माण केले याबाबत त्यांचे अनेक सन्मान झाले. सांगली जिल्हा पत्रकार संघाची वार्षिक सभा श्री. नवजीवन लखनपाल, कलेक्टर सांगली यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७-८-१९७५ रोजी झाली. त्यात श्री. धों. म. मोहिते यांना महाराष्ट्र शासनाने 'वृक्षमित्र' ही पदवी द्यावी असा ठराव करण्यात आला. १९-३-१९८१ रोजी मुख्यमंत्री मा. अंतुले व विरोधी पक्षनेते मा. शरद पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात सत्कार. मा. वसंतरावदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गौरव समिती स्थापन करून श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनी सन १९८१ मध्ये श्री. धों. म. मोहिते यांचा गौरव अंक काढला. महाराष्ट्र विधानसभेत २४-३-१९८१ रोजी श्री. धों. म. मोहिते यांना महाराष्ट्र शासनाने 'वृक्षमित्र' पदवी द्यावी असा ठराव करण्यात आला. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना मुख्यमंत्री बॅ. अ. रा. अंतुले यांनी मुंबई विमानतळावर श्री. धों. म. मोहिते यांचा व सागरेश्वर अभयारण्यनिर्मितीचा परिचय करून दिला. त्यावेळी पंतप्रधानांनी, श्री. धों. म. मोहिते यांच्या कामाबद्दल गौरवोद्गार काढले, ''व्हेरी गुड ! आपने देश का बहुत बडा काम किया है, मैं बहुत खुश हूँ।'' मुख्यमंत्री बॅ. अ. रा. अंतुले यांच्या हस्ते १ मे १९८१ (महाराष्ट्र दिन) यादिवशी 'वृक्षमित्र' पदवीचा ताम्रपट समारंभपूर्वक दिला.

महाराष्ट्र शासनाच्या फिल्म डिव्हिजनने श्री. धों. म. मोहिते यांच्यावर 'वृक्षमित्र हा' रंगीत लघुपट काढला. मा. मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीवरून संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे दक्षिण कोरियाचा २१ दिवसांचा दौरा केला. महाराष्ट्रशासनाच्या बालचित्रवाणी (दूरदर्शन) यांनी श्री. धों. म. मोहिते यांच्यावर प्राथमिक शिक्षकांसाठी वृक्षमित्र हा दूरचित्रवाणी चित्रपट काढला. सांगली जिल्हा कामगार सहकारी बँक लि. मुंबई चेअरमन ॲड. दादासाहेब चव्हाण यांनी बजाज सुपर स्कूटर व्यक्तिगत भेट दिली. श्री. धों. म. मोहिते यांना इचलकरंजीच्या फाय फौंडेशनचा नॅशनल ॲवॉर्ड हा स्मृतिचिन्ह व रोख रु. १०,०००/- देऊन करण्यात आला. मा. शरद पवार यांनी गौरव समिती स्थापन करून वृक्षमित्र हा गौरव अंक काढला. दूरदर्शनने रोजी सागरेश्वर अभयारण्य : हरणांना अभय हा दूरचित्रवाणी चित्रपट काढला. वसंतराव नाईक विकास प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे 'वसंतराव नाईक वनीकरण पुरस्कार' मिळाला. वृक्षमित्र श्री. धों. म. मोहिते यांना भारत सरकारकडून इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र ॲवॉर्ड प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रु. ५०,०००/- राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अनेक महामंडळावर त्यांनी काम केले. त्यामधे संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ लि., मुंबई, संचालक, वनविकास महामंडळ, महाराष्ट्र लि., नागपूर, अध्यक्ष, रायगड किल्ला, वनीकरण वनसंवर्धन समिती, जि. रायगड, कार्यकारी अध्यक्ष, सागरेश्वर अभयारण्य विकास सल्लागार समिती, जि. सांगली, उपाध्यक्ष, शिवनेरी किल्ला विकास सल्लागार समिती, जि. पुणे. शिंदखेड राजा विकास समिती, जि. बुलढाणा. रायगड परिसर विकास सल्लागार समिती, जि. रायगड. वेरूळ लेणी परिसर विकास, सल्लागार समिती जि. औरंगाबाद, मानद वन्यजीव रक्षक महाराष्ट्र राज्य. वन्यजीव सल्लागार मंडळ महाराष्ट्र राज्य अशा विविध समित्यावर काम केले. १९५१ ते १९७४ किर्लोस्कर

मासिके, किर्लोस्करवाडी यामध्ये लेख, कथा इ. विपुल लेखन. 'सोनहिऱ्याचे पाणी' लघुकथा संग्रह (प्रस्तावना : मा. काकासाहेब गाडगीळ), 'मुलाखतीच्या मैदानातून' कथारूप मुलाखतींचा संग्रह (प्रस्तावना : मा. यशवंतराव चव्हाण) मुंबई, पुणे, सांगली या आकाशवाणी केंद्रांवरून लोकनाट्य, कथा, श्रुतिका, नभोनाट्य, भाषण, मुलाखती इ. कार्यक्रमासाठी लेखन व प्रत्यक्ष सहभाग. मराठीतील अग्रगण्य दैनिके व साप्ताहिके यांतून लेखन केले आहे.

कोणतेही काम हातात घेतल्यानंतर ते पूर्णच करायचे त्यासाठी काहीही करायला लागले तरी चालेल असा मोहिते यांचा स्वभाव असलेला आपणास दिसून येतो. अनेक संकटांचा महापूर ओलांडून अभयारण्य उभारण्याचा पैलतीर गाठण्याची किमया मोहिते यांनी लिलया पेलली आहे. भारतातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य म्हणून ज्या अभयारण्याचा उल्लेख केला जातो. ते अभयारण्य शासनाने त्यांची कोणतीही नेमणूक न करता किंवा त्यांनी कोणतेही मानधन न घेता जगावेगळे पण लोकोपयोगी, सार्वजनिक कामाच्या छंदापायी आणि निसर्गाच्या वेडापायी ही खडतर वाटचाल करून जीवघेण्या संकटावर मात करून अनेकांच्या हाताचे पाठबळ घेत हा प्रवास पूर्ण केला आहे. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता प्रामाणिकपणे निस्वार्थपणे काम करत राहिल्यानंतर त्याचे फळ आपोआपच मिळत राहते हा त्यांच्या आई-वडिलांनी दिलेला संदेश त्यांनी कायम आपल्या लक्षात ठेवला. ६ ऑगस्ट १९९४ रोजी दिल्लीत राष्ट्रपती भवनातील अशोक हॉलमध्ये निमंत्रितांच्या उपस्थितीत मोहिते यांना इंदिरा गांधी प्रियदर्शनी, वृक्षमित्र पुरस्कार आणि प्रदूषण नियंत्रण राष्ट्रीय पुरस्कार असे तीन पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. पर्यावरण प्रदूषण नियंत्रण वनीकरण आणि संरक्षण या सर्व पातळ्यावर त्यांनी दुष्काळी परिस्थितीत अतिशय मोलाची कामगिरी बजावली. त्यांच्या स्वभावाच्या तर्कटपणाचा एक नवीन पैलू आपणास या अनुभवकथनातून पाहावयास मिळतो. सागरेश्वर अभयारण्य हे वनक्षेत्रासाठी अयोग्य आहे. त्यामुळे वनीकरण योजना राबवणे शक्य नाही असे शासनाकडून पत्र आल्यानंतर मंत्रालयात भेटण्यास मोहिते गेले त्यावेळी तिथल्या एका कामगाराने त्यांना विचारलं, 'तुमचं अभयारण्य कुठपर्यंत आले?' त्यावेळी 'आत्ताशी ते स्मशानात पोहोचले आहे. सचिवालयात जाऊन त्याच्या चितेला काडी लावायची आहे.' असे म्हटल्यामुळे त्या कामगारास पुढे काय विचारायचे याचे धाडस झाले नाही. त्यानंतर वनमंत्री तिरपुडे साहेब यांना भेटण्यासाठी मोहिते गेले. त्यावेळी वनमंत्री पाठमोरे उभे राहून सर्वांची बोळवण करत होते. हे पाहून मोहिते काहीही न बोलता खुर्चीवर बसून राहिले. वनमंत्र्यांनी पाठीमागे वळून पाहिल्यानंतर त्यांना मोहिते दिसले. त्यावेळी मोहिते यांनी त्यांना 'अभयारण्य नाकारण्याचा निर्णय आपण का घेतला?' असे विचारले त्यावेळी त्यांनी 'एवढ्याशा टेकडीवर कसले अभयारण्य करताय, सांगली जिल्ह्यासाठी कसे पैसे काढायचे यासाठी सांगलीकर पटाईत आहेत,' असा दम भरण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेला मोहिते यांनी हे अभयारण्य होईल असे सुचवणारे सगळे मूर्ख आहेत का? आणि आपण सचिवालयात बसून शहाणे झालात का? असा प्रतिप्रश्न वनमंत्र्यांना केला. त्यावेळी 'हू आर यू?' असे तिरपुडे यांनी मोहिते यांना विचारले. त्यावेळी मोहिते यांनी 'तुम्ही तरी कोण? खुर्ची गेल्यावर माझ्यासारखे कार्यकर्तेच आहात' असे सुनावले. त्यानंतर त्या रात्री यशवंतराव चव्हाण साहेब यांच्याशी मोहिते यांनी वार्तालाप केला. त्यावेळेला चव्हाण साहेबांनी एका कार्यकर्त्याला

सांगितले की, ''मोहिते हा भडक डोक्याचा कार्यकर्ता आहे. तो न जेवता झोपेल, पहिल्यांदा त्यांना जेवायला घाल.'' दुसऱ्या दिवशी त्यांनी वसंतरावदादा पाटील यांना भेटण्यास सांगितले. त्यावेळी मात्र वसंतरावदादांनी त्यांना सांगितले की, ''वनमंत्र्याशी भांडण काढायला कशाला गेलात. तुमचे काम होईल.'' अशा प्रकारे आपला स्वभाव रागीट आहे, हेही विनम्रपणे मोहिते यांनी मान्य केले आहे. आज सर्व स्तरावर प्रदूषणाचे प्रमाण आणि नैसर्गिक संसाधनांचे जतन यावर विचारविनिमय केला जातो. परंतु धोंडीराम महादेव मोहिते उर्फ अण्णा यांनी १९७२ ला या विषयावर आपल्या कामाने योग्य ती मोहोर उठवलेली दिसते.

सर्वांना एकत्रित घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी आपणास या अनुभवकथनाच्या प्रत्येक पानावरती जाणवते. कोणतेही प्रशासकीय अधिकारी असो त्यांच्याशी गोडी गुलाबीने, प्रसंगी त्यांच्याशी भांडण काढून आपले काम करून घ्यायचे असा मोहिते यांचा स्वभावाचा पैलू या पुस्तकातून जाणवतो. कोणतेही काम पूर्ण केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे ते आपल्या अनुभवकथनात म्हणतात, ''स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह ही चिन्ह येत असतात. पण ती पार करून अखेर पूर्णविराम गाठतोच. दारुड्यासारखी मला त्या सार्वजनिक कामाची नशा चढते. या नशेत असताना मला शारीरिक, मानसिक त्रास होतो, खिसा मोकळा होत असतो पण असल्या किरकोळ बाबी माझ्या गावीही नसतात. तहानभूक हरपलेली असते.अर्जुनासारखे फक्त ते लक्ष्यच मला दिसत असते. या एकाच ध्यासाने माझी वाटचाल सुरू असते. त्या कामात मी स्वतःला झोकून देत असतो. मग शेंडी तुटो गाठ सोडायची नाही. त्या सार्वजनिक कामाचा शेवट गाठायचाच. शिकार उठवायची. ती उठली की सोडायची नाही. करायचीच. हे पक्क. त्यामुळे किचकट आणि अवघड गणित असले तरी ते मांडायचे आणि सोडवल्याशिवाय थांबायचे नाही, हीच माझ्या सार्वजनिक कामाची तऱ्हा आहे.'' सार्वजनिक कामासाठी वडिलांनी आपल्याला पूर्ण मोकळे सोडले म्हणून ते म्हणतात की, ''मी कधी वळू सारखा उंडारलो नाही. कारण वडिलांनी मला त्यावेळी सक्त ताकीद दिली होती. सार्वजनिक काम करताना, प्रवास करण्यासाठी मी तुला हवे तेवढे पैसे देत जाईन. पण त्या कामात कुठे अपहार केल्याचे मला थोडे जरी समजले तरी तुला शेतीत घालीन.'' आपल्या वडिलांच्या सार्वजनिक कामाचा वारसा मोहिते अण्णांनी शेवटपर्यंत सांभाळला. आजही मुंबईत गेल्यानंतर काळाचौकी येथे त्यांच्या वडिलांच्या नावे असलेली महादेव मास्तरची चाळ ही मोठ्या दिमाखात उभी आहे. मोहिते वडगावच नव्हे तर आसपासच्या परिसरातील लोकांनाही निवाऱ्याचे हक्काचे ठिकाण म्हणून आज काळाचौकीमध्ये ही चाळ सर्वांना आपली वाटते. याचे कारण हेच आहे की, मोहिते अण्णांच्या वडिलांनी सार्वजनिक कामाचा वसा स्वतः जपला होता आणि तो आपल्या मुलाकडे सोपवला होता. यावरून त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू वाचकांना या अनुभवातून पहावयास मिळतात. शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते म्हणून सुद्धा त्यांनी अनेक वर्ष काम केले होते. निवडणुकांच्या काळात आपल्या रसाळ वाणीने मतदारांच्या मनाला भुरळ घालणारा एक उत्कृष्ट वक्ता म्हणूनही मोहिते यांची ओळख आपणास आहे. जे पाहिले, जे जाणवले अनुभवले ते आपल्या लेखणीतून कलात्मकपणे तितक्याच संवेदनशीलपणे आणि तरलपणे त्यांनी नोंदवून ठेवले आहे. त्यांना फक्त निसर्ग वाचायचे आणि पहायचेच वेड नव्हते, तर ते माणसेही अतिशय

संवेदनशीलपणे वाचत होते त्यामुळे त्यांच्या अनुभवकथनाला सागरेश्वरच्या मातीचा, सोनहिऱ्याच्या पाण्याचा रस, रूप, गंध आणि मोहिते वडगावच्या उत्कृष्टतेचा आणि उत्तम कार्यकुशलतेचा गंधही जडलेला आहे. सरपंच म्हणून अनेक वर्ष त्यांनी मोहिते वडगाव गावची ग्रामपंचायत अतिशय उत्तमरीत्या सांभाळली. गावात वीज आणणे, परिसरातील शेतीला वीज आणणे यासारखी अतिशय महत्त्वाची कामेही अण्णांनी त्यांच्या हयातीत पूर्ण केली. मोहिते वडगावचे विद्यार्थी विकास विद्यालय उभारणीमध्येही रयत शिक्षण संस्थेचे तत्कालीन उपाध्यक्ष बाळकृष्ण रावजी मोहिते यांना मोलाची मदत केली. गावातील प्राथमिक दवाखाना असेल किंवा इतर अनेक महत्त्वाच्या सोयी या अण्णांच्या मुळेच मूर्त रूपात आल्या. त्यांचे शिक्षण मोहिते वडगाव पासून फक्त दीड किलोमीटर अंतरावर असणाऱ्या देवराष्ट्रे या गावात झाले. लहानपणी त्यांना भेटलेले देवराष्ट्रचे एक शिक्षक कृष्णा मारुती मोरे यांनी सागरेश्वर पठार– डोंगर आणि तेथील वनसंपत्ती यांचे दर्शन घडवले. सागरोबाच्या खिंडीतून जाताना गच्च असलेली झाडेझुडपे, धो धो कोसळणारा पाऊस, बारमाही वाहणारे ओहोळ, छोटे मोठे धबधबे हे कालांतराने नष्ट होत गेले आणि सागरेश्वरचा परिसर उजाड भकास आणि ओसाड झाला. अशा या ओसाड माळरानावर नंदनवन फुलवण्याचे शिवधनुष्य अण्णांनी पेलले. एकूण त्यांच्या अनुभवकथनांमधून क्रांतिसिंह नाना पाटील, खासदार शरदचंद्रजी पवार, बॅरिस्टर अंतुले, सांगलीच्या राजमाता पटवर्धन, त्याचबरोबर वनविभागाचे मोरे, नलावडे, मावीनकुर्वे आणि प्रत्येक वेळी त्याला नकार देणारे बेनकट्टी यांचेही चित्रण त्यांनी तितक्याच ताकदीने केले आहे. त्यांची 'सोनहिऱ्याचे पाणी', 'मुलाखतीच्या मैदानातून' ही पुस्तके ही प्रसिद्ध आहे. प्रत्यक्ष स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या, तुफान सेनादलाच्या तुकडीचे नेतृत्व करणारा कॅप्टन त्यांनी सागरेश्वर परिसरातील अनेक गावातील लोकांशी चर्चा करून, एकत्रित करून अभयारण्य उभारणीचे नेतृत्वही केले आणि आपण खरेखुरे कॅप्टन असल्याचे सिद्ध केले.

## ३.२.२ राजकीय व्यक्तींची व्यक्तिचित्रणे

### ◆ क्रांतिसिंह नाना पाटील

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून क्रांतिसिंह नाना पाटील यांचे चित्रण आले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबरोबर काम करण्याचे भाग्य मोहिते अण्णा यांना लाभले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. क्रांतिसिंह नाना पाटील हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मोठे राजकारणी होते. ते महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे क्रांतिकारक मानले जातात. त्यांचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने सांगली, सातारा या परिसरामध्ये होते. ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीस आव्हान देण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. साताऱ्यातील प्रतिसरकारच्या स्थापनेत त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. नाना पाटील यांनी साताऱ्यामध्ये प्रतिसरकारची स्थापना करून महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीला मोठे योगदान दिले. भूमिगत चळवळीच्या माध्यमातून त्यांनी प्रतिसरकारची स्थापना केली. प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर ग्रामीण भागात ब्रिटिशांचे अस्तित्त्व नाममात्र राहिले. नाना पाटील यांनी युवकांची संघटना स्थापन करून इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान

निर्माण केले. प्रति सरकारचे नेते या नात्याने त्यांनी केलेल्या कार्यामुळेच त्यांना क्रांतिसिंह म्हणून ओळखले जाऊ लागले. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीच्या भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये नाना पाटलांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. या काळामध्ये महाराष्ट्रातील सातारा, सांगली या परिसरात नाना पाटलांची ब्रिटिशांवर एक मोठी दहशत निर्माण झाली होती. प्रतिसरकार अथवा 'पत्री सरकार' म्हणून या काळात ते ओळखले गेले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारमध्ये तूफान सेनेचे कॅप्टन म्हणून मोहिते अण्णा यांनी काम केले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभा देवराष्ट्रे आणि संपूर्ण सोनहिरा खोऱ्यात होत असत. त्या सभांना मोठ्या प्रमाणात गर्दी होत असे. इंग्रजापासून बचाव करण्यासाठी हे क्रांतिकारक भूमिगत होऊन काम करीत असत. रेल्वे लूट, रेल्वे रूळ उखडणे अशा कार्यात हे स्वातंत्र्य सैनिक काम करीत असत. लोकांच्या भाषेत प्रभावी भाषणे करून, त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी नानांकडे होती. ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होय. या योगदानाचा ओझरता उल्लेख ''कथा सागरेश्वर अभयारण्याची'' या पुस्तकातून आला आहे.

◆ **यशवंतराव चव्हाण**

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च, १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. देवराष्ट्रेपासून वृक्षमित्र धों. म. मोहिते यांचे मोहित्यांचे वडगाव हे गाव फक्त दोन किमी अंतर आहे. यशवंतराव चव्हाण यांची द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. तसेच मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनही त्यांचीच निवड झाली. त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री ही पदे यशस्वीरीत्या भूषविली. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. युगांतर, सह्याद्रीचे वारे, कृष्णाकांठ, ऋणानुबंध ही त्यांची साहित्यसंपदा आहे. शेती, उद्योग, सहकार, समाजवाद, आर्थिक विषमता, विकासातील समस्या आणि नियोजनाचे महत्त्व या विषयावर त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये त्यांचा अतिशय मोलाचा वाटा असलेला दिसून येतो. सोनहिरा खोऱ्यावर, आपल्या गावावर आणि परिसरातील लोकावर नितांत प्रेम करणारा माणूस म्हणून यशवंतराव चव्हाण यांची कारकीर्द कायम लक्षात राहते. रान कवी यशवंत तांदळे यांना कराडमधील साहित्य संमेलनात साहित्यिक म्हणून ओळख देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. वृक्षमित्र धों. म. मोहिते यांच्याशी त्यांचा स्नेह होता. त्यामुळेच सागरेश्वर अभयारण्याच्या मंजुरीपासून ते संपूर्ण अभयारण्य पूर्ण होईपर्यंत चव्हाण साहेबांनी विशेष लक्ष दिले. वनमंत्री तिरपुडे यांनी सागरेश्वर अभयारण्याच्या मंजुरीस नकार दिल्यावर स्वतः चव्हाण साहेबांनी वसंतरावदादा पाटील यांना फोन करून सागरेश्वर अभयारण्य प्रस्ताव मंजूर करण्यास सुचविले होते. आपल्या कार्यकर्त्यावर

त्यांचे विशेष प्रेम होते. त्यामुळेच वनमंत्री तिरपुडे यांचेशी मोहिते यांचा वाद झाल्यावर आपल्या एका कार्यकर्त्याला मोहिते यांना जेवायला घालण्याविषयी सुचविले. सागरेश्वर अभयारण्यामध्ये त्यांनी स्वतः येऊन वृक्षारोपण केले. ते भागात आले की हेलिकॉप्टर जितके खाली घेता येईल तितके खाली घेऊन सागरेश्वर अभयारण्याची पाहणी करत. यातून त्यांचे झाडे, वन्यप्राणी आणि जन्मभूमी यांच्याविषयी असलेले प्रेम दिसून येते. आपल्या मातीशी त्यांची नाळ घट्ट जोडली जाते. हेच यातून अधोरेखित होते. अशा प्रकारे 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून स्व. यशवंतराव चव्हाण यांची व्यक्तिरेखा रेखाटली आहे.

◆ **वसंतदादा पाटील**

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला एक वेगळे, निर्णायक वळण देऊन विकास साधणारे नेते म्हणजे वसंतदादा बंडूजी पाटील होत. क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक ते विधायक कार्य करणारे, पक्ष संघटना वाढवणारे राजकीय नेते, प्रभावी मुख्यमंत्री व सहकार महर्षी - असा त्यांचा जीवन प्रवास आपल्याला थक्क करतो. सांगली जिल्ह्यातील, मिरज तालुक्यातील पद्माळे या छोट्या गावी जन्मलेले वसंतदादा १९७७ ते १९८५ या काळात चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. एकूण सुमारे ४ वर्षे त्यांनी राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. ते काही काळ राजस्थानचे राज्यपालही होते. त्या आधी १९७२ मध्ये ते प्रथम मंत्री झाले होते. तसेच स्वतंत्र भारतातल्या पहिल्या निवडणुकीतच ते सांगलीतून आमदार म्हणून निवडून आले होते. पुढील काळात सुमारे २५ वर्षे त्यांनी सांगलीचेच प्रतिनिधित्व (विधानसभेत व लोकसभेत) केले. राजकीय जीवनात त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आदी संस्था-संघटनांची अध्यक्षपदे सांभाळली.

महाराष्ट्राचे नेतृत्व करताना दादांनी अनेक समाजहितकारक, दूरगामी परिणाम साधणारे निर्णय घेतले. सागरेश्वर अभयारण्य उभारणीमध्ये धों. म. मोहिते यांना अतिशय मोलाची मदत त्यांनी केली आहे. वनमंत्री तिरपुडे यांच्याशी धों. म. मोहिते यांचा वाद झाल्यानंतर ते प्रकरण अतिशय उत्तम रीतीने हाताळले आणि सागरेश्वर अभयारण्य उभारणीसाठी मंजूरी मिळवून दिली. वसंतदादांनी राज्याचा विकासविषयक आढावा घेण्यासाठी अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांची सत्यशोधन समिती नेमली. यातूनच समतोल विकास, विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष (बॅकलॉग) अशा संज्ञा पुढे आल्या. शालेय विद्यार्थ्यांना मोफत एस. टी. प्रवास, परगावी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जेवणाच्या डब्यांची मोफत वाहतूक, शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्जपुरवठा इत्यादी महत्त्वाचे निर्णय दादांनी त्यांच्या काळात घेतले. पाणी अडवा, पाणी जिरवा हे सूत्र प्रथम दादांनी महाराष्ट्रासमोर आणले. दादांच्या या लोकहितकारक निर्णयांची बीजे त्यांच्या देशभक्तीत व त्यांनी केलेल्या क्रांतिकार्यांत आढळतात.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या विविध प्रकारच्या अनुभवांचे संचित, स्मरणशक्ती, नेतृत्वगुण, संघटनकौशल्य, समाजमन-आकलन शक्ती, निर्णयक्षमता, शेतकरी व ग्रामीण समाजजीवनाची अचूक, परिपूर्ण जाणीव -

इत्यादी गुणांच्या आधारे वसंतदादांनी महाराष्ट्राचा विकास साधला. दुर्दैवाने फार शिकू न शकलेला, पण तरीही सर्वांत शहाणा नेता या समर्पक शब्दांत त्यांचे वर्णन केले जाते.

◆ **शरद पवार**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या आत्मकथनातून अनेक लहान मोठ्या व्यक्तिरेखा मोहिते यांनी रेखाटल्या आहेत. त्यापैकी मा. शरद पवार यांची व्यक्तिरेखा ही वाचकांच्या मनात घर करून राहते. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीचे काम चालू असताना शरद पवार हे विरोधी पक्ष नेते होते. ते सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना  मोहिते यांची त्यांच्याशी भेट झाली. बोरगाव ते रामानंदनगर हा प्रवास फक्त वीस मिनिटांचा असल्यामुळे मधल्या अडीच तासात काय करायचे? हा प्रश्न पवार साहेबांसमोर होता. त्यावेळी मोहिते यांना 'मला तुमच्या अभयारण्याला भेट द्यायची आहे. आपण तिथे जाऊ शकतो का?' असे विचारले. तेव्हा 'समोरचा दिसतोय तो डोंगर आपलाच आहे. आपण तिकडे जाऊ शकतो, पण या दिवसात तिथे बघण्यासारखे काही नाही. थंडीच्या दिवसात झाडांची पानगळ होऊन झाडांचे फराटे झालेत,' असे मोहिते यांनी पवार साहेबांना सांगितले. त्यावेळी पवार साहेबांनी तिथे डाकबंगला आहे. आपण तिथे जाऊन छान गप्पा मारू असे मोहिते यांना सांगून आपला मोठारीचा ताफा दहा मिनिटात अभयारण्याकडे वळवला. यावेळी आमदार हनुमंतराव पाटील हे त्यांच्याबरोबरच होते. पवार साहेब गेटवरच गाडीतून खाली उतरले. वनीकरणातून तयार झालेल्या वनराईबद्दल त्यांना कुतूहल होतं. निसर्गाबद्दलची एक वेगळी दृष्टी त्यांच्याकडे होती. त्यामुळेच या ठिकाणी वैभवशाली सृष्टी उभारली जाईल याची त्यांना खात्री पटली आणि जवळजवळ तीन ते चार फर्लांग ते स्वतः चालत अभयारण्यमध्ये फिरले. हरणासोबत त्यांनी फोटोही घेतले. चहापानाच्या वेळी अभयारण्याच्या विकासासाठी पैसा फारच कमी मिळतो असे सांगितल्यानंतर ते मोहिते यांना म्हणाले की, मी मुख्यमंत्री असताना तुम्ही मला इकडे आणले नाही. मी तुम्हाला एक कोट रुपये दिले असते. पण आपण सध्याच्या मुख्यमंत्र्यांकडे हा प्रस्ताव मांडू तेही निसर्गवेडे आहेत. आणि अशा निसर्गवेडा मुख्यमंत्री म्हणजेच बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्याकडे जाण्याची त्यांनी सूचना केली. त्याचबरोबर त्यांनी अंतुले साहेब यांची भेटीची तारीख घेऊन मोहिते यांना त्यांच्याशी भेटही करून दिली. बॅरिस्टर अंतुले आणि शरदराव पवार हे दोघेही विरोधक असले तरीसुद्धा कामाच्या बाबतीत आपण सर्वजण एकच आहोत याची प्रचिती मोहिते यांना करून दिली. राजकारणात चांगल्या कामासाठी भांडण करायचे नसते याची एक चांगली कृती त्यांनी लोकांसमोर ठेवली. अभयारण्याला भरपूर मदत करून अभयारण्याला भेट देण्याचेही मुख्यमंत्र्यांनी मान्य केले. त्यानंतर १९८१ मध्ये स्वतः शरदरावजी पवार, सांगली जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ शालिनीताई पाटील, वनमंत्री नानाभाऊ एंबडवार, कृषिमंत्री भगवंतराव गायकवाड, वनराज्यमंत्री सतीश चतुर्वेदी, आमदार रवींद्र राऊत, महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाचे सर्व कुलगुरू, पर्यटन खात्याचे सचिव, वनाधिकारी यांच्या एकत्रित कार्यक्रमांमध्ये मोहिते यांना वृक्षमित्र पदवी देऊन गौरव करण्याचे ठरवले आणि ते पूर्णत्वास नेले. सागरेश्वर अभयारण्याच्या जडणघडणीमध्ये शरदरावजी पवार यांचेही विशेष योगदान असल्याची नोंद मोहिते यांनी या अनुभवकथनांमधून केली आहे.

### ◆ बॅरिस्टर ए. आर. अंतुले

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल र. अंतुले यांचे चित्रण आले आहे. अतिशय खुल्या दिलाचा, सुसंस्कृत राजकारणी म्हणून त्यांचा उल्लेख या अनुभवकथनातून आला आहे. ते केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्री व महाराष्ट्राचे आठवे मुख्यमंत्री होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य असलेले अंतुले मनमोहन सिंग केंद्र सरकारमध्ये २००६ ते २००९ दरम्यान पहिले केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्री होते. रायगड जिल्ह्याच्या आंबेत गावामध्ये जन्मलेल्या अंतुले ह्यांनी मुंबई विद्यापीठ व लंडन येथे शिक्षण घेऊन बॅरिस्टरची पदवी मिळवली. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये १९६२ सालापासून कार्यरत असलेले अंतुले १९६२ ते १९७६ दरम्यान विधानसभेचे सदस्य होते. याच काळात सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीचे काम सुरू होते. मा. शरद पवार यांनी मोहिते यांना आपण सध्याच्या मुख्यमंत्र्यांकडे हा प्रस्ताव मांडू तेही निसर्गवेडे आहेत. हे निसर्गवेडे मुख्यमंत्री म्हणजेच बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्याकडे जाण्याची त्यांनी सूचना केली. त्याचबरोबर त्यांनी अंतुले साहेब यांची भेटीची तारीख घेऊन मोहिते यांना त्यांच्याशी भेटही करून दिली. बॅरिस्टर अंतुले आणि शरदराव पवार हे दोघेही विरोधक असले तरीसुद्धा कामाच्या बाबतीत आपण सर्वजण एकच आहोत याची प्रचिती मोहिते यांना करून दिली. राजकारणात चांगल्या कामासाठी भांडण करायचे नसते याची एक चांगली कृती त्यांनी लोकांसमोर ठेवली. अभयारण्याला भरपूर मदत करून अभयारण्याला भेट देण्याचेही मुख्यमंत्र्यांनी मान्य केले. त्याच बरोबर मोहिते यांना वृक्षमित्र उपाधीने सन्मानित करण्यात यावे अशी सूचनाही केली. सागरेश्वर अभयारण्य विकास सल्लागार समिती स्थापन करून त्याचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून मोहिते यांची निवड केली. मा. शरदरावजी पवार आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले हे दोघेही विरोधक. परंतु चांगल्या कामात भांडण न करता जनतेची कामे पूर्ण करणारे हे अतिशय सुज्ञ राजकारणी आपणास या अनुभवकथनातून पहावयास मिळतात. अभयारण्याच्या मदतीसाठी शरद पवार साहेबांना वेळ देऊन एक मोठी रक्कम त्यांनी अभयारण्याच्या उभारणीसाठी दिली. दोन दिवसापूर्वी आपल्या विरोधात बोलणाऱ्या, घोषणा करणाऱ्या, मोर्चा काढणाऱ्या शरद पवार साहेबांना आपल्या अँटी चेंबरमध्ये बसवून जिवलग मित्रांची भेट व्हावी तसे त्यांच्याशी गप्पा मारल्या. अगदी कालपरवापर्यंत हातोपे आखडून हे दोन नेते एकमेकांवर हमरीतुमरीवर आले होते आणि आज एका चांगल्या कामासाठी एकत्र बसून गप्पा मारत आहेत अशी दृश्ये विरळाच आहेत. मोहिते यांना वृक्षमित्र पदवी देऊन त्यांची माहिती देणारे एक पुस्तक काढू, त्याचबरोबर शासनाच्या वतीने एक ध्वनिमुद्रित फिल्म तयार करू, असे बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी पवार साहेबांना सांगितले. अभयारण्याला भेट देण्याचे त्यांनी मान्य केले. मुख्यमंत्र्यांनी विविध समित्यांची स्थापना केली. त्यामध्ये फक्त आपल्याच पक्षांचे कार्यकर्ते त्यांनी समितीमध्ये निवडले नाहीत तर कार्यकर्ता कोणत्याही पक्षाचा असो पण त्या समितीतील तज्ज्ञ असणारेच कार्यकर्ते त्यांनी विविध समित्यांवर नेमले होते. मोहिते यांची विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाची मुदत संपल्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या ते लक्षात आले आणि त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी असणारे पत्र लगेचच मोहिते यांच्या हातात दिले.

सागरेश्वर अभयारण्याच्या विकासासाठी २ कोटी ६३ लाख रुपये मंजूर करून बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. राजकारणात केव्हाही काहीही होऊ शकते. मुख्यमंत्र्यांच्या विरोधात एक केस कोर्टात चालली होती. त्याचा निकाल उलटा गेल्यामुळे मुख्यमंत्र्यांना तडकाफडकी राजीनामा द्यावा लागला. असे जरी असले तरी सागरेश्वर अभयारण्याच्या जडणघडणीमध्ये व विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याने एखादे काम सांगितले आहे म्हणून ते करायचे नाही; असे न करता त्यांनी अभयारण्याच्या उभारणीसाठी मोलाची मदत देण्याचे महत्त्वाचे काम पूर्ण केले. अशाप्रकारे 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या आत्मकथनातून तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांचे व्यक्तिचित्र अतिशय सुंदर रीतीने रेखाटलेली दिसते.

**◆ वनमंत्री नाशिकराव तिरपुडे**

नाशिकराव तिरपुडे (१६ जानेवारी १९२१–१९ मे २००२) हे महाराष्ट्र राज्याचे पहिले उपमुख्यमंत्री होते. ते काँग्रेस पक्षाचे सक्रीय सदस्य होते. जानेवारी १९७८ मध्ये जेव्हा इंदिरा गांधींनी पक्षात फूट पाडली तेव्हा त्यांनी त्यांना पाठिंबा दिला. पुढच्या महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस (इंदिरा) ने चांगली कामगिरी केल्यानंतर आणि काँग्रेस (मुख्य गट) सोबत संयुक्तपणे सरकार स्थापन केल्यानंतर, ते नवीन आघाडीत उपमुख्यमंत्री झाले. काहीकाळ त्यांनी वनमंत्री म्हणूनही काम केले आहे.

सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये महाराष्ट्राचे तत्कालीन वनमंत्री तिरपुडे साहेब यांचाही मोलाचा वाटा आहे. वृक्षमित्र मोहिते हे वनमंत्र्यांना भेटण्यासाठी गेले, हा प्रसंग या अनुभवकथनातून आला आहे. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीच्या प्रसंगी सुरुवातीच्या काळात सचिवालयातून जरी परवानगी दिली असली तरी वनमंत्री तिरपुडे साहेब यांनी मात्र ती परवानगी नाकारली होती. त्यावेळी मोहिते हे वनमंत्र्यांना भेटण्यासाठी गेले. लोकांना भेटण्याच्या वेळी तिरपुडे साहेब खुर्चीवर बसलेले नव्हते तर ते टेबलजवळ पाठमोरे उभे होते. टेबलावरील पत्रे वाचून त्यापैकी टेबलावर ते परत ठेवत होते. आणि मोजकी पत्रे आपल्या शर्टच्या खिशात घालीत होते. भेटायला येणाऱ्याकडे त्यांचे मुळीच लक्ष नव्हते. किंवा त्यांच्याकडे ते वळून सुद्धा पाहत नव्हते. भेटणाऱ्या व्यक्तीने नमस्कार केल्यानंतर त्याच्याकडे न पाहताच 'हा अर्ज लिहून आणलाय ना, ठेवा.' एवढे म्हणून ते त्याला बाहेर जाण्यास भाग पडत होते. धों. म. मोहिते यांना या गोष्टीचा राग आला आणि त्यांनी आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ न देता काहीही न बोलता तिथेच खुर्चीवर बसले. त्यावेळी तिरपुडे साहेबांनी पाठीमागे वळून पाहिले आणि मोहिते यांना पाहिल्यानंतर घुश्यातच 'आपले काय?' असा प्रश्न विचारला. तेव्हा सचिवालयातून आलेले पत्र त्यांच्याकडे देऊन 'हा निर्णय आपण घेतलात का?' असा प्रश्न विचारला. त्यावेळी 'हो मीच निर्णय घेतला आहे. तो एवढ्या छोट्याशा टेकडीवर कसले अभयारण्य करताय शासनाचे पैसे सांगली जिल्ह्यासाठी कसे काढायचे यात सांगलीकर आहेत.' असे म्हणून त्यांनी जणू दम दिला. त्यावेळी मोहिते यांनी त्यांना 'आतापर्यंत ज्या लोकांनी अभयारण्य उभारण्यासाठी सह्या केल्या ते सगळे मूर्ख आहेत का? आणि आपणच फक्त शहाणे आहात?' असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी 'हू आर यू?' असा प्रतिप्रश्न मोहिते

यांना केला. त्यावेळी मोहिते 'तुम्ही तरी कोण आहात?' खुर्ची गेल्यावर माझ्यासारखे सामान्य कार्यकर्तेच आहात' असे दरडावून सांगितले. स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण साहेब आणि वसंतरावदादा पाटील यांनी तिरपुडे साहेबांना या अभयारण्याच्या विषयी माहिती दिल्यानंतर आणि त्यास मंजुरी देण्यासाठी सांगितल्यावर मात्र त्यांनी ती मंजुरी दिली आणि सागरेश्वर डोंगरावर अभयारण्य झालेच पाहिजे. कार्यकर्ते भेटायला आल्यावर दोन चांगले शब्द बोलत चला, असे यशवंतराव चव्हाण यांनी सुनावल्यानंतर तिरपुडे साहेबांनी अभयारण्य उभारण्यास ग्रीन सिग्नल दिला. अभयारण्य पूर्ण झाल्यानंतर सागरेश्वराला पर्यटन केंद्र व्हावे म्हणून मोहिते यांनी सह्यांचे एक निवेदन तयार केले आणि ते वसंतराव दादा पाटील यांच्या मंजूर अशा शिफारशीसह पर्यटन मंत्री तिरपुडे यांच्याकडे दिले. तेव्हा ते निवेदन घेऊन आलेल्या व्यक्तीच्या अंगावर अक्षरशः फेकून दिले. तेव्हा त्यांच्या विरोधात सत्याग्रह करण्याची नोटीस मोहिते यांनी दिली. परंतु सत्याग्रह करण्याच्या अगोदरच सरकार पडले आणि तिरपुडे साहेब मंत्रीपदावरून गेले. अशा प्रकारचा आशय या व्यक्तिचित्रणातून आपणास वाचाव्यास मिळतो. मोहिते यांनी तिरपुडे साहेबांची व्यक्तिरेखा आपल्या अनुभवकथनातून अत्यंत संयमाने उत्तम रीतीने रेखाटली आहे.

### ३.२.३ साहित्यिक व कलावंतांची व्यक्तिचित्रणे

**◆ मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील एक महत्त्वाचे पात्र म्हणजे कविवर्य मंगेश पाडगावकर आणि कविवर्य वसंत बापट यांचे आहे. सागरेश्वर अभयारण्याला भेट देणाऱ्या अनेक साहित्यिकांपैकी मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट यांची सागरेश्वर अभयारण्यातील कृती सर्वसामान्य वाचकांच्या लक्षात राहते. कराडमधील एक लेखक श्रीनिवास कुलकर्णी यांनी मोहिते यांना मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट किर्लोस्करवाडीला जात आहेत. तेव्हा जाता जाता तुमच्याकडे अभयारण्यात जेवणासाठी दुपारी येणार आहेत असे पत्र पाठवले. त्याचवेळी बरेच दिवस मृगविहारासाठी विहीर खोदण्याचे काम सुरू होते. आठवडाभरापासून मातीचे खनिज लागायला सुरुवात झाली होती. त्यामुळे विहिरीला पाणी लागण्याची ही लक्षणे होती. आज सागरेश्वर अभयारण्यात मोठे पाहुणे येत आहेत. त्यांच्या पायगुणाने विहिरीला आजच पाणी लागले, तर त्यांच्या हस्ते पाणी पूजन करण्याची कल्पना मोहिते यांच्या मनात आली. दुसऱ्या दिवशी मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट हे दोघेही किर्लोस्करवाडीचा कार्यक्रम करून सागरेश्वर अभयारण्यात दाखल झाले आणि त्याच वेळी विहिरीला पाण्याचा उमाळा लागला. 'बोला फुलाला गाठ पडली पाहुणे आले आणि पाणी लागले' अशीच सर्वांची भावना झाली. पाणी पुजन विधीसाठी पाहुण्यांनी होकार दर्शवला. त्यावेळी पाणी पूजन विधीसाठी जो भटजी सांगितला होता, त्याला बाजूला बसायला सांगून कवी मंगेश पाडगावकर पाणी पूजनासाठी जमिनीवर टाकलेल्या पोत्यावर बसले आणि शेजारच्या मोठ्या दगडावर बसून कवी वसंत बापट यांनी पाणी पूजन विधीचे साग्रसंगीत पौरोहित्य केले. एकूणच साहित्याच्या क्षेत्रात दबदबा असलेल्या या दोन साहित्यिकांनी आपलेही पाय मातीचे आहेत. हे या कृतीवरून सिद्ध केले.

◆ **मुकुंदराव किर्लोस्कर**

किर्लोस्कर मासिकाचे संपादक म्हणून मुकुंदराव किर्लोस्कर ही व्यक्तिरेखा 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून वाचकांसमोर येताना दिसते. अत्यंत सालस मृदुल स्वभावाचे मुकुंदराव किर्लोस्कर सर्वच लोकांना सर्वतोपरी मदत करत असत. धों. म. मोहिते हे किर्लोस्कर मासिकामध्ये पत्रकार म्हणून काम करत असताना मुकुंदराव किर्लोस्कर यांनी त्यांना विशेष पास देऊन ताडोबा अभयारण्य पाहण्यासाठी दौऱ्यातून पाठवले होते. त्याचाच परिपाक म्हणून सागरेश्वर अभयारण्याच्या निर्मितीचे बीजे, हरवली गेली सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीसाठी मुकुंदराव किर्लोस्कर यांचे स्नेही मावीन कुर्वे साहेब यांनी अतिशय मोलाची मदत केली. अभयारण्य उभा करत असताना कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्ट पुणे सर्कल यांचा दौरा ठरवण्याची जबाबदारी श्री मुकुंदराव किर्लोस्कर यांनी घेतली होती. प्रत्यक्ष त्यांना त्यावेळी हजर राहणे शक्य नव्हते. त्यावेळी आपल्या मासिकाचे सहसंपादक व. र. देशपांडे यांना पाठवून दिले होते. अभयारण्य नेमके कसे झाले आहे आणि ते पाहण्यासाठी स्वतः उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर हेही आपल्या छोट्या विमानाने किर्लोस्कर वाडीकडे येताना अभयारण्यावर अगदी खालून दोन तीन चकरा मारत. एकूणच अभयारण्याच्या उभारणीसाठी मदत करणारे एक थोर असामी म्हणून मुकुंदराव किर्लोस्कर यांची व्यक्तिरेखा धो म मोहिते यांनी रेखाटली आहे.

◆ **रानकवी यशवंत तांदळे**

आसद, ता. कडेगाव, जि. सांगली या गावचे रानकवी म्हणून शाहीर यशवंत तांदळे यांची ओळख आहे. शाहीर तांदळे हे डफ तुणतुणे वाले शाहीर नव्हते. पण कोणत्याही वाद्याशिवाय ते एकटेच आपला बहारदार कार्यक्रम सादर करतात पूर्णपणे अशिक्षित होते. त्यांना कोणत्याही प्रकारचे वाचन किंवा लेखन येत नव्हते. परंतु शीघ्र कवी म्हणून त्यांची ओळख संपूर्ण सोनहिरा खोऱ्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रालाच असलेली दिसून येते. पायात जाड जोड वाहना, शर्ट, धोतर, डोक्यावर लाल भडक फेटा आणि खांद्यावर घोंगडी असा त्यांचा धनगरी गणवेश कायम असायचा. कला देवता तांदळे यांच्यावर प्रसन्न होती. आपल्या गाण्याने ते समोरच्या श्रोत्यांना अडीच तीन तास सहज खेळून ठेवत. कॉलेजच्या पोरांपुढे व्याख्यान देताना मी म्हणणारे वचकून असायचे. पण यशवंत तांदळे हे तीन तीन तास कॉलेजमधील मुलांसमोर आपल्या कार्यक्रमात हशा टाळ्यांनी आपला बहारदार कार्यक्रम सादर करायचे. त्यामुळे सर्वजण त्यांच्यावर खुष असायचे. श्रोत्यांपासून ते खेड्यापाड्यातील जनतेपर्यंत तांदळे हे ओळखले जात होते. कराड येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ते प्रथम प्रसिद्धीस आले व्यासपीठावरील मान्यवरांनी आणि समोरच्या मंडपातील हजारो साहित्यिकांनी यशवंत तांदळे यांना संमेलनात अक्षरशः डोक्यावर घेतले सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीसाठी तांदळे यांनी एक छान पोवाडा तयार केला. डोंगरात नेहमी मेंढरे चरायला आणत असल्यामुळे त्यांना इथली खडा न खडा माहिती होते. आपल्या प्रत्येक कार्यक्रमात तांदळे यांनी अभयारण्याचा पोवाडा स्वतःला ऐकवला आणि अभयारण्याच्या उभारण्याची एक मनोभूमिका तयार करण्यामध्ये रानकवी यशवंत तांदळे यांनी मोलाचा वाटा उचलला.

*सांगली जिल्ह्याला, खानापूर तालुक्याला अभयारण्याचा ठराव झाला!*
*धो. म. आण्णा बोले चव्हाणसायबाला!*
*लावायची तार डोंगराला ! वाढवायची झाडी जंगलाला!*
*असा दोघांचा बसून इचार झाला! १९७० सालाला! अंबिकावन जंगलाला!*
*वनखातं आलं तपासायला! डोंगर सारा तपासून पाहिला!*
*हुकुम दिला अभयारण्याला! डोंगर कसा आहे सांगतो तुम्हाला!*
*सहा गावांच्या शिवेला! तीन तालुक्यांच्या मधला ! पाच देव हायतं डोंगराला !*
*डोंगराच्या उगवत्या बाजूला !*
*यशवंत खिंडीला! देव सागरेश्वर दर्शनाला !*
*पुण्या-मुंबईची माणसं येती त्याला! दरसाल या भागाला !*
*लाईन लागती त्येच्या दर्शनाला! त्याच्या मावळत्या बाजूला ! खोल दरीला!*
*देव लिंगोबा तिथं राहायला ! फुलांची झाडं मारी लहर !*
*खोल ओढा पाण्यानं भरून चालणार! चढून डुक्करदरीच्या टेकडीवर !*
*लांडग्याची घळ म्होरं दिसणार! बामणदरा खोल लई फार ! तिथं कोल्ह्यांच्या घळी चार !*
*चढून जावं डोंगराच्या माथ्यावर ! वाऱ्याची हवा थंडगार ! रणशूळ दिसतुया म्होरं!*
*महानगुंड गुंडगुळी इयार !*
*नजर टाका तिथनं लांबवर ! जोतिबाचा दिसतो डोंगर ! कृष्णा नदीचं पाणी निवळशार !*
*बहुतीचा शिवार हिरवागार ! कॅनेलच्या वरच्या बाजूवर ! रेल्वेची गाडी रुळावर!*
*त्याच्या म्होरच्या बाजूवर ! नंदी बसला पांढरा इयार !*
*ताकारी ठेशन हाय म्होरं! कमळभैरी अवघड कड्यावर ! दुधारीचा पीर पांढरा इयार !*
*संकेशर फुलांनी भरलं सारं! चाफा शोभे गोरा उंचावर ! सातारा जिल्ह्याला महाबळेश्वर !*
*तसा सांगलीला सागरेश्वर ! दोन गांव वाळवे तालुक्याला! दुधारी ताकारी म्हणती त्याला!*
*तुपारी गाव तासगाव तालुक्याला ! एस. टी. चालली सागरेश्वर खिंडीला !*
*बघून आनंद वाटतो सगळ्याला ! खोल ओढ्याच्या काठाला!*
*देव बिरोबा दर्शनाला! गार लिंबाच्या सावलीला ! त्येच्या वरच्या बाजूला !*
*दहा हजार खड्डा डोंगराला !*
*झाडांची लागण झाली त्याला! माविनकुर्वे साहेबाला!*
*दहा जिल्ह्याचा अधिकार त्याला! कळकळ वाटली त्याच्या जिवाला!*

*झालं पाहिजे अभयारण्य सांगली जिल्ह्याला ! हुकूम असा त्यानं लगेच दिला!*
*वनखातं लागलं जोरात कामाला ! रोपांची लागण झाली डोंगराला! डोंगर लागला हिरवागार दिसायला! जणू धरित्रीनं हिरवा शालू नेसला! शोभा आली साऱ्या शिवाराला.....!*

अशा प्रकारे रानकवी यशवंत तांदळे यांनी अभयारण्याच्या उभारणीसाठी आपल्या कला, साहित्याने मोलाची मदत केल्याचे वर्णन मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनात केले आहे.

### ३.२.५ अधिकाऱ्यांची व्यक्तिचित्रणे

**◆ लीना मेहंदळे**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून लीना मेहंदळे यांनी सागरेश्वर अभयारण्याला भेट दिल्याचा प्रसंग चित्रीत केला आहे. कमळभैरवकडे जातानाचा जो रस्ता आहे, तो म्हणजे एका बाजूला उंच कडा आणि दुसरीकडे खोल दरी मध्ये फक्त दोन-तीन फुटांची पाऊलवाट हळूहळू घसरत सरपटत कोल्हे बीळातून खाली जावे लागते. अशा अवघड पाऊलवाटेने मेहंदळे यांनी उतरण्याचा धाडसी निर्णय घेतला. ताई वाट फार अवघड आणि धोकादायक आहे. असे सांगितले तरी तुम्ही सगळे हा जर डोंगर उतरून जाता, तर मी सुद्धा या वाटेने जाऊ शकते असे म्हणून त्यांनी तालुका गटविकास अधिकारी, एक वन कर्मचारी यांच्याबरोबर तो अवघड रस्ता उतरून डाक बंगला गाठला. विशेष म्हणजे दोन गाड्या घेऊन सागरेश्वरमार्गे ताकारी बंगल्यावर मोहिते आणि इतर लोक डाक बंगल्यावर पोहोचण्यापूर्वीच लीना मेहंदळे मॅडम चालत पोहोचल्या होत्या. उच्च पदावर असणाऱ्या स्त्रिया सुद्धा धाडसाने ट्रेकिंग करू शकतात, हे लीना मेहंदळे मॅडम यांच्या उदाहरणावरून आपणास दिसून येते.

काही दिवसांनी लीना मेहंदळे मॅडम या सांगली जिल्ह्याच्या कलेक्टर म्हणून पुन्हा रुजू झाल्या. त्यावेळी त्यांनी अभयारण्यात लायन सफारी करून देण्याचे प्रपोजल तयार करून ते वन खात्याच्या सचिवांना पाठवले. हा प्रोजेक्ट महेंदळे मॅडम त्यांच्या खात्यामार्फत पूर्ण करून देणार होत्या. सांगलीच्या प्रतापसिंह उद्यानातील सिंहाची एक जोडी लायन सफारीत सोडून त्यांना अगदी पहिल्या दिवसाचे खाद्य घालण्याची तयारीही त्यांनी दर्शवली होती. परंतु वनखात्याच्या नकारामुळे हा प्रकल्प मागे पडला. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील कर्तबगार धाडसी आणि धडाडीच्या अधिकारी म्हणून लीना मेहंदळे यांचे व्यक्तिचित्रण धों. म. मोहिते यांनी रेखाटले आहे.

**◆ श्री. बी. टी. मोहिते**

मोहित्यांचे वडगाव मधील श्री. बी. टी. मोहिते एक कर्तव्यदक्ष अधिकारी मध्यरेल्वे मध्ये काम करत होते. त्यांनी धो. म. मोहिते यांना पत्र लिहून अण्णांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या अण्णा तुम्ही म्हणजे तिकडे आहात, तुम्हाला आठवत असेल कृष्णा नदीला महापूर आला, की तो पाहण्यासाठी आपण

लहानपणी डोंगराच्या पठारावर जात असू. नदीने तिच्याकडच्या गावाला पाण्याचा वेढा दिलेला असेल काही घरे पाण्यात पूर्ण तर काही अर्धी अधिक बुडालेली. ती पाहून आपण हळहळत असू. नंतर तळवाटाला येऊन सूर्यास्तापर्यंत सूरपाट्या खेळत असू. आपल्या गावासाठी तुम्ही जे करून दाखवलेत त्यावरून तुमच्या हाताला यश आहे. आणि यशवंतराव चव्हाण साहेब तुमच्या पाठीशी आहोत. या योजनेचे सचिवालयात जर काही काम असेल, तर अवश्य मला सांगा मी ते आनंदाने करेन असे सांगून मैत्रीची भावना जपणारे बी. टी. मोहिते आपणास या अनुभवकथनातून पाहावयास मिळतात.

◆ **श्री. एस. एस. सक्सेना**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनामध्ये सांगली जिल्ह्याचे तत्कालीन कलेक्टर एस. एस. सक्सेना यांचे वर्णन आले आहे. कलेक्टर सक्सेना यांनी अभयारण्य उभारणीसाठी धों. म. मोहिते यांना खूप मोलाची मदत केलेली आहे. कलेक्टर साहेब ज्यावेळी दिल्लीला गेले होते, तेथे यशवंतराव चव्हाण यांच्याशी भेट झाली. त्यावेळी चव्हाण साहेबांनी कलेक्टरना, ''धों. म. मोहिते एकांड्या शिलेदारासारखा अभयारण्यासाठी तेथे लढतोय. तुपारी गावाचा काही प्रॉब्लेम झाला आहे तो पहा आणि सोडवून टाका.'' असे सांगितल्यानंतर सक्सेना साहेब दिल्लीहून परत आले आणि तिसऱ्याच दिवशी ताकारी बंगल्यावर कॅम्प लावला. साताऱ्याहून विभागीय वनअधिकार्यांना बोलवून घेतले. अभयारण्याला गायरान दिल्यावर जनावरे चरायची कोठे? हा तुपारीकारांचा प्रश्न सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. सागरेश्वर अभयारण्याच्या डोंगरामध्ये किती जनावरे चरायला येतात हे पाहण्यासाठी आणि मोजण्यासाठी स्वतः कलेक्टर साहेब उदी खडकाजवळ नऊ वाजता येऊन थांबले. त्यांच्याबरोबर शासकीय लावाजमा होता. ज्या उदी खडकावरून तुपारी गावची जनावरे डोंगरात प्रवेश करतात ती सर्व जनावरे डोंगरात यायची. संपल्यानंतर त्यांनी ती जनावरे मोजली. एक गाय आणि बाकीच्या म्हशी अशी एकूण ३० जनावरे होती. त्यांना चरण्यासाठी दहा एकर वनक्षेत्र सोडून बाकीचे सर्व गायरान अभयारण्यात वर्ग करण्याचा निर्णय सक्सेना साहेबांनी सर्व संमतीने घेतला आणि लगेचच गायरान अक्वीजिशनचे प्रकरण तयार करून ते दोनच दिवसात शासनाकडे सचिवालयात पाठवून दिले. कलेक्टर सक्सेना यांनी लँड रेकॉर्डकडून तुपारी गट नं. १३२ चा नकाशा मिळवून देण्यास मदत केली. दुष्काळाचा लाभ उठवून अभयारण्यासाठी सडक करता येईल. त्या दृष्टीने अभयारण्याला दुष्काळ हे वरदान ठरणार होते. याचा लाभ घेण्यासाठी मुख्य प्रवेशद्वार ते पठार ही पाच किलोमीटर अंतराची सडक तयार करण्याचे ठरविले. धों. म. मोहिते यांनी कलेक्टरांना 'अभयारण्यात दुष्काळी काम म्हणून पाच किलोमीटर सडक मंजूर करावी' असे पत्र लिहिले. तीनच दिवसात कलेक्टर एस. एस. सक्सेना यांच्याकडून या पाच किलोमीटर सडकेस दुष्काळी काम म्हणून तात्काळ मंजुरी देण्यात आली. अशा प्रकारे अभयारण्य उभारणी कामी कलेक्टर एस. एस. सक्सेना यांनी कोणतीही दिरंगाई न करता पत्रव्यवहार करून आणि आदेश देऊन अतिशय मोलाची मदत केल्याचे धों. म. मोहिते यांनी विनम्रपणे मान्य केले आहे.

## ३.२.५ वनखात्यातील व्यक्तिचित्रणे

**◆ रेंजर एल.एच. बेनकट्टी**

सातारा विभागीय वनाधिकारी क्ष. प. नरवणे यांच्या जागेवर एल. एच. बेनकट्टी हे नियुक्त झाले होते. पूर्वी कराडला ते रेंजर म्हणून काम करत होते. पदोन्नतीने ते विभागीय वन अधिकारी झाले होते. त्यांचे मूळ गाव धारवाड. त्यामुळे त्यांच्या बोलण्यात मराठीला कानडीचे व्याकरण असायचे त्यांच्या बोलण्याची एक झलक मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनातून व्यक्त केली आहे. ते कुणालाही शाला म्हणजे साला म्हणायचे. अगदी बायकोशी बोलताना सुद्धा शाला तुझे अजून आवरला नाय पिक्चर सुटल्यावर जायचा काय? अशा कानडी हेल मध्ये बोलायचे. या अभयारण्याच्या उभारणीमध्ये एक सरकारी अधिकारी म्हणून आपले काम कसे टाळता येईल, याचे एक उत्तम उदाहरण म्हणून एल एच बेनकट्टी यांच्याकडे पहावे लागते. आपले काम दुसऱ्यावर ढकलून आपण नामानिराळे राहणे हे बेनकट्टी साहेबांच्या कडून शिकावे. अभयारण्याच्या उभारणीसाठी श्री मोरे आणि श्री वैद्य हे दोन अधिकारी जीव लावतात. हे बेनकटींना खटकत होते. उपविभागीय वन अधिकारी टी. वाय. मोरे आणि वनक्षेत्रपाल फी. जे. वैद्य या दोघांनी अभयारण्य उभारण्यासाठी केलेली मदत बेनकटींना आवडत नसे. तसेच मावीनकुर्वे आणि बेनकट्टी यांच्यामध्ये सुद्धा काही वाद होता. तो राग बेनकट्टी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यावर काढीत. शेवटी शेवटी तर बेनकटीनी टी. वाय. मोरे यांना सागरेश्वरला न जाणेबद्दल सक्त ताकीद दिली होती. तसेच विजय वैद्य यांनाही धारेवर धरले होते. आपल्या अधिकारी निवासासमोरील परसामध्ये बेनकट्टी यांनी मजुरांकडून भाजीपाला लावला होता. त्याची भांगलण ते गार्ड कडून करून घेत असत. मोहिते ज्यावेळी त्यांच्या बंगल्यावर त्यांना भेटण्यासाठी गेले, त्यावेळी पाच किलोमीटर दुष्काळी रस्त्याचे काम आमच्याने होणार नाही. तुम्ही दुसऱ्या कुणाकडून तरी हे काम करून घ्या असे सांगून मोहिते यांची बोळवण केली. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर मात्र, 'शाला तुम्ही एवढे चांगला काम करून राहिलेत आमच्या लोकांना असा जमेल काय? आमचे लोक म्हणजे शाले फालतू. त्यांना नुसते खड्डे पाडून रोपे लावायला सांगा. सडके बिडकेची असले त्यांना काय जमते.' असे म्हणून दुष्काळी कामावरील शेरेबुकात वाऽ वाऽ असा इंग्रजी शेरा मारून निघून जाणारे बेनकट्टी साहेब वाचकांच्या लक्षात राहतात. रस्ता पूर्ण झाल्यानंतर सडकेवर स्ट्रीट लाईट घेण्यासाठी आमच्याकडे पैसा नाही, असे म्हणून ते काम टाळणारे बेनकट्टी यांनी १९७३-७४ या सालात अभयारण्यासाठी फक्त पंधराशे २४ रुपये इतकीच रक्कम खर्च केले होते. अभयारण्याला मदत करणाऱ्या रेंजर वैद्य यांची त्यांनी दोनदा बदली करून अभयारण्य उभारण्याच्या कामांमध्ये खोडाच घालण्याचे काम केले होते. सागरेश्वर अभयारण्य पूर्ण झाल्यानंतर सांगली जिल्ह्यासाठी स्वतंत्र वनविभागाची मोहिते यांची मागणी पूर्ण झाली आणि सांगली वनविभाग सुरू झाल्यानंतर बेनकट्टींना समजताच अभयारण्यामध्ये असलेल्या डाक बंगल्यातील सर्व सामानांची यादी करून ते सातारला हलवण्यासाठी स्वतः सागरेश्वर अभयारण्यात आले. तेव्हा सातारा डिव्हिजनचे सर्व मालमत्ता मी इथून घेऊन जाणार आहे. असे त्यांनी मोहिते यांना सांगताच सामान न्यायला ट्रक येऊ द्या. त्याच्या चाकातली हवा सोडून टाकतो. असा दम दिल्यानंतर रागीट

चेहरा करून बेनकट्टी जीपमधून बसून निघून गेले. एकूणच सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये अडथळे आणून हे अभयारण्य उभाच राहणार नाही. यासाठी सर्वतोपरी प्रयत्न बेनकट्टी यांनी केलेले दिसून येतात. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून बेनकट्टी साहेबांसारखे सरकारी अधिकारी आपणास दिसून येतात.

**◆ रेंजर बी. जी. ममदापूर**

सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये मदत करणारे रेंजर म्हणून व्ही. जे. वैद्य, टी. वाय. मोरे यांच्याबरोबर रेंजर बी. जी. ममदापूर यांचेही नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. या आत्मकथनातून बी. जी. ममदापूर हे एक सरकारी अधिकारी. उत्तम रीतीने काम करणारे आणि लोकांना योग्य मार्गदर्शन करणारे अधिकारी म्हणून वाचकांसमोर येतात. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा विकास सल्लागार समिती आहे आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष त्या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आणि विभागीय वनाधिकारी सातारा हे त्याचे सचिव असतात. तुम्ही सांगली जिल्हा परिषद अध्यक्षांचा यांना भेटा आणि या सागरेश्वरच्या डोंगरावर अभयारण्य होऊन जाईल, असा दिलासा देऊन मोहिते यांना योग्य मार्ग दाखवला. त्याचबरोबर त्यांना योग्य ते सहकार्य केले. जिल्हा परिषद अध्यक्ष धोंडीराम नाना पाटील सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये सांगली जिल्हा परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष धोंडीराम नाना पाटील यांनीही मोहिते यांना मोलाची मदत केली आहे. अभयारण्याची कल्पना त्यांच्यापुढे मांडल्यानंतर वा छान. त्यात काही अडचण येणार नाही. तुम्ही मला या संदर्भात एक पत्र लिहून द्या. त्याला माझे डी. ओ. लेटर जोडून ते मी साताऱ्याला पाठवून देतो, असे म्हणून लगेचच त्यांनी ते पत्र सातारा विभागीय वनाधिकारी यांच्याकडे पाठवून दिले आणि त्याची एक प्रत मोहिते यांना दिली. अशाप्रकारे सागरेश्वर अभयारण्याला उभारणीसाठी मदत करणारे एक उत्तम राजकारणी म्हणून जिल्हा परिषद अध्यक्ष धोंडीराम नाना पाटील यांचाही उल्लेख करावा लागतो.

**◆ श्री. उ. रा. माविनकुर्वे**

चीफ कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्ट, पुणे सर्कलचे मुख्य वनसंरक्षक म्हणून श्री. माविनकुर्वे साहेब यांची व्यक्तिरेखा मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनातून अतिशय उत्तमरीतीने रेखाटली आहे. एक उत्तम प्रशासक संघटक अधिकारी म्हणून श्री. माविनकुर्वे वाचकांच्या समोर येतात श्री. माविनकुर्वे हे मुकुंदराव किर्लोस्कर यांचे स्नेही होते. त्यामुळे मुकुंदराव किर्लोस्करांचा शब्द त्यांच्यासाठी प्रमाण होता. त्यामुळेच अभयारण्य उभारण्यासाठी आणि झाडांवर प्राण्यांवर असणाऱ्या प्रेमापोटी त्यांनी सागरेश्वरच्या उजाड ओसाड डोंगरावर अभयारण्य उभा रहावे म्हणून मोहिते यांना सर्वतोपरी मदत केली. सागरेश्वरच्या परिसरातील डोंगर पाहिल्यानंतर माविनकुर्वे साहेबांना खूप आनंद झाला. जीपमधून उतरून ते चालत तेथील जमिनीची पाहणी करत पुढे जात होते. काठीचे अनुकुचीदार टोक जमिनीत घुसवत आणि माती उचकटवीत येथील जमिनीचा पोत आणि प्रत कशी आहे. यामध्ये लावलेली झाडे येतील काय? याचा अंदाज घेत त्यांनी संपूर्ण

परिसराची पाहणी केली. दुपारच्या वेळी चिपळ्यांच्या ज्वाळावर भाजलेल्या ओल्या शेंगा त्यांनी झाडाखाली घोंगडी टाकून बैठक मारून खाल्ल्या आणि अभयारण्य उभारण्याची चर्चा केली. येथील जमीन चांगली आहे. प्लांटेशन चांगले येईल. झाडे लावू. हरण सोडू. पॅगोडा गेस्ट हाऊस अशा आणखीन इमारती बांधू एकूणच हा परिसर खूप छान होईल. मी स्वतः प्लॅन तयार करून देतो. असे सांगून मोहिते यांना खूप हुरूप आणला.

वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक श्री. एस. एस. बुट यांना घेऊन येण्याची जबाबदारी सुद्धा श्री. माविनकुर्वेसाहेब यांनी स्वतः सांभाळली. एकूणच अभयारण्याच्या उभारणीसाठी माविनकुर्वे साहेब यांनी मुलाची मदत केल्याचे दोन मोहिते यांनी लिहिले आहे.

**◆ श्री. एस. एस. बुट**

महाराष्ट्राच्या वन विभागाचे मुख्य संरक्षक म्हणून श्री. एस. एस. बुट यांचेही चित्रण मोहिते यांनी 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभव कथनांमधून केली आहे. श्री. एस. एस. बुट यांना अभयारण्याच्या साइटवर घेऊन येण्याची जबाबदारी श्री. माविनकुर्वे साहेब यांनी स्वीकारली होती. लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यामुळे प्रचार सभेत आक्रमकपणे आपली बाजू मांडण्यासाठी तत्कालीन आमदार संपतराव नानांनी मोहिते यांना सांगितल्यामुळे बूट साहेबांचा दौरा पुढे ढकलावा असे मोहिते यांना वाटत होते. परंतु मोहिते फार बोलतात आणि समोरच्या माणसाचं मत आपल्यासारखं करून घेतात. तेव्हा त्यांच्या अपरोक्ष आपण साईट पाहिलेली बरी असे म्हणून श्री. बूट साहेब यांनी सागरेश्वर अभयारण्याच्या साईटला भेट दिली आणि तुमची साईट फार सुंदर आहे. इतके दिवस तुमच्या लक्षात का आले नाही तुमचे अभयारण्य होऊन जाईल तुमच्या कामाला यापूर्वीच माविनकुर्वे यांच्याकडून गती देण्यात आली आहे. असे सांगितल्यामुळे अभयारण्याच्या उभारणीचे काम गतीने सुरू झाले. अभयारण्य उभारणीसाठी मावीनपूर्वे यांच्या बरोबरीने मुख्य वनसंरक्षक श्री. एस. एस. बुट यांचीही भूमिका मोलाची ठरल्याचे श्री मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनातून लिहिले आहे.

**◆ श्री. पी. पी. घुले**

उपविभागीय वन अधिकारी म्हणून श्री. पी. घुले ही व्यक्तिरेखा मोहिते यांनी चित्रित केली आहे. सांगली वन उपविभाग सुरू झाल्यानंतर पी. पी. घुले हे उपविभागीय वन अधिकारी म्हणून शासनाने नियुक्त केले. अभयारण्य पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर लाईट नाही, याची खंत त्यांनी बोलून दाखवली आणि विजेची मागणी करायला पाहिजे असे म्हणून लगेचच विजेची मागणी करणारे पत्र संबंधित अधिकाऱ्यांना लिहिले त्यानुसार अभयारण्यात वीज येण्याचा मार्ग मोकळा झाला. पी. पी. घुले यांची कारकीर्द फक्त दीड दोन महिन्याची ठरली. परंतु आपल्या या अल्प कारकीर्दीत त्यांनी तीन महत्त्वाची कामे केली. अभयारण्यासाठी विजेची मागणी करून ते काम मार्गस्थ लावले. सांगली जिल्हा नियोजन आणि विकास मंडळाकडे सागरेश्वर अभयारण्यासाठी बेनकट्टीने केवळ दहा हजार रुपयांची मागणी केली होती. परंतु घुले साहेबांनी आक्रमक

भूमिका घेऊन ती रक्कम एक लाखापर्यंत वाढवून घेतली. पालकमंत्री या नात्याने वसंतरावदादा पाटील यांनी घुले साहेबांची ही मागणी तात्काळ मान्य केली. त्याचबरोबर वरिष्ठांना सांगून सत्तार यांच्यासारख्या अभ्यासू आणि कार्यक्षम रेंजर पी. घुले यांनी खास नेमणूक करून घेतली. अभयारण्य उभारणीमध्ये एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून घुले साहेबांची कारकीर्द वाचकांच्या डोळ्यासमोर येते.

**◆ इ. अ. ज. सत्तार आणि जे. एम. लोबो**

सत्तार हे अभ्यासू आणि कार्यक्षम रेंजर म्हणून वन खात्यामध्ये त्यांची कामगिरी नोंदवली गेली आहे. त्यांच्याकडे तासगाव खानापूर आटपाडी हे तीन तालुके इतके मोठे कार्यक्षेत्र होते. तरीही घुले साहेबांच्या सूचनेनुसार सागरेश्वर अभयारण्याचा चार्जही त्यांच्यावर कडे दिला गेला. वैद्यांच्या पावलावर पाऊल टाकून सत्तार साहेबांनी अतिशय चांगले काम केले. अभयारण्यातील वनीकरण करण्याबरोबरच इतर इमारतींचेही प्लॅनिंग करणे इस्टिमेट करणे अतिशय महत्त्वाची कामे सत्तार यांनी केलेली दिसून येतात. आता अभयारण्यामध्ये दिसणारा पॅगोडा याचा प्लॅन आणि स्वतः साहेब यांनी बनवला आहे. पॅगोडा फक्त चित्रातच पाहिला असल्यामुळे सिंहगडला जो पॅगोड आहे. तो पाहण्यासाठी मोहिते आणि सत्तार हे दोघेही सिंहगडला गेले. त्याचे फोटो घेतले, मापे घेतली आणि त्याची पूर्तता करून पॅगोडाचे काम सुरू केले कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने मंजूर करून घेतली आणि त्यांना गती दिली शांतिनिकेतनच्या धरतीवर फुलांनी सजवलेल्या पालखीत रोपे ठेवून आनंदाने गाणारी नाचणारी मुले असा मजकूर असलेला लेख मोहिते यांनी सत्तार साहेबांना वाचायला दिला आणि तो लेख वाचून झाल्यावर ‘अण्णा, चालू वर्षीच्या वनमहोत्सवात आपण अभयारण्यात अशी वृक्षदिंडी काढायचीच.’ ही वृक्षदिंडीची कल्पना त्यांनी एकदम उचलून धरली आणि जोशी साहेबांनी ही त्यांना प्रोत्साहन दिले सागरेश्वर अभयारण्यामध्ये सांगलीच्या राजमाता यांच्या उपस्थितीत ताकारी देवराष्ट्रे मोहित्यांचे वडगाव येथील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सजवलेल्या पालखीतून रोपांची मिरवणूक काढली. बँड धनगरी ढोल लेझीम घोषणा अशा पद्धतीने ही मिरवणूक काढून बालोद्यानापर्यंत मुलांनी येऊन वृक्षारोपण केले. या आगळ्यावेगळ्या वृक्षदिंडीचा अनेक वर्तमानपत्रांनीही प्रसिद्धी देऊन सन्मान केला. एकूणच सागरेश्वर अभयारण्यात स्वतंत्र रेंज म्हणून मान्यता मिळाली आणि या रेंज ऑफिसमध्ये पहिले रेंजर म्हणून श्री सत्तार यांचीच नेमणूक करण्यात आली या अनुभवकथनातून एक कर्तव्यदक्ष मनमिळावू आणि धडाडीचा कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून श्री सत्तार यांचा उल्लेख आपणास दिसून येतो.

**◆ श्री. बी. जी. माळी आणि श्री. एस. बी. नलावडे श्री. टी. वाय. मोरे आणि श्री. विजय वैद्य**

सांगली जिल्ह्यातील उपविभागीय वन अधिकारी म्हणून टी. वाय. मोरे यांची मोलाची मदत सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणी कामी झाल्याचे मोहिते यांनी लिहिले आहे. टी. वाय. मोरे हे इस्लामपूरचे तर वनक्षेत्रपाल व्ही. जे. वैद्य हे शिराळा गावचे दोघेही सांगली जिल्ह्यातील असल्यामुळे अभयारण्याच्या उभारणीसाठी विशेष सहकार्य केल्याचे मोहिते नमूद करतात. अभयारण्याच्या उभारणीवर त्यांनी अधिक लक्ष

दिल्यामुळे बेनकट्टी यांची खप्पा मर्जी त्यांच्यावर झाली. त्यामुळे सागरेश्वरला न जाण्याबद्दल दोघांनाही ताकीद मिळाली होती. 'शाला ते मोहिते मंत्र्यांना कशाला पत्र लिहिले? आम्ही नाय काय इथे वैद्य? तुम्ही त्यांना मंत्र्यांना पत्र लिहू नका म्हणून का नाही सांगत? शाला तुम्ही म्हणजे नुसते हे हाय.' अशा प्रकारची विनाकारणांची कानउघडणी केली जात होती.

अभयारण्य योजनेसाठी वनखात्याने देवराष्ट्रे येथे वनविभागाचे अधिकृत कार्यालय सुरू केले त्यावेळी कामावर देखरेख ठेवणे, वनीकरण करण्यास संरक्षण देणे, यासाठी माळी आणि नलावडे हे कर्मचारी देवराष्ट्रे येथे येऊन राहिले. कराड रेंजच्या अधिपत्याखाली हे कार्यालय असल्याने रेंजर वैद्य जाऊन येऊन तिथले कामकाज पाहत होते. नागपंचमीच्या दिवशी शिकार करू नये, यासाठी स्वतः रेंजर वैद्य साइटवर हजर राहून शिकार न करण्याविषयी लोकांचे प्रबोधन करत होते. या सर्व कामासाठी टी. वाय. मोरे यांनी वन्यप्राणी आणि पशुपक्षी यांचे शिकार करणे हे बेकायदेशीर असून आरोपीस पाचशे रुपये दंड आणि सहा महिने शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा होईल, असे पत्र काढल्यामुळे कोणीही शिकार करू नये किंवा झाडांची तोड करू नये नुकसान करू नये असे आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. अशा आशयाची नोटीस काढून वृक्षतोडीला आणि शिकारीला पायबंध घालण्यासाठी मोलाचे काम केले आहे. अभयारण्यातील पाच किलोमीटर रस्त्याचे काम करण्यासाठी श्री वैद्य यांनी पत्रव्यवहार करून कलेक्टर श्री. एस. एस. सक्सेना यांच्याकडून दुष्काळी काम म्हणून मंजुरी घेण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. अशा प्रकारे श्री. वैद्य, श्री. मोरे, श्री. माळी, श्री. नलावडे यांनी आपापल्या परीने अभयारण्य उभारण्यासाठी अतिशय महत्त्वाचे काम केले आहे. याचा उल्लेख मोहिते यांनी 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या आत्मकथनातून नम्रपणे केला आहे.

### ३.२.६ परदेशी पाहुणे

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनामधून विविध लोकांची ओळख आपणास मोहिते यांनी करून दिली आहे. त्यामधील मेसर्स सिग्मंड पल्सो मीटर लिमिटेड इंग्लंड लंडनचे वर्क्स मॅनेजर पीटर हेरो क्वालिटी कंट्रोल मॅनेजर पीटर जॅक्सन यांचाही उल्लेख या अनुभवकथनातून आलेला आहे. किर्लोस्कर कारखान्यामध्ये ते भेट देण्यासाठी आले होते. त्यावेळी किर्लोस्कर कारखान्याची गाडी त्यांना घेऊन सागरेश्वरच्या पठारावर आली होती. सागरेश्वर पठाराहून सूर्यास्त पाहताना प्रसन्न वातावरणात तेथील दृश्य ते आपल्या कॅमेऱ्यात टिपत होते. अलीबाबाची गुहा सापडावी, तसा त्यांना आनंद झाला होता. खुर्चीवरून उठून त्यांनी व्हरांड्यात चक्क डान्स सुरू केला. अशा प्रकारचे वर्णन आपणास वाचावयास मिळते.

मुंबईतील रशियन कॉन्सल मॉन्टरॉव यांना घेऊन सांगलीच्या राजमाता पद्मिनी राजे पटवर्धन या आमदार वि. कृ. टेंभे आणि किर्लोस्कर कारखान्याचे काही अधिकारी सागरेश्वर अभयारण्यात आले होते. रशिया मैत्रीचे प्रतीक म्हणून रशियन पाहुण्यांने सागरेश्वर अभयारण्यात वृक्षारोपण केले. शास्त्रीवानी हे वृक्षारोपण विधीपूर्वक करून घेतले. मोंतराव बूट काढून बसले होते. त्यांच्या कपाळी कुंकुम तिलक लावून

मंत्र म्हणता म्हणता त्यांना म.. म.. म्हणायला लावत होते. विधी पूर्ण होईपर्यंत पाहुणे हात जोडून बसले होते. रोप लावून झाल्यानंतर 'वृक्ष देवो भव' असे म्हणून त्यांनी रोपाला नमस्कार केला. अशाप्रकारे परदेशी पाहुण्यांचे हे चित्र आपणांस 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून वाचाव्यास मिळते.

### ३.२.७ संकीर्ण व्यक्तिचित्रणे

**◆ बापू बिरू वाटेगावकर**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून बापू बिरू वाटेगावकर यांचाही उल्लेख आलेला आहे. धो. म. मोहिते यांना अभयारण्य बनवत असताना खांद्यावर घोंगडी आणि दुसऱ्या खांद्यावर बंदूक अडकवलेला एक इसम समोर येऊन उभा ठाकला. 'इथं अभयारण्य करायचं म्हणत आहे. पण गरीबाची मेंढरं चरायची कुठं?' असा प्रश्न करून तो इसम पुढे निघून गेला. परंतु हा इसम कोण? असा प्रश्न श्री मोहिते यांना पडला होता. त्यांच्या एकूण वर्णनावरून फौजदारांनी त्यांना तो इसम म्हणजे बापू बिरू वाटेगावकर असल्याचे सांगितले. चार-पाच खून करणारा बापू बिरू वाटेगावकर हा मुद्दाम कुणाशी वैर करत नाही. ज्यांना धनदांडगे लोक जाणीवपूर्वक त्रास देतात, अशांना जरब बसवणारे बापू बिरू म्हणून या परिसरात त्यांची ओळख आहे. तेच बापू बिरू नंतर अभयारण्य पूर्ण झाल्यावर श्री. मोहिते यांना भेटले. तेव्हा वडगावकर, 'मी तुम्हाला म्हणत होतो, की अभयारण्य केल्यानंतर इथं जनावरे कुठे चरायची? पण आज तुम्ही खूप चांगले काम केले आहे.' असे सांगणारे बापू बिरू वाटेगावकर ही व्यक्ती आपल्याला या अनुभवकथनातून वाचावयास मिळते.

**◆ शंकर बाळकू पवार**

शंकर बाळकू पवार हे मोहित्यांच्या वडगावचे अभयारण्यामध्ये रस्त्याचे काम सुरू झाल्यानंतर काम करणाऱ्यांमध्ये स्त्रियांचा भरणा जास्त होता. त्यातल्या त्यात बागायतदार शेतकऱ्यांच्या स्त्रियांना पुरुषांमध्ये काम करणे संकोच वाटू लागल्यामुळे त्यांना पुरुषांपासून वेगळ्या ठिकाणी काम करण्याची संधी श्री धों. म. मोहिते यांनी दिली. बायकांचा वेगळा विभाग करून फर्लांगभर अंतरावर सडकेची आखणी करून दिवसभर स्त्रियांच्या कामाकडे पुरुषाने फिरकायचे नाही असा कडक दंडक घालून दिला. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत नवरा बायको सुद्धा एकत्र येत नसत. घरून निघतानाच ते आपल्या वेगळ्या भाकरी बांधून आणत. या महिला विभागाकडून काम करून घेण्यासाठी शंकर बाळकू पवार यांची नेमणूक श्री. धो. म. मोहिते यांनी केली. श्री. शंकर बाळकू पवार यांच्या स्वभावाचे वर्णन करताना ते फार बोलके आणि कडक असल्याचे नमूद केले आहे. पवार हे मोहिते वडगावमध्ये पाहुणे असल्याने सर्व स्त्रियांचे ते नात्याने भाऊ होते. त्यामुळे कोणत्याही स्त्रीला कामाबद्दल रागाने ते काही बोलले, तरी कोणालाही त्याचे काही वाटायचे नाही. त्यामुळे पवार दिसले की बायका म्हणायच्या ऊठा कामाला लागा, सासू आली. परंतु एका चांगल्या कामासाठी शंकर बाळकू पवार यांनी स्त्रियांच्याकडून काम करून घेण्यात मोलाची कामगिरी बजावलेली दिसून येते.

◆ **विठ्ठल गणू मोहिते आणि विलास महादेव देशमुख**

सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये धों. म. मोहिते यांना मोहित्यांच्या वडगाव मधील अनेक लोकांनी मदत केलेली दिसून येते. यामध्ये विठ्ठल गणू मोहिते आणि विलास महादेव देशमुख दगडू बाळा मोहिते यांचे उल्लेख मोहिते यांनी आपल्या आत्मकथनातून केले आहे. तर पुरुष विभागाकडून विठ्ठल गणू मोहिते आणि विलास महादेव देशमुख हे दोन कार्यकर्ते काम करून घेत होते. तर दगडू बाळा मोहिते यांच्याकडे सुरुंग विभाग सोपवला होता. जालिंदर विष्णू मोहिते यांच्याकडे सुकडी वाटप ह्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली होती. गावातीलच एक शिंगाड्याही कामावर होता. तो सकाळी सात वाजता देवळापुढच्या चौकात दोन-तीन वेळा शिंगफुंकून गावकरी लगेच डोंगराच्या वाटेला लागत. डोंगरात सकाळी आठ वाजता पहिले आणि नंतर सव्वा आठ वाजता दुसरे शिंग वाजे. कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याचा हा इशारा असे. तिथून पुढे येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कामावर घेतले जात नसे. वेळेवर हुकूमी काम करून घेण्यात या सर्वच लोकांनी श्री मोहिते यांना मदत केली आहे.

◆ **परशराम भोंगाळे**

देवराष्ट्रे गावचे परशराम भोंगाळे हे पात्र आपल्याला 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या आत्मकथनातून पहावयास मिळते आभारण्याचे रस्त्याचे काम सुरू असताना परसराम भोंगाळे हे आपल्या पत्नीसह हॉटेल घेऊन येत असत ते यात्रेसारखे पाल ठोकेत चहाबरोबर भजी वडापाव वगैरे सामान ते आपल्या सायकलवर लादून आणत नवरा आणि बायको दोघेही हे हॉटेल चालवत असत परशराम यांच्या हातात हँडल आणि त्यांची बायको पाठीमागून सायकल ढकलत असायची त्यांना पाहून कामावरील लोक आली परशराम लायन सर्कस आली असे विनोदाने म्हणायचे. अशाप्रकारे प्रत्यक्ष अभयारण्याच्या उभारणीमध्ये मदत नसली तरी अप्रत्यक्षपणे कामावरील लोकांना चहा पाण्याची आणि नाश्त्याची सोय करून देणारे भोंगाळे हे आपल्याला या आत्मकथनातून भेटतात.

◆ **गणेश महादेव कुलकर्णी मास्तर**

गणेश महादेव कुलकर्णी हे शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले होते. सेवानिवृत्त झाल्यानंतर येणाऱ्या पेन्शनमध्ये आपला उदरनिर्वाह चालत नाही, हे लक्षात आल्यामुळे भिक्षुकी करण्यास त्यांनी सुरुवात केली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते देवराष्ट्रीय येथील प्राथमिक शाळेत यशवंतराव चव्हाण यांना शिक्षक म्हणून शिकवायला होते. त्याचबरोबर ते धो. म. मोहिते यांनाही शिकवायला होते. दुष्काळामुळे त्यांची भिक्षुकी बंद झाली होती. सत्यनारायण वगैरे कोणीही करत नव्हते. आपल्या पोटाचे हाल होत आहे. ते हे पाहून वार्धक्यात सुद्धा आपली गुरुदक्षिणा म्हणून आपल्याला काम मिळावे, असे ते मोहिते यांना म्हणतात. तेव्हा तत्कालीन शिक्षकांची हलाखीची परिस्थिती वाचकांच्या डोळ्यासमोर येते. सर्वजण त्यांना बाबुराव मास्तर किंवा बाबुराव भटजी या नावाने ओळखत होते. या वयात आपण आपल्या शिक्षकांना काय काम द्यायचे असा प्रश्न मोहिते यांच्यासमोर उभा राहिला. कारण इथली सर्वच कामे कष्टाची. दगड फोडणे,

खोदणे अशा प्रकारची कामे त्यांना जमणार नाहीत. हे जाणून मोहिते यांनी त्यांना कामावरील लोकांना पाणी पुरवण्यासाठी जी बैलगाडी होती. त्या बैलगाडीतील पाणी वाटपाचे काम मास्तरांना दिले. आणि पाण्याची गैरवाजवी होणारी थांबली आणि मास्तरांनाही काम मिळाले. अभारण्याच्या उभारणीमध्ये सर्वांनी आपापल्या परीने हातभार लावला. त्यामध्ये कुलकर्णी मास्तर यांचेही चित्र मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनातून केले आहे.

◆ **कामगार स्त्रिया**

मोहित्यांचे वडगाव, देवराष्ट्रे, आसद इथून अनेक स्त्रिया सागरेश्वर अभयारण्यात कामावर येत असत. दुष्काळामुळे अनेक लोकांची परिस्थिती अतिशय वाईट झाली होती. पाऊस नसल्यामुळे बागायती शेती सुकून गेली होती. आपले पोट कसे भरावे, अशा विवंचनेत सारा सोनहिरा परिसर हवालदील झाला होता. अशा काळात अभयारण्यातील सडक करण्यासाठी या गावातील स्त्री आणि पुरुष हे कामावर येत होते. अशा कामावर येणाऱ्या स्त्रियांमध्ये ज्या स्त्रियांना लोकसाहित्याची आणि लोकगीतांची आवड होती. अशा स्त्रिया गाणी म्हणून आपला श्रमपरिहार करत.

काम करणाऱ्यांत बायकांचा भरणा अर्धाअधिक होता. या बागाईतदार शेतकऱ्यांच्या बायका. पुरुषात काम करायला त्यांना संकोच वाटू लागला. मला त्यांनी तसे बोलून दाखविले आणि 'आम्हाला पुरुषापासून वेगळ्या ठिकाणी काम द्या' अशी विनंती केली. मला ती पटली. बायकांचा वेगळा विभाग स्थापन करुन त्यांना फर्लांगभर अंतर सोडून सडकेची आखणी करून देऊ लागलो. दिवसभर बायकांच्या कामाकडे पुरुषाने फिरकायचे नाही. असा कडक दंडक घातला! दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत नवराबायकोसुद्धा एकत्र येत नसत. घरुन निघतानाच ते आपल्या वेगळ्या भाकऱ्या बांधून आणीत.

*अभयारण्यात कोण गं उभी दगड काढते मी भाऊजी*
*सुगराभाबी*
*पाटी फेका लवकरी, येईल कुणीतरी ।। ध्रु. ।।*
*लिंगेश्वरच्या खालच्या बाजुला देव गणपती हा सापडला*
*गोलामध्ये स्थापन केला.*
*बायांनो*
*दर्शन घ्या लवकरी, जाऊया कामावरी ।।१।।*
*औंदाचं गं वरीस बाई मी दुष्काळात काढलं*
*डोकीला नाही तेल चपचपीत लावलं*
*तुझ्या नथीच्या झोकावरी काळीज त्याचं झरझर करी*
*पंचीन वैनी*

*पाटी उचला लवकर, येईल कुणीतरी ।।२।।*

*दुष्काळाचा धंदा निघाला तुमचा आमचा मेळा जमला*

*टिकावाने मुरुम काढीला*

*भरणारनीनो पाटी भर गं लवकरी, येईल कुणीतरी ।।३।।*

एका महिलेने उखाणे रचले होते.

*गुरवदादा शिंग वाजव बिगीबिगी अरण्या जायला जनता करावी जागी।।*

*घाट चढताना गुडघ्यावर देती हात*

*तीन रुपयांच्या नोटीसाठी जागते सारी रात।।*

*असले काम नको कशी घेऊ डोईवर पाटी*

*पडेना मेघराजा त्याला कैलासी धाडू चिठ्ठी ।।*

*मुकादमदादा नका देऊ दमदाटी*

*जनता आलीय पोटासाठी आठ तासांची आहे ड्यूटी*

*पाणी प्यायला का सुट्टी।।*

*अभयारण्यात टॅक्सी का गं वळणे घेती*

*सांगली जिल्ह्यातील जनता सडक पहायला येती ।।*

*एक महिला कामावर आपल्या नवऱ्याचे नाव उखाण्यात घेते.*

*अभयारण्याच्या गोलात बसला गणपती त्याच्या सोंडेला*

*शंभर मोती। xxx पाटील शंकर, मी पार्वती।।*

*अभयारण्याच्या गोलात बसला गणपती। त्याच्या सोंडेला शंभर मोती।*

*xxx पाटील शंकर, मी पार्वती।।*

*अभयारण्याच्या सडकेला नागमोडी रस्ता। xxx पाटलाचं नाव घेते साडेबारा वाजता ।।*

*अभयारण्याच्या सडकेला आहे आंबिका घाट।*

*xxx पाटलांच्या जीवावर हळदी कुंकवाचा थाट।।*

*मोहित्यांचे वडगाव शेजारी अंबिकावन । अंबिकावनात अभयारण्य।*

*अभयारण्यात वळणावळणाची सडक। पाटलांचे नाव घेते बीनधडक ।।*

याशिवाय कुस्त्या, नकला असे कार्यक्रमही अधूनमधून होत असत. अशा प्रकारची गीते त्या

म्हणून श्रमपरिहार करत. एकूणच त्यांच्या गीतातून लिंगेश्वरच्या बाजूला असलेला गोलगणपती, सागरेश्वर, दुष्काळाची परिस्थिती आणि आपल्यावर आलेली हालाखीची परिस्थिती याचे चित्र या गीतातून आपणास ऐकावयास मिळते. मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनातून अशा स्त्रियांचे सामूहिक चित्रण केलेले दिसते. एकूणच आभारण्याचा उभारणीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही अतिशय मोलाचा वाटा उचलला आहे असे मोहिते नम्रपणे नमूद करतात.

◆ **शामराव सदू महिंद**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील लेखक मोहिते यांचे मामेभाऊ म्हणजेच श्यामराव सदू महिंद. १९४२ च्या चळवळीतील एक क्रांतिकारक म्हणून शामराव महिंद पाटील यांची ओळख संपूर्ण सोनेहिरा परिसरालाच आहे. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणी वेळी ते काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते म्हणून काम करत होते. रस्त्याचे काम करत असताना रामोशी समाजातील एक मजूर अचानकपणे अपघातात मयत झाला. त्यावेळी देवराष्ट्रकर आपल्याला काहीतरी त्रास करतील. याचा अंदाज मोहिते यांना आला होता. कोंडवाडे, जनावरे पकडणे, खटले भरणे अशी काही कारणे ही त्यामध्ये होती. परंतु मोहिते यांचे मामे भाऊ शामराव यांनी मोहिते यांना काही काळजी करू नकोस, मी माझा ग्रुप तयार ठेवला आहे, असे सांगून दिलासा दिला. एकूणच या अपघातसमयी शामराव महिंद यांनी जमावाला शांत करण्यासाठी मोलाची मदत केली.

◆ **सखाराम नाना शिरतोडे**

सखाराम नाना शिरतोडे हे देवराष्ट्रे गावातील रामोशी समाजाचे नेते होते. १९४२ च्या चळवळीतील क्रांतिकारक म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्याचबरोबर धो. म. मोहिते यांचे ते सहकारीही होते. रस्त्याचे काम करत असताना रामोशी समाजातील एका मजुराचा अपघात होऊन तो मयत झाला आणि इतर दोघे जखमी होते. मयत व्यक्तीस दहन करायच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी सखाराम नाना शिरतोडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. प्रेत रामोशी वाड्यात आल्यानंतर त्या मजुराच्या बायका मुलांचा पुरुष आणि एकूणच जमावाचा रोख यामुळे कोणताही अनुचित प्रसंग होऊ शकतो. याची कल्पना आल्यामुळे सखाराम शिरतोडे यांनी धो. म. मोहिते यांना अण्णा या प्रेताला तुम्ही अग्नी द्यावा. अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे.  असे सांगून त्या चितेला अग्नी द्यायला लावला. या मागे त्यांचा नेमका कोणता हेतू होता ते मोहिते यांना समजले नसले तरीही प्रेताला अग्नी देणारी व्यक्ती हा त्या मयत व्यक्तीच्या जवळचा असला पाहिजे अशी सर्वसाधारण समजूत असल्यामुळे मोहिते यांना रामोशी समाजातील कोणत्याही व्यक्तीने आवक्षर काढले नसावे.

वृक्षमित्र धों. म. मोहिते यांच्या अनुभवकथनातील व्यक्तिरेखा वास्तव पद्धतीने साकार झालेल्या आहेत. त्यांच्या ललितलेखाचे कथाबीज खरं तर त्यांच्या अनुभवविश्वातच पहावयास मिळते. ताडोबा अभयारण्य पाहिल्यानंतर आपल्याही भागात असे अभयारण्य उभा करता येईल, याची खात्री वृक्षमित्र धों.

म. मोहिते यांना पटली आणि त्यातूनच एका नव्या संघर्षाचा जन्म झाला. तो संघर्ष फक्त निसर्गाशी नव्हता, तर वेगवेगळ्या मानवी वृती प्रवृत्ती यांच्याशी होता. हे अभयारण्य उभा करीत असताना त्यांना अनेक महत्त्वाच्या व्यक्तींनी मोलाची मदत केली तर अनेकांनी विरोधही केला. पण न डगमगता धीराने येणाऱ्या संकटावर मात करीत सागरेश्वरच्या उजाड माळरानावर हिरवे नंदनवन फुलवले. हरिण, चितळ, सांबर, भेकर, ससे, तरस, विविध पशू पक्षी यांच्या वास्तव्याने हे अभयारण्य पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.आपल्याला ज्या ज्या लोकांनी मदत केली, त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख या अनुभवकथनातून केला आहे. वृक्षमित्र धों. म.मोहिते यांनी अनुभवकथनातील आशयाला व घटना-प्रसंगांना अनुसरून नेमकेपणाने व कौशल्याने व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत. ही व्यक्तिचित्रणे विविध स्वभावाची, वृत्ती-प्रवृत्तीची असलेली दिसून येतात.

### ३.२.८ घटनाप्रसंग

**◆ इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार वितरण समारंभ**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभव कथानातील अगदी सुरुवातीला आलेला प्रसंग आहे तो म्हणजे वृक्षमित्र आणि इंदिरा गांधी प्रियदर्शिनी पुरस्कार वितरण सोहळ्याचा आहे. ६ ऑगस्ट १९९४! राजधानी दिल्लीत राष्ट्रपती भवनातील अशोक हॉल निमंत्रितांच्या उपस्थितीने खचाखच भरला होता. भारत सरकारच्या वन-मंत्रालयाने आयोजित केलेल्या विशेष सोहळ्यासाठी मान्यवरांची तेथे हजेरी होती. त्यामध्ये लोकसभेचे सभापती, अनेक केंद्रीय मंत्री, खासदार, नेते मंडळी, वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवरांचा समावेश होता. वनवृद्धीचे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार होते. इंदिरा गांधी पर्यावरण पुरस्कार, इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार आणि प्रदूषण नियंत्रण राष्ट्रीय पुरस्कार असे हे तीन पुरस्कार होते. त्यासाठी भारताच्या कानाकोपऱ्यांतून निवडण्यात आलेल्या व्यक्ती आणि सेवाभावी संस्थांचा एकूण आकडा सोळा होता. इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कारासाठी व्यक्तिगत श्रेणीत निवड झालेले भारतातील धों.म. मोहिते हे एकमेव होते. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

सर्व पुरस्कार विजेत्यांना अशोक हॉलमधील छोट्या व्यासपीठाच्या डाव्या बाजूस खुर्चा टाकून क्रमवार बसविण्यात आले होते. तेथे येऊन केंद्रीय वनमंत्री कमलनाथ यांनी प्रत्येकाला भेटून त्यांचे अभिनंदन केले. वनखात्याचे सचिव आर. राजमनी यांनी आधल्या रात्री पंचतारांकित कनिष्का हॉटेलमध्ये सर्वांना अभिनंदनाप्रित्यर्थ स्नेहभोजन आयोजित केले होते.अशोक हॉलमध्ये संयोजकांची धावपळ चालली होती. सुरक्षा व्यवस्था कडक पण न जाणवणारी वाटत होती. पत्रकारांचा आणि छायाचित्रकारांचा प्रचंड ताफा व्यासपीठाच्या उजव्या बाजूस सज्ज होता. दूरदर्शनवाले खांद्यावर कॅमेरा घेऊन उपस्थितांचे चित्रण करीत होते. परवानाधारक दोन व्यावसायिक व्हिडिओवाले आणि दोन छायाचित्रकार आपल्या कॅमेऱ्यात सर्वांना टिपत होते. समारंभस्थळी राष्ट्रपती व्यासपीठावर कसे येतील, प्रत्येकाने पुरस्कार कसा स्वीकारायचा, समारंभानंतर राष्ट्रपतींच्या समवेत सर्वांचा ग्रुप फोटो कसा घ्यायचा, याची रंगीत तालीम अगोदर घेण्यात

आली. सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे वरचेवर सांगण्यात येत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिच्याकडे होते ती निवेदिका प्रत्येक पुरस्कार विजेत्याजवळ येऊन त्याची माहिती व निवेदनातील काही शब्दांचे उच्चार कसे करायचे हे विचारून खात्री करून घेत होती. ठीक ११ वाजून ५९ मिनिटांनी ललकारी, तुतारी, बँडच्या निनादात राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांनी अशोक हॉलमध्ये प्रवेश केला. सर्वजण उठून उभे राहिले आणि राष्ट्रपती व्यासपीठावर स्थानापन्न झाल्यावर खाली बसले. राष्ट्रपतींच्या उजव्या बाजूला वनमंत्री आणि डाव्या बाजूला वन-सचिव बसले. हॉलमध्ये शांतता पसरली. सुरुवातीला वनमंत्र्यांनी सर्वांचे स्वागत करून पुरस्कारांचे प्रयोजन सांगितले. पुरस्कार वितरणाला सुरुवात झाली. धों. म. मोहिते यांचा क्रमांक येताच निवेदिकेने त्यांचे नाव पुकारले. गालिच्यावर उभा राहून त्यांनी राष्ट्रपतींना वाकून अभिवादन केले. धों. म. मोहिते यांना हा इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार का दिला जातोय, याची माहिती निवेदिका माईकवर देऊ लागली.

''स्वतंत्रता सेनानी, कर्मठ सामाजिक कार्यकर्ता तथा वनीकरण एवं वन्यजीव संरक्षण के पुनीत कार्य में सफलतापूर्वक जन-जन को जागरूक बनाने वाले श्री. धोंडीराम महादेव मोहिते ने महाराष्ट्र के सांगली जिले में 'सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य' के निर्माण में प्रमुख भूमिका निभाई है। श्री. मोहिते ने 'सागरेश्वर अभयारण्य' के विकास के लिये १९७० से १९८३ के दौरान जन-मानस को जुटाया जिसकी सफल परिणति १९८३ में १०८७ हैक्टेर क्षेत्र में अभयारण्य की स्थापना और उसकी अधिसूचित करने के साथ हुई। श्री. मोहिते के अथक प्रयासों के फल स्वरूप अभयारण्य की परिस्थिति में सुधार हुआ। उनके द्वारा किये गये उत्कृष्ट कार्योंकी राज्य सरकार, विश्व प्रकृति निधि तथा वनीकरण व संरक्षण कार्यों में लगे अन्य संगठनोंने भूरि-भूरि प्रशंसा की है।''

''पर्यावरण प्रदूषण के नियंत्रण, वनीकरण एवं उसके संरक्षण की आवश्यकता के प्रति आम जागरूकता उत्पन्न करने के लिये श्री. मोहिते ने ९९ अध्ययन दौरे, विचार-गाष्ठियाँ, कार्यशालायें तथा व्याख्यान आयोजित किये और लघु स्तरीय संस्थाओं की स्थापना की जिनमें अध्यापकों, चिकित्सकों, इंजीनियरों, पत्रकारों, बच्चों आदी को शामिल किया गया। १९७८ में उन्होंने 'वृक्ष दिंडीफ नाम' कार्यक्रम शुरू किया जिसका उद्देश पौध वितरण करना, वृक्षारोपण कार्यक्रमों व बीज बैंक तैयार करने के लिये मार्गदर्शन करना था। यह कार्यक्रम सांगली जिले में आज भी लोकप्रिय है! श्री. मोहिते द्वारा जागरूकता बढ़ाने की दिशा में किये गये प्रयत्नों से ग्राम समाज तथा शैक्षणिक संस्थाओं के वनीकरण प्रयासों को बढ़ावा मिला है। धोंडीराम महादेव मोहिते... सांगली... महाराष्ट्र!''

त्यांनी आदराने नम्रपणे राष्ट्रपतींना नमस्कार केला. राष्ट्रपतींनी सुहास्य वदनाने धों.म. मोहिते यांना प्रति-नमस्कार केला. आणि त्यांच्या हातात हात दिला. राष्ट्रपतींचा हात एकदम कापसासारखा! टाळ्यांचा कडकडाट चालला होता. कॅमेऱ्यांचे फ्लॅश उडत होते. पुरस्कार स्वीकारताना बोलायचे तरी काय? परत वळल्यानंतर राष्ट्रपती वनमंत्र्यांना राष्ट्रपती होते, ''ये मोहितेजी वाय. बी. चव्हाणसाब के गाववाले हैं!'' राष्ट्रपतींच्या भाषणानंतर राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपला.

◆ **ताडोबा अभयारण्य भेटीचा प्रसंग**

दुसरा प्रसंग आहे, तो म्हणजे ताडोबा अभयारण्य पाहायला गेल्यावर तेथील सुरक्षा रक्षकांनी त्यांच्या पास नसल्यामुळे अडवल्याच. त्यावेळी त्यांच्याशी वाद घातला, परंतु ''तुम्ही मंत्री असा, पण पास दाखविल्याशिवाय मी तुम्हाला आत सोडणार नाही!'' असे गेटमनने निर्वाणीचे सांगून सर्वांचे तोंड बंद केले! १९७० सालातील मार्च महिन्याच्या १९ तारखेची गोष्ट. शासनाच्या प्रसिद्धी विभागाने पश्चिम महाराष्ट्रातील काही मोजक्या पत्रकारांचा दौरा विदर्भपाहणीसाठी आयोजित केला होता. 'किर्लोस्कर' मासिकाचा प्रतिनिधी म्हणून धों. म. मोहिते यांची वर्णी त्या दौऱ्यात लागली होती. खरे तर दौरा दैनिकांच्या प्रतिनिधीसाठी होता. स्पेशल केसने संपादकांनी धों. म. मोहिते यांना त्या दौऱ्यात घुसडले होते. विदर्भातील विकास कामे, प्रेक्षणीय स्थळे, धार्मिक ठिकाणे पादाक्रांत करीत हा दौरा मजल दरमजल कूच करीत होता. नागपूरपासून ११० मैलांवरील चांदा जिल्ह्यातील ताडोबा जंगलाच्या वाटेने हा प्रवास सुरु होता. ताडोबा जंगलाचे राष्ट्रीय उद्यान तसेच चांदा जिल्ह्याचे चंद्रपूर असे नामकरण झालेले नव्हते. वेळ रात्रीची. फाल्गुन महिन्याच्या शुक्ल पक्षातील द्वादशी. टिपूर चांदणे पडलेले. धरतीमाता चांदण्यात न्हाऊन निघत होती. 'पी. टी. आय.' चे कुमार जोशी, 'प्रभात'चे चंद्रकांत दीक्षित, 'महाराष्ट्र टाईम्स'चे सुधाकर अनवलीकर आणि धों. म. मोहिते हे असे चौघेजण आपण हिरो आहोत नि गाडीत दंगा करण्याचे अधिकारपत्र आपणास देण्यात आले आहे, गव्हर्नमेंटचा तसा खास 'जी-आर' आहे, अशा थाटात वावरत होते. चुटके सांगत, गाणी म्हणत, डफडी वाजवत प्रवास सुरु होता. गाडी अडवल्यामुळे गेटमनची काही वादावादी चालू झाली.ताडोबा जंगलात जायला वन खात्याचा पास लागतो. तो नागपुरात मुख्य कार्यालयात मिळतो. इथे येणाऱ्या प्रत्येकाचा पास पाहून आणि नोंदवहीत तशी नोंद करून मगच गेटमन गेट उघडून आत प्रवेश देतो.

''आम्ही पत्रकार! आम्हाला हा गेटमन रोखतो म्हणजे काय? आम्हाला राग येणारच! आम्ही त्याला दमात घेतले, ''हे पहा, या गाडीत सगळे पत्रकार आहेत, तू जर गेट नाही उघडलेस तर तुला ते फार महागात पडेल!'' गेटमनही खमक्या होता. त्याने ठणकावून सांगितले, ''ते तुम्ही मंत्री असा, पण पास दाखविल्याशिवाय तुम्हाला आत सोडणार नाही!''

गेटमन कायद्याचा बांधील. तो त्याचे पालन कर्तव्यबुद्धीने करीत होता. नागपूरचे प्रादेशिक प्रसिद्धी अधिकारी वसंत चौधरी! त्यांच्याकडे सर्वांचे पास होते. त्यांची जीप पुढे निघून गेली होती. आम्ही मुक्कामास जायचे ठिकाण जंगलात आत-खूप दूर होते. इथं आम्ही अडकून पडल्याचा संदेश त्यांना कसा मिळणार पण झालेली चूक पुढे गेलेल्यांच्या लक्षात आली. पास घेऊन ते परत आले. गेट उघडले गेले आणि ताडोबा जंगलात प्रवेशाचा आमचा मार्ग मोकळा झाला.घडली घटना तशी छोटीशीच. डोंगरात जायला परवानगीशिवाय प्रवेश नाही? आमच्या सागरेश्वरच्या डोंगरात कुणीही उठावे, केव्हाही जावे. चरण्यासाठी जनावरे न्यावीत. जळणासाठी झाडे-झुडपे तोडावीत. हातभट्ट्या चालवाव्यात. गुन्हेगार- फराऱ्यांनी दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घ्यावा. ससा, खोकड, कोल्हा, काळवीट यांच्या शिकारी कराव्यात. थोडक्यात, 'माझे नव्हे, माझ्या

बापाचे' म्हणून कुणीही- अगदी येरागबाळ्यांनी सुद्धा जंगलसंपत्तीची लूट करावी! नाश करावा! मनमानी वागावे आणि इथे जंगलात जायला पासाशिवाय मज्जाव?

ताडोबा जंगलाच्या गेटने धों.म. मोहिते यांच्या मेंदूची कवाडे उघडली. विचारचक्रांना गती दिली. त्यांच्यातील कार्यकर्ता जागा झाला. सागरेश्वराच्या डोंगरात हे असे करायचे. 'सागरेश्वराच्या डोंगरावर अभयारण्य करायचेच' या विचाराने पुरता झपाटूनच त्यांनी ताडोबा जंगल सोडले.

**◆ सागरेश्वर अभयारण्याची सहल**

लहानपणी मनावर कोरलेला आणखी एक प्रसंग म्हणजे मराठी चौथी ते सातवीपर्यंतचे मोहिते अण्णाचे शिक्षण देवराष्ट्रे येथे झाले. ब्रिटिश राजवटीचा तो काळ. 'मास्तरां'चे 'गुरुजी' झालेले नव्हते. ही मास्तरमंडळी जीव लावून आणि हातात छडी घेऊन मुलांना शिकवायची. शिवाय नेमून दिलेल्या शिक्षणाखेरीज चाकोरीबाहेर जाऊन त्यांच्या ज्ञानात आणखीही काही भर घालायची प्रयत्न करायची. त्या काळात शाळेत मुलेही फार नसायची. चार-पाच मुलींसह चारही वर्गांचा मिळून एकूण सत्तर पाऊणशेच्या आसपास हजेरीपट असे. देवराष्ट्रेपासून सागरेश्वरचा डोंगर दीड-दोन मैलांवर, दर शनिवारी सकाळची शाळा संपली की भाकरी बांधून घेऊन या डोंगराची वाट सर्व विद्यार्थ्यांना धरावी लागे. सणवार, उन्हाळी, दिवाळी सुट्टी वगळता यात कधी खंड पडला नाही. पावसाळ्यातसुद्धा डोकीवर गोणपाटाची पोती पांघरून 'डोंगर गाठणे' चालूच असे. कृष्णा मारुती मोरे म्हणून देवराष्ट्र्याचेच एक मास्तर सागरेश्वर इथे घेऊन जात. हेडमास्तर अनंत लक्ष्मण महाजनी यांनी तशी अनुमती दिली होती. चालना दिली होती.त्या काळी सागरेश्वरचा डोंगर वनश्रीने कायमचा नटलेला असे. झाडेझुडपे गच्च होती. एकट्यादुकट्याला सागरोबाच्या खिंडीतून जाताना भीती वाटत असे. पाउस धो धो कोसळे. सुपाने पाणी ओती. त्यामुळे डोंगरातील ओहोळ बारमाही वाहात असत. छोटे मोठे धबधबे हमेशा पाहायला मिळत. मोरे मास्तर हरहुन्नरी होते. ते या धबधब्याखाली मुलांना आंघोळ करायला लावत. दऱ्याखोऱ्यांतून लपाछपीचा खेळ चाले. पठारावर लवकर कोण पोहोचतो, अशा शर्यती होत. मोरे मास्तर स्वतःही धावत. पण पहिला नंबर मुलालाच मिळे. डोंगरात कुणी पडला, खरचटला तर मास्तर तिथल्याच एका वनौषधीचा पाला काढून त्याचा रस त्या जखमेवर लावत. जखम दुसऱ्या दिवसापर्यंत बरी झालेली असे. त्या औषधी वनस्पतीला बोलीभाषेत गुडघेमोडीचा किंवा दगडी पाला म्हणतात. प्रत्येक झाडाची, झुडपाची, वेलीची इतकेच काय पण खडक-दगडाची सुद्धा मास्तर आम्हाला माहिती करून देत. करवंदी, कारी, टेंभरे, आमोणी, जांभळे आदी रानमेव्याचा भरपूर आस्वाद सर्व विद्यार्थी घेत असत. त्या काळात पशुपक्ष्यांच्या वास्तव्याने सागरेश्वरचे वनवैभव समृद्ध होते. ससे, कोल्हे, लांडगे, तरस, साळींदर इत्यादी स्थानिक पशुपक्षी भरपूर होते. काळवीटांचे तर कळपच्या कळप होते. असा एखादा कळप दिसला की मोरेमास्तर त्याचा पाठलाग करायला सांगायचे. मुले धावतात न धावतात तो हरणांचा कळप दौडत कुठल्या कुठे पसार होऊन अदृश्य व्हायचा. मास्तर पशुपक्ष्यांची इत्थंभूत ओळख करून देत. एखादी खार पकडून ते तिच्यावरील पुस्तकातील कविता म्हणत.

**लहान सुंदर गोजिरवाणी दिसे कशी ही खार।**
**गुलगलीत हे अंग मजेचे शेपूट गोंडेदार।।**

अशा तऱ्हेने मोहिते यांची शाळा, मोरे मास्तर यांनी मोहिते यांना बालवयातच निसर्ग, पशुपक्षी यांचे बाळकडू पाजले. त्यांच्यावर प्रेम करायला शिकविले. तो जिव्हाळा त्यांच्या नसानसांत भिनला. त्यामुळेच सागरेश्वर अभयारण्य उभारण्याची कल्पना मनात रुजली या प्रसंगाचे चित्रण अनुभवकथनातून आलेले दिसून येते.

**◆ वीज जोडणीचा प्रसंग**

नंतरच्या काळात गावात वीज येण्याचा प्रसंग रेखाटला आहे. १९६३-६४ मध्ये तालुक्याची शहरे आणि दहा वीस कोसांवरील एखादे मोठे खेडे विजेने लुकलुकताना दिसे. ती वीज मोहिते यांना खुणावत होती. विजेशिवाय गावाचा विकास नाही. गावात वीज आणायचीच, हे त्यांनी ठरविले आणि प्रयत्नाला लागले. जवळ जवळ वर्ष-सहा महिने धडपड केल्यानंतर सांगली, मुंबईला हेलपाटे घातल्यानंतर मतदार संघाचे आमदार बी. एल. पवार यांचे मार्फत असेंब्ली क्वेश्चनही करविला. पण आशेचा एवढासुद्धा किरण कोठे दिसेना, मग गावात वीज दिसायची बाब लांबच! अखेर तत्कालीन मंत्री स. गो. बर्वे यांना ग्रामपंचायतीच्या लेटरहेडवर रागे रागे एक पत्र लिहिले. त्यामध्ये मोहित्यांचे वडगावला वीज मिळावी म्हणून काय आणि कसे प्रयत्न केले हे सविस्तर लिहून शेवटी एक वाक्य टाकले, ''आकाशातील वीज आणि कोयणामाईची वीज सारखीच दिसते! हाताला लागायची लक्षणे दिसेनात!.''

आपल्या सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यात बर्वेसाहेबांनी 'हा असा सरपंच कोण?' हे पाहण्यासाठी धों. म. मोहिते यांना सांगलीला बोलावून घेतले. भेटीत त्यांना समजले की, 'किर्लोस्कर' मासिकाचे धों. म. मोहिते हे एक लेखक आहेत. 'कोयना धरण झालेच पाहिजे!' हा लेख 'किर्लोस्कर'मध्ये लिहायचा ठरवून संपादक मुकुंदराव किर्लोस्कर, चित्रकार ग. ना. जाधव, छायाचित्रकार लक्ष्मण गायकवाड आणि मोहिते कोयना धरणाच्या नियोजित जागेवर गेले होते. घनदाट जंगल. किर्र झाडी. दोन हत्यारी गार्ड, दिवसभर त्या परिसरात फिरले. फोटो घेतले. रेखाचित्रे काढली. 'किर्लोस्कर'मध्ये लेख आला. त्यानंतर 'कोयना धरण झाले पाहिज' यासाठी तेथे झालेल्या डेक्कन मॅन्युफॅक्चरिंग असोशिएशनच्या हेळवाक येथे भाऊसाहेब हिऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही कॉन्फरन्स झाली. आचार्य अत्रे, कर्मवीर भाऊराव पाटील, शंकरराव किर्लोस्कर आदी पन्नास एक बडी मंडळी त्या कॉन्फरन्ससाठी जमली होती. हे सारे बर्वेसाहेबांना समजले आणि काही महिन्यांतच कोयनामाईची वीज मोहित्यांचे वडगावला गावात दाखल झाली. या विजेच्या जोडणी प्रसंगाचे वर्णन या अनुभवकथनातून वाचावयास मिळते.

**◆ यशवंतरावजी चव्हाण यांच्याशी भेट झाल्याचा प्रसंग**

यशवंतरावजी चव्हाण यांच्याशी धों. म. मोहिते यांची भेट झाल्याचा प्रसंग या अनुभवकथनातून वाचावयास मिळतो. ६ जून १९७० रोजी यशवंतराव चव्हाणसाहेबांची भेट कराड सर्किट हाऊसवर झाली.

साहेबांचे एक वैशिष्ट्य होते. समोरचा कार्यकर्ता त्यांना 'वाचता' येत असे. धों. म. मोहिते हे दिसताच ते लगेच म्हणाले, 'काय म्हणते तुमचे अभयारण्य?' त्यावेळी सातारा विभागीय वन अधिकाऱ्याचे 'असे होणे नाही' चे पत्र त्यांच्यासमोर धरले. पत्र वाचून ते किंचित हसले. म्हणाले, ''तुमच्या अभयारण्याबद्दल महाराष्ट्राच्या वनमंत्र्यांना एक पत्र लिहा. तुमच्या सहीखाली माजी सरपंच हुद्दा टाका आणि ते पत्र आताच डोंगरेंच्याकडे द्या.''

अभयारण्य भेटीचा एक प्रसंग मोहिते यांनी चितारला आहे. ग्रामीण भागातील लोकांशी यशवंतराव चव्हाण यांच्याशी चांगले सख्य होते. ते या योजनेची हालचाल सुरू होण्यापूर्वी तीन-चार वर्षांआधी सागरेश्वर आणि देवराष्ट्रेस येऊन गेले होते. त्यानंतर ते इकडे आलेले नव्हते. या दोन वर्षांत डोंगरात काय प्रगती झाली आहे याची त्यांना उत्सुकता होती. ४ मार्ज १९७२ रोजी ते सांगली जिल्ह्यातील एका कार्यक्रमासाठी हेलिकॉप्टरमधून आले होते. ते हेलिकॉप्टर त्यांनी सागरेश्वर डोंगराकडे वळविले. शक्य तेवढे खाली घ्यायला लावले आणि डोंगराभोवती दोन फेऱ्या मारल्या. सागरोबाच्या खिंडीतून हेलिकॉप्टर खाली जात होते आणि पिराच्या खिंडीने वर येत होते. हेलिकॉप्टर इतके खालून होते की, तेथे काम करणाऱ्या मजुरांनी चव्हाणसाहेबांना ओळखले आणि हात हालवून आपला आनंद व्यक्त केला. त्यांनीही हात उचावून मजुरांचे अभिवादन स्वीकारले. संध्याकाळी धों. म. मोहिते यांना हे समजल्यावर त्यांनी ही बातमी सांगलीला सर्व पेपरांसाठी पाठवून दिली. त्यानंतर यशवंतराव चव्हाण नंतर ८ जून १९७२ रोजी सागरेश्वर आणि देवराष्ट्रेस आले होते. त्यांच्यासमवेत महाराष्ट्राचे अर्थमंत्री यशवंतराव मोहिते हेही होते. देवराष्ट्रेचा कार्यक्रम संपवून परत जाताना तिथेच सडकेकडेला अभयारण्यात दोघांनी वृक्षारोपण केले. वृक्षारोपण केल्यावर चव्हाणसाहेब धों. म. मोहिते यांना म्हणाले, '''तुझे अभयारण्य 'यशस्वी' होणार. कारण दोन 'यशवंतां'नी प्रवेशद्वारातच दोन्ही बाजूस झाडे लावलीत.'' ती वेळ सूर्यास्ताची होती. पठारावरून वाहत येणारी वाऱ्याची थंडगार झुळूक. लोकांची कसलीच गर्दी नाही. प्रसन्न वातावरण. साहेब अर्धापाऊण तास तिथे थांबले होते. वन अधिकाऱ्यांकडून योजनेची माहिती घेत होते. तिथे हजर असलेल्या सांगलीच्या पत्रकारांबरोबर बातचीत, हास्यविनोद करीत होते. अशा या मोकळ्या वातावरणात चव्हाणसाहेब पूर्ण समरस झाले होते.

**◆ कॉंझर्वेटर माविनकुर्वे यांचा अभयारण्य दौरा**

साताऱ्याचे विभागीय वन अधिकारी एस. पी. नरवणे आणि उप-विभागीय वन अधिकारी टी. वाय. मोरे, धों. म. मोहिते यांचा शोध घेत मोहित्यांचे वडगावला आले. त्यांची जीप सकाळी सकाळीच त्यांच्या दारात येऊन उभी राहिली. ओळखदेख, चहापाणी झाल्यावर वनअधिकारी म्हणाले, ''तुमचे अभयारण्य कुठल्या डोंगरावर करायचे आहे, तिकडे जाऊन समक्षच साईट पाहूया.''

वन अधिकाऱ्यांना घेऊन धों. म. मोहिते हे साईटवर गेले. डोंगरात अर्थातच रस्ते वगैरे कसलेच नव्हते. जीपने कसेबसे माळामाळाने मैलभर आत गेल्यावर तेथेच थांबून समोरच्या डोंगराकडे हात फिरवीत

धों. म. मोहिते म्हटले, ''या परिसरात अभयारण्य करायचे आहे.'' समोरचा उघडा बोडका आणि उजाड डोंगर पाहून साहेबांनी मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला असेल. ते एवढेच म्हणाले, ''कल्पना चांगली आहे. तथापि कॉंझर्वेटरसाहेबांनी ही साईट नजरेखाली घातलेली बरी. व्यक्तिगत तुम्हाला यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. ती तयारी ठेवा.'' अभयारण्य उभारणीच्या सुरुवातीच्या काळातील हा प्रसंग धों. म. मोहिते यांनी अतिशय बारकाईने रेखाटला आहे.

त्यानंतरचा अभयारण्य साईट पाहण्यासाठी माविनकुर्वे साहेब आले होते. त्यावेळच्या प्रसंगाचे वर्णन या अनुभवकथनातून आले आहे. कॉंझर्वेटर माविनकुर्वे हे मुकुंदरावांचे स्नेही असल्याने त्यांनी सांगितल्यावर ते साईटवर येणार हे धों. म. मोहिते गृहीत धरून होते. हो ना करता करता एकदाचा कॉंझर्वेटर यांचा दौरा लागला. कराड रेंजरचे पत्र घेऊन एक खास वन कर्मचारी आदल्या दिवशी धों. म. मोहिते यांच्याकडे तातडीने पाठविण्यात आला. पत्रात लिहिले होते, श्री. डी. एम. मोहिते, पत्रकार, रा. मोहित्यांचे वडगांव, महाशय, मे. कॉंझर्वेटर ऑफ फॉरेस्टस् पुणे सर्कल, पुणे १ हे दि. २६-११-१९७० रोजी सकाळी १० वाजणेच्या सुमारास सागरेश्वर येथील नियोजित अभयारण्याची जागा पाहणेसाठी येणार आहेत. त्यांच्या समवेत श्री. नरवणे विभागीय वन अधिकारी सातारा व श्री. मोरे. उप वि. व. आ. सातारा हे सुद्धा येणार आहेत. तरी आपण दि. २६-११-१९७० रोजी सकाळी १० वाजता सागरेश्वराचे देवळाजवळ उपस्थित राहावे ही विनंती.

काही अडचणीमुळे मुकुंदराव किर्लोस्कर येऊ शकत नव्हते. म्हणून त्यांनी सहसंपादक व. र. देशपांडे देवराष्ट्रेकर यांना एक दिवस आधीच धों. म. मोहिते यांचेकडे पाठवून दिले. २६ तारीख उजाडली. कराड रेंजचे अधिकारी आणि कर्मचारी कडक गणवेषात सकाळी आठ वाजताच सागरेश्वराचे देवळाजवळ हजर झाले. सातची एकुलती एक एस. टी. पकडून धों. म. मोहिते हेही त्यांच्या आधी सकाळी सव्वासात वाजता सागरेश्वर परिसरात दाखल झाले. देवदर्शन घेतले. 'अभयारण्य होऊ दे' म्हणून सागरेश्वराला साकडं घातलं. जीप आलेली कळावी यासाठी एका गार्डला टेकडीवर बसायला सांगितलं. दूरवर जीप येताना दिसली, की त्याने शिट्टी वाजवायची. दहाच्या सुमारास शिट्टी वाजली.आठदहा फॉरेस्टर, गार्ड रस्त्याकडेला एका ओळीत खडे झाले. आल्या आल्या साहेबांना मानवंदना द्यायची होती. धों. म. मोहिते हे आपल्या पाच-सहा कार्यकर्त्यांसह बाजूला लांबच उभा होते. जीप आली. सगळे खाडदिशी अटेन्शनमध्ये आले आणि त्यांनी साहेबांना कडक सॅल्यूट ठोकला ! जीपमधून उतरलेल्या साहेबांचे त्या सलामीकडे लक्ष नव्हते. त्यांची नजर धों. म. मोहिते यांना शोधते आहे, हे धों. म. मोहिते यांच्या लक्षात आले. धों. म. मोहिते हे चटकन् पुढे झाले. त्यांच्या हातात श्रीफळ देत म्हणाले, ''सुस्वागत! मी धों. म. मोहिते.'' साहेबांनी आपल्या हातातील नारळ दुसऱ्याकडे दिला नि धों.म. मोहिते यांचे दोन्ही हात आपल्या दोन्ही हातांत घेऊन स्नेहार्द्र दाबले! व. र. देशपांडे आणि इतर कार्यकर्त्यांचा त्यांना परिचय करून दिला.

सागरेश्वर देवालयाचा परिसर नव्या माणसाला एकदम मोहून टाकतो. दरीतील ती नीरव शांतता,

निसर्गाचे वरदान लाभलेले वातावरण, देवालयांचे ते शिल्प आणि त्यांची ती मांडणी. येणारा नवखा पाहुणा एकदम खूष होऊन जातो. माविनकुर्वेसाहेब याला अपवाद कसे असतील? त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. गाईडसारखे बडबडत धों. म. मोहिते हे त्यांना तिथली माहिती देत होते. देवदर्शन घेऊन सर्वजण जीपने कार्यभूमीत आले. मनात धाकधूक चालू होती. महाबळेश्वरातून उठून एकदम माणदेशाच्या वैराण मुलुखात यावे तसे हे होते. उघडा बोडका डोंगर. शिवाय माळावर वाळलेली कुसळेच कुसळे! उन्हाची तिरीप. वारे पडलेले. सारेच प्रतिकूल. काही अंतर गेल्यावर साहेब जीपमधून उतरून चालू लागले. चालता चालता ते आपल्या हातातील काठीचे अणुकुचीदार टोक जमिनीत घुसवीत नि माती उचकटवीत. पोराठोरासारखे हे असे का करतात, हे कुणालाही कळेना.

मुख्य सडकेपासून आत मैलभरावर दरीत लिंगेश्वर नावाचे आणखी एक देऊळ आहे. तेथे सर्वजण गेले. त्या ठिकाणी चिपाडांच्या जाळावर भाजलेल्या ओल्या शेंगांचा बेत आखण्यात आला होता. नाहीतरी डोंगरात पाहुणचार म्हणून साहेबांना खायला दुसरे काय देणार? रानात भाजलेल्या ओल्या शेंगा एकदम मस्त लागतात. साहेबांना हा 'मेनू' एकदम आवडला. एका झाडाखाली घोंगडी टाकून बैठक केली होती. शेंगाचे दाणे तोंडात टाकीत अभयारण्य उभारणीची चर्चा सुरू झाली. एवढ्यात सांगली जिल्हा परिषदेचे प्रशासन अधिकारी द. शं. मुडशिंगीकर तेथे आले. या भागात दौऱ्यावर असताना त्यांना येथे अभयारण्य होणार असल्याचे आणि त्यासाठी कुणी फार मोठे वनअधिकारी आज येणार आहेत, हे समजल्यावर मोठ्या उत्साहाने त्यांनी वाकडी वाट केली होती. तेही या चर्चेत सामील झाले. माविनकुर्वे यांना अभयारण्याची साईट आवडल्याचे दिसत होते. ते म्हणाले, ''येथील जमीन चांगली आहे. येता येता काठीने माती उचकटून पहिली. प्लँटेशन चांगले येईल. झाडे लावू. हरणं सोडू. पॅगोडा, गेस्टहौस बांधू. आणखीही खूप करता येण्याजोगे आहे. आणि हे सारे करता येईलही... फक्त चीफ् कॉझर्वेटरसाहेबांनी हा परिसर एकदा पाहून घेतला की आम्ही लगेच प्लॅन तयार करून देतो.'' असे म्हणून ते परत फिरले.

**◆ चीफ् कॉंझर्वेटरसाहेब बूट यांच्या भेटीचा प्रसंग**

यानंतरचा प्रसंग चीफ् कॉंझर्वेटरसाहेब यांच्या भेटीचा असून धों.म. मोहिते यांना त्यावेळी हजर राहता आले नव्हते. प्रचारसभेत अडकल्यामुळे अभयारण्य उभारणीचे काय होईल याची चिंता त्यांना लागून राहिली होती. चीफ कॉंझर्वेटर म्हणजे महाराष्ट्राच्या वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक. त्यांचे मुख्यालय पुण्यातच. एस. एस. बूट म्हणून एक कर्तबगार अधिकारी या हुद्यावर होते. त्यांच्या नावावरून सुरुवातीला धों. म. मोहिते यांना ते ख्रिश्चन वाटले. पण नंतर कळले की, ते हिंदू-ब्राह्मण आहेत. माविनकुर्वेना धों.म. मोहिते म्हणाले, ''इकडे यायला तुम्ही तीन महिने लावलेत. आता हे साहेब यायला किती महिने लावतात कुणास ठाऊक?''

''तुम्ही त्याची चिंता करू नका.'' माविनकुर्वेनी ठोसपणे सांगितले, ''बूटसाहेब लवकरात लवकर या साईटला भेट कसे देतील, हे पाहतो. तुम्ही निवांत असा.'' आणि लवकरच बूटसाहेबांचा अभयारण्य भेटीचा दौरा जाहीर झाला. लोकसभेची निवडणूक जाहीर झाली होती आणि तिच्या प्रचाराने वेग घेतला

होता. प्रचारसभेत आक्रमक भाषण ठोकणारा धों. म. मोहिते हे एक कार्यकर्ते. त्यामुळे धों. म. मोहिते यांना सोडायला खानापूर तालुक्याचे आमदार संपतराव माने तयार होईनात. बूटसाहेबांच्या सागरेश्वर भेटीच्या वेळी धों. म. मोहिते हे हजर राहू शकत नव्हते. आमदार संपतरावनानांनी एकदा निर्णय घेतला की त्यावर अपील नसे. मूग गिळून धों. म. मोहिते हे प्रचार दौऱ्यात फिरत होते. यावर एकच मार्ग होता तो म्हणजे बूटसाहेबांचा दौराच पुढे ढकलणे. बूटसाहेबांना धों. म. मोहिते यांनी फोन लावला आणि आपली अडचण सांगून 'निवडणूक संपल्यावर साईटवर या' अशी विनंती केली. त्यांनी ती तात्काळ मान्य केली. 'निवडणूक संपताच ते लगेच येत आहे.' असे आश्वासनही दिले. पण पुन्हा समजले की, पूर्वी ठरल्या तारखेला बूटसाहेब परस्पर साईटवर येऊन गेले!... आता!... त्यांना जर ही साईट आवडली नसेल तर 'असे होणे नाही' चा खुंटा बळकट होणार आणि आजपर्यंतच्या प्रयत्नांवर पाणी पडणार ! भीत भीत धों. म. मोहिते यांनी त्यांना पुण्याला फोन लावला. धों. म. मोहिते हे काही बोलायच्या आत ते सांगू लागले, ''त्याचं काय झालं मोहिते साहेब, तुम्ही सांगितल्यावरून आपण तिकडे येणार नव्हतो. पण माविनकुर्वे म्हणाले, 'ते मोहिते फार बोलतात नि समोरच्या माणसाचं मत आपल्यासारखं करून घेतात. तेव्हा आपण त्यांच्या अपरोक्ष साईट पाहिलेली बरी' म्हणून तुम्ही नसताना येऊन गेलो. तेच योग्य झाले...'' त्यांनी पुढे सांगितले, ''तुमची साईट फार सुंदर आहे. इतके दिवस तुमच्या लक्षात हे का आले नाही? तुमचे अभयारण्य होऊन जाईल. तुमच्या कामाला यापूर्वीच माविनकुर्वे यांचेकडून गती देण्यात आली आहे.'' असे सांगितल्यावर धों. म. मोहिते यांना खूप आनंद झाला.

### ◆ वृक्षलागवडीचा एक प्रसंग

वृक्षलगावडीच्या एका प्रसंगाचा उल्लेख या पुस्तकात आला आहे. मान्सून वारे वाहू लागले. झडीचा पाऊस सुरू झाला. हंगामात वनीकरण झाले पाहिजे. वन कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू झाली. त्यावेळेला पॉलिथीन पिशवीत तयार केलेली रोपे लावण्याचे काम केले जात नव्हते. लागवडीसाठी नेकेड रोपेच वापरीत. काळजी फक्त एवढीच घ्यायची की, नर्सरीतून रोपे उपटल्यापासून चोवीस तासांच्या आत त्यांची लागवड झाली पाहिजे. तशी दक्षता घेऊनच नेकेड रोपांचा ट्रक रात्री दहा वाजण्याच्या सुमारास सागरेश्वरला आला. धों. म. मोहिते यांना नेण्यासाठी स्कॉड रेंजर साहेबांची जीप गावाकडे आली. मध्यान्हरात्री ठीक बारा वाजता धों. म. मोहिते यांच्या हस्ते कांचन रोपाचे पहिले रोपण करून रोपे लागवडीस सुरुवात करण्यात आली! श्रीफळ वाढवून विधिपूर्वक हे वृक्षारोपण करण्यात आले. रेंजर व्ही. जे. वैद्य म्हणाले, ''अण्णा, तुम्ही आज या अभयारण्यास जन्म दिलात! श्रीकृष्णाचा जन्म असाच मध्यान्हीला झाला होता!''

गॅसबत्त्यांच्या उजेडात मजुरांकरवी रात्रभर रोपांची लागवड करण्याचे काम चालले होते. न थकता. न दमता. उत्साही वातारवणात रोपे लावण्याचे काम सूर्योदयाबरोबर उरकून टाकले. ट्रकमधील सर्व रोपे संपविली. रात्रभर पावसाची रिपरीप चालूच होती. सूचनेबरहुकूम रोपांची लागवड होते किंवा नाही हे पाहाण्यासाठी धों. म. मोहिते हे दोन रेंजर्स, फॉरेस्टर, गार्ड देखरेख करीत होते. ट्रेंचेसच्या मध्यावर आणि दोन्ही बाजूला प्रत्येकी दोन दोन याप्रमाणे रोपे लावण्यात आली. मधल्या मोकळ्या जागेत लिंब, चिंच

यांच्या बिया टोकण्यात आल्या. रेन ट्री, शिसव, शिरस, अंजन, कांचन, काशीद, गुलमोहोर, सुरु, जाकरांडा, सिल्वर ओक, आकेशिया इत्यादी प्रकारची हो रोपे होती. रोपांनी मूळ धरून वाढायला सुरुवात केली. यांची जगवण क्षमता ८५ ते ९० टक्के राहिली. टाकलेल्या बियाही तरारून उगवल्या. ट्रॅचेस हिरव्यागार रोपट्यांनी बहरून गेले. चराई बंद झाल्याने गवतानेही जोर धरला. झाडतोड आणि वर्दळ थांबल्याने तुटलेल्या बुंध्यांना तगारे फुटले. वर्षभरात डोंगराचा बराचसा भाग जरा हिरवा दिसू लागला.

**◆ साहित्यिक भेटीचा प्रसंग**

साहित्यिक भेटीचा प्रसंगही आपणास या पुस्तकातून वाचावयास मिळतो. प्रा. ग. प्र. प्रधान अभयारण्यात भेटीसाठी आले. त्यांच्यासमवेत शिवाजी विद्यापीठाचे डॉ. मोहन तावडे आणि इतर एक दोन अधिकारी होते. अभयारण्य पाहत पाहत सर्वजण किर्लोस्कर पॉईंटवर पोहोचले. दिवस वळीव पावसाचे होते. कृष्णा नदीचे दृश्य पाहात पाहुणे उभे होते. पाठीमागे वळीव पाऊस केव्हा उठला हे समजले नाही. वळीव पावसाचे एक असते, आला, आला म्हणेतोपर्यंत झटक्यात येतो नि धो धो कोसळू लागतो. जिकडे तिकडे पाणीच पाणी होते. सरीवर सरी कोसळताना जंगल पहाणे हा आनंद काही वेगळाच. पाऊस उघडल्यावर सर्वजण परत फिरले. किर्लोस्कर पॉईंट ते रणशूळ एक किमी रस्ता कच्चा, काळ्या मातीतून जाणारा. त्या रस्त्यावर बघता बघता पावसाने चिखल करून टाकला होता. त्यात जीप रूतून बसली! ड्रायव्हरने प्रयत्न करून पाहिले. जीप जागची हालायला तयार नाही. अखेर सगळे खाली उतरले आणि प्रधानसरांसह सर्वजण जीप ढकलू लागले. चिखलाने पाय भरलेले. राजकपूरसारख्या सर्वांनी पँटी दुमडलेल्या. ताकद लावून ढकलीत ढकलीत ती जीप एकदाची पक्क्या सडकेवर आणली. धों. म. मोहिते म्हणतात, ''जीप ढकलताना या मान्यवरांचे ते दुर्मिळ दृश्य टिपायला नेमका यावेळी माझ्याकडे कॅमेरा नव्हता!''

साहित्यिकांच्या भेटीचा आणखी एक प्रसंग या अनुभवकथनातून पहावयास मिळतो. कऱ्हाडचे एक लेखक मित्र श्रीनिवास कुलकर्णी यांचे धों. म. मोहिते यांना पत्र आले, ''कविद्वय वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर किलोस्करवाडीला ता. २५/३/७९ रोजी जात आहेत. ते त्या दिवशी जाता जाता तुमच्याकडे अभयारण्यात जेवणासाठी दुपारी येणार आहेत.'' त्यामुळे  जेवण तयार ठेवून धों. म. मोहिते हे आणि फॉरेस्टर खरात डाकबंगल्यावर त्यांची वाट पाहात थांबले होते. मृगविहारासाठी विहीर खोदण्याचे काम चालले होते. गेला आठवडाभर ओली माती खणीत लागायला सुरुवात झाली होती. मातीचे मुटके वळायला लागले होते. विहिरीला लवकर पाणी लागण्याची ही लक्षणे! खरात म्हणाले, ''आज आपणाकडे मोठे पाहुणे येताहेत. त्यांच्या पायगुणाने आजच विहिरीला पाणी लागले तर काय बहार येईल! आपण त्यांच्याच हस्ते विहिरीच्या नवीन पाण्याचे पूजन करू.''

कविद्वय आले. हास्यविनोदात जेवण सुरू झाले. एवढ्यात विहिरीत काम करणारा एक कामगार धावत पळत आला आणि म्हणाला, ''अण्णा, विहिरीला पाणी लागले!''

बोलाफुलाला गाठ पडली! पाहुणे आले नि पाणी लागले! किर्लोस्करवाडीचा कार्यक्रम करून पाहुणे दुसरे दिवशी अभयारण्यात आले. पाणीपूजन विधीसाठी आम्ही भटजी सांगितला होता. त्या भटजीला पाहुण्यांनी बाजूला बसायला सांगितले. कवी मंगेश पाडगावकर पाणी पूजनासाठी जमिनीवर टाकलेल्या पोत्यावर बसले आणि शेजारच्या मोठ्या दगडावर बसून कवी वसंत बापट यांनी पाणीपूजन विधीचे साग्रसंगीत पौरोहित्य केले! अशा प्रकारचा एक खूप चांगला प्रसंग मोहिते यांनी चित्रित केला आहे.

### ३.२.९ धों. म. मोहिते यांच्या संघर्षाची जीवन कहाणी

**◆ स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग**

स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेण्याच्या प्रसंगाचे वर्णन 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून आले आहे. इंग्रजी चौथीसाठी मोहिते कुंडलच्या हायस्कूलमध्ये दाखल झाले. आणि थोड्याच दिवसांत १९४२ चा स्वातंत्र्य लढा सुरू झाला. सागरेश्वर अभयारण्यात सध्या जेथे मृगविहार आहे त्या ठिकाणी त्या काळी क्रांतिसिंह नाना पाटलांची आमच्या भागातील पहिली सभा झाली. रात्री नऊ-दहा वाजता अंधारात ! या सभेसाठी देवराष्ट्र, मोहित्यांचे वडगाव आणि आसद येथील तीस-पस्तीसजण आले होते. धों. म. मोहिते हे होतेच. सभा संपल्यानंतर उपस्थित क्रांतिकारक सर्वजण पीराची खिंड उतरून पाऊलवाटेने घाटाखाली उतरले. पुणे-मिरज रेल्वेचे दुधारी गावानजिक रूळ उखडले आणि रातोरात आपापल्या घरी जाऊन चिडीचाप झोपी गेले.अशा रीतीने मोहिते अण्णा चळवळीत दाखल झाले. शिक्षणाला रामराम ठोकला. मिसरुडसुद्धा फुटली नव्हती त्या वयात आपल्या हातून खारीचा का होईना वाटा उचलावा म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या अग्निकुंडात उडी घेतली! पुन्हा सागरेश्वरचा डोंगर! अशासाठी की सातारा क्रांती ही भूमिगत चळवळ होती. प्रतिसरकार (किंवा पत्रीसरकार) साठी तुफानसेना स्थापण्यात आली. पुढे पन्नास तुफान सैनिकांच्या एका तुकडीचे कॅप्टन झाले. या चळवळीचे मुख्य केंद्र कुंडल. खानापूर तालुक्यासाठी मोहित्यांचे वडगांव-आणि पारे ही दोन उपकेंद्रे. वेळप्रसंगी भूमिगतांना आसरा घेण्यासाठी, तुफान सैनिकांच्या कवायती, स्पर्धा, बौद्धिके यासाठी या भागांतील डोंगर सर्व दृष्टीने सुरक्षित होते. क्रांतिकार्यात सहभाग घेणाऱ्या या परिसराचा उल्लेख वाचकांना वाचावयास मिळतो.

**◆ चराईबंदी प्रसंग**

एखादे चांगले काम होत असेल तर अनेकजण त्याला विरोध करीत असतात. असाच एक प्रसंग धों. म. मोहिते यांनी लिहून ठेवला आहे. डोंगरात चरण्यासाठी भरपूर जनावरे येत. त्यामध्ये मोहिते वडगाव गावच्या जनावरांचा भरणा अधिक असे. धों. म. मोहिते हे एकेका गुराख्याला गाठून सांगत असत, ''पुन्हा जनावरे आणू नको. येथे अभयारण्य करायचे आहे.'' नाही-होय करता करता हळूहळू जनावरे यायची बंद झाली. चराईबंदीची बाजू जवळ जवळ संपल्यात जमा झाली. याबाबत गावात धों.म. मोहिते यांना कुंणी काही बोलत नसे. गावची जनावरे बंद झाली म्हटल्यावर शेजारीपाजारीचीही जनावरे येईनाशी झाली. काही दिवसांनी खुद्द मोहिते वडगावमध्ये एक आगळा प्रसंग घडला. एका भगताच्या अंगात देवी संचारली. तो

घुमू लागला आणि किंचाळून म्हणू लागला, ''अभयारण्य करून जो मुक्या जनावरांना चरायची बंदी करतोय... त्यांच्या तोंडावर मारतोय... त्याच्यावर देवीचा कोप झालाय... देवी त्याला बघून घेईल... त्याचं वाट्टोळं होईऽऽल!'' आमचं अभयारण्य देवीच्या सुद्धा कानापर्यंत पोचल्याचे समजल्यावर धों. म. मोहिते हे एकदम खूश!

**◆ लाकूडतोड आणि दारूभट्ट्याविरोधी संघर्ष**

जळणासाठी तोड करणारे, तेही यायचे बंद झाले. पण या दारूभट्ट्यांचे काय करायचे? यांच्या तोडीमुळे झाडोरा तर संपला होताच आणि यांनी आता तुटलेल्या झाडाझुडपांचे बुंधे आणि मुळ्या उकरून त्या वापरायला सुरुवात केली होती. या 'कुटिरोद्योगा'च्या परिसरात धों. म. मोहिते हे तीन-चार चकरा मारल्या. दारूचे नि त्यांचे विळाभोपळ्यासारखे 'सख्य' असताना धों. म. मोहिते हे 'इकडे' कसा; हा प्रश्नही या मंडळींना प्रथम पडला. त्यांच्याकडे धों.म. मोहिते यांनी दोन वेळा जेवणही केले. जेवण वगैरे झाल्यावर तृप्तपणे ढेकर देऊन त्यांना धों. म. मोहिते यांनी सांगून टाकले, ''येथे अभयारण्य करायचे आहे.'' सगळेजण धों. म. मोहिते यांना परिचित व मानणारे, त्यांच्याबद्दल आदर बाळगणारे. त्यामुळे फक्त चेहरे कसनुसे करण्यापलीकडे ते आणखी काय करणार? हे सगळे ठीक असले तरी ही मंडळी जागा सोडायची चिन्हे दिसेनात. अखेर यशवंतराव चव्हाणांना त्यांनी पुण्यात गाठले. केंद्रात ते गृहमंत्री होते. धों.म. मोहिते यांनी चव्हाण साहेबांना अभयारण्य प्रगतीचा अहवाल सांगितला. अगदीच न सुटणारी अडचण ते त्यांच्याकडून सोडवून घेत असत. दारूभट्ट्यांचेही तसेच झाले. चव्हाणसाहेबांना बोलल्याशिवाय गत्यंतर नव्हते.हातभट्ट्यांची अडचण त्यांच्यापुढे मांडताच मिस्किलपणे साहेब म्हणाले, ''त्या आपल्याच असतील?'' होय 'आपल्या'च आहेत.'' धों. म. मोहिते यांनी सांगून टाकले.

पोलिस फक्त एकदा छापा टाकतील. नंतर मागचे तेच पुढे होणार आहे. यासाठी तुम्हीच आता काय ते डोके चालवा. आणि यातूनही काही मार्ग निघाला नाही तर धों. म. मोहिते यांना पुन्हा भेटण्यास सांगितले. पुण्याहून ते दुसऱ्या दिवशी सांगलीमध्ये डी. एस. पी. च्या कार्यालयात गेले. डी. एस. पी. ए. व्ही. कृष्णन धों. म. मोहिते यांना प्रथमच भेटत होते. कृष्णनसाहेबांना धों.म. मोहिते यांनी आपली ओळख करून दिली आणि सागरेश्वर अभयारण्याची कल्पना त्यांना सांगितली. उत्साहित होऊन ते म्हणाले, ''वा, सुंदर! धों. म. मोहिते हे सागरेश्वर देवस्थान पाहिलंय, रमणीय ठिकाण आहे.'' त्यावेळी धों. म. मोहिते यांनी हे अभयारण्य करण्यामागे थोडी अडचण आहे. त्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे. ते मिळेल अशी अपेक्षा करू काय?'' असे विचारले. तेव्हा ''मनमोकळेपणे बोला. काय हवं ते सहकार्य आपणास देईन.'' असे सांगितले. ''त्या परिसरात पन्नास-साठ दारूच्या हातभट्ट्या आहेत. त्या तिथून हालवायच्या आहेत. हलवताना त्यांच्यावर खटले भरायचे नाहीत अगर त्यांच्या मालाची नासधूस करायची नाही. कालच पुण्यात चव्हाणसाहेबांना भेटलो. त्यांनी आपणास भेटायला सांगितले म्हणून आलोय.'' धों.म. मोहिते यांनी सांगून टाकले.

कृष्णनसाहेब एकदम 'टाईट' झाले! बेल मारून त्यांनी स्टाकफोर्सच्या फौजदाराला बोलावले.

स्टाकफोर्स म्हणजे दारू निर्मूलन पथक. फौजदार आत येताच डी. एस. पी. एकदम भडकले, ''काय हो, कार्यकर्ता थेट येऊन मला सांगतोय... सागरेश्वर परिसरात पन्नास-साठ हातभट्ट्या चालू आहेत म्हणून ! आणि तुम्ही मला कुंभारगावच्या माळाला नेऊन दोन-तीन भटट्या दाखवता काय?'' ''न् न् नाही साहेब.'' फौजदार चाचरत म्हणाले, ''नाही साहेब, तिथं फक्त पाच-सहाच भटट्या आहेत.'' त्यावेळी धों.म. मोहिते म्हणाले, ''पाच-सहा सांगून त्यावरील टिंब पुसू नका. पन्नास साठ आहेत. चला आता साहेबांना घेऊन.'' फौजदार काही बोलायचा प्रयत्न करू लागले. पण त्या आधी साहेबच तडकले, ''शट्अप् ! उद्याच्या उद्या तिथून साऱ्या भट्ट्या हालल्या पाहिजेत. कुणावरही खटला घालायचा नाही, अगर त्यांच्या मालाची नासधूस करायची नाही... आणि तिथून सर्व भट्ट्या निघून गेल्याबद्दल मोहित्यांचे पत्र उद्या संध्याकाळी धों. म. मोहिते यांना मिळाले पाहिजे... गेट औट!''

साहेबांचा चहा घेऊन ते बाहेर पडले तर हे फौजदारमहाशय दाराबाहेर उभे! धों.म. मोहिते यांना बाजूला घेऊन ते म्हणाले, ''तुम्ही थेट साहेबांकडे कशाला गेलात? हेच तुमचं मी काम केलं नसतं का? 'तिथून सर्व हातभट्ट्या निघून गेल्या आहेत' अशा दोन ओळी लिहून द्या. उद्या आम्ही सर्व भट्ट्या हालवीत आहोतच.'' भट्ट्या निघण्यापूर्वीच त्या निघाल्या म्हणून लिहून कसे द्यायचे असा प्रश्न उभा राहिला. दुसऱ्या दिवशी तिथून सर्व दारू भट्ट्या निघून गेल्या. कुणाशी वाद न घालता आणि दुसऱ्याचे जास्त नुकसान न करता समंजसपणे एखादे काम कसे करावे हे या प्रसंगातून दिसून येते.

**◆ बापू बिरू वाटेगावकर यांच्या भेटीचा प्रसंग**

बापू बिरू वाटेगावकर यांच्या भेटीचा प्रसंग या अनुभवकथनातून आलेला आहे. नित्याप्रमाणे धों.म. मोहिते हे डोंगरातून घराकडे परतत होते. दिवस मावळायच्या तयारीत आसदच्या डोंगरावर टेकायच्या बेतात होता. लिंगेश्वराचे दर्शन घेऊन आणि तिथल्या बुवाचा बिनदुधाचा चहा पिऊन धों. म. मोहिते हे दरी चढून वर आले. समोरून एक इसम येताना दिसला. तो झपाझपा चालत होता. त्याच्या एका खांद्यावर घोंगडी आणि दुसऱ्या खांद्यावर बंदूक दिसली. म्हणजे हा नक्कीच फरारी! पण कसचे काय? तो सरळ धों. म. मोहिते यांच्यासमोरच येऊन थांबला. धों. म. मोहिते यांना ही थांबणे भाग पडले.

''वडगावकर..'' तो धों. म. मोहिते यांच्यावर डोळे रोखीत म्हणाला, ''तुम्ही म्हणे इथं अभयारण्य करायचं म्हणताय?''

''तसा डोक्यात विचार आहे.'' नाही म्हटलं तरी धों. म. मोहिते हे आतल्या आत सटपटले होतेच.

''डोक्यातून तो विचार काढून टाका. गरिबांची मेंढरं चरायची कुठं?'' आणि तो तरातरा निघून गेला.पाठीमागे वळून त्याच्याकडे पाहायचे धों. म. मोहिते यांना धाडस झाले नाही. धों. म. मोहिते यांना भेटलेला फरारी हा खुनीच होता. कोण हा? याने कुणाचा खून केलाय ? आपल्या भागात अलीकडे वर्ष-सहा महिन्यांत कुणाचा खून झालेला नाही. मग हा कुठल्या भागातील? धों. म. मोहिते यांना तर हा ओळखतो. 'वडगावकर' म्हणून चक्क त्यांच्याशी बोलला. कोण हा? भीतीपोटी चार दिवस उलटले धों.

म. मोहिते डोंगराकडे फिरकले नाहीत. हा खुनी फरारी कोण? आणि अभयारण्य करू नका म्हणून का सांगतो? धनगरांची मेंढरे चरण्याचे कारण म्हणावे तर धनगरांनी येथे अभयारण्य करू नका अशी तक्रार अर्जाद्वारे वन खात्याकडे केली होती. ती तक्रार धों. म. मोहिते हे सामोपचाराने मागेच मिटविली होती. तेव्हा हा फरारी कोण आणि याचा उद्देश काय हे समजल्याखेरीज डोंगरात जाणे धोक्याचे होते. बरे, अभयारण्य करायचे सोडून देऊन आता माघार घेणेही शक्य नव्हते. धों. म. मोहिते विश्वासातील एका फौजदार मित्राला भेटले. फराऱ्याचे पूर्ण वर्णन ऐकताच फौजदार एकदम म्हणाला, ''तो बापू बिरू वाटेगावकरच!'' बापू बिरूच्या खात्यावर चार-पाच खून जमा असल्याचे कानावर होते! पण फौजदाराने धीर दिला. बापू बिरू तसे काही करणार नाही. त्याच्या स्वभावाची माहिती आम्हाला पूर्ण आहे. तुम्ही त्याचे वैरी नाही. मुद्दामहून गाठून त्याने तुम्हास हे सांगितले नाही. जाता जाता तुम्ही सहज रस्त्यात भेटलात तेव्हा कुणीतरी, केव्हातरी त्याला मेंढरे चरण्याबद्दल बोलला असेल, ते त्याच्या लक्षात आले आणि तो तुम्हास बोलला. तोही धनगरच आहे. यामागे खास असे काही नाही. तुम्ही निर्धास्त असा. फौजदार मित्राचे बोलणे पटले. बापू बिरूला डोक्यातून काढून टाकले. डोक्यात पुन्हा अभयारण्य घातले नि कामाला लागले. यानंतर पुन्हा बऱ्याच दिवसांनी धों.म. मोहिते यांना चारपाच बंदूकवाले दिसले! त्यात बापू बिरू वाटेगावकर ! ''वडगांवकर, अभयारण्य करू नका मी तुम्हाला म्हणत होतो खरं...'' डोंगराकडे हात फिरवीत बापू बिरू म्हणाला, ''...पण तुम्ही हे सारं भारीच केलंय!'' बापू बिरूने धों. म. मोहिते यांना चक्क शाब्बासकी दिली होती! ही टोळी खडपा चढून दिसेनाशी होईपर्यंत त्यांच्याकडे पाहात आज धों. म. मोहिते हे निश्चितपणे उभा होते.असे काही भीतीदायक प्रसंग धों. म. मोहिते यांच्या आयुष्यात आले त्याचे ही सुंदर वर्णन त्यांनी आपल्या अनुभवकथनातून केले आहेत.

**◆ जिवावर बेतणारा प्रसंग**

आणखी एका अशाच प्रसंगाचे वर्णन 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या पुस्तकात आले आहे. डोंगरात फिरताना कैकदा जिवावरचे प्रसंगही ओढवले होते. याचे खुमासदार वर्णन मोहिते यांनी केले आहे. डोंगरात पाहाण्याजोगे आणखी विशेष काय काय आहे, याची माहिती घेत असताना डोंगरात अत्यंत अडचणीच्या ठिकाणी एक गुप्त गुहा आहे, असे अनेकजण सांगत होते. तेव्हा तिचा शोध घेण्यासाठी एक माहितगार सीताराम बाळा मोहिते आणि एक कामगार कार्यकर्ते महिपतराव मोहिते यांना बरोबर घेऊन धों. म. मोहिते हे डोंगरात गेले. गुहेचा शोध घेता घेता एका अवघड ठिकाणी तीस-चाळीस फूट उंचीच्या कड्यात मधेच अडकले. तो कडा चढून वाटाड्या केव्हाच वर पोहोचला होता. उंच कड्यावरून घसरले असते तर खाली पाच सहाशे फूट घरंगळत जाऊन कपाळमोक्ष झाला असता! पण वाटाड्याच्या फेट्याचा दोरासारखा उपयोग करून वर आले नि या संकटातून सुटले. या प्रसंगाचे वर्णन आले आहे.

**◆ अभयारण्य उभारणीस विरोध**

विरोध आणि संघर्ष तर पाचवीलाच पूजलेला.यातील काही संघर्षाच्या प्रसंगाचे वर्णन या पुस्तकातून आले आहे. अभयारण्य उभा करताना सर्वांनीच मदत केली असे नाही तर काही ग्राम पंचायतींनी

विरोध केला. सहापैकी पाच ग्रामपंचायतींच्या सरपंचांनी ठराव दिले. पण एका ग्रामपंचायतीचे सरपंच आडवे आले. तुपारी ता. तासगांव ही ती ग्रामपंचायत. दोन दिवस तुपारीला जाऊनही सरपंचांनी ठरावही दिला नाही नि दुसरे दिवशी गावकऱ्यांना भेटूही दिले नाही. त्यांनी धों. म. मोहिते यांचे सरपंच हे पाहुणे. तरीही चहा पिऊन झाल्यावर ते म्हणाले, ''तुम्ही माझ्या किंवा माझ्या गावाच्या नादाला लागू नका. मी तुमचे अभयारण्य होऊ देणार नाही !''

''पण का?''

''ते तुम्ही विचारू नका. अभयारण्य होऊ देणार नाही म्हणजे नाही.''

आता बोलणेच खुंटले. केवळ सरपंचच नव्हे तर साऱ्या तुपारी गावात मोहिते यांचे पै-पाहुण्यांचे संबंध. 'सारा गाव मामाचा, एक नाही कामाचा!' असे चित्र दिसू लागले. वाळवा तालुका पंचायत समितीचे सभापती डी. आर. पाटील यांनी दुसरे दिवशी भेटून सरपंचांना दोन शब्द सांगितले पण सरपंचाचा नकार कायम! रंगराव महादेव मोहिते, भिकाजी महादेव पाटील, दत्तू गणू मोहिते हे आमच्या गावचे कार्यकर्ते तुपारीकरांना भेटले. पण त्यांचा हेका सुटेना! हा अट्टहास कशासाठी हे धों. म. मोहिते यांना समजेना. त्यांचे माझे वैर नाही, भांडणबिंडण, देणेघेणे काही एक नाही. तुपारीचे वनक्षेत्र अभयारण्याच्या वनक्षेत्रातून वगळताही येईना. ते मधेच घुसलेले. ते वगळले की अभायरण्याचे दोन अलग भाग होत होते. धों. म. मोहिते यांना पाच चौरस किलो हेक्टरचा परिसर सलगच हवा होता.

तुपारीच्या तलाठ्याकडून त्या वनक्षेत्राचा ७/१२ चा उतारा तेवढा मिळाला. त्यामुळे त्याचा गट नंबर आणि क्षेत्र किती हे समजले. पण या गट नंबरचा नकाशा तलाठ्याकडे नव्हता आणि तो वनखात्याकडेही नव्हता. वनखात्याकडे असण्याचे कारण नव्हते. तुपारी हे गाव पूर्वीच्या सांगली संस्थानचे. त्यामुळे तो वनखात्याकडे उपलब्ध नव्हता. त्यांच्याकडे फक्त खालसा हद्दीतील वनक्षेत्राचे नकाशे होते. नकाशा असल्याशिवाय हद्दी कायम कशा करायच्या? म्हणून धों. म. मोहिते हे सांगलीच्या लँड रेकार्ड कार्यालयात गेले. १०/१२/१९७० या तारखेला अर्ज नकाशा मागणीसाठी दिला. नकाशाच्या फीसाठी एक रुपया अॅडव्हान्स म्हणून कार्यालयात भरला. बाकीच्या रकमेची व्ही. पी. सोडवायची. त्यांच्याकडून उत्तर आले, 'आपण मौजे तुपारी ता. तासगाव येथील गट नं. १३२ या गटाची नकाशा मागणी केली आहे. येथील रेकार्ड पाहता नकाशा उपलब्ध नसल्याने नक्कल देता येत नाही. सबब आपले अॅडव्हान्स रुपया एक पैकी म. ऑ. कमिशन वजा जाता पैसे ऐंशी परत केले आहेत आणि आपला वरील तारखेचा अर्ज निकाली काढणेत आला आहे.' अखेर कलेक्टर एस. एस. सक्सेना यांच्यापुढे अगदी ठिय्याच मांडून बसलो आणि लँड रेकॉर्डकडून तुपारी गट नं. १३२ चा नकाशा मिळविला. या नकाशावरून वनखात्याने दुसरा नकाशा तयार करून घेतला. तुपारीचे सरपंच आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन बापूंना भेटले. 'आमचे गायरान अभयारण्यासाठी द्यायचे नाही' असे त्यानी बापूंना निक्षून सांगितले. अभयारण्य निर्मिती बापूंच्याही कानापर्यंत पोहोचलेली होतीच. बापूंनी धों.म. मोहिते यांना बोलावून घेतले. म्हणाले, ''तुम्ही तुपारीकरांच्या गायरानाच्या मागे का लागला आहात?'' धों. म. मोहिते हसून म्हणाले, ''ते गायरान सरकार माझ्या

नावाचं करायचं म्हणतंय.'' बापूही हसले. नंतर सरपंचांना बोलावून घेऊन बापूंनी त्यांना समजावून सांगितले, ''धों. म. मोहिते एक चांगले काम करून राहिलेत. तुम्ही त्यांना विरोध करू नका. सहकार्य द्या.'' विरोधासाठी विरोध करण्याचा संकल्प सोडलेल्या तुपारीच्या सरपंचांना हे कसे रुचावे? त्यांनी बापूंकडे जायचे सोडून दिले. येळावीचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्या काखेत तुपारीकर शिरले. बाबासाहेबांच्या मतदार संघातील हे गाव. त्यामुळे त्यांनी तुपारीकरांना दुखविले नाही. तसेच माझ्या विरोधातही सूर लावला नाही. नंतर मात्र मोठ्या प्रयासाने काही क्षेत्र गायरान ठेऊन उर्वरित अभयारण्यात जमा करण्यात आले. ज्या प्रसंगातून श्री. मोहिते यांचे प्रसंगावधान, संयम, चिकाटी आणि प्रशासकीय कौशल्ये दिसून येतात.

**◆ वनमंत्र्याशी वादाचा प्रसंग**

वनमंत्री तिरपुडे यांच्याशी झालेल्या वादाचा प्रसंग धों. म. मोहिते यांनी लिहून ठेवला आहे. काही दिवसांनी अभयारण्य मंजूरी देता येत नाही असे पत्र आल्यावर धों. म. मोहिते यांनी दुसरे दिवशी तडक मुंबई गाठली. मुक्कामी धों. म. मोहिते हे पोहोचल्यावर तिथल्या एका कामगाराने विचारले, ''तुमचं अभयारण्य कुठंपर्यंत आलंय?''

धों. म. मोहिते हे उद्वेगाने बोलले, ''आत्तासे ते स्मशानात पोहोचलंय!'' ''उद्या सचिवालयात जाऊन त्याच्या चितेला काडी लावायची आहे!'' त्यांच्या स्वभावाच्या तर्कटपणाचा हाही पैलू त्या गाववाल्या कामगाराला माहीत असल्यामुळे तो पुन्हा काहीच बोलला नाही. 'नेमके काय घडले?' हे विचारण्याचे धाडस त्याला झाले नाही!

दुसरे दिवशी दुपारी एक-दोनच्या सुमारास धों. म. मोहिते हे सचिवालयात पोहोचले. धों. म. मोहिते यांना ते नवीन होते. एखाद्या शहरात पाहुण्याचा पत्ता शोधीत फिरावे तसे धों. म. मोहिते हे ते पत्र हातात घेऊन ज्याला त्याला हे वनखात्याचे कार्यालय कुठे आहे हे विचारत होते. सचिवालय म्हणजे चक्रव्यूह! शोधता शोधता अखेरीस दुपारी साडेतीन चारचे सुमारास ते कार्यालय सापडले. व. शं. कुलकर्णींना भेटले. हातातील पत्र त्यांना दाखवीत धों. म. मोहिते म्हणाले, ''तुम्ही असे कसे लिहिले?''

ते पत्र सविस्तर वाचून कुलकर्णी म्हणाले, ''आम्ही कोण हे असे लिहिणार? हा निर्णय अखेर वनमंत्र्यांचा असतो. त्यांनी जो या संदर्भात निर्णय घेतला तो आम्ही तुम्हास कळविला.'' वनमंत्री कोण आहेत हेही धों. म. मोहिते यांना माहीत नव्हते.

''तिरपुडेसाहेब!'' कुलकर्णी म्हणाले, ''हवं तर तुम्ही त्यांना भेटा. पण त्यांचेकडे मला भेटल्याचा उल्लेख मात्र करू नका.'' सायंकाळी पाचचे सुमारास धों. म. मोहिते त्यांच्या कार्यालयात पोहोचले. पाच वाजून गेल्यामुळे सचिवालयातील आणि वनमंत्र्यांच्या कार्यालयातही फारशी वर्दळ नव्हती. त्यांना भेटण्याचा कार्यक्रम चालू होता. त्यांच्या केबिनपुढे आता आठदहाजण उभे होते. धों. म. मोहिते हे त्या रांगेत उभे राहिले. धों. म. मोहिते हे शेवटच्या नंबरावर होते. दारावरचा शिपाई आता दोघातिघांना एकदम आत सोडू लागला. त्यालाही घरी जायची घाई असावी. शेवटचे दोघेतिघेजण आत गेले. तिरपुडेसाहेब खुर्चीवर

नव्हते. समोरच टेबलाजवळ पाठमोरे उभे होते. टेबलावरील पत्रे वाचून त्यांपैकी काही टेबलावर परत ठेवीत होते. तर मोजकीच काही आपल्या शर्टच्या खिशात घालीत होते. भेटायला येणाऱ्याकडे त्यांचे मुळीच लक्ष नव्हते. त्यांच्याकडे ते वळून पाहात सुद्धा नव्हते. तेही बंगल्यावर जायच्या गडबडीत असावेत. भेटणाऱ्याने नमस्कार केला की ते त्याच्याकडे न पाहाताच म्हणत, ''हं, अर्ज लिहून आणलाय ना? ठेवा टेबलावर.''

तिरपुडेसाहेबांनी येणाऱ्यांना ही अशी भेट देणे धों.म. मोहिते यांना बरोबर वाटले नव्हते. खटकले होते. कुठून कुठून लोक भेटायला आले होते. त्यांची साधी विचारपूससुद्धा नाही? आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ न देता धों. म. मोहिते हे तिथेच एका खुर्चीवर बसले. 'भेटीला येणारे संपले की काय?' म्हणून त्यांनी मागे वळून पाहिले, तर धों. म. मोहिते हे खुर्चीवर. धों. म. मोहिते हे चटकन उठून नमस्कार केला. 'काय हो?' म्हणून त्यांनी आपल्या भुवया उंचावल्या. धों. म. मोहिते हे खालच्या आवाजात म्हणाले, ''साहेब, आपल्या हातातील ते पत्र संपू द्या, मग माझे काम सांगतो.'' त्यांना ते बोचले असावे. हातातील पत्र टेबलावर ठेवून जरा घुश्यातच ते म्हणाले, ''हं...''

सचिवालयातून आलेले ते पत्र त्यांच्याकडे देत धों. म. मोहिते हे नम्रपणे म्हणाले, ''साहेब, हा निर्णय आपण घेतलात?''

पत्रावर नजर टाकून तिरपुडेसाहेब म्हणाले, ''हो... हो.. मीच निर्णय घेतलाय तो. एवढी एवढीशी टेकडी. निघाले अभयारण्य करायला? शासनाचे पैसे सांगली जिल्ह्यासाठी कसे काढायचे यात सांगलीकर पटाईत आहेत!'' धों. म. मोहिते यांना त्यांनी दमात घ्यायचा प्रयत्न केला. धों. म. मोहिते हे म्हणाले, ''साहेब, गार्डापासून चीफ् काँझर्वेटरपर्यंत साऱ्यांनी सह्या करून 'येथे अभयारण्य होईल' असे आपणास कळविले ते सारे मुर्ख !... आणि इथे सचिवालयात एअर कंडिशनमध्ये बसलेले आपण शहाणे काय?...''

तसे तिरपुडे एकदम तडकले! ओरडून म्हणाले, ''हू आर यू?'' धों. म. मोहिते हेही तसाच आवाज चढवून एकदम भडकलो, ''तुम्ही तरी कोण?..... ही खुर्ची गेल्यावर माझ्यासारखे कार्यकर्ते आहात!...'' बुमरँग आपणावरच उलटेल याची त्यांना यत्किंचितही कल्पना नव्हती. दमात घेतले की हा निघून जाईल अशी त्यांची समजूत. पण कसचे काय नि कसचे काय. काहीएक न बोलता रागारागाने ते केबिनबाहेर पडले नि निघून गेले. धों. म. मोहिते हेही त्यांनी टेबलावर ठेवलेले पत्र घेऊन तापलेल्या अवस्थेत तिथून थेट मुक्कामाच्या ठिकाणी आले.

**◆ कोंडवाडा आणि दंड – शेतकऱ्यांशी संघर्ष**

अभयारण्य उभे राहत असताना आणखी असेच संघर्षाचे प्रसंग घडले. याचेही चित्रण धों. म. मोहिते यांनी केले आहे. हिरवागार परिसर पाहून जनावरांच्या नसले तरी त्यांच्या मालकांच्या तोंडाला पाणी सुटले. हे लोक रात्री-अपरात्री जनावरे चरण्यासाठी प्लँटेशनमध्ये सोडू लागले. काही लोक तर 'आमची फॉरेस्ट

हद्द इथंपर्यंत आहेच' अशी दमदाटी करून प्लँटेशनमधे जनावरे चारू लागले. हे एक नवेच संकट उभे राहिले. गुरे चारणाऱ्या सर्वच गावच्या गुराख्यांना आम्ही सुरुवातीला समजून सांगण्याचा, पटवून देण्याचा प्रयत्न केला. आमच्या नम्र आणि नरम बोलण्यामुळे त्यांनीच उलट आमचे अवसान घेतले, गुरे यायची ती येऊ लागलीच.मग मात्र आम्ही आक्रमक भूमिका घेऊन गुरे चारणाऱ्यांना गुरांचे  कोंडवाडे चालू केले. कोंडवाड्यांचे काम तसे कडकच! अभयारण्य व्हावे म्हणणाऱ्या, मनापासून सहकार्य करणाऱ्या ज्या काही ग्रामपंचायती होत्या, त्यांनी कोंडवाड्याच्या दंडाबाबत एकदम टोकाची भूमिका घ्यायला सुरुवात केली. प्रकरणे हातघाईवर येऊ लागली. संबंधित लोकांनी आमदारांच्या कानावर ही तक्रार घातली. आमदार महाशयांनी कलेक्टरांना दम भरला. 'दंडाचे प्रकरण ताबडतोब थांबले पाहिजे' म्हणून सांगितले. कलेक्टर नवजीवन लखनपाल यांनी धों. म. मोहिते यांना  बोलावून सांगितले, ''दंड जरा सौम्य घ्यायला सांगा.'' कलेक्टरसाहेबांना धों. म. मोहिते हे जरी 'होय' म्हणून सांगून आले  असले  तरी ग्रामपंचायतीनी याबाबत तसूभर माघार घेतली नाही. काही लोकांचा धों. म. मोहिते यांना  निरोप आला, ''रक्ताचे पाट वाहतील!'' धों. म. मोहिते यांनी  हेही लागलीच कळवून टाकले, ''त्यालाही माझी तयारी आहे.'' सुदैवाने या प्राथमिक अवस्थेत अत्यंत अडचणीच्या काळात माझ्यासारखीच कणखर भूमिका असलेले निर्भय वनअधिकारी व कर्मचारी लाभले. कराडचे वनक्षेत्रपाल (रेंजर) व्ही. जे. वैद्य, येथे खास नेमणुकीस असलेले वनपाल (फॉरेस्टर) बी. जी. माळी आणि वनरक्षक (गार्ड) एस. बी. नलावडे एवढाच तोकडा फौजफाटा. सुरुवातीचा हा काळ माझ्या इतकाच वनखात्याच्याही सचोटीचा आणि परीक्षेचा गेला. वनखात्याची ही अपुरी फौज असूनही ही परीक्षा पूर्णपणे उत्तीर्ण झाल्याचा आनंद व्यक्त केला आहे.

### ◆ शिकारीला बंदी करण्याचा प्रसंग

शिकारीला बंदी करण्याच्या प्रसंगाचे वर्णन धों. म. मोहिते यांनी आपल्या अनुभवकथनातून केला आहे. त्या प्रसंगांचे वर्णन करताना ते लिहितात, नागपंचमीचा सण तोंडावर आला होता. डोंगरात शिकारीला जाण्याची पद्धत ग्रामीण भागात आहे. भाले, कुऱ्हाडी, काठ्या, कुत्री घेऊन गावकरी येतात. फक्त आपापल्या हद्दीतील डोंगरात शिकार करायची. एका गावच्या हद्दीत शिकार उठली नि ती दुसऱ्या हद्दीतील गावकऱ्यांनी केली तर शिकार उठविणाऱ्या पहिल्या गावकऱ्यांचा त्या शिकारीवर हक्क नसे आणि दोन्ही गावांच्या सरहद्दीवर शिकार झाली तर ती कुणाची म्हणून दोन्ही गावांत मारामारी होत असे. केलेली शिकार भाल्याच्या टोकावर अडकवून वाजत गाजत गावात आणायची आणि ती गाववेशीत पुरायची! पुढचे वर्ष गावाला सुफळ जाते अशी समजूत! सालाबादप्रमाणे यंदाही आसपासचे गावकरी डोंगरात शिकारीला येणारच. येथे शिकार झाली तर मग हे अभयारण्य कसले? शिवाय शिकारीचा पाठलाग करताना झालेल्या मनमानी धावपळीत इथल्या वनीकरणाचे काय होणार? तेव्हा लोकांनी डोंगरातच येऊ नये असा काहीतरी उपाय केला पाहिजे. शिकारीलाच बंदी घातली पहिजे. बेनकट्टींना सांगून काही उपयोगाचे नव्हते. ते म्हणाले असते, ''शाला, आपण  काय करणार? अजून अभयारण्य डिक्लर नाय झाले ! तुम्ही तिथे जावून शिकार करू नका' म्हणून लोकांना समजावून सांगा.'' मोरेसाहेबांना पत्र पाठवून धों. म. मोहिते हे त्यांना

विट्यास बोलावून घेतले. एका हॉटेलात बसून यावर चर्चा केली आणि त्याप्रमाणे त्यांच्या सहीने आदेश काढण्यात आला. 'तमाम' लोकांना कळविण्यात येते की, वन्यप्राणी व पशुपक्षी यांची शिकार करणे हे बेकायदेशीर असून असे करणारा आरोपी ५०० रु. दंड अथवा सहा महिने शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा यास पात्र होतो. तसेच जंगलात झाडांची चोरटी तूट करणे अथवा नुकसान करणे हा इंडियन फॉरेस्ट ॲक्ट १९२७ कलम २६ प्रमाणे गुन्हा आहे व असे करणारा आरोपी ५०० रु. दंड अथवा सहा महिने शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा यास पात्र होतो. सबब कुणीही शिकार करू नये. कोणत्याही निमित्ताने जंगलातील झाडांचे अथवा कोवळ्या रोपांचे वगैरे नुकसान करू नये. असे करताना कोणी आढळल्यास त्याच्याविरुद्ध वरील कायद्याप्रमाणे कारवाई केली जाईल. सदर नोटीस संबधित सर्व ग्रामपंचायतींना पाठविण्यात आली. त्याप्रमाणे गावात दवंडीद्वारे तसेच सभा घेऊन गावकऱ्यांमार्फत हा आदेश पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या. पेपरातूनही तसे जाहीर करण्यात आले. नागपंचमीच्या दिवशी स्वत: रेंजर वैद्य साईटवर हजर होते. त्यांनी कराड रेंजचे काही फॉरेस्टर, गार्डही आणले होते. रेंजरसह सर्वजण कडक गणवेषात होते. अशी वातावरण निर्मिती तयार झाल्यामुळे कोणत्याही गावचे लोक शिकारीसाठी डोंगरात आले नाहीत. त्यानंतरही कुणीही या वनक्षेत्रात शिकार करण्याच्या फंदात पडले नाही. कुठे चोरटी शिकार झालीच तर ती पकडून वनखाते त्यांना कोर्टात खेचीत असे.

**◆ रस्ता उभारणी आणि सरकारी अधिकारी यांची मानसिकता**

अभयारण्यामधील सडक करताना आलेल्या अडचणीचे आणि संघर्षाचे चित्रण धों. म. मोहिते यांनी या अनुभवकथनातून केले आहे. सडक करण्यासाठी सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे वगैरे सर्व खात्यांचे उंबरठे झिजवीत धों. म. मोहिते हे ते पत्र घेऊन पंधरा दिवस फिरत होते. खूप प्रयत्न केले. पण संपूर्ण नवीन आणि डोगरातील रस्ता असल्याने दुष्काळाचे घाईगर्दीत हे काम घेण्यास कुणीच तयार होईनात. त्यांचे म्हणणे असे की, ''अभयारण्याचा रस्ता. तशात घाटाचे काम. लेव्हल लावली पाहिजे. हे या घाईगर्दीत करायचे कामच नव्हे. रस्ता उत्तम. आकर्षक आणि मजबूत व्हायला हवा. अभयारण्यास भेट देणाऱ्या अनेक मान्यवरांची त्यावरून सदोदित ये-जा होणार. त्यांच्याकडून ठपका यायला नको.''

शेवटी जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती संपतराव चव्हाण यांनी खानापूर तालुका पंचायत समितीस हे काम हाती घेण्यास जवळ जवळ सक्तीनेच भाग पाडले. इंजीनियर पटवर्धन आणि ओव्हरसीअर तात्या पोळ यांनी धों. म. मोहिते यांना बोलावून घेऊन सांगितले, ''आम्ही हे काम हाती घेतो, पण एका अटीवर. तुम्ही स्वत: उभे राहून रस्ता करून घेण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तुमच्या इच्छेप्रमाणे रस्त्याची कशी आखणी करायची तशी करा. आम्हाला तिकडे यायला अजिबात सवड व्हायची नाही. फक्त एक मस्टर क्लार्क तेवढा तुम्हाला देतो. थोडक्यात या कामाची संपूर्ण जबाबदारी तुमची. मात्र कृपा करून आम्हासाठी कुठे 'खड्डा' खणू नका म्हणजे झाले!... आणि तुम्ही ही जबाबदारी स्वीकारणार नसाल तर हे काम आम्ही मुळीच करणार नाही.'' २ ऑक्टोबर गांधी-जयंतीचा मुहूर्त साधला.

पंचायत समितीचे सभापती गंगारामबापू करांडे यांच्या हस्ते नारळ फोडून सडकेच्या कामाचा शुभारंभ केला. काम गावापासून दूर. डोंगरात. त्यामुळे कामासाठी माणसे मिळेनात. कारण प्रत्येक गावाशेजारी काही ना काही दुष्काळी काम चालू होते. ते सोडून इतक्या दूर कोण येणार? अखेर वनखात्यात कामाला असणारे काही मजूर, आमच्या गावचे काही गावकरी असे पन्नास एक मजूर घेऊन काम सुरू झाले. दोन आठवडे झाले तरी मजुरांची संख्या वाढेना! एवढेच मजूर घेऊन ही सडक पठारावर कशी पोहोचणार? दुष्काळ संपला की काम बंद.

हळूहळू मजुरांची संख्या वाढत गेली. पण इथे कामावर येणारे हे मजूर नव्हते. ते बागाईतदार शेतकरी होते. तेही दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेले. पण गावाशेजारील कामावर काम करण्यास त्यांना संकोच वाटत होता. त्यांच्या शेतीवर नेहमी कामावर असणारे मजूर तेथे काम करीत होते. त्यांच्याबरोबर मजूर म्हणून यांनी काम कसे करायचे? म्हणून ते चुळबुळत घरीच बसून होते. त्यांना डोंगरात सडकेचे काम चालू झाल्याचे समजले. शिवाय 'अण्णा म्हणजे धों. म. मोहिते हे स्वतः तिथे कामावर उभे आहेत, काम करून घेताहेत.' म्हटल्यावर ही बागाईतदार मंडळी हळूहळू कामावर यायला लागली, मोहित्यांचे वडगांव, देवराष्ट्र, आसद, अंबक, दुधारी, ताकारी येथील सुमारे तीनचारशे शेतकरी सडकेच्या कामावर येऊ लागले. कामाला गती मिळाली.

गणपतीची मूर्ती सापडल्याचा प्रसंगही आपणास या अनुभवकथनातून वाचावयास मिळतो. सडक दीड किमी. वर पोचली होती. तिथे काम करणाऱ्या एका जोडीला नाल्यात एक भला मोठ्ठा दगड लागला. त्यांनी हरप्रयत्न करून पाहिले पण नाल्यातून दगड काही निघेना. सुतकीचे घाव घातले पण दगड फुटंना! नाला तर निघाला पाहिजे. शेजारी काम करणाऱ्या आठ दहाजणाना त्यांच्या हत्यारांसह बोलावून घेतले. टिकाव, पहारी यानी कटवून इंच इंच उचलीत तो दगड वर घेतला आणि सडकेच्या बाहेर ढकलला. दगड पालथ्याचा उताणा झाला. दगडाच्या वरच्या निमुळत्या भागात चक्क डोळे, सोंड असा गणपतीचा चेहरा कोरलेला दिसला! आम्ही तो साफसूफ केला. 'गणपती सापडल्या' ची बातमी कामावर सगळीकडे पोहोचली. धावत पळत सगळे तिथे जमले. हात जोडून भक्तीभावे गणपतीला नमस्कार करू लागले. नमस्कार करावा असाच हा चमत्कार होता!

**◆ अपघाताचा टळल्याचा प्रसंग**

सडक तयार करताना सुरुंग लावताना अपघात होता होता वाचला. त्या रोमहर्षक प्रसंगाचे वर्णन मोहिते यांनी केले आहे. घाटात एकाचवेळी पंधरा वीस सुरुंग भरून ते एकदम उडवले जात. काळाकरंद खडक असल्याने चार पाच फुटांचे अंतरावर सुरुंग घेतलेले असत. सुरुंग उडविताना संपूर्ण काम बंद ठेवून पूर्ण दक्षता घेण्यात येई.एकदा असेच सुरुंग भरायचे चालले होते. काही सुरुंग भरून झाले. एक सुरुंग भरून त्याची वात पहारीने दगडावर तोडताना पहारीची ठिणगी उडाली आणि ठिणगीने सुरुंगाची वात पेटली. काही क्षण गेले. सुरुंगाचा आवाज नाही. एवढ्यात खालून एक कामगार मोठ्याने ओरडून धों.म. मोहिते यांना

सांगू लागला, ''आण्णा, घाबरू नका.! सुरुंग वांझ गेला!'' काही क्षणातच सुरुंगाचा स्फोट होतो आणि खडकाच्या ठिकऱ्या चहुकडे फेकल्या जातात. हे सारे काही क्षणांतच घडते. सुरुंगाची वात पेटताच तो कामगार ओरडला, ''सुरुंग पेटलाय! पळाऽऽ....''

कामावर एकदम घबराट निर्माण झाली. जो तो जीव वाचविण्यासाठी पळायचा प्रयत्न करू लागला. पण पळणार तरी कुठे? जिकडे तिकडे दगडांचा खच पडलेला. या सुरुंगाच्या स्फोटाने भरलेले दुसरे सुरुंगही पेटले तर? कितीजण खलास होणार!.. कितीजण घायाळ होणार!.. अंगाला दरारून घाम फुटला! डोळे गच्च मिटून घेतले! नकळत हात जोडले गेले. कसे आणि कुणाला, हे समजले नाही! गोलातील गणपतीला... आईवडिलांना.. की कुठल्या अदृश्य शक्तीला !! घाटाचे काम सुरू झाल्यापासून आजअखेर दीड हजारांहून अधिक सुरुंग आम्ही उडविले. त्यांपैकी एकही सुरुंग कधी वांझ गेला नाही आणि आजच हा कसला चमत्कार ?... धों. म. मोहिते यांनी कामाला सुट्टी दिली. गणपती गोलात सायंकाळी पाचपर्यंत सर्वांनी आनंदोत्सव साजरा केला.

### ◆ पूर्णत्वाचा आनंद

आणखी एक असाच प्रसंग मोहिते यांनी चित्रित केला आहे. सडक पूर्ण झाल्यावर दुष्काळी इंजीनियरनी कामाला खास भेट दिली आणि रस्ता चुकला असल्याचा निर्वाळा दिला.प्रवेशद्वारापासून पठारावरील महानगुंडापर्यंत पाच किमी ची सडक अवघ्या एक लाख एकोणनव्वद हजार रुपयांत तयार झाली होती. या दुष्काळी कामाच्या समारोपासाठी स्वतः दि. वि. साठे, इंजीनियर, ओव्हरसीयर आले होते. शिराळकर शास्त्रीही खास हजर होते. समारोपाच्या भाषणात या कामाबद्दल मामलेदारांनी सर्वांचा खास गौरव केला. रस्त्याचे काम संपण्याच्या शेवटी शेवटी नवीनच बदलून आलेल्या दुष्काळी इंजीनियरनी कामाला खास भेट दिली होती. काम पाहून ते म्हणाले, ''तुमचा घाटाचा प्लॅन चुकलाय. कशीतरी जीप पठारावर जाईल.'' तेव्हा धों. म. मोहिते यांनी आखलेला प्लॅन चुकीचा की बरोबर हे ठरविण्यासाठी उद्घाटनाच्या दिवशी कडेगाव दूध संघाचा एक लेलँड ट्रक, दोन एस. टी. गाड्या, दोन ॲम्बॅसीडर्स, एक जीप, एक मोटार सायकल आणि एक बैलगाडी इतकी वाहने हजर ठेवली. उद्घाटनासाठी आमदार संपतराव माने, जि. प. सदस्य मोहनराव कदम, एस. टी. महामंडळाचे सांगलीचे विभाग नियंत्रक ग. म. चव्हाण, पाटबंधारे खात्याचे कार्यकारी अभियंता एम. पी. गोवंडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रवेशद्वाराजवळ आमदारांनी फीत कापली आणि तेथे हज़र ठेवलेली सर्व वाहने नव्या रस्त्यावर सोडली. ट्रक, एस. टी. गाड्यांत कामावरील बायका-पुरुष बसले होते. तर काहीजण आधीच जाऊन पठारावर थांबले होते, घोषणा, लोकांच्या जयजयकारांनी अभयारण्य दणाणून सोडले! घाट चढताना तर लोकांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. वाहनात लेलँड ट्रक सर्वात पुढे होता. त्याच्यामागून एस. टी. गाड्या धावत होत्या. एस. टी. चे शिंदे आणि शेख ड्रायव्हर होते. घाटात तर शेख ड्रायव्हरने ट्रकला साईट मागितली आणि एस. टी. पुढे काढली. दोन ॲम्बॅसीडर आधीच पुढे गेल्या होत्या. पठारावर प्रथम एस. टी. पोहोचली. विभाग नियंत्रक ग. म. चव्हाण आमदारांना म्हणाले, ''पाहिलंत, माझी एस. टी. पठारावर प्रथम आली!''

कामावरील आणि बाहेरील माणसांनी डोंगर फुलून गेला होता. त्यांच्या उत्साहाला आणि घोषणा – जयजयकाराला उधाण आले होते. ध्येयपूर्तीचा आनंद कल्पना करण्यापलीकडचा असतो! यावेळी मोहिते यांचे हृदय आनंदाने भरून आले होते.

**◆ एल.एच. बेनकट्‌टी यांच्यासोबत वादाचा प्रसंग**

एल.एच. बेनकट्‌टी यांच्यासोबत वादाचा प्रसंगही आपणास या अनुभवकथनातून वाचावयास मिळतो. सांगली जिल्ह्यासाठी स्वतंत्र वनविभागाची मागणी मान्य केल्यावर तिथे एका चांगल्या ऑफिसरची नेमणूक केली गेली. बेनकट्‌टींना हे समजताच ते ताबडतोब अभयारण्यात आले. धों. म. मोहिते हे तिथे गेले तर डाकबंगल्यातील सामानाची यादी करायचे काम चालले होते. खुर्च्या, टेबल, कॉट, गादी, चादरी, स्टोव्ह, स्वयंपाकाची भांडी, वगैरेची यादी चालली होती. रेंजर यादी लिहीत होते. आणखी काही सामान राहिले आहे काय? याची खात्री बेनकट्‌टी खोल्यांतून फिरून स्वतः करून घेत होते.

धों. म. मोहिते यांनी विचारले, ''हे काये चालले आहे?'' तेव्हा बेनकट्‌टी म्हणाले, ''शाला, हे सारे सामान सातारा डिव्हीजनचे हाय ना? उद्या ट्रकने न्यायचे आहे. तुमचा स्वतंत्र डिव्हीजन झाला ना. तेव्हा हे सामान नेते.''

''हा डाकबंगलाही सातारा डिव्हिजनचा आहे. तोही तुम्ही नेणार काय?'' धों. म. मोहिते हे खवचटपणे विचारले.

''ते कशाला नेते ? ते तुमाला राहूद्या.'' तेव्हा धों.म. मोहिते हे रागाने म्हणाले, ''सामान न्यायला ट्रक येऊ. द्या तर खरे. त्याच्या चाकांतली हवाच सोडून टाकतो!'' बेनकट्‌टी उठले. जीपमध्ये बसले नि निघून गेले.

**◆ अपघाताचा प्रसंग**

अभयारण्य उभा करताना एक अपघात झाला. त्यामध्ये एका मजुराचा मृत्यू झाला त्या प्रसंगाचे वर्णन मोहिते यांनी केले आहे. कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने मंजूर झाली होती. त्याची पूर्वतयारी म्हणून ट्रकने दगड ओढायचे काम चालले होते. घाटात या ट्रकचे ब्रेकामी होऊन दगडाने भरलेला ट्रक घाटाचा कठडा तोडून खाली पंचवीस तीस फूट खोल दरीत कोसळला! त्यावर काम करणाऱ्यांपैकी बसलेले तीन मजूर गंभीर जखमी झाले. तिघेही देवराष्ट्रेचे होते. वन-कर्मचाऱ्यांनी त्यांना ताबडतोब तासगावच्या सरकारी दवाखान्यात हलविले. तेथे नेल्यावर काही वेळातच त्यांपैकी एक मजूर दगावला! दुसऱ्या दोघांना तातडीने सांगलीला सरकारी दवाखान्यात हलवायचे ठरले. सत्तार तासगावात होतेच. धों. म. मोहिते हे त्या दिवशी कोल्हापूरला वनखात्यात जाऊन सांगलीस येणार होते आणि तेथील काम करून सायंकाळी गावच्या मुक्कामाच्या एस. टी. ने परत येणार होते. हे सत्तारना माहीत होते. त्यांनी ताबडतोब सांगली एस. टी. स्टँडला फोन लावून कंट्रोलरकडे माझ्यासाठी निरोप दिला, ''आण्णा सांगलीत आले आहेत. ते मुक्कामाचे गाडीने परतणार आहेत. अभयारण्यात दगड ओढणाऱ्या ट्रकला अपघात होऊन एक मजूर ठार झाला आहे! दोघे गंभीर

जखमी झाले आहेत!'' ही वार्ता समजताच धों. म. मोहिते हे हॉस्पिटलवर आले. जखमींना घेऊन टॅक्सी आली. त्या दोघांपैकी एकजण हळूहळू चालत दवाखान्यात आला. दुसऱ्याला स्ट्रेचरवर घ्यावे लागले.

मयत मजूर रामोशी समाजातील होता. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. मयताचे काही भाऊबंद तासगावला आले होते. वातावरणात तणाव होता. शवविच्छेदन होऊन प्रेत ताब्यात मिळायला दुपार झाली. मुळातच काही देवराष्ट्रेकर मोहिते यांच्यावर चिडून होते. कोंडवाडे, मोळ्या पकडणे, खटले भरणे, अशी कारणे होती. आजचे हे निमित्त करून त्याचा स्फोट झाला तर? सत्तार आणि जीप ड्रायव्हरला युनिफॉर्म घालायला सांगितले. तेथे काही गडबड झालीच तर चटकन जीपमध्ये बसून तिथून झटक्यात निघून जायची सूचना दिली. प्रेत घेऊन येणारा ट्रक पाठीमागून येत होता. देवराष्ट्रजवळ गावाबाहेर वाट पाहात शेपाचशे गावकऱ्यांचा जमाव उभा होता! पुढे काय वाढून ठेवले आहे याची कल्पना येईना! जमावाजवळ जीप थांबवली. जीपला लोकांनी गराडा घातला. ते काही बोलायचे आधीच धों. म. मोहिते हे जीपमधून खाली उतरले आणि आरडा ओरडा करून बोलायला सुरुवात केली, ''चला... रामोशीवाड्याकडे सगळे चला... मयत घेऊन गाडी आलीच बघा... चला...''

जमावात मोहिते यांचा मामेभाऊ शामराव सदू महिंद पाटील ४२ च्या चळवळीतील एक क्रांतिकारक आणि विरोधी पक्षाचा कार्यकर्ता उभा होता. त्याला धों. म. मोहिते यांनी बाजूला बोलावून विचारले, ''परिस्थिती काय? त्याने सांगितले, ''गावकऱ्यांचा रोख तुझ्यावरच दिसतो. पण तू काही काळजी करू नकोस.'' प्रेत आल्यावर रामोशीवाड्यातील बायका-मुलांचा आक्रोश सुरू झाला! स्मशानभूमीमध्ये सरणावर प्रेत ठेवले. रामोशी वाड्यातील पुढारी सखाराम नाना शिरतोडे ४२ च्या चळवळीतील मोहिते यांचा एक सहकारी. त्याने प्रेतदहनाची तयारी पूर्ण केली आणि धों.म. मोहिते यांना तिकडे बोलावले. सखाराम शिरतोडे म्हणाले, ''आण्णा, या प्रेताला तुम्ही अग्नी द्यावा, अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे!'' मृत रामोशी, धों. म. मोहिते हे मराठा. पण तो क्षणच असा होता की फाटे फोडण्यात अर्थ नव्हता! मोहिते यांनी खिशातून काडेपेटी काढून चितेला भडाग्नी दिला! यातून मोहिते यांचे धाडस, प्रसंगावधान आणि समयसूचकता दिसून येते.

◆ **शिकारबंदी**

संघर्षाच्या आणखी एका प्रसंगाचे वर्णन मोहिते यांनी केले आहे. नागपंचमी सणाला आम्हाला शिकारीला बंदी का? वर्षाचा सण. आम्ही या दिवशी शिकारीला जाणारच! कोण आडवे येते ते पाहातो!'' काही गावकऱ्यांचा हा निर्णय धों. म. मोहिते यांना कर्णोपकर्णी समजला. शिकार करू नये यासाठी डी. एस. पी. ना भेटल्यावर त्यांनी चार पाच पोलिसांची हत्यारी पार्टी दिली. नागपंचमी दिवशी पोलिस शिकारीला जाणाऱ्या लोकांच्या वाटेवर अभयारण्याच्या हद्दीत एका टेकडीवर बसले. भाले, कुऱ्हाडी, बंदुकीसह लोक शिकारीसाठी जमावाने आले. समोर पाहातात तर पोलिस ! मग आत कसचे येतात? हद्दीबाहेर तासभर थांबून, आरडाओरडा करून, बंदुकीचे हवेत बार घालून आणि पोलिसांना तसेच

आम्हाला शिव्याशाप देऊन लोक परत फिरले. त्यांचा शिकारीचा डाव आम्ही उधळून लावला! अशा प्रकारे अनेक संघर्षाचे प्रसंग आपणास वाचावयास मिळतात.

मुंबईच्या महात्मा गांधी हॉस्पिटलचे डॉ. अशोक शहा हे अभयारण्य पाहण्यासाठी आले होते. किर्लोस्कर पॉईंटवर कमळभैरवकडे जाण्यासाठी पाऊलवाट आहे. ती कोल्हेबिळातून जाते. ते म्हणाले, ''आम्ही कमळभैरवला जाऊन येतो. तुम्ही इथे कारजवळ थांबा.'' अनिलभाई, डॉक्टर आणि मुंबईच्या हॉस्पिटलचे एक अधिकारी असे तिघेजण त्या पाऊलवाटेने कमळभैरवकडे गेले. कोल्हेबिळातून बाहेर पडलेले वरून दिसले. त्यानंतर त्यांचा अर्धा पाऊण तास झाला तरी पत्ता नाही. कसली चाहूल नाही. मोठमोठ्याने हाका मारल्या, शीळ घातली. त्याला प्रतिसाद नाही. सर्वजण घाबरले. ही पाऊलवाट तशी अवघड आणि धोकादायक! एवढ्यात मोटरसायकलवरून दोन तरुण तेथे आले. धों. म. मोहिते यांनी त्यांना कमळभैरवला जाऊन पाहुणे पाहून यायची विनंती केली. वीस मिनिटांतच ते तरुण परत आले आणि तुमचे पाहुणे कुठेच दिसत नाहीत म्हणून सांगू लागले. त्यानंतर सुमारे दीड तासाने एका जीप तिथे पठारावर आली नि तीमधून पाहुणे उतरले. मोठ्या उत्साहाने ते कमळभैरवकडे निघाले खरे पण ती अवघड वाट उतरताना त्यांना आईचे दूध आठवले ! एक बाजूला उंच कडा. दुसरीकडे खोल दरी! मध्ये फक्त दोन तीन फुटांची पाऊलवाट. अक्षरश: खाली बसून हळूहळू घसरत सरपटत ते कमळभैरवला पोहोचले. घसरताना पँटी फाटल्या. पुन्हा परत त्या वाटेने वर यायचे त्यांचे धाडस झाले नाही. ते तसेच पायऱ्या उतरून ताकारी स्टेशनवर गेले आणि एक भाडोत्री जीप घेऊन सरळ अभयारण्यातील सडकेने पठारावर आले. असे काही रोमहर्षक आणि जीवावर बेतणारे प्रसंग आपणास या अनुभवकथनातून वाचावयास मिळतात.

### ◆ समारोप

अशा प्रकारे अभयारण्य उभारणीमध्ये ज्या अडचणी आल्या त्यातून वाट काढत कधी सामंजस्याने तर कधी संघर्ष करीत अभयारण्य उभे राहिले आहे. कथानकाचा विशेष घटक म्हणून व्यक्तिचित्रणाला विशेष महत्त्व दिले जाते. कथानकातील घटना-प्रसंग व्यक्तींच्या कृती-उक्तीतून घडत असते. कथानकाला गती देण्याचे काम व्यक्तिचित्रणे करीत असतात. या अनुभव कथनातील व्यक्तिरेखा धों. म. मोहिते यांनी वास्तवपूर्ण रीतीने रेखाटल्या आहेत. कथानकाची गरज म्हणून त्या वावरताना दिसतात. कुणाची अवास्तव स्तुती नाही किंवा कुणाविषयी जाणीवपूर्वक आकस नाही. जे सोबत आले त्यांना सोबत घेऊन वाटचाल केली, जे विरोधक म्हणून उभे राहिले त्यांना समजावून प्रसंगी कडक शब्दात फटकारून आपला मार्ग त्यांनी मोकळा केला आहे. आपल्या स्वभावाचे वेगळे पैलू त्यांनी सर्व वाचकांसमोर व्यक्त केले आहेत. हा जीवनप्रवास सोपा नव्हता. खच खळग्यांनी, काट्याकुट्यानी भरलेला होता. आपल्या संसाराकडे दुर्लक्ष करून त्यांनी समाजरथाचा गाडा हाकला. त्यांच्या मनातील जिद्द त्यांच्या 'जिद्द निवासात' ही भरलेली होती. घराणे वारकरी आणि समाजकार्यात अग्रेसर असलेले त्यामुळे भक्तीचा आणि समाजसेवेचा वारसा आपोआपच त्यांच्याकडे चालत होता. स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग, तुफान सेनेचे कॅप्टन ते अभयारण्याचे कॅप्टन म्हणून त्यांचा प्रवास पुढील पिढीसाठी प्रेरणादायी असाच आहे. उजाड ओसाड माळरानावर हिरवे

नंदनवन फुलवण्याची किमया त्यांना संघर्ष करीत, सर्वांना समवेत घेऊन लीलया पार पाडली. एकूणच धों. म. मोहिते यांच्या कठोर जीवनसंघर्षाचे वास्तव चित्रण आणि त्यांच्या जिद्दीची कहाणी 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथानतून वाचकांसमोर येते.

## ३.३ सरावासाठी प्रश्न

### १. योग्य पर्याय निवडा.

१. यशवंतराव चव्हाण यांचे कोणते शिक्षक १९७२ च्या दुष्काळात मोहिते यांच्याकडे काम मागण्यासाठी आले होते?

अ) गणेश महादेव कुलकर्णी ब) जे. बी. कुलकर्णी

क) बी. टी. मोरे ड) कृष्णा मारुती मोरे

२. वृक्षमित्र धों. म. मोहिते यांचे बरोबर कोणत्या लेखकास वैयक्तिक पर्यावरण पुरस्कार मिळाला?

अ) डॉ. शिवराम कारंथ ब) गणेश महादेव कुलकर्णी

क) वसंत बापट ड) मंगेश पाडगावकर

३. धों. म. मोहिते यांना वृक्षमित्र आणि इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार कोणाच्या हस्ते दिला गेला?

अ) राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा ब) यशवंतरावजी चव्हाण

क) इंदिरा गांधी ड) वसंतराव दादा पाटील

४. सागरेश्वर अभयारण्य उभारणी वेळी सांगली जिल्हा परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष ............. यांनी मोहिते यांना मदत केली.

अ) आर. आर. पाटील ब) स. गो. बर्वे

क) धोंडीराम नाना पाटील ड) वसंतरावदादा पाटील

५. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीस कोणत्या वनमंत्र्यांनी मंजुरी नाकारली?

अ) स. गो. बर्वे ब) वसंतरावदादा पाटील

क) यशवंतराव चव्हाण ड) श्री. नासिकराव तिरपुडे

६. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या आत्मकथनातून आसदमधील कोणत्या शाहिराचा उल्लेख आला आहे?

अ) महादेव बाळाजी मोहिते ब) यशवंत तांदळे

क) रंगराव महादेव मोहिते ड) भिकाजी महादेव पाटील

७. अभयारण्याच्या सुरुवातीच्या काळात कोणत्या वनक्षेत्रपालांनी अभयारण्य उभारण्यासाठी मोलाची मदत केली?

अ) नंदकुमार कुलकर्णी ब) जे. बी. कुलकर्णी

क) एल.एच. बेनकट्टी ड) श्री. नासिकतराव तिरपुडे

८. मोहिते यांनी कोणत्या अभयारण्यास भेट दिल्यानंतर सागरेश्वर अभयारण्य उभा करण्याची संकल्पना त्यांना सुचली?

अ) दाजीपूर ब) ताडोबा

क) पेंच ड) रणथंबोर

९. महिला गटाकडून काम करून घेण्यासाठी कोणाची नेमणूक केली होती?

अ) शंकर बाळकू पवार ब) भिकाजी महादेव पाटील

क) दत्तू गणू मोहिते ड) महादेव बाळाजी मोहिते

१०. मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या कोणत्या स्नेह्याने सागरेश्वर अभयारण्यासाठी मोलाची मदत केली?

अ) श्री. माविनकुर्वे ब) एस.एस. बुट

क) बी. जी. ममदापूर ड) एल. एच. बेनकट्टी

११) मध्य रेल्वेमध्ये अधिकारी म्हणून काम करणाऱ्या कोणत्या व्यक्तीने मोहिते यांना मंत्रालयातील कामे करून देण्याचे वचन दिले?

अ) महिपतराव मोहिते ब) महादेव बालाजी मोहिते

क) एस. टी. मोहिते ड) बी. टी. मोहिते

१२. देवराष्ट्राच्या तलाठ्याने मोहिते यांनी कामावर येऊ नये, असा कोणाला दम भरला?

अ) मस्टर क्लार्क ब) शंकर पवार

क) सखाराम शिरतोडे ड) शामराव महिंद

१३. धोंडीराम महादेव मोहिते उर्फ अण्णा यांना कोणता पुरस्कार दिला गेला?

अ) वृक्षमित्र ब) इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार

क) फाय फाउंडेशन इचलकरंजी आणि वसंतराव नाईक वनीकरण पुरस्कार

ड) वरील सर्व

१४. सागरेश्वर अभयारण्य विकास सल्लागार समितीचे पहिले कार्यकारी अध्यक्ष म्हणून कोणाची निवड करण्यात आली?

अ) वृक्षमित्र धों. म. मोहिते    ब) श्री. माविनकुर्वे

क) मुकुंदराव किर्लोस्कर    ड) वनक्षेत्रपाल नंदकुमार कुलकर्णी

१५. सागरेश्वर अभयारण्य उभारण्यामध्ये कोणत्या शासकीय अधिकाऱ्याने खोडा घातला?

अ) एस.एस. बुट    ब) एल. एच. बेनकट्टी

क) श्री माविनकुर्वे    ड) बी. जी. ममदापूर

१६. सागरेश्वर डोंगरात असलेली एक गुप्तगुहा शोधण्यासाठी मोहिते यांच्याबरोबर कोण गेले होते?

अ) सिताराम बाळा मोहिते    ब) महिपतराव मोहिते

क) रंगराव महादेव मोहिते    ड) अ व ब

१७. सागरेश्वर अभयारण्य साईट पाहण्यासाठी महाराष्ट्राचे चीफ कॉन्झर्वेटर म्हणून कोण आले होते?

अ) एल. एच. बेनकट्टी    ब) श्री. मावीनकुर्वे

क) एस. एस. बूट    ड) व्ही. जे. वैद्य

१८. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मगाव कोणते?

अ) मोहित्यांचे वडगाव    ब) देवराष्ट्रे

क) कराड    ड) ढवळेश्वर

१९. वनमंत्री तिरपुडे यांनी नकार दिल्यानंतर कोणत्या मुख्यमंत्र्यांनी अभयारण्य उभारणीस मंजुरी द्यावी अशी शिफारस केली?

अ) वसंतरावदादा पाटील    ब) यशवंतराव चव्हाण

क) स. गो. बर्वे    क) वसंतराव नाईक

२०. सागरेश्वरचे मूळ नाव कोणते आहे?

अ) लिंगेश्वर    ब) समुद्रेश्वर

क) कुरणेश्वर    ड) वीरेश्वर

२१. सागरेश्वर अभयारण्यास कोणत्या परदेशी पाहुण्यांनी भेट दिली?

अ) मॉन्ट रोव्ह 		ब) पीटर जॅक्सन

क) पीटर फेरो 		ड) वरील सर्व

२२. सागरेश्वर अभयारण्यातील विहिरीला पाणी लागल्यानंतर त्याचे पाणी पूजन कोणाच्या हस्ते झाले?

अ) वसंत बापट 		ब) मंगेश पाडगावकर

क) शरद पवार 		ड) अ आणि ब

**उत्तरे :**

| | |
|---|---|
| १. अ) गणेश महादेव कुलकर्णी | २. अ) डॉ. शिवराम कारंथ |
| ३. अ) राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा | ४. क) धोंडीराम नाना पाटील |
| ५. ड) श्री. तिरपुडे | ६. ब) यशवंत तांदळे |
| ७. अ) नंदकुमार कुलकर्णी | ८. ब) ताडोबा |
| ९. अ) शंकर बाळकू पवार | १०. अ) श्री. माविनकुर्वे |
| ११. ड) बी. टी. मोहिते | १२. अ) मस्टर क्लार्क |
| १३. ड) वरील सर्व | १४. अ) वृक्षमित्र धों. म. मोहिते |
| १५. ब) एल. एच. बेनकट्टी | १६. ड) अ व ब |
| १७. क) एस एस बूट | १८. ब) देवराष्ट्रे |
| १९. अ) वसंतराव दादा पाटील | २०. ब) समुद्रेश्वर |
| २१. ड) वरील सर्व | २२. ड) अ आणि ब |

**३.४ दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.**

१. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाच्या आधारे वृक्षमित्र धों. म. मोहिते यांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

२. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून यशवंतरावजी चव्हाण यांची प्रेरणा, प्रोत्साहन आणि मदतीचे चित्रण कसे आले आहे, ते तुमच्या शब्दात लिहा.

३. सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीमध्ये रेंजर एल.एच. बेनकट्टी यांनी कसा विरोध केला, त्याचे सोदाहरण वर्णन लिहा.

४. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून आलेले वनसंरक्षक माविनकुर्वे यांचे व्यक्तिचित्र सविस्तर लिहा.

५. शाहीर यशवंत तांदळे आणि मुकुंदराव किर्लोस्कर यांची व्यक्तिरेखा धों. म. मोहिते यांनी कशी रेखाटली आहे, ते लिहा.

६. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातून शरद पवार आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांची व्यक्तिरेखा कशी रेखाटली आहे, ते स्पष्ट करा.

७. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील धों. म. मोहिते यांच्या संघर्षाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

८. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील घटना प्रसंगाचे चित्रण धों. म. मोहिते यांनी कसे केले आहे, ते सोदाहरण स्पष्ट करा.

९. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील वृक्षमित्र पुरस्कार सोहळ्याचे चित्रण धों. म. मोहिते यांनी कसे केले आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

१०. धों. म. मोहिते यांना सागरेश्वर अभयारण्य उभा करीत असताना कोणकोणते अनुभव आले, ते तुमच्या शब्दात लिहा.

**३.५ लघुत्तरी प्रश्न / टीपा लिहा.**

१. सागरेश्वर अभयारण्यातील सडकेवर काम करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण धों. म. मोहिते यांनी कसे रेखाटले आहे ते लिहा.

२. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील वनमंत्री तिरपुडे यांच्या स्वभावाचे चित्रण धों. म. मोहिते यांनी कसे केले आहे, ते सविस्तर लिहा.

३. परदेशी पाहुण्यांची सागरेश्वर अभयारण्यास भेट.

४. वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते झालेले पाणी पूजन

५. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे व्यक्तिचित्र

६. वसंतरावदादा पाटील

७. मुकुंदराव किर्लोस्कर

८. गणेश महादेव कुलकर्णी (मास्तर)

९. सी. ई. ओ. लीना मेहंदळे

१०. जिल्हाधिकारी सक्सेना

११. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील साहित्यिक भेटीचा प्रसंग थोडक्यात लिहा.

१२. यशवंतरावजी चव्हाण यांच्या भेटीचे प्रसंग थोडक्यात लिहा.

१३. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील अपघाताच्या प्रसंगाचे वर्णन करा.

१४. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनातील शिकारबंदी आणि चराईबंदी प्रसंगाचे थोडक्यात वर्णन करा.

१५. ताडोबा जंगल भेटीचा प्रसंग.

**३.६ पूरक ग्रंथ :**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' - वृक्षमित्र धों. म. मोहिते, इंद्रायणी प्रकाशन, पुणे. २०२५

**संदर्भ ग्रंथ :**

१. १९५१ ते १९७४ किर्लोस्कर मासिके, किर्लोस्करवाडी यामध्ये लेख, कथा इ. विपुल लेखन.

२. 'सोनहिऱ्याचे पाणी' लघुकथा संग्रह (प्रस्तावना : मा. काकासाहेब गाडगीळ)

३. 'मुलाखतीच्या मैदानातून कथारूप मुलाखतींचा संग्रह.' (प्रस्तावना : मा. यशवंतराव चव्हाण)

४. मुंबई, पुणे, सांगली या आकाशवाणी केंद्रांवरून लोकनाट्य, कथा, श्रुतिका, नभोनाट्य, भाषण, मुलाखती इ.

५. मा. शरद पवार यांनी गौरव समिती स्थापन करून वृक्षमित्र हा गौरव अंक काढला. (१९९१)

**३.७ उपक्रम :**

१. दूरदर्शनने १०-११-१९९३ रोजी 'सागरेश्वर अभयारण्य : हरणांना अभय' हा दूरचित्रवाणी चित्रपट काढला आहे. याचे अवलोकन करून तुमच्या जवळच्या पर्यटन स्थळाची डॉक्युमेंटरी फिल्म तयार करा किंवा अहवाल तयार करा.

२. महाराष्ट्र शासनाच्या बालचित्रवाणीने (दूरदर्शन) श्री. धों. म. मोहिते यांच्यावर प्राथमिक शिक्षकांसाठी वृक्षमित्र हा दूरचित्रवाणी चित्रपट काढला आहे त्याचे अवलोकन करून लहान मुलांसाठी मार्गदर्शक (चित्रफित) रील तयार करा.

३. महाराष्ट्र शासनाच्या फिल्म डिव्हिजनने श्री. धों. म. मोहिते यांच्यावर वृक्षमित्र हा रंगीत लघुपट काढला. (१९८१) त्याचे अवलोकन करून आपल्या परिसरात निसर्ग संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करा.

४. सागरेश्वर अभयारण्यास भेट देऊन तेथील प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांचा अहवाल तयार करा.

५. सागरेश्वर अभयारण्यास भेट देऊन आपला अनुभव लिहा.

६. तुमच्या जवळच्या अभयारण्यास किंवा निसर्ग पर्यटनस्थळास भेट देऊन अहवाल तयार करा.

❍❍❍

घटक ४

# कथा सागरेश्वर अभयाण्याची : परिसर पर्यावरण लढा व भाषाशैली कथन

### ४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास,

१. अनुभव कथनाचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व समजून घेता येईल.

२. सागरेश्वर अभयारण्याचे पर्यावरणीय महत्त्व अभ्यासता येईल.

३. लेखकाच्या लेखन शैलीचा अभ्यास करता येईल.

४. कथा सागरेश्वर अभयारण्याची मधील वाडमयीन विशेष समजतील.

### ४.१ प्रस्तावना

अनुभवकथन म्हणजे एखाद्या व्यक्तीने अनुभवलेल्या घटना, प्रसंग किंवा अनुभवांचे लिखित किंवा मौखिक वर्णन. अनुभवकथन हा कथा, कादंबरी, ललित लेखनासारखाच एक प्रकार आहे. ज्यामध्ये लेखक स्वतःच्या जीवनातील अनुभव, भावना आणि विचार व्यक्त करीत असतो. मराठी साहित्यात अनुभवकथनाला महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन मराठी गद्यांमध्ये अनुभवकथनाचे मूळ शोधता येईल. ललित गद्य, लघुनिबंध यासारख्या साहित्यातूनही अनुभवकथनाचे स्वरूप पाहायला मिळते. तसेच आत्मचरित्र, आत्मकथन, प्रवास वर्णन या साहित्य प्रकारांमध्ये ही अनुभवकथनाचा प्रभाव दिसून येतो.

अनुभवकथन वाचकांना प्रेरणा देते आणि जगाकडे चांगल्या दृष्टिकोनातून पाहण्यास मदत करते. 'आत्मजागरुकता' हे अनुभवकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. अनुभवकथन वाचून लोकांना सहानुभूती आणि सहानुभूतीची भावना निर्माण होते. अनुभवकथनातून समाजाला विविध दृष्टिकोन आणि अनुभवांची माहिती मिळते. तसेच अनुभवकथन भावनिक आणि मानसिकदृष्ट्या समृद्ध करणारे असतात.

धों. म. मोहिते लिखित 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनात मोहितेंनी सागरेश्वर अभयारण्याची निर्मिती करताना सामाजिक, राजकीय, वैयक्तिक संघर्षाची कहाणी मांडली आहे. विविध कारणांनी पर्यावरणाचा होणारा ऱ्हास उघड्या डोळ्यांनी पाहणारे लेखक आपल्या उरात एक स्वप्न बाळगतात की सागरेश्वर अभयारण्याची निर्मिती. एखादा माणूस इतका निसर्ग वेडा, ध्येयनिष्ठ असू शकतो हे 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' वाचल्यानंतर कळते. आपल्या आयुष्याची २४ वर्षे त्यांनी सागरेश्वर

अभयारण्यासाठी खर्च केले. यात वैयक्तिक स्वार्थ काहीच नव्हता तर सागरेश्वराच्या डोंगरावर अभयारण्य व्हावे, पर्यावरण जागृती व्हावी, वृक्ष लागवड व्हावी, पर्यटन स्थळ निर्माण व्हावे, हा एकच ध्यास यापाठीमागे होता. आपल्या कामाच्या चिकाटीने आणि ध्येय निष्ठेने त्यांनी सागरेश्वर अभयारण्य उभारले. यासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक आणि राजकीय संघर्षाचा अभ्यास आपणास या प्रकरणात करावयाचा आहे.

## ४.२ विषय विवेचन

आपणास या घटकातील धों. म. मोहितेंचा परिसर पर्यावरणाबाबतचा लढा व संघर्ष याचा अभ्यास करावयाचा आहे. तसेच मोहितेंच्या अनुभवकथन लेखनातील भाषा व लेखनशैलीचा अभ्यास करून या अनुभव कथनाचे वाडमयीन विशेषांचा अभ्यास करता येईल.

### ४.२.१ अनुभव कथनाचे ऐतिहासिक महत्त्व

सार्वजनिक कामाचा छंद, निसर्ग वेड, वृक्षप्रेम यातून धों. म. मोहिते यांनी सागरेश्वर अभयारण्याची कल्पना सत्यात उतरवली. या अभयारण्याच्या उभारणीच्या काळात मोहितेंनी अनेक सामाजिक व राजकीय संकटावर मात केली. पण या कार्यात त्यांना बळ देणारे हजारो हात मिळाले. कोणत्याही प्रकारची स्वार्थी भूमिका न ठेवता प्रामाणिकपणे काम करीत त्यांनी सागरेश्वर अभयारण्य उभारले. त्यामुळे या अनुभवकथनाला ऐतिहासिक महत्त्वही प्राप्त झाले.

धों. म. मोहिते किर्लोस्कर मासिकाचे प्रतिनिधी म्हणून काम करीत होते. १९७० मध्ये महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाने पश्चिम महाराष्ट्रातील काही मोजक्या पत्रकारांचा विदर्भ दौरा आयोजित केला होता. फक्त पत्रकारांचा दौरा असला तरी किर्लोस्करच्या संपादकांनी विशेष परवानगी घेऊन मोहित्यांना या दौऱ्यावर पाठवले. या दौऱ्यात विदर्भातील विकास कामे, प्रेक्षणीय स्थळे, धार्मिक ठिकाणे यांचा अभ्यास करावयाचा होता. नागपूरपासून ११० कि. मी. चांदा जिल्ह्यातील ताडोबा जंगलाच्या प्रवेशद्वारावर गेटमनने बसला रोखले होते. या दौऱ्यात पीटीआयचे कुमार जोशी, प्रभातचे चंद्रकांत दीक्षित, महाराष्ट्र टाइम्सचे सुधाकर अनवलीकर, वसंतराव काणे, वसंतराव भोसले, वसंतराव गीत अशी मान्यवर मंडळी होती. ताडोबा जंगलाच्या गेटवरच गेटमनने वन खात्याचा पास नसल्याने गाडी थांबवली होती. आम्हा पत्रकारांना गेटमन पास नसल्याने थांबवतो, याचा राग पत्रकार मंडळीना येणे साहजिकच होते. या सर्वांचे पास नागपूरचे प्रादेशिक प्रसिद्ध अधिकारी वसंत चौधरी यांच्याकडे होते. ते पुढे निघून गेल्याने या पत्रकार मंडळींना थांबविण्यात आले होते.

या प्रसंगाने धों. म. मोहित्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. डोंगरात जायला परवानगी व पास लागतो. मग आमच्या गावाशेजारच्या सागरेश्वर डोंगरात कोणीही यावे, जावे, जनावरे चारावीत, वृक्षतोड करावी, गवत कापावे, प्राण्यांची शिकार करावी हे का? या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याच्या प्रयत्नात मोहिते यांना सागरेश्वर अभयारण्याची कल्पना सुचली. ती त्यांनी आपल्या सोबतच्या मित्रांना समजावून

सांगितली पण मोहित्यांच्या अभयारण्य कल्पनेला त्या सर्वांनी नावे ठेवली. धों. म. मोहितेनी मनाशी पक्का निर्धार केला की ताडोबा अभयारण्याच्या धरतीवर सागरेश्वर अभयारण्याची उभारणी करायची. हा एकट्यांना घेतलेला निर्णय ऐतिहासिक म्हणावा लागेल.

### ४.२.२ श्री क्षेत्र सागरेश्वराचे ऐतिहासिक महत्त्व

श्री क्षेत्र सागरेश्वर हे दक्षिण महाराष्ट्रातील निसर्गरम्य डोंगर कपातील वसलेले एक अति पुरातन देवस्थान आहे. कृष्णा व सोनहिरा खोऱ्यावर लक्ष ठेवून सह्याद्रीच्या रांगेत हे सागरेश्वर वसलेले आहे. याचे मूळ नाव समुद्रेश्वर पण याचा अपभ्रंश होऊन सागरेश्वर झाले. मुळात या ठिकाणाहून समुद्र शंभर कोस दूर आहे. सागरेश्वर डोंगर समुद्रसपाटीपासून २७६२ फूट उंच आहे. तरीही याचे नाव समुद्रेश्वरच आहे. समुद्रेश्वरचे हे नावही शोभतेच. कारण मुख्य पिंडीतील साळुंका बाजूस केली की आपल्या हाताला पाणी लागते. हे पाणी लोक भक्तिभावाने तीर्थ म्हणून प्राशन करतात. हे पाणी चवदार व स्वच्छ आहे. समुद्रातील पाण्यासारखे खारट नाही. समुद्राच्या पाण्यासारखा या पाण्याला अंत नाही. या पाण्याची खोली अजूनही कोणाला समजली नाही.

सागरेश्वर हे नाव असण्यामागे दुसरे एक कारण आहे मुख्य पिंडीला सकाळी स्नान घातल्यानंतर गाभारा धुतला जातो ते पाणी पिंडीवर अभिषेक पात्रातून अहोरात्र संततधार चालू असते. ते पाणी देवळालगत डाव्या बाजूस बांधलेले एका बांधू कुंडात पडते. हे कुंड पाच फूट औरस चौरस आणि तितक्याच खोलीचे बांधकाम असलेले आहे. साचलेल्या पाण्याची उंची फक्त दीड फूट आहे. कुंड स्वच्छ करण्यासाठी कुंडातील पाणी उपसणेचा बऱ्याचदा प्रयत्न झाला पण त्यातील पाणी बोटभर सुद्धा कमी होत नाही. हीच अवस्था लगतच्या तीन मोठ्या कुंडांची आहे. यातील कुंडा पैकी पहिले कुंड पिण्याचे, दुसरे आंघोळीचे व तिसरे कपडे धुण्याचे आहे. तिन्ही कुंडातील पाण्याचे रंग वेगवेगळे आहेत. तिन्ही कुंड बांधीव असून चार चार फूट खोल आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे देवळातील गाभाऱ्यातील पिंडीच्या साळुंकेखालील पाणी, देवळालगच्या गाभाऱ्यातून येणारे पाणी व या तीन कुंडातील पाणी एकाच समपातळीत असते. बारमाही पाण्याची पातळी समुद्रासारखी एकसमान म्हणूनच याला सागरेश्वर असे म्हणतात.

'सागरेश्वर माहात्म्य' या ग्रंथात 'कौंडण्यपूर'चा (आताचे कुंडल) राजा सत्यशिल याने येथे तपश्चर्येस बसलेल्या सुमित्र ऋषीच्या अंगावर कृमी किड्यांनी भरलेले एक फळ टाकले. त्यावेळी ऋषींनी शाप दिला की ज्याने 'हे कृत्य केले त्याच्या अंगावर असेच कृमी अक्षय फिरतील'. भ्यायलेल्या राजाला ऋषीने उशाप दिला की कृमी फक्त रात्रीचेच अंगावर राहतील. पुढे बारा वर्षांनी उशापाप्रमाणे सागरेश्वरावर स्नान केल्यावर राजा कृमी मुक्त झाला. त्यानंतर राजाने येथे देऊळ बांधले. आजही हे पाणी 'विमलतीर्थ' म्हणून ओळखले जाते. या मंदिरात ऋषींना तपश्चर्या करण्यासाठी दगडी बांधकाम असलेल्या १५ छोट्या ओवऱ्या आहेत. महादेवाच्या एकूण १०८ पिंडी आहेत. २७ देवळे आहेत. त्यामुळे या परिसराला 'अंबिकावन' असे म्हणतात. श्रावण महिन्यात येथे पर्वणी असते. श्रावणातील शेवटच्या सोमवारी खूप मोठी यात्रा भरते.

सागरेश्वराला पौराणिक व ऐतिहासिक संदर्भ असले तरी आता ही मालमत्ता केंद्र सरकारची आहे. केंद्र सरकारने ही मालमत्ता महाराष्ट्र शासनाकडे संरक्षणासाठी ताब्यात दिली असून महाराष्ट्र शासनाने ती देवराष्ट्रे ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिली आहे. महसूल खात्याच्या देवराष्ट्रे येथील तलाठ्याकडील सातबाराच्या उताऱ्यात तशी नोंद आहे. सध्या मंदिराची पडझड होत असल्याने मुंबईत स्थायिक झालेले चाकरमानी यांनी 'सागरेश्वर उत्कर्ष मंडळ' स्थापन केले असून वर्गणी, देणग्याच्या माध्यमातून मंदिराचा जिर्णोद्धार करीत आहेत. या ठिकाणी क्रांतीसिंह नाना पाटील यांचा अर्ध पुतळा ही उभारला आहे. इंग्रज काळातील ब्रिटिश गॅझेटनुसार सागरेश्वर देवस्थान आणि परिसराचा उल्लेख आढळतो. यामध्ये ऋषीमुनी, देवालय, जंगल, अंबिकावन यांचा उल्लेख आढळतो.

असे हे सागरेश्वर सह्याद्रीच्या शंभू महादेव फाट्याचा एक उपफाटा दक्षिणेकडे सरकत सातारा जिल्हा पार करून सांगली जिल्ह्यातील कुंडल गावाजवळ थांबतो. या उपफाट्यातच कुंडलच्या अलीकडे पाच किलोमीटर अंतरावर सागरेश्वर डोंगर येतो. सांगली जिल्ह्यातील खानापूर, वाळवा, तासगाव या तीन तालुक्यातील मोहित्यांचे वडगाव, देवराष्ट्रे, आसद, दुधारी, ताकारी आणि तुपारी ही सहा गावे या क्षेत्रात येतात.

या सागरेश्वर डोंगराला व मंदिराला पौराणिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याने हे एक चांगले पर्यटन होऊ शकते. हा डोंगर नेहमीच झाडा फुलांनी, झाडे झुडपे यांनी भरलेला असतो. पाऊस नेहमी बरसत असतो. डोंगरातील ओहोळ पावसाळ्यात निसर्ग सौंदर्य वाढवतात. छोटे छोटे धबधबे वाहत असतात. सागरेश्वर डोंगरावर बऱ्याच औषधी वनस्पती पाहायला मिळतात. त्यामुळे सागरेश्वर अभयारण्य झाले तर सांगली जिल्हा व परिसरातील पर्यटकांना एक पर्वणीस लाभेल. या हेतूनेच धों. म. मोहितेंनी सागरेश्वर डोंगराला अभयारण्याचं रूप देण्याचे ध्येय उराशी बाळगले होते. अभयारण्याला मान्यता मिळवून देण्यासाठी मोहितेंनी जे प्रयत्न केले त्याचा संक्षिप्त अहवालच या अनुभव कथनात येतो. या अभयारण्याचा एक इतिहासच या अनुभवकथनातून लिहिला गेला आहे. कोणत्याही अभ्यासकाला अभयारण्याची माहिती मिळवायची असेल तर हे अनुभवकथन त्याला एक नवी दिशा देईल. धों. म. मोहितेंनी अनुभवकथनातून सागरेश्वर डोंगर व मंदिराचा इतिहासच आपल्यासमोर मांडला आहे. या डोंगराचे महत्त्व व अभयारण्य झाल्यानंतर सागरेश्वर व परिसराला येणारे महत्त्व त्यांनी पुन्हा पुन्हा अधोरेखित केले आहे.

### ४.२.३ अनुभवकथनाचे सामाजिक व पर्यावरणीय महत्त्व

अनुभवकथन करताना कोणताही लेखक एक मुख्य हेतू समोर ठेवून करत असतो. सागरेश्वर अभयारण्याच्या निर्मितीचा अनुभवकथन करण्यापाठीमागे धों. म. मोहितेंचाही तसाच हेतू असावा. सागरेश्वर अभयारण्याचा अभयारण्य होणे का गरजेचे आहे हे वारंवार शासन व शासन प्रतिनिधींना त्यांनी पटवून दिले. या अभयारण्यामुळे सामाजिक व पर्यावरणीय महत्त्व कसे आहे हे त्यांनी समाजाला व शासकीय प्रतिनिधींना, आमदार, खासदार, शासन कर्मचारी यांना पटवून दिले. सागरेश्वर अभयारण्य हे शिकारी, जनावरे चरण्यासाठी, झाडाझुडपांची तोड करण्यासाठीच कामी येत होते. सागरेश्वराचा एकूण परिसर पाहता

या डोंगराचा विकास केला तर सागरेश्वर परिसराला ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक महत्त्व प्राप्त होणार होते. आपला देश स्वातंत्र्य झाल्यानंतर 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थच लोकांनी आपल्याला सोयीस्कर असा लावून घेतल्याने धों. म. मोहिते म्हणतात, 'जंगलतोड तर ती लोकांनी हक्काचीच करून ठेवली. सरपण, अवजारे, जळण यासाठी सागरेश्वर डोंगरावरील झाडांची बेसुमार कत्तल झाली. दऱ्याखोऱ्याचा प्रदेश, भरपूर पाणी यामुळे पन्नासाठ दारूच्या हातभट्ट्या सुरू होत्या. लिंगदरी, नागदरी हे या भट्टयांचे ठिकाण असे. गुराढोरांचे मालक तर हा डोंगर आपल्याच मालकीचा असल्यासारखे गुराढोरांना दररोज चरायला नेत असत. छोट्या छोट्या प्राण्यांची शिकार हौसे शिकारी करीत होते. यामुळे सागरेश्वर डोंगराची वर्षानुवर्षे हाणीच होत होती. झाडांची तोड होत होती. पण पुन्हा झाडांचे रोपण होत नव्हते. भकास डोंगर व्हायला लागला होता. हे सर्व धों. म. मोहित्यांना पहावत नव्हते. त्यांच्यातील देशसेवक, सामाजिक कार्यकर्ता जागा होत होता आणि अभयारण्य करण्याचे ध्येय त्यांच्या मनोमन भिनत चालले होते. जंगलतोड थांबवावी म्हणून सरपंच या नात्याने मोहितेनी अनेक प्रयत्न केले. त्याकाळच्या सातारा फॉरेस्ट डिव्हिजनला ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांनी प्रयत्न केले. कराडच्या रेंज ऑफिसला जाऊन तेथील रेंजर एल. एच. बेनकट्टी यांच्याशी वाद घातला. पण त्यांनी नोकरांना दम देण्यापलीकडे काहीच केले नाही. हेड क्वार्टर्स डोंगरापासून दहा-बारा मैल दूर असल्याने जंगलतोड ते थांबू शकत नव्हते. वनसंवर्धन करणे गरजेचे होते. पण कामाच्या मर्यादा येत असल्याने मोहितेंचा नाईलाज होत होता. त्यातूनही ग्रामपंचायत व गावाला भेट देण्यासाठी येणाऱ्या सरकारी अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून घेतले जात असे.

सागरेश्वर अभयारण्य करण्याचे वेड मोहित्यांच्या डोक्यात शिरले. ते म्हणतात की, ''एखादे सार्वजनिक काम मी मनावर घेतले, की ते पूर्ण केल्याशिवाय पूर्णविराम नाही. ते तडीस नेत असताना अधेमध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्हे येतातच. पण ती पार करून मी अखेर पूर्णविराम गाठतोच. दारुड्या सारखी मला त्या सार्वजनिक कामाची नशा चढते. या नशेतच असताना मला शारीरिक, मानसिक त्रास होतो, खिसा मोकळा होत असतो पण असल्या किरकोळ बाबी माझ्या गावीही नसतात.'' अभयारण्य बनविण्यात मोहितेंनी स्वतःला समर्पित करण्याचे ठरविले होते. त्यादृष्टीने ते प्रयत्न करीत होते. याचाच एक भाग म्हणून त्यांनी पहिल्यांदा आपल्या गावात वीज आणण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन मंत्री स. गो. बर्वे यांच्या सहकार्याने दि २८/३/१९६५ रोजी गावात वीज दाखल झाली. फक्त गावातच वीज आली नाही, तर शेती शिवारालाही वीज पुरवठा करण्यात आला. त्यांच्या या कार्याचे कौतुक म्हणून एक वीज अधिकारी म्हणाले, 'शेतीसाठी वीज देण्याकरीता चालू साली सांगली जिल्ह्याला दोन लाख रुपये मंजूर होते. त्यापैकी एकट्या मोहित्यांच्या वडगावला पाऊण लाख रुपये खर्च पडले. आपल्या गावच्या संपूर्ण शिवारात एकाच वेळी वीज फिरविणारे तुम्ही महाराष्ट्रातील एकमेव सरपंच आहात.' अधिकारी व सामान्य जनतेतूनही मोहित्यांच्या कामाची दखल घेतली जात होती.

सार्वजनिक कामासाठी मोहित्यांच्या वडिलांनी त्यांना पूर्ण मोकळीक दिली होती. मोकळीक देत असताना त्यांनी सक्त ताकीद ही दिली होती की, 'सार्वजनिक कामाकरिता प्रवास खर्चासाठी मी तुला हवे

तेवढे पैसे देत जाईन  पण त्या कामातून कोठे अपहार केल्याचे मला थोडे जरी समजले तरी मी तुला शेतीत घालीन.' एकूणच मोहिते यांच्या घरातूनही त्यांच्या सार्वजनिक कामाला विरोध नव्हता.

सार्वजनिक काम करताना मोहितेनी  शासकीय अधिकाऱ्यांबद्दल गोड समाज करून घेतला होता की 'कर्तबगार आणि कर्तव्यदक्ष शासकीय अधिकारी अगदी पोलीस सुद्धा यांच्याकडे एक अदृश्य तराजू असतो. काम घेऊन येणाऱ्या समोरच्या कार्यकर्त्याला त्या तराजूत  ते बरोबर जोखत असतात. यात याचा काही स्वार्थ आहे की परमार्थ याचा ते बरोबर अंदाज घेतात'. शासकीय अधिकाऱ्यांच्याकडून काम करून घेण्याची मोहित्यांची हातोटी होती. अभयारण्य उभारणीच्या कार्यात मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेबांचे फार मोठे योगदान आहे. यशवंतराव चव्हाण यांनी बऱ्याच वेळा अभयारण्य उभारणीत येणाऱ्या अडचणींना योग्य मार्ग दाखवण्याचे काम केले. अप्रत्यक्षपणे यशवंतराव चव्हाण यांचा सहभाग जास्त होता. यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे पहिल्यांदा अभयारण्याचा आराखडा तयार झाला. या आराखड्यात पाच चौरस किलोमीटर वनक्षेत्रास काटेरी तारेचे कुंपण, अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, सागरेश्वर, लिंगेश्वर, कमळभैरव, पीरमलिक, नागेश्वर या देवालयांच्या परिसरात बाग बगीचा, झाडांच्या लागवडीसाठी खड्डे पाडणे, रोपवाटिका, वनीकरण, तीन किलोमीटर पक्की सडक, गेस्ट हाऊस, काळवीट, चितळ, मोर, ससे इत्यादी पशुपक्षी सोडणे आदी विकास कामे या आराखड्या धरण्यात आली होती.  याचा एकूण अंदाजित खर्च पाच लाख, तीस हजार रुपये इतका होता. या आराखड्याबरोबर कार्यक्षेत्रातील पाच धार्मिक स्थळांबरोबर घोडेबीळ, डुक्करदरा, बामनदरा, खोलओढा, जुना सागरेश्वर, लांडगे घळ, होंड बागेची सोंड, आवाजी पठार, कोल्हेबीळ, कमळभैरव, दीपमाळ, धावडबन  रणशुळ, महानगुंड, फेटा उडवी, गुप्तगुहा आदी ठिकाणेही नमूद करून सांगली जिल्ह्यासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ म्हणून ते सुचविण्यात आले होते.

काही वेळा सार्वजनिक काम करीत असताना समाजातील लोकांकडून विरोध होण्याची शक्यता असते. अभयारण्याचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वीच काही लोकांनी विरोध केला. डोंगरात चरण्यासाठी भरपूर जनावरे येत होती. मोहित्यांच्या गावातील काही गुराखी जनावरांना घेऊन येत. त्यांना मोहितेंनी चराईबंदी असल्याचे सांगितले. त्यानंतर हळूहळू गुरे चरण्याचे बंद झाले. पण अचानक एक दिवस एका भक्ताच्या अंगात देवी संचारली आणि म्हणू लागली, ''अभयारण्य करून जो मुक्या जनावरांना चरायची बंदी करतोय, त्यांच्या तोंडावर मारतोय, त्याच्यावर देवीचा कोप झालाय. देवी त्याला बघून घेईल, त्याचं वाटोळ होईल.'' पण भक्ताच्या या म्हणण्याने मोहित्यांच्या कामावर काही परिणाम झाला नाही. जळणासाठी झाडे तोडणाऱ्यांनाही बंदी केली, पण यात एक मोठा प्रश्न होता तो दारूभट्ट्यांचा. दारूभट्ट्यांना लागणारे लाकूड तोडले जायचे याबद्दल मोहिते यांनी दारूबट्टी चालकांना बंद करण्याबाबत सांगितले. पण ते ऐकण्याच्या मन:स्थितीत नसल्याने केंद्रीय गृहमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या आणि वसंतदादा पाटील, पोलीस यांच्या सहकार्याने दारूभट्ट्या कायमच्या बंद करण्यात आल्या.

अभयारण्याच्या कामामुळे मोहिते सागरेश्वरावर नेहमी जात. एके दिवशी बापू बिरू वाटेगावकर

खुनाच्या आरोपाखाली जे फरार होते ते भेटले. बापू बिरूंच्या जवळ जनावरे चरायला बंदी केल्याची कोणीतरी सांगितले असावे पण बापू बिरुनी मोहिते यांना कोणतीही धमकी न देता विनवणी वजा गुरे चरायचे बंद करू नका म्हणून सांगितले. अभयारण्याबाबत लोकांच्यामध्ये जनजागृती करण्यासाठी शाहीर शाहीर तांदळे यांची मदत झाली. तांदळेंनी सागरेश्वर अभयारण्यावर पोवाडा रचला आणि तो पोवाडा गावागावात सादर करीत असत. यामुळे हळूहळू सांगली जिल्ह्यात अभयारण्याचे वारे पसरू लागले. सागरेश्वर अभयारण्यासाठी सहा ग्रामपंचायतीचे ठराव आवश्यक होते. त्यापैकी देवराष्ट्रे, मोहित्यांचे वडगाव, आसद, दुधारी, ताकारी या पाच गावाने ठराव दिले. पण तुपारी (तालुका तासगाव) या ग्रामपंचायतीने ठराव देण्यास विरोध केला. उलट सरपंचांनी त्या गावातील लोकांनाही भेटू दिले नाही. सरपंच पाहुणे असूनही त्यांनी 'तुम्ही माझ्या किंवा माझ्या गावच्या नादाला लागू नका मी तुमचे अभयारण्य होऊ देणार नाही' असे स्पष्टपणे सांगितले. शेवटी कलेक्टर सक्सेना यांच्या मदतीने त्या गावाचा नकाशा मिळवून ताकारीचे वनक्षेत्र गायरान म्हणून नोंद होते. वनक्षेत्राची नोंद फॉरेस्ट व मालकी वहिवाट सरकार अशी होती. शेवटी कलेक्टर साहेबांनी फॉरेस्ट नोंद रद्द करून गायरान अशी नोंद लावली. गायरान कोणत्याही कारणासाठी देता येत नाही. हे तुपारी गावच्या सरपंचांना माहीत असल्याने त्यांनी विरोध केला. त्या गावात राजारामबापूंच्या कार्यकर्त्यांची सत्ता असल्याने शेवटी राजाराम बापूंना भेटून हा प्रश्न मार्गी लावण्याचे ठरवले. पण तुपारीच्या सरपंचांनी राजारामबापूंचेही म्हणणे ऐकले नाही.

सचिवालयाकडून अभयारण्यासाठी परवानगी नाकारण्यात आली. यावरून वनमंत्री तिरपुडे साहेब व मोहित्यांचे मतभेद झाले. यानंतर यशवंतराव चव्हाण व वसंतदादा पाटील यांची भेट घेऊन झाला प्रकार सांगितला. त्यानंतर लगेचच वनमंत्री तिरपुडे यांनी अभयारण्याला मंजुरी देऊन तीन लाख रुपये मंजूरही केले. यानंतरच खऱ्या अर्थाने अभयारण्याच्या कामाला सुरुवात झाली. येणाऱ्या निधीतून अभयारण्यात विविध रोपांची लागण करण्यास सुरुवात झाली. तुपारीच्या लोकांनी मात्र पुन्हा जनावरे चरण्या सोडण्यास सुरुवात केली. यासाठी कोंडवाडा सुरू करून काही रक्कम दंड म्हणून ठेवण्यात आली. काही लोकांनी मोहित्यांना धमक्या देण्यास सुरुवात केली. पण या धमक्यांना मोहिते नमले नाहीत.

१९७२ साली पावसाने दडी मारली. भयंकर दुष्काळाचे सावट निर्माण झाले. यशवंतराव चव्हाण यांनी हेलिकॉप्टर मधून अभयारण्याची देखरेख केली. नागपंचमीच्या सणानिमित्त अभयारण्यात शिकार करण्याची पद्धत होती. त्यालाही मोहितेंनी अधिकाऱ्यांच्या मदतीने विरोध केला. दुष्काळामुळे शेती बागायतदार, सामान्य शेतकरी, मजुरावर उपासमारीची वेळ आली. त्याच वेळी पाच किलोमीटर सडकेची परवानगी मिळाली. परिसरातील लोकांच्या सहकार्याने मजुरीने सडकेचे काम मार्गी लागले. मोठे मोठे बागायतदार शेतकरीही या सडकेच्या कामावर येऊ लागले. परंतु या सगळ्यात धों. म. मोहितेंना शारीरिक, मानसिक त्रास फार झाला. सडकेच्या कामात दुष्काळात लोकांना धान्याची मदत झाली. सडकेचे काम चालू असताना एका दगडावर गणपतीची चित्र दिसले. गणपती सापडल्याची बातमी सर्वत्र पसरली. भक्तीभावानी लोक गणपतीची पूजा करू लागले. यातच गावटग्यांनी मोहित्यांवर भ्रष्टाचार करत आहेत

म्हणून तक्रार केली. दोन दिवस सडकेचे काम बंद पडले. गावटग्यांनी सडकेचे काम आपले हाती घेतले पण दिवसभर होणारा त्रास सोसवेना, म्हणून त्यानी ते काम सोडले. शेवटी मामलेदारांनी मध्यस्थी करून पुन्हा मोहिते यांच्यावर सडकेच्या कामाची जबाबदारी दिली. सडकेच्या कामावर स्त्रियांची संख्या जास्त होती. यात बागायतदार घराण्यातील स्त्रिया होत्या. त्यांना पुरुषांपासून स्वतंत्र ठिकाणी काम दिले गेले. वर्षभरात सडकेच्या कामाची पूर्तता झाली. सडकेवरून वाहने धावू लागली. याच दरम्यान पुन्हा एकदा बापू बिरू वाटेगावकरांची भेट झाली. पण त्यांनी मोहित्यांना त्यांच्या कामाबद्दल शाबासकीच दिली.

चांगल्या कामात कधी कधी संकटे येत असतात. अभयारण्याच्या कामात पॅगोड्याचे काम सुरू केले. कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने मंजूर झाली होती. त्याची पूर्वतयारी म्हणून ट्रकने दगड ओढायचे काम चालले होते. यावेळी घाटात ट्रकचे ब्रेक निकामी होऊन दगडाने भरलेला ट्रक घाटाचा कठडा तोडून खाली २५/३० फूट खोल दरीत कोसळला. यात एका मजुराचा मृत्यू तर दोन मजूर गंभीर जखमी झालेले होते. यामुळे थोडे वातावरण गंभीर झाले होते. मृत्यू झालेला मजूर रामोशी वाड्यातील होता. रामोशी वाड्यातील वातावरण भयानक गंभीर होते. पण १९४२ च्या चळवळीतील सखाराम शिरतोडे या मोहितेंच्या सहकाऱ्याने मजुराच्या प्रेताला अग्नी मोहितेंनीच द्यावा; अशी विनंती केली यामुळे वातावरण शांत झाले.

### ४.२.४ पर्यावरणीय महत्त्व

सागरेश्वर अभयारण्याला पर्यटन केंद्र व्हावे, ही धों. म. मोहितेंची इच्छा होती. यासाठी येणाऱ्या पर्यटकांची राहण्या जेवणाची सोय करणे महत्त्वाचे होते. यासाठी मोहितेने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे मदतीची मागणी केली. पण त्यात त्यांना यश आले नाही.

फॉरेस्ट आणि टुरिझम या एकाच नाण्याच्या दोन बाजू. फॉरेस्ट म्हणजे निसर्ग. निसर्गाशी संबंधित जे जे आहे ते सर्व सागरेश्वर अभयारण्यात होते. गर्द वनराई, वन्य पशुपक्षी, व्ह्यू पॉईंट्स, धार्मिक ठिकाण, प्रसन्न मोकळे वातावरण, थंडगार वारे, कड्याची चढण, दऱ्या खोऱ्या, धबधबे, पशुपक्षी (ससे, कोल्हे, लांडगे, तरस, साळींदर, मोर). सुरुवातीला मृग विहार करण्याचे ठरवले. वनसंरक्षक म्हणून प्र. प्र. जोशी बदलून आले. त्यांनी सागरेश्वर अभयारण्याला भेट दिली. श्रावणातील सोमवारी इथे आल्याने त्यांना सागरेश्वरावर माणसांची गर्दी दिसली. अभयारण्यात फिरणाऱ्या लोकांना पाहून मुलांसाठी खेळणी बसवण्याची त्यांनी मान्य केले. त्यानंतर रेड्डी साहेबांनी मृग विहारासाठी जागा निश्चित केली. मृगविहारासाठी विहीर खोदण्याचे काम चालू होते. त्यावेळी मराठीतील ख्यातनाम कवी वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर तेथे आले होते. त्यांच्या पदस्पर्शाने विहिरीला पाणी लागले असे मानून त्यांच्याच हस्ते विहिरीच्या पाण्याचे पूजन केले. हरणांसाठी ७.५ हॉर्स पावरच्या विद्युत पंपाचे उद्धाटन यशवंतराव चव्हाण साहेबांच्या हस्ते झाले. त्यावेळी मोहित्यांबद्दल 'विधायक कार्यकर्ता आणि शासन यंत्रणा यांच्या कर्तृत्वाचा सुरेख संगम म्हणजे हे सागरेश्वर अभयारण्य' असे उद्गार काढले. अभयारण्यासाठी बोरिवली, पाल, अमरावती, आंबोली, भीमाशंकर येथून काळवीट, चितळ, सांबर, भेकर, चिंकार या जातीची १६/१७ हरणे आणली होती. त्यांची संख्या वाढून ती शंभरावर गेली.

तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजीराव पाटील यांनी युवक युवतींना राहण्यासाठी युवागृह बांधण्यासाठी पाच लाख रुपये निधी दिला. जिल्हाधिकारी शिवाजीराव शिंदे यांनी अल्पबचत मधून एक लाख तीस हजार, शरद पवार यांनी मुख्यमंत्री निधीतून ६४००० रुपये निधी दिला. अभयारण्यात श्रम शिबिरे, चर्चासत्रे, परिषदा, परिसंवाद, एनसीसी कॅम्प होत होते. सांगलीचे कृषिभूषण प्रशांत ठाकूर यांनी ''हे अभयारण्य म्हणजे धों. म. मोहिते यांनी स्थापन केलेले निसर्गाचे मुक्त विद्यापीठ आहे'' असे गौरवोद्गार काढले होते.

अजिबात पाणी न देता इथली झाडे वाढतात कशी?, कोणकोणत्या जातीची झाडे आहेत?, या झाडापासून फायदा काय?, जंगल असले की पाऊस पडतो हे कसे? असे अनेक प्रश्न पर्यटक वन कर्मचाऱ्यांना विचारून येत असत. यातून पर्यटकांच्या ज्ञानात भर पडत असे. जनजागृती करून निसर्गप्रेम, वन्यप्राणी प्रेम निर्माण करण्याचे महान कार्य सागरेश्वर अभयारण्याने केले आहे. यातील महत्त्वाचा उपक्रम म्हणजे वृक्षदिंडी होय. रेंजर सत्तार व धों. म. मोहितेंच्या कल्पनेतून वृक्षदिंडीची कल्पना सुचली. वन महोत्सवानिमित्त वृक्षदिंडी काढण्याचे ठरविले. सागरेश्वर अभयारण्यातील दुसऱ्या वन महोत्सवानिमित्त ताकारी, देवराष्ट्रे, मोहित्यांचे वडगाव येथील हायस्कूलचे विद्यार्थी बोलवून पालखी सजवण्यात आली. त्यात पाच रोपे ठेवून बँड, धनगरी ढोल, लेझीम, घोषणा देत मिरवणूक काढून मुलांच्या हस्ते वृक्षारोपण केले. या वृक्षदिंडीचा फारच गाजावाजा झाला. पुढे सांगली जिल्ह्यात सर्वत्र अशी वृक्षदिंडी काढायची ठरवले व तो प्रयोग यशस्वी झाला. प्रा. एन. डी. पाटील मंत्री असताना सांगली जिल्ह्यातील शाळा कॉलेजला आवाहन करून सागरेश्वर अभयारण्यातील काही क्षेत्र दत्तक घेऊन युवकांनी त्या क्षेत्रात श्रमदानाने वनीकरण करण्यात आले. वनीकरणाचा हा उपक्रम सलग दहा-बारा वर्षे राबविण्यात आला. दिनांक २५/०८/१९७८ रोजी नागपूर येथे वन्यप्राणी सल्लागार समितीची बैठक होऊन 'सागरेश्वर अभयारण्य' मान्यता देण्याचा ठराव पास करण्यात आला. १९८१ मध्ये सागरेश्वर अभयारण्य स्वतंत्र रेंज म्हणून मान्यता मिळाली.

सागरेश्वर अभयारण्य हे भारतातील एकमेव मानवनिर्मित अभयारण्य होय. डेहराडून येथील वाईल्ड लाईफ ट्रेनिंग सेंटर मध्ये तशी नोंद करण्यात आली. या अभयारण्याचे वैशिष्ट्य म्हणजे सांगली जिल्ह्यातील जनता अभयारण्य म्हणूनच ओळखते. सागरेश्वर म्हटले की फक्त देवस्थानच नजरेसमोर येते.

आज या सागरेश्वर अभयारण्याला लाखो पर्यटक भेट देत असतात. तेथील झाडे झुडपे, पशुपक्षी, प्राणी यांची संख्या वाढली आहे. गेल्या ४०/४५ वर्षात सागरेश्वर अभयारण्यात अनेक बदल झाले असतील. पण धों. म. मोहितेंनी जे अभयारण्य उभा केले त्या अभयारण्याचे आजचे विस्तृत रूप पाहून त्यांच्या कार्याला सलाम करावासा वाटतो.

### ४.३ वाङ्मयीन विशेष, भाषाशैली

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभव कथनात धों. म. मोहितेंनी स्व-अनुभव मांडला आहे.

अभयारण्याची निर्मिती कशी झाली याचे विवेचन त्यांनी केले आहे. अनुभवकथन हा वाङ्मय प्रकार असला तरी त्याचे काही गुणविशेष पाहायला मिळतात. त्यामुळे 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाचे काही वाङ्मयीन विशेष पाहायला मिळतात.

**१. आत्मनिष्ठ लेखन**

आत्मनिष्ठ लेखनात लेखकाचे अनुभव त्याच्याच शब्दात मांडले जातात. त्यामुळे लेखक 'मी' या भूमिकेतून लेखन करीत असतो. 'प्रथम पुरुषी एकवचनी' या निवेदन पद्धतीचा पुरेपूर वापर अनुभवकथनात येतो. लेखक आपल्या आयुष्यातील घटना, संघर्ष, अपयश, विचार याच्या नोंदी तो 'मी' या नात्याने करीत असतो. यात वास्तववादी खऱ्या घटना आठवणींच्या स्वरूपात ही मांडतो. केवळ घटना प्रसंग न सांगता त्या घटनामागील आपल्या भावना, विचार आणि आंतरदृष्टी तो मांडत असतो 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या शीर्षकात 'कथा' हा शब्द जरी असला तरी ती कथा नसून अनुभवकथन आहे. हा अनुभव घटना प्रसंगानुसार क्रमाक्रमाने पुढे सरकत जातो. मोहित्यांनी अभयारण्य निर्मितीत आपल्याकडून झालेल्या प्रयत्नांचा अनेक चांगल्या वाईट अनुभवांना कथन केले आहे. यात 'मी' आहे पण या 'मी' ला कुठेही मीपणाचा लवलेशी आलेला नाही. सर्व प्रसंग जसे घडले तसे मांडण्याचा प्रयत्न केल्याने हे अनुभवकथन उत्तमरीत्या पूर्ण झालेले आहे. हे अनुभवकथन वाचताना लेखकातील सच्चा कार्यकर्ताच दिसून येतो. याबरोबरच लेखकाचे व्यक्तिमत्व विचार आणि भावना वाचकापर्यंत पोहोचत असतात. त्यानुसार मोहिते यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध पैलू या अनुभवकथनातून दिसून येतात. निर्भीड, स्वाभिमानी, वृक्षप्रेमी, समाजकारणी, राजकारणी, हळवेपण इत्यादी लेखकाची अनेक स्वभाव वैशिष्ट्ये दिसून येतात.

**२. ललित गद्याचा प्रकार**

अनुभवकथन हा ललित गद्याचाच एक प्रकार आहे. लेखकाने स्वतःच्या आयुष्यातील एखादा प्रसंग, घटना, अनुभव, स्वतःचे कार्यकर्तृत्व वाचकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी अनुभवकथन प्रकार या ठिकाणी वापरला आहे. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या कथनातही मोहितेंनी अभयारण्य निर्मितीच्या काळात आपल्याला आलेले अनुभव प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ललित गद्यात जशी अलंकारिक भाषा येते, तशी भाषा मात्र या ठिकाणी कोठेही आढळून येत नाही. उलट ७०-८० च्या दशकातील ग्रामीण व प्रमाणभाषा वापरली आहे. निखळ आपल्याशी केलेला संवाद असेच या अनुभव-कथनाचे स्वरूप आहे.

**३. घडलेल्या घटनांचे हुबेहूब वर्णन**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनात अनेक घटना प्रसंग पहायला मिळतात. या कथनाची सुरुवात राष्ट्रपती भवनात लेखक इंदिरा प्रियदर्शनी पुरस्कार स्वीकारतानाच्या प्रसंगाने होते. यानंतर

ताडोबा अभयारण्याला लेखक व पत्रकार मित्रांनी भेट दिल्याचा प्रसंग येतो. रात्रीच्या काळोखात  ताडोबा अभयारण्यात गेल्यानंतर तिथे सुरक्षारक्षकाने अडवण्याचा प्रसंग, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांना भेटण्याचा, प्रसंग बापू बिरू वाटेगावकर भेटण्याचा प्रसंग, शाहीर तांदळे यांचा पोवाडयाचा कार्यक्रम, वनमंत्री तिरपुडे यांच्या भेटीचा प्रसंग, यशवंतराव चव्हाण यांची हेलिकॉप्टर मधून अभयारण्यास भेट, दुष्काळात सडक तयार करताना अपघाताचा प्रसंग असे अनेक घटना प्रसंग मोहितेने हुबेहूब वर्णिले आहेत. त्यामुळे या अनुभवकथनातील सच्चेपणा पूर्णता अनुभवता येतो.

**४. विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब**

या अनुभवकथनाला मुळातच समाजकारणाचा धागा आहे. मोहिते हे मोहित्यांचे वडगाव या गावचे कित्येक वर्षे सरपंच होते. आपल्या गावात पाणी, वीज, महिलांसाठींचे कार्यक्रम इत्यादीसाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या वडिलांनीच त्यांना समाजकारणाचे बाळकडू दिले होते. प्रामाणिक आणि निष्ठेने समाजाची सेवा करण्याचा उद्देश दिला होता. आपल्या कार्यातून आणि विचारातून आपला गाव व परिसरातील अनेक कार्यकर्ते त्यांनी गोळा केले होते. त्याला स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाची जोड होती. आपले काम जर प्रामाणिक असेल तर आपल्या कार्यात कोठेही तडजोड करावी लागत नाही. याचा परिचय सागरेश्वर अभयारण्याच्या निर्मितीत मोहिते यांना वारंवार आला होता. अभयारण्य निर्मिती होणे का गरजेचे आहे, हे त्यांनी अगदी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, शासकीय अधिकारी, ग्रामस्थ यांना पटवून दिले होते. तसेच त्यांच्या कामातील सच्चेपणा, निष्ठा पाहून मंत्री स. गो. बर्वे, कॉंझर्वेटर साहेब, राजारामबापू पाटील, वनमंत्री तिरपुडे साहेब, सांगलीचे कलेक्टर साहेब, मामलेदार, बेनकट्टी साहेब अशा सर्व लोकांनी त्यांच्या कार्याला चालना दिली. मोहितेंनी अभयारण्यात काढलेले वृक्षदिंडी हा उपक्रम तर संपूर्ण सांगली जिल्ह्यात चर्चेचा ठरला. कोणीही प्रामाणिक आणि सच्चेपणाने काम करीत असेल तर त्याच्या पाठीशी अख्खी दुनिया असते. अभयारण्य निर्मितीत मोहितेंना अनेक वेळा विरोध झाला, अपयश आले पण हार न मानता त्या कामाचा पाठपुरावा करण्याची कृती हेच त्यांच्या यशाचे गमक होते.

**५. सामाजिकता**

समाजातील अनेक वास्तव अनुभवांना त्यातील प्रश्नांना लेखक समोरासमोर भेटताना दिसतात. तळागाळातील अगदी खेड्यातील भावकी, शेताच्या बांधापर्यंत अनेक प्रश्न आहेत. कामगार, शेतकरी, देवदासी, शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, नोकरी, तरुणांच्या समस्या असे  अनेक प्रश्न आणि समस्या आहेत.  अशा अनेक प्रश्नांवर लेखक अनुभवकथन करीत असतो. अलीकडच्या काळात वृक्ष लागवड, अनियमित पर्जन्य, दुष्काळ असे प्रश्न निर्माण होत आहेत. धों. म. मोहितेंनी ताडोबा जंगलाला भेट दिल्यानंतर आपल्या गावाजवळील सागरेश्वर डोंगरावर असेच अभयारण्य करता येईल, असा विचार मनात आणला आणि तो पत्रकार मित्रांना सांगितला पण या विचारांची त्यांनी थट्टाच केली. गावी परतल्यावर सागरेश्वर अभयारण्य निर्माण करायचेच या एका ध्येयाने ते कामाला लागले. तिथे व्यक्तिगत स्वार्थ नव्हता,

तर सामाजिक भान महत्त्वाचे होते. सामाजिक काम म्हटले की त्याला विरोध हा आलाच. या अभयारण्याच्या परवानगीला आजूबाजूच्या चार-पाच गावाचा ठराव लागणार होता. तुपारीच्या संरपंचानी विरोध केला. यावरही मार्ग काढून त्यांनी अभयारण्याला परवानगी मिळवली. गावटग्यांनी सडकेच्या कामात मोहिते भ्रष्टाचार करतात असा दंगा केला. सडकेच्या कामाच्या वेळी अपघातात एक मजूर मरण पावला. त्यावेळीही आपल्यावर त्या मजुराच्या मृत्यूचे खापर फोडले जाईल असे वाटत असतानाही रामोशी समाजाने त्या मजुराच्या प्रेताला अग्नी द्यायला लावला. अनेक राजकीय, सामाजिक, शासकीय अधिकाऱ्यांचे हातभार या अभयारण्याच्या कामाला लागले. त्यांच्याच कल्पनेतून वृक्षदिंडी सारखा उपक्रम संपूर्ण सांगली जिल्ह्यात राबवला गेला. सांगली जिल्ह्याला सागरेश्वर अभयारण्य पर्यटन स्थळ म्हणून मिळाले. या संपूर्ण प्रवासात मोहितेंनी आपल्या संसाराकडे घराकडे दुर्लक्ष केले. स्वतःच्या खिशातून पदरमोड करून अभयारण्य उभारले. मोहितेंच्या या सामाजिक कार्याची दखल वाचक व समाजाने घेणे गरजेचे आहे.

**६. पर्यावरणीय भान**

उपभोगवादी आणि चंगळवादी जीवनशैलीत निसर्गाचे व एकूणच पर्यावरणाकडे आपले दुर्लक्ष होत आहे. वारंवार वृक्षतोड, बदलते ऋतुचक्र, दुष्काळ या समस्या वाढतच चालल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतंत्र झालेल्या सर्वसामान्य माणसावर बंधने लादली गेली. पण या बंधनांना झूगारून लोकांनी आपल्याला हवा तसा निसर्गाचा वापर करून घेतला. मोहित्यांना ताडोबा जंगलाच्या भेटीवरून सागरेश्वर अभयारण्याची कल्पना सुचली. त्यांनी अभयारण्य निर्मितीचा ध्यास घेतला. अभयारण्य निर्मितीमागे पर्यावरण बचाव व पर्यटन स्थळ निर्माण व्हावे हा मुख्य हेतू होता. सागरेश्वर डोंगरावर मुळात अनेक प्रकारचे वृक्ष होते. त्याची बेसुमार कत्तल होत होती. जर हे वृक्षांची कत्तल थांबली तर पर्यावरणाच्या दृष्टीने चांगलेच होते. त्यामुळे मोहिते यांनी अभयारण्यात विविध जातींच्या वृक्षाची लागवड करून घेतली विजेचा प्रश्न सोडविला. अभयारण्यात पाण्याचा प्रश्न होता. त्यासाठी नवीन विहीर खोदली. मृग विहाराचा प्रयोग केला. अनेक सांबर, काळवीट, कोल्हा, हरीण यासारखे प्राणी अभयारण्यात सोडले. अभयारण्यातील कच्चे रस्ते तयार करून घेतले. वृक्षदिंडी सारखा उपक्रम राबविला. पर्यावरण पूरक अनेक उपक्रम हाती घेऊन अभयारण्य निर्माण केले.

**७. रोजनिशीचा / दैनंदिनी प्रभाव**

दैनंदिन अनुभवांची लिखित नोंद राखणारा एक लवचिक वाडमय प्रकार आहे. मुळतः काही व्यावहारिक उद्दिष्टातून निर्माण झालेल्या दैनंदिनीला पुढे काळाच्या ओघात तिच्या आशयप्रकृतीनुरूप वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक, तत्त्वचिंतनात्मक अशी अनेक परिमाणे लाभत गेली. अनेक विविध क्षेत्रातील भिन्न भिन्न कर्तृत्वांच्या व्यक्तींना या प्रकारचे आकर्षण वाटत आले आहे. दैनंदिनीचे दोन प्रकार पडतात. एक घटना प्रधान वस्तुनिष्ठ दैनंदिनी पाहिलेल्या व ऐकलेल्या घटनांचा त्याच दिवशी केलेल्या सलग व संक्षिप्त नोंदी. दुसरा प्रकार म्हणजे ललित साहित्यात समाविष्ट होणाऱ्या वैयक्तिक साद

प्रतिसादावर लक्ष केंद्रित करून भावभावना, कल्पनातरंग, चिंतन, मनन आणि विचार, विकार यांचा सजीव बोलका आलेख शब्द रुपात साकार करतात.

दैनंदिनी म्हणजे अशी वही किंवा पुस्तक ज्यामध्ये एखादी व्यक्ती आपल्या दररोजच्या घटना अनुभव विचार आणि भावनांची नोंद करते. ती लेखकासाठी एक सुरक्षित व खाजगी जागा असते. जिथे तो आपल्या मनातील गोष्टी खुल्यापणे व्यक्त करू शकतो. दैनंदिनीद्वारे आत्मचिंतन, आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळते व विचारांना एक दिशा मिळते.

'कथा सागरेश्वर अभयारण्याची' हेही धों. म. मोहितेंची रोजनिशीच आहे. कारण या अनुभवकथनाची विभागणी ३१ भागात केली आहे. प्रत्येक भागात एक अनुभव व्यक्त केला आहे. दैनंदिनीत तारखेनुसार सलग नोंदी केल्या जातात. पण या अनुभवकथनात सलग नोंदी नाहीत, तर प्रत्येक नोंदीच्या मध्ये बराच कालावधी गेलेला आहे. धों. म. मोहितेची स्मरणशक्ती ही अफाट आहे. अभयारण्य निर्मितीच्या काळात ते ज्या ज्या व्यक्तींना भेटले, ज्या ठिकाणी जाऊन आले त्यांचे सर्व तपशील या अनुभवकथनात येतात. काही ठिकाणी व्यक्तींची नावे संक्षिप्त दिली आहेत, तर काही ठिकाणी तारखेनुसार त्याचा तपशील दिला आहे. पहिल्याच भागात इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र वृक्षमित्र पुरस्कारासाठी ते दिल्लीला गेले होते. त्याचा सर्व तपशील तारीख, ठिकाण, वेळेनुसार दिला आहे. ते पुढील प्रमाणे, 'ठीक अकरा वाजून ५९ मिनिटांनी ललकारी, तुतारी, बँडच्या निनादात राष्ट्रपती डॉ. शंकर दया शर्मा यांनी अशोक हॉलमध्ये प्रवेश केला. सर्वजण उठून उभे राहिले आणि राष्ट्रपती व्यासपीठावर स्थानापन्न झाल्यावर खाली बसले. राष्ट्रपतींच्या उजव्या बाजूला वनमंत्री आणि डाव्या बाजूला वन सचिव बसले. हॉलमध्ये शांतता पसरली.' याच भागात पुरस्काराची व मोहितेंची माहिती देताना निवेदिकांनी केलेले निवेदन जसेच्या तसे हिंदीमध्ये त्यांनी लिहिले आहे. दैनंदिनीच्या स्वरूपातच मोहितेंनी पहिल्या भागाचे हुबेहूब लेखन केले आहे.

ताडोबा जंगलाला भेटीचा प्रसंग येथेही त्यांनी १९ मार्च १९७० च्या दिवशी जंगलाला भेटीचा प्रसंग सांगितला आहे. 'वेळ रात्रीची फाल्गुन महिन्याच्या शुक्ल पक्षातील द्वादशी. टिपूर चांदणे पडलेले. धरणीमाता चांदण्यात न्हावून निघत होती. आमची लक्झरी बस वेग सांभाळून धावत होती. गाडीत शिरणारी वाऱ्याची थंडगार झुळूक शरीराला मोहून टाकत होती.' त्या रात्रीचा प्रसंग चित्रित केला आहे. या अनुभवकथनात दिनांक सहित अनुभव मांडला आहे. तर कधी कधी तारखेचा उल्लेख नसला तरी महिना व सालाचा उल्लेख करून मोहितेंनी त्या वेळच्या अनुभवांचे चित्रण केले आहे. तारखेसहित नोंदी आढळत असल्याने मोहितेंनी हे अनुभवकथन लिहिण्या अगोदर या नोंदी नोंदवहीत लिहून ठेवलेल्या असाव्यात. तसेच त्या संबंधीची सर्व कागदपत्रे जपून ठेवलेली असावीत.

**८. नर्म विनोदी लेखनशैली**

'कथा सागरेश्वर अभयारण्याची, हे अनुभवकथन असले तरी त्याला विनोदाची झालर आहे. ती सर्वत्र दिसत नाही. पण बऱ्याच वेळा मोहितेने विनोदी अंगाने त्याचे लेखन केलेले दिसते. अनुभव- कथनाच्या सोळाव्या भागात यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर फोनवरचे संभाषण विनोदी अंगाने मांडले आहे.

''साहेब, मुंबईहून मी धो.म. मोहिते बोलतोय!'' माझ्या रागातील आवाजाची खंत साहेबांना जाणवली. ''कुठे आग लागली, बाबा?'' साहेबांचा चिंतेचा सूर! वन खात्याचे ते पत्र मी फोनवर वाचून दाखवले. वनमंत्र्यांच्या कार्यालयात घडलेला प्रकार त्यांना सांगितला. भांडण झाल्याचे तसेच एकमेकांच्या अंगावर धावल्याचे ही त्यांच्यापासून लपवून ठेवले नाही.

''काय म्हणावे तुला?'' साहेब समजुतीच्या स्वरात बोलले, ''वनमंत्र्याकडे गेलासच का तू? अरे, मला हे आधी सांगायचे. जेवलास की नाही?''

''जेवतो की..... उपाशी झोपतोय काय?'' मी अजून रागातच!

''तुझ्या शेजारी कुणी कार्यकर्ता आहे काय? त्याच्याकडे फोन दे.''

कार्यकर्त्याला साहेबांनी सांगितले, ''हा भडक डोक्याचा आहे, न जेवता झोपेल. त्याला ओढून नेऊन जेवायला घाला.'' यशवंतराव चव्हाण यांचा मिश्किलपणा व विनोदीबाज येथे येतो.

सागरेश्वर अभयारण्याच्या उभारणीत दुष्काळात सडकेचे जे काम चालू होते, या कामावर स्त्रियांची संख्या जास्त होती. ''महिला विभागाकडून काम करून घेण्यासाठी शंकर बाळकू पवार या कार्यकर्त्याची नेमणूक केली. पवार फार बोलके आणि कडक होते. काम चुकार बायांना ते धारेवर धरायचे. पवार हे आमच्या गावात पाहुणे म्हणून सगळ्या बायकांचे नात्याने भाऊ. त्यामुळे कुणाही बाईला ते कामाबद्दल रागाने काही बोलले तरी कुणाला त्याचे काही वाटायचे नाही. पवार दिसले की बायका म्हणायच्या, ''उठा, कामाला लागा. सासू आली!'' मी पवारांना एकदा गमतीने म्हटले, ''पवार बायका तुम्हाला आत्याबाई (सासू) म्हणतात आणि मला मामंजी (सासरा) म्हणून बोलवतात.'' सडकेच्या कामावर देवराष्ट्र्याचे परशराम बोंगळे कामावर आपले हॉटेल आणू लागले. ते आपल्या हॉटेलचे सामान सायकलवर घालून आणीत. नवरा बायको दोघेही असत. परशुरामाच्या हातात हँडल आणि बायको पाठीमागून सायकल ढकलीत असे. ते यायला लागले की कामावरील लोक म्हणत,''आली परशराम लायन सर्कस आली!'' अशा पद्धतीने या अनुभवकथनात मोहितेंनी बऱ्याच ठिकाणी विनोदी पद्धतीने लेखन केले आहे.

**९. सूक्ष्म निरीक्षणशक्ती**

कोणत्याही लेखकाकडे सूक्ष्म निरीक्षणशक्ती असावी लागते. अनुभवलेल्या, पाहिलेल्या लहानसहान गोष्टींचे निरीक्षण तो करीत असतो. समाजात घडणाऱ्या घटना प्रसंगाचे सूक्ष्म निरीक्षण त्याला करावे लागते. मोहितेंकडेही सूक्ष्म निरीक्षण शक्ती आहे. कारण या अनुभवकथनात अनेक लहान-सहान गोष्टींचे कथन त्यांनी केलेले आहे. आजूबाजूचे निरीक्षण त्यांनी केले होते. त्यातूनच सागरेश्वर डोंगरावर अभयारण्य करण्याची कल्पना त्यांना सुचली. सागरेश्वर हे अभयारण्य व पर्यटन स्थळ होऊ शकते हे त्यांनी अनुभवले व अभयारण्य करण्याचे ध्येय त्यांनी ठरवले. सागरेश्वर अभयारण्याच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर सागरेश्वर डोंगरात कोणता बदल व्हावा, हे त्यांनी ठरविले होते. सडकेच्या कामावर त्यांनीच रस्ता आखून देण्याचे काम केले होते. सागरेश्वर अभयारण्याच्या मान्यतेच्या वेळी कोणता अधिकारी, व्यक्ती आपल्याला मदत करू शकतो हे ते जाणून होते व त्यांच्याच पाठीमागे लागून ते काम करून घेत होते.

## ४.४ समारोप

सारांश रूपाने आपणास या घटकातून कथा सागरेश्वर अभयारण्याची या अनुभवकथनातील ऐतिहासिक, सामाजिक महत्त्व अभ्यासता आले. त्याबरोबरच मोहितेंचा सामाजिक व पर्यावरणीय दृष्टिकोन समजून घेता आला. मोहितेंनी या अनुभव कथनासाठी वापरलेली भाषा व लेखन शैलीचे विशेष पाहत आले. महत्त्वाचे म्हणजे या अनुभव कथनाचे वाडमयीन विशेषांचा अभ्यास करता आला. धों. म. मोहितेंचा सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय संघर्ष आपल्याला समजावून घेता आला

## ४.५ सरावासाठी प्रश्नोत्तरे

**प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.**

१. धों. म. मोहिते कोणत्या मासिकासाठी लेखन करीत होते?

अ) किर्लोस्कर ब) साधना

क) अनुष्टुभ ड) सकाळ

२. धों. म. मोहिते यांना राष्ट्रपतींच्या हस्ते कोणता पुरस्कार देण्यात आला?

अ) इंदिरा गांधी पर्यावरण पुरस्कार ब) इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार

क) प्रदूषण नियंत्रण राष्ट्रीय पुरस्कार ड) पद्मश्री पुरस्कार

३. सागरेश्वराचे मूळचे नाव काय होते?

अ) दंडोबा ब) समुद्रेश्वर

क) कुणकेश्वर ड) मल्लिकार्जुन

४. अभयारण्याबाबत जनजागृती करण्यासाठी कोणी पोवाडा तयार केला?

अ) धों. म. मोहिते ब) वसंत बापट

क) मंगेश पाडगावकर ड) शाहीर तांदळे

५. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनात कोणती निवेदन पद्धती वापरली आहे ?

अ) प्रथमपुरुषी निवेदन पद्धती ब) द्वितीयपुरुषी निवेदन पद्धती

क) तृतीयपुरुषी निवेदन पद्धती ड) आत्मनिवेदन

६. सागरेश्वर अभयारण्याला प्रथम परवानगी कोणी नाकारली होती?

अ) वनमंत्री तिरपुडे ब) यशवंतराव चव्हाण

क) वसंतदादा पाटील ड) शरद पवार

७. अभयारण्याची हेलिकॉप्टर मधून कोणी देखरेख केली होती?

अ) वनमंत्री तिरपुडे | ब) यशवंतराव चव्हाण

क) वसंतदादा पाटील | ड) शरद पवार

८. कोणत्या साली दुष्काळाने उग्ररूप धारण केले होते?

अ) १९८२ | ब) १९७२

क) १९७१ | ड) १९८०

९. अभयारण्याच्या कामावर असताना कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कोणते नाटक सादर केले होते?

अ) राजा शिवाजी | ब) भगवा झेंडा

क) मावळी मुजरा | ड) हयवदन

१०. सडकेवर काम करीत असताना विद्यार्थ्यांनी कोणते मंडळ स्थापन केले होते?

अ) अभयारण्य नाट्य मंडळ | ब) सागरेश्वर नाट्य मंडळ

क) कॉलेज नाट्य मंडळ | ड) अभयारण्य कला मंच

**उत्तरे :**

१. अ) किर्लोस्कर | २. ब) इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार
३. ब) समुद्रेश्वर | ४. ड) शाहीर तांदळे
५. अ) प्रथमपुरुषी निवेदन पद्धती | ६. अ) वनमंत्री तिरपुडे साहेब
७. ब) यशवंतराव चव्हाण | ८. ब) १९७२
९. क) मावळी मुजरा | १०. अ) अभयारण्य नाट्य मंडळ

**प्रश्न २ : दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद करा.

२. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाचे सामाजिक व पर्यावरणीय महत्त्व विशद करा.

३. 'कथा सागरेश्वर अभयारण्याची' या अनुभवकथनाचे वाङ्मयीन विशेष स्पष्ट करा.

**प्रश्न ३ : लघुत्तरी प्रश्न.**

१. 'कथा सागरेश्वर अभयारण्या'ची मधील निवेदन पद्धती

२. 'कथा सागरेश्वर अभयारण्या'ची मधील पर्यावरणीय महत्त्व

३. धों. म. मोहिते यांनी कथन केलेली 'सागरेश्वराची कथा'.

❍❍❍